KÂVYASANGRAHA. 34.

THE MAHÂBHÂRATA

OF

MOROPANT

(THE GREAT MARÂTHÎ POET OF THE MAHÂRÂSHTRA.)

7. DROṆAPARVA.

EDITED WITH

CRITICAL AND EXPLANATORY NOTES

BY

DÂMODARA KESHAWA OKA, B. A.

PRINCIPAL,

MARATHI NORMAL SCHOOL FOR MEN, AMARAOTI.

Second Edition.

PUBLISHED

BY

PÂNDURANG JÂWAJÎ,

PROPRIETOR, "NIRNAYA-SAGAR" PRESS.

BOMBAY.

1919.

PUBLISHER :—Pandurang Jawaji, } 'Nirnaya-sagar' Press,
PRINTER :—Ramchandra Yesu Shedge, } 23, Kolbhat Lane, Bombay.

काव्यसंग्रह ३४.

महाराष्ट्रकविवर्यमोरोपंतकृत

महाभारत.

७. द्रोणपर्व.

आर्या-छंदें जोडुनि रामायण-भारतादि आयकवी।
नायक वीर-कवींचा ऐसा होईल अन्य काय कवी ? ॥

हें

दामोदर केशव ओक, बी. ए.,
प्रिन्सिपाल, मराठी नार्मलस्कूल फॉर मेन, उमरावती,

यांनीं

अर्थनिर्णायक, पुराणेतिहासविषयक व अवांतर माहितीच्या विपुल टीपा देऊन
जुनाट हस्तलिखित प्रतींच्या आधारें शुद्ध करून तयार केलें.

तें
मुंबईत
पांडुरंग जावजी
यांनीं आपल्या 'निर्णयसागर' छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

आवृत्ति दुसरी.

सन १९१९.

॥ श्री ॥

कै० श्री. रा. रा. तुकाराम जावजीशेट चौधरी, जे. पी.

'निर्णयसागर' छापखान्याचे मालक, मुंबई.



जन्म ता० ९।४।१८६४. मृत्यु ता० २४।४।१९१८.

आळस अवघाच दवडावा । यत्न उदंड करावा ॥
शब्द मत्सर न करावा । कोणि एकाचा. ॥
उत्तम गुणीं शृंगारला । ज्ञानवैराग्यें शोभला ।
तोचि एक आणावा भला । भूमंडळीं. ॥
स्वयें आपण कष्टावें । बहुतांचें सोशीत जावें ॥
झिजोनि कीर्तीस उरवावें । नाना प्रकारें. रामदास.

प्रस्तावना.

हें पर्व प्रथमतः सुमारें वीस वर्षांपूर्वी 'काव्यसंग्रह' नामक मासिकपुस्तकांत खंडशः छापून प्रसिद्ध झालें. त्यानंतर आतां ही त्याची दुसरी आवृत्ति काढण्याचा प्रसंग, मराठी कवितेच्या भोक्त्यांच्या कृपेनें लाधला. ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. ही आवृत्ति तयार करण्याचें काम श्री० कै० तुकारामजी शेट ह्यांनीं फेब्रुआरी १९१७ मध्यें माझ्याकडे सोंपविलें होतें व त्यांच्या हयातींत सर्व काम तयार करून छापखान्यांत पाठविलेंही होतें. परंतु ते ही आवृत्ति तयार झालेली पाहाण्यास हयात नाहींत, ह्याबद्दल मला फार दुःख होत आहे. त्यांच्या सूचनेवरून तयार केलेली ही कृति त्यांस मोठ्या आदरानें अर्पण करीत आहें.

स्वतंत्रपणें प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथांत जो एकसूत्रीपणा आढळतो तो एखाद्या नियत कालिकांत ठरीव पृष्ठसंख्येस अनुसरून कित्येक दिवसपर्यंत चालू असलेल्या ग्रंथांत आढळणें प्रायः अशक्यच असतें. त्यांतही संपादकीय व्यवस्थेंत फेरबदल झाला तर एकतंत्रीपणाचें नांवच घ्यावयास नको. तसाच प्रकार ह्या पर्वाच्या प्रथमावृत्तीच्या बाबतींत झाला होता. कारण 'काव्यसंग्रहा'चे द्वारें मोरोपंतकृत आर्या—भारताच्या भीष्मपर्वापर्यंतच्या सहा पर्वांचें संशोधन आणि संपादन ती० कै० वामन दाजी ओक ह्यांच्या हातून होऊन, ते जून १८९७ मध्यें स्वर्गवासी झाले. त्यानंतर मध्यंतरीं सुमारें दोन वर्षांत निरनिराळ्या तीन संपादकांच्या कारकीर्दी पोरक्या 'काव्यसंग्रहा'स पाहाव्या लागल्या ! त्याचा परिणाम असा झाला, कीं त्या आवृत्तीच्या आरंभींच्या कांहीं पृष्ठांवर टीपा वाजवीपेक्षां ज्यास्त, तर पुढें जरूरीच्या ठिकाणींही त्यांचा अभाव ! तसेंच मूळ ग्रंथांत ठिकठिकाणीं अपपाठही घुसले होते. हे दोष नाहींसे करण्याचा प्रयत्न यथामति केला आहे. तो कितपत साध्य झाला आहे, हें ठरविणें वाचकांकडे आहे.

'केरळकोकिळ'कारांनीं द्रोणपर्व–अध्याय १ गीति १०० ह्या पद्यावर केलेली टीका माझ्या पाहण्यांत आलेली होती. 'मानवसे गमले न' ह्या पाठाबद्दल 'मानवके,[1] गमले न' असा पाठ माजी संपादकांस कोठें सांपडला नकळे ! असेच आणखी पुष्कळ ठिकाणीं अपपाठ आढळले. ते ह्या आवृत्तींत शुद्ध केलेले आहेत. ह्या कामीं पंतवंशज रा. रा. रामकृष्ण दत्तात्रय पराडकर यांनीं प्रसिद्ध केलेल्या आवृत्तीचा फार उपयोग झाला. ह्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

उमरावती
ता० १६–९–१९ } दा. के. ओक.

---

१ माजी संपादकांनीं दिलेल्या टीपा:—मानवके=हृष्ट झाले, गमले न=खेळले नाहींत. सर्वसंग्रहात व रा० पराडकर यांनीं पंतलिखित पोथीवरून छापलेल्या प्रतींत 'मानवसे गमले न' असाच पाठ आहे.

उपोद्घात.

आर्या-छंदें जोडुनि रामायण-भारतादि आयकवी ॥
नायक वीर-कवींचा ऐसा होईल अन्य काय कवी ? ॥

विठोबा अण्णा.

१. व्यासविरचित महाभारत हा एक अपूर्व ग्रंथ आहे. त्यांतील विविध विषयांच्या वर्णनामुळें 'व्यासोच्छिष्टं जगत्सर्वं' असें म्हणण्याची रूढी आहे. अशा ह्या महत्वाच्या ग्रंथाचा आस्वाद संस्कृत न जाणणाऱ्यांस घेतां यावा, म्हणून आपल्या महाराष्ट्रीय कवींपैकीं कमींत कमी १५।१६ जणांनीं आपल्या बुद्धिवैभवाचा उपयोग केला आहे. त्यांत मुक्तेश्वर, मोरोपंत व श्रीधर ह्यांचे ग्रंथ लोकप्रिय व रसिकमान्य झालेले आहेत. मोरोपंतांचा जन्म इ. स. १७२९ मध्यें झाला व इ. स. १७९४ त ते स्वर्गवासी झाले. पंतांनीं आपलें आर्याभारत रचण्यास इ. स. १७७२ चे सुमारास सुरुवात करून तें इ. स. १७८२ चे सुमारास पूर्ण केलें असावें, असें त्यांच्या पत्रव्यवहारावरून दिसून येतें. सारांश पंतांनीं आपला हा मोठा व अनेक दृष्टींनीं महत्वाचा ग्रंथ आपल्या प्रौढ वयांत संपविला. ह्यावेळीं मराठी भाषा त्यांनीं 'करतलामलकवत्' करून घेतली होती, व त्यांच्या काव्यरचनाशक्तीचा विकासही चांगला झाला होता.

२. आर्याभारत हें पंतांच्या प्रगल्भ बुद्धीचें सरस फल होय. यांत पंतांची प्रतिभा पूर्णत्वानें विकास पावली आहे. त्यामुळें ह्यांतील कविता मोठी सरस, हृदयंगम, कौतुकप्रद आणि माधुर्यप्रसाद-गुणयुक्त झाली आहे. तसेंच ह्यांची भाषा मोठी डौलदार, भारदस्त व संस्कृतमिश्रित असून, आणखी ती उपमारूपक-उत्प्रेक्षादि अलंकारांनीं खचून भरलेली आहे. ह्याशिवाय ओज, पदलालित्य, अर्थगौरव, प्रास, यमकें, इत्यादि इतर सामान्य कवींस दुर्मिळ असे अनेक गुणालंकार पंतांच्या काव्य-करंडकांत आढळतात.

३. आर्याभारत उत्कृष्ट वीररसानें भरलेलें आहे. भीष्म-द्रोण-कर्ण-शल्य-गदा हीं पर्वें वाचीत असतां उत्साह, क्रोध, आवेश, स्फुरण हे विकार वाचकाच्या मनांत इतके आविर्भूत होतात कीं, त्यास इतर विषयाचें भान रहात नाहीं. तो वाचनांत इतका गढून जातो कीं, तो आपलें देहभान विसरतो, व तो तो प्रसंग प्रत्यक्ष आपल्यापुढें दिसत आहे, असा त्यास भास होऊं लागतो. पंतांची वर्णनशैली इतकी बहारीची आहे, तरी 'वीररसाची, श्रवणें थोडी, नेत्रें उदंड, चव कळती' (अध्याय १२।११६) असें ते मोठ्या शालीनतेनें म्हणतातच. द्रोणपर्व हें वीररसप्रधान असून त्यांत प्रसंगानुरूप करुणादि इतर रसांची भटीही चांगली साधली आहे. (अध्याय ७ गीती १-३५ पहा).

४. पंतांनीं द्रोणपर्वात वीररस मूर्तिमंत ओतला आहे, हें वर सांगितलेंच आहे. द्रोणार्जुनांसारखे पराक्रमी वीर व 'वीरकवींचा नायक' त्यांच्या पराक्रमाचें वर्णन करणारा, अशी जोडी जमल्यावर वाचक देहभान विसरले, तर त्यांत आश्चर्य कसलें ? द्रोणाचार्य कांहीं सामान्य नव्हते. 'आहे चाप करीं, तों हा ब्राह्मण न आवरायाचा। जाईल यापुढें बा ! त्या देवांच्याही, आव, रायाचा. ॥' (अ० २१।६४) असें भगवान् श्रीकृष्णाचें व 'झांकाल तपन नयनें, तेजें काळासही न वांकाल ॥' (अ० ३।२) असें दुर्योधनाचें त्याच्या पराक्रमाविषयीं मत होतें. अर्जुन हा द्रोणाचा शिष्य खरा. पण तो आपल्या गुरूपेक्षां कांकणभर जास्तच होता. त्या गुरुशिष्यांच्या युद्धाचें वर्णन अध्याय २१ गीती २८–३५ यांत आहे. तें वाचून दोघांत जास्त पराक्रमी कोण ? हें ठरविण्याचें अवघड काम, शक्य असल्यास, वाचकांनींच करावें, हें बरें. भीम हा देखील मोठा पराक्रमी होता. पण आडमुठ्या होता. त्याची युद्धाची पद्धति 'भीम करी वीरांचें, वृक्षांचें, मथन, वातसा वाटे ॥' (अ० ११।९०) अशा प्रकारची होती. अभिमन्यु बिचारा सोळा वर्षांचा पण त्याचा पराक्रम द्रोणाचार्यांसही थक्क करून सोडणारा होता. त्याचा पराक्रम पाहून कर्ण-द्रोणांची गाळण उडाली. (अध्याय ३।११३ ते १२०) मग इतरांची त्यानें कशी दुर्दशा करून सोडिली असेल, तें लिहावयास नकोच. भीमपुत्र घटोत्कच हाही भीमास साजेसाच होता. त्याची युद्ध-रीति इतकी भीषण होती कीं, 'अत्युग्रता कधींही न भीमाच्या सूनुसम यमा यावी. ॥' (अध्याय १९।३६). पण तो मोठा पितृभक्त होता. 'मरतांहि पांडवप्रिय अद्भुत केलें घटोत्कचें, परिसा ॥ (अध्याय १९।४७). परंतु 'पितृहित किमपि न घडलें, धरुनि मनामाजि भाव हाचि, रडे.' ॥ (अ० १९।४८). अशा पितृभक्त पुत्राला मरण आल्यामुळें धर्मराजा दुःखानें व्याकुळ व्हावा, आणि संतापून जावा, हें साहजिक आहे.

पांडवपक्षीय वीरांत धृष्टद्युम्न आणि सात्यकी हेही मोठे वीर्यशाली होते. पांडवांस वेळोवेळीं त्यांनीं एकनिष्ठपणानें केलेल्या साहाय्यामुळेंच पांडव यशस्वी झाले. हे दोघे पांडवपक्षपाती नसते, तर त्यांची बाजू खात्रीनें लंगडी पडली असती.

५. श्रीकृष्णाची 'न धरीं शस्त्र करीं मीं, गोष्टी सांगेन युक्तिच्या चार ॥' अशी प्रतिज्ञा होती. पण तीच पांडवांस पथ्यकर झाली. त्याचें सर्व लक्ष पांडवांस जेणेंकरून जय मिळेल, अशा युक्त्या लढविण्यांत गुंतलेलें असे. जयद्रथवध प्रतिज्ञेची पूर्ति कृष्ण-कृपेशिवाय होणें शक्यच नव्हतें. पांडवांचा सत्पक्ष होता, म्हणून कृष्णास पांडवांविषयीं कळकळ वाटे. कृष्णाचें पांडवांवर प्रेम असून, त्यांतही अर्जुनावर विशेष होतें. भगदत्तानें सोडलेल्या वैष्णवास्त्रापासून अर्जुनाचा बचाव करण्यासाठीं 'प्रभुनें अनिवार्य म्हणुनि वक्षःस्थळ अंकुशास बोढविलें ॥' (अ० ३।६८). काय हें निःसीम प्रेम ! आपल्या मित्रासाठीं आपले प्राण गेले तरी बेहेत्तर, असें समजणारे मित्र किती दुर्मिळ आहेत, हें प्रत्येकास माहीत आहेच. कृष्ण आणि अर्जुन हे नरनारायणांचे

असतात. त्यांचें एकमेकांवर प्रेमही तसेंच अकृत्रिम आणि निष्कपट होतें. (अध्याय २०।४० ते ४१)

श्रीकृष्ण मोठा बुद्धिमान व चतुर होता. समयसूचकता व प्रसंगावधान हे दोन गुण प्रामुख्येंकरून त्याच्या आंगीं वसत होते. त्यानें अर्जुन व धर्मराज ह्यांची कर्ण व द्रोण ह्यांच्याशीं गांठच पडूं दिली नाहीं. अर्जुनाबद्दल घटोत्कचास पुढें करून त्यानें अर्जुनास वांचविलें. (अ० २०।५ ते १०). द्रोणाचार्यांनीं 'धर्मराजास धरून देतों' असें दुर्योधनास वचन दिलें होतें. पण कृष्णानें दोघांचा सामनाच होऊं दिला नाहीं. त्यानें 'राजानें राजासीं भांडावें, तदितरांस वरजावें । त्वां हे सेना घेउनि राजा धृत-राष्ट्र-सूनुवर जावें ॥' (अध्याय १८।११). अशी सल्ला देऊन त्यास दुसरीकडे लावून दिलें. तसेंच द्रोणाचार्य व अर्जुन ह्यांचेंही युद्ध होऊं दिलें नाहीं. पांडवांचा जय त्यांच्या भुजबळापेक्षां कृष्णाच्या बुद्धिबळावर ज्यास्त अवलंबून होता, ही गोष्ट ते पूर्णपणें जाणून होते. म्हणून ते त्यास फार पूज्य मानीत असत व त्याच्या सल्ल्याप्रमाणें वागत असत.

६. कौरवपक्षीय योद्धे पराक्रमाच्या बाबतींत कांहीं कमी होते असें नाहीं, पण त्यांना अपयश आलें, याचें कारण त्यांचा सत्पक्ष नव्हता. पांडवांविषयीं त्यांस लहान-पणापासूनच मत्सर वाटत असे, व त्यांनीं पांडवांचा नाश करण्याचे नानाविध उपाय योजिले. द्रोणपर्वांत असा प्रसंग म्हणजे कौरवांनीं अभिमन्यूचा अधर्मानें केलेला वध, हा होय. तसेंच कौरवसेनापती द्रोणाचार्य यांनींही ब्रह्मास्त्र न जाणणाऱ्यांवर तें अस्त्र सोडून त्यांस दग्ध केल्यामुळें अधर्माचें पातक जोडिलें होतें. (अ० २१।८८ ते ११२). तेव्हां अधर्मरूपी बीजाला अपयश आणि पराभवरूपी फळें आलीं, हें सृष्टिक्रमास अनुसरूनच झालें.

पांडवपक्ष अधर्मापासून अगदीं अलिप्त होता, असें नाहीं. पण त्यांचा त्यांत स्वार्थ-मूलक हेतू नव्हता. समाजस्वास्थ्य हा हेतू असल्यामुळें त्यांनीं क्वचित् केलेल्या अधर्मा-चरणाबद्दल त्यांस फारसा दोष देतां येत नाहीं. शिवाय, 'बापा ! केवळ धर्में राज-व्यवहार चालतो काय ? ॥' (अ० २२।६८). अशी राजनीतीच आहे. तसेंच 'जशास तसें' ह्या न्यायानें 'त्यांहीं तसाचि यांहीं केला आहे, अधर्म हा कांहीं ॥' (अ० २२।७५) अशी वस्तुस्थिति होती. मुख्य प्रश्न प्रथम अधर्माचरणास सुरुवात कोणीं केली ? असा आहे. त्याचें उत्तर प्रत्येकास माहीत आहेच.

७. पंतांनीं महाभारत, रामायण, व इतर पुराणें ह्यांचा आधार घेऊन पुष्कळ काव्यरचना केली आहे. त्यांचें काव्य उच्चप्रतीचें आहे. त्याचा 'स्थालीपुलाक' न्यायानें मासला पहावयाचा असल्यास द्रोणपर्वाचें वाचन पुरेसें होईल. पंतांच्या काव्यांतील सर्वसाधारण गुण त्यांत ओतप्रोत भरलेले आहेत. त्यांच्या काव्यांतील गुणांचें वर दिग्दर्शन केलें आहे. त्याखेरीज त्यांच्या कवितेंतील विशेष गुण असा आहे, कीं, त्यांनीं वर्णनीय पात्रांच्या स्वभाववैचित्र्याकडे पूर्ण लक्ष पुरविलें असून त्यायोजाने त्यांची

स्वभावाचें यथातथ्य वर्णन करण्याचें चातुर्य प्रकट केलें आहे. द्रोणपर्वांत रणांगणीचीं रणवर्णनें व वीरांचीं वीरश्रीयुक्त भाषणें इत्यादि प्रकार अपूर्व साधले आहेत. शस्त्रांचा खणखणाट, गदेचा गरगराट, बाणांचा सणसणाट, तोफांचा धडधुडाट, इत्यादि प्रसंगीं पंतांची शब्दयोजना मोठी कर्णमधुर, आणि हृदयंगम झाली आहे. पंतांची वर्णनशैली आटोपशीर व सफाईदार असते. मूळ कथाभाग कायम ठेवून, रसभंग होऊं न देतां, योग्य ती छाटाछाट करण्याचें कौशल्य, मराठी कवींत एकट्या पंतांसच साधलेलें आहे. आपल्या काव्यरचनेपासून ज्याला द्रव्यप्राप्ति करून घ्यावयाची असेल, त्यानेंच पाल्हाळ करावा, असें पंतांचें मत होतें. (अ० ५।५४). पंतांनीं जी इतकी ग्रंथरचना केली आहे, ती आपल्यास द्रव्यप्राप्ति व्हावी किंवा आपला नांवलौकिक व्हावा, म्हणून त्यांनीं केली नाहीं. तर केवळ आपला उद्धार व्हावा व संस्कृताभिमानी पंडितंमन्य जिचा पदोपदीं धिक्कार करीत असत अशा आपल्या मातृभाषेच्या सारस्वताची अभिवृद्धि व्हावी व तिला भारदस्तपणा येऊन तिचा दर्जा वाढवा, ह्या पवित्र हेतूनें व निरपेक्ष-बुद्धीनें केली आहे. पंतांच्या वेळीं कोणीं द्रव्यप्राप्तीच्या लोभानें गावाळ ग्रंथांचीं बाडें तयार केलीं असावीं व त्यास उद्देशून पंतांनीं हा कोरडा ओढिला असावा.

८. पंतांच्या काव्यांतील आणखी विशेष म्हणजे त्यांचें भाषाप्रभुत्व. त्यांच्यापुढें मराठी भाषा जणूं काय दासीप्रमाणें हात जोडून उभी होती, असें वाटतें. पंतांन, शब्दयोजना करण्याचे कामीं विचार करण्याचें कामच पडत नाहीं. अर्थानुषंगानें शब्दरचना कोमल, कठोर, कर्कश, मृदु व मधुर अशी केली असून, तीस यमका अनुप्रास, इत्यादिकांची जोड दिली आहे. यामुळें कवितेचा ध्वनि हा अर्थाचा प्रतिध्वनि असावा, असा जो पोपकवीचा सिद्धांत आहे, तो पंतांस संमत होता, असें म्हणावयास हरकत नाहीं. पंतांच्या काव्यांत भावी कोशकारांस पुष्कळ सामग्री मिळण्यासारखी आहे. प्रस्तुत पर्वांतील अपरिचित शब्द व भाषणसंप्रदाय ह्यांच्या सूची शेवटीं जोड-लेल्या आहेत. त्या पाहिल्या असतां, वाचकांची खात्री होईल. कोशकाराप्रमाणेंच व्याकरणकारांसही पुष्कळ साहित्य मिळेल. पंतांनीं मराठी भाषेस संस्कृती वळण लावण्याचा प्रयत्न केला आहे व संस्कृत व्याकरणानुसार प्रयोग केल्याचीं उदाहरणेंही ठिकठिकाणीं आढळतात.

९. जगांत निर्दोष असें कांहीं नसतें. सूर्यावर सुद्धां डाग आहेत. त्याप्रमाणेंच पंत-कृतींत यमकभंग, अयोग्य शब्दयोजना, शब्दांची ओढाताण, विशेष्याला न तोलणारें विशेषण—अशा प्रकारचे दोष क्वचित् आढळतात. पण त्याचें प्रमाण खंडींत पाव रती आहे. कोठें कोठें वीररसांत शृङ्गाराचें मिश्रणही केलेलें आढळतें. (अ० २०।७७, अध्याय २२।६१). पण त्याबद्दल पंतांस दोष देणें इष्ट होईल, किंवा नाहीं हा प्रश्न आहे. कारण पंतांनीं गीर्वाण—साहित्यशास्त्राचा अभ्यास केला होता, व 'वीरशृङ्गारयोः अविरोधः' [रसगंगाधर] हा त्यांनीं नियम पाळलेला आहे. शिवाय पंत-कालीन अभिरुचि कशी होती, ह्या गोष्टीकडेही आपणांस लक्ष दिलें पाहिजे.

१०. पंतांच्या काव्यांत सुभाषित–रत्नें इतस्ततः किती तरी विखुरलेलीं आहेत. पण त्यांचें महत्व किती आहे, तें अद्याप आपले लक्ष्यांत आलेलें नाहीं. तीं सर्व एकत्र केलीं, व त्यांची विषयानुसार मांडणी केली, तर त्यांचें एक लहानसें 'भांडार' सहज बनेल. हीं सर्व पंतांच्या मालकीचीं असून, त्यांचा नीतिशिक्षण देण्याचे कामीं आपणांस फार उपयोग होणार आहे. प्रतिज्ञापालनासंबंधी पुढील पंक्ती—

॥ बहु रक्षिति प्रतिज्ञांप्रति जैसे कुळवधूप्रति ज्ञाती. ॥ (अ० ११।२४)

॥ रक्षोचित प्रतिज्ञावच, न तसें धन, कलत्र, शिर कविला. ॥ (अ० ९।७३)

॥ वचनाशि कुलज, न शिरा, खरासि, न देवता जपो कळसा. ॥ (अ० २१।२०)

तसेंच यशोरक्षणाविषयीं खालील गीत्यर्धें—

॥ त्यजिति, हित सुयश जोडुनि, कवि पलभुग्भोग्य-कायगाबाळ. ॥ (अ०८।३७)

॥ कीं म्हणति, 'न हो अयशीं, हो मृत्युमुखांत आशुपतन' मुनी. ॥ (अ० ८।९५)

॥ कीं शोभाघ्ना अयशा मी सुकुलज, जेंवि जडित नग तेला. ॥ (अ० १७।९६)

॥ करिती बहु कीं, शोका सुयशांनीं ती न रत्न-हेमांनीं ॥ (अ० १८।२३).

॥ सोसे कुलजा मृत्यु, न अयशाचा सोसवे चुना नाकीं ॥ (अ० २१।५८).

ह्या सारखींच पुढील पद्यें:—

॥ कर्ण म्हणे, न वद असें, करिती आचार्य जनककुरसा जे ॥

॥ त्यांसचि 'पशु' म्हणति कवि, न जरि पुच्छ विषाण घनककुद् साजे.॥ (अ०१६।७)

॥ गमला कृष्ण प्राकृत, धर्महि, ज्या स्पष्ट तो पशु भ्रमला ॥ (अ० १७।५०)

॥ कीं त्रिजगद्गुरुवरवच जो न करिल तोचि पशु न सामान्य ॥ (अ० २१।७१)

हीं व अशा सारखींच आणखी कितीतरी आपल्या जिव्हाग्रीं निरंतर नाचत रहावीं व त्यांचा आपल्या आचरणावर इष्ट परिणाम घडावा, असें कोणास वाटणार नाहीं?

पंतांच्या कवितेविषयीं सामान्यतः मला काय वाटतें, त्याचें थोडक्यांत वर दिग्दर्शन केलें आहे. तें वाचून पंतकृतीचें परिशीलन करण्याची आवड आपल्या लोकांत उत्पन्न होवो, अशी ईशचरणीं प्रार्थना करून, हा लांबत चाललेला लेख पुरा करितों.

उमरावती
ता० १६-९-१९ } द्वा० के० ओक.

अनुक्रमणिका.

एकंदर ग्रंथसंख्या–२५०१

परिशिष्टें.

मोरोपंतकृत महाभारत.

७. द्रोणपर्व.

(गीतिवृत्त)

अध्याय पहिला.

योधवरतातपतनें[1] अनुदिन धृतराष्ट्र होय कष्टी, तें[2] ।
किति वर्णावें ? विजनीं[3] अंध रडे हारवूनि यष्टीतें[4]. ॥ १
योगीश्वरसा[5] साक्षात् जो पाहे सर्व संजय ज्ञानी, ।
तो ये पुरासि[6], चिंतित जें गावें पादकंज[7] यज्ञांनीं. ॥ २
'शिबिराहुनि आलों मी संजय नमितों[8]' असें वदे, त्यातें. ।
नृप वृत्त पुसे, सांगे गावल्गणि[9], कर्ण चित्त दे[10][11] त्यातें. ॥ संजय ३
'भीष्म पडतांचि गेले सर्वांचेही पळांत ओवांके[12]; । धैर्य.

---

१. वीरश्रेष्ठ जो पितामह (भीष्म) त्याच्या पतनानें, तो शरपंजरीं पडला म्हणून. भारतांत भीष्मास 'धनुष्मतां केतुः' असें म्हटलें आहे. या प्रथम पद्याचें प्रथमाक्षर 'यो' असें आहे, तें 'श्रीपांडवसहायो भगवानरविंदाक्षो जयति' ह्या अष्टादशाक्षरी संस्कृत वाक्याचें सातवें अक्षर आहे. पंतकृत महाभारताच्या प्रत्येक पर्वाच्या पहिल्या गीतीचें आद्याक्षर घेतलें असतां पूर्वोक्त संस्कृत वाक्य निष्पन्न होतें, हें सुप्रसिद्ध आहे. २. धृतराष्ट्राचें कष्टी होणें. ३. अरण्यांत; जेथें मनुष्यसंचार नाहीं तेथें. ४. काठीला. 'आंधळ्याची काठी' अरण्यांत हरवली म्हणजे अंध जसा रडतो व त्याच्या शोकास पारावार नसतो, तसा धृतराष्ट्र रडला, त्याचें वर्णन, पंत म्हणतात, 'किती करावें ?' भीष्म ही त्या अंधाची काठी होती. ह्या दृष्टांतांत 'विजनी' शब्दाची योजना समर्पक झाली आहे व या योजनेनें 'भीष्म पडल्यावरोबर सर्व कौरवसैन्य धृतराष्ट्रास अरण्यवत् वाटलें' असें सुचविलें आहे. हा दृष्टांत मूळांत नाहीं. ५ योगेश्वराप्रमाणें. ज्याला सर्वसाक्षित्व व्यासप्रसादानें प्राप्त झालें असा सर्वद्रष्टा संजय. योगेश्वर हें कृष्णाचें व याज्ञवल्क्याचें नांव आहे. ६. हस्तिनापुराला. पुर=शहर. ७. चरणकमल. जें परमेश्वरचरणकमल यज्ञाच्या स्तुतीस विषय होतें, त्या पदकमलाचें चिंतन करीत संजय पुरास आला. सर्वसाक्षित्व प्राप्त झालें, तरी परमेश्वरध्यान करीत असावें, असें येथें सुचविलें आहे. ८. धृतराष्ट्र अंध म्हणून नामग्रहणपूर्वक 'नमस्कार करितों' असें सांगावें लागत आहे. ९. गवल्गणपुत्र (संजय). गवल्गण हा धृतराष्ट्राचा सारथी होता. १०. त्यातें कर्ण (कान) व चित्त (लक्ष्य, मन) दे (धृतराष्ट्र देता झाला). 'इंद्रियमनःसंयोगात् ज्ञानं जायते' असा सिद्धांत आहे. इंद्रियाचा (प्रस्तुत कर्णेंद्रियाचा) व मनाचा संयोग झाला हें दाखविण्यासाठीं पंतांनीं 'कर्ण चित्त दे त्यातें (त्या वृत्ताला)' असें म्हटलें आहे. ११. सावधानपणानें धृतराष्ट्र ऐकूं लागला. १२. धैर्य, अवसान.

सु नसतां धुरंधर वृषभ बाळवृष भेरें, करूनि 'ओं', वांके. ॥ ४
कुरुकटका आठवला कर्ण महासंकटीं गजा हरिसा; ।
देउनि दर्शन वदला तो जें तें सर्व सांगतों, परिसा. ॥ ५
भीष्म 'देवव्रतेंचि केली सत्य असाधारणा प्रतिज्ञा ती; ।
आहे क्षम भाराच्या कोण असा धारणाप्रति ज्ञाती ? ॥ ६
रविरुचिचें तीमांगें संपादे स्वल्प काज वातीस. ।

---

१. धुरं धारयति स धुरंधरः, धुरीचा. २. खोंड. ३. ओझ्यानें. ४. तोंड वासून. या ओळींतील **दृष्टांत** किती समर्पक आहे हें रसज्ञांस सांगण्यास नकोच. ५. भारतांत कर्णास 'देवव्रतोपम (भीष्मासारखा)' असें म्हटलें आहे. भीष्मानें आपला अपमान केला असें समजून कर्णानें 'भीष्म जिवंत आहे तोंपर्यंत मी युद्ध करणार नाहीं' अशी प्रतिज्ञा केली होती, ती अभियुक्त वाचकांच्या लक्ष्यांत असेलच. ६. गजाला. गजेंद्राला नक्रानें धरिलें, तेव्हां त्याला जसें हरीचें स्मरण झालें, त्याप्रमाणें भीष्मपतनानें व्यसनाधीन झालेल्या कौरवांस कर्णाचें स्मरण झालें. या **उपमेवरून** कर्णाची योग्यता व कौरवानीं त्यावर ठेवलेला विश्वास यांची उत्तम कल्पना होते. ७. कर्ण. ८. ऐका. ९. देवव्रत=भीष्म. 'गांगं देवव्रतं नाम पुत्रं सोऽजनयत्प्रभुः । स तु भीष्म इति ख्यातः कौरवाणां पितामहः ॥' (हरिवंश). त्यानेंच (भीष्मानेंच) ती असाधारणा (दुसऱ्यास असाध्य, दुष्कर) प्रतिज्ञा ('कृष्णाला शस्त्र धरावयास लावीन' ही प्रतिज्ञा) सत्य (यथार्थ) केली. भीष्मानें अतिदुर्धर प्रतिज्ञा केली होती, आणि त्यानें ती खरीही केली. इतराच्या हातून तें कर्म झालें नसतें व होणारही नाहीं. असो, असा (महारथी जो भीष्म त्याच्यासारखा) भाराच्या धारणाप्रति (सेनापतीचें जें अवघड कर्म त्याच्या ओझ्याचा भार घेण्याला, धारण करण्याला) कोण ज्ञाती (ज्ञानयुक्त वृद्ध पुरुष) क्षम (समर्थ) आहे ? अर्थात् कोणी नाहीं. १०. सूर्यप्रकाशाचें. ११. सूर्यप्रकाश अस्तंगत झाल्यावर, त्याच्या परोक्ष. १२. वातीस रविरुचिचें काज (काम) स्वल्प (फारच थोडें) संपादे (संपादतां, करितां येतें). म्हणजे सूर्य अस्तास गेल्यानंतर आपण दिवा लावतों व त्या मंद प्रकाशाच्या साहाय्यानें आपलें काम करून घेतों हें खरें, म्हणून वातीच्या हातून रविप्रभेचें काम संपादवेल काय ? नाहीं. कोठें सर्व जगास आपल्या प्रभावानें सुप्रकाशित करणारी रविप्रभा ! आणि कोठें दिवळीमध्यें मिणमिण जळणारी वात ! दोहोंमध्यें जमीनअस्मानचें अंतर ! हेंच महदंतर महाप्रतापशाली भीष्मामध्यें व इतर कुरुवीरांमध्यें आहे, असें कर्णानें—नव्हे कवीनें—या ओळींतील **अप्रस्तुतप्रशंसेनें** सुचविलें आहे. कर्णानें येथें अभिव्यक्त केलेला स्वतःसंबंधीं विनय ध्यानांत ठेवण्याजोगा आहे. पुनः कर्ण म्हणतो, 'अल्प तेज प्रकट करुनि काजवा तीस विसरविल काय ? म्हणजे काजव्याचा अल्प प्रकाश पाहून मनुष्यास रविप्रकाशाचें विस्मरण होईल काय ? स्वतःलाही ज्याचा प्रकाश पुरत नाहीं, तो काजवा दृष्टीस पडला म्हणून सूर्याचें विस्मरण होत नाहीं, तसेंच भीष्माचेंही विस्मरण आम्हांस

विसरविल काय तेज प्रकट करुनि अल्प काजवा [1]तीस ? ॥ ७
[2]भीष्माच्या पतनाची चित्तांत धरूं नका व्यथा राया ! ।
[3]कुरुगुरुपुढें समर्थ न, [4]सुरगुरु, तोही न [5]काव्य, [6]थाराया. ॥ ८
प्रार्थुनि अभिषेकावा, देइल वर, होय [7]सुर-तरुचि, राजा ! ।
वरितिल देवी[8] जाणति सर्व कला विविध सुरत-रुचिरा [9]ज्या'. ॥ ९
कुरुराज म्हणे, 'गुरुजी ! सेनापति [10]शत्रुबलविरामा व्हा, ।
तुमची [11]आव्हा पळवू [12]अहितमदा, जेंवि पळवि [13]रामाव्हा.' ॥ १०
द्रोण म्हणे, 'सेनापति होतों म्हणतोसि जरि, परि [14]स्पष्ट ।
[15]धृष्टद्युम्नासि न मी वधिन, करीन त्वदर्थ बहु कष्ट. ॥ ११
मी समर **पांडवांसीं** करिन, हरिन [16]अरिनराधिपतिकटकें. ।
भट केंवि टिकेल इतर? [17]गरुड निरखिजेल काय गा ! [18]चटकें ? ॥ १
मज गुरुसीं [19]गुरुवत्सल **पांडव** रण न करितील [20]उत्साहें; ।

होणार नाहीं.' 'अल्प' हें विधिविशेषण करून 'अल्प विसरवील . काय ?' (थोडें तरी विस्मरण पाडील काय ?) असाही अर्थ करितां येईल.

१. रविरुचीस. २. असें आहे तथापि कर्ण दुर्योधनास धीर देण्यासाठीं म्हणतो, 'राया ! घाबरूं नको.' ३. द्रोणापुढें. ४. बृहस्पति. ५. दैत्यगुरु शुक्राचार्य. ६. उभें राहण्यास. ७. कल्पतरु. ८. रिद्धि, सिद्धि वगैरे देवी. ९. शृंगाररसपोषक अशा सर्व कला. कर्णाच्या बोलण्यांतील भाव असा कीं, द्रोणाचार्यांनीं मनःपूर्वक युद्ध केल्यास पांडवांचें निर्मूलन होऊन 'निर्वीरमुर्वीतलम्' होईल आणि शत्रु नाहींसे झाल्यामुळें आपल्यास शृंगाररसपोषक ज्या ललितकला त्यांची माधुरी स्वस्थपणें चाखावयास सांपडेल. १०. शत्रुसैन्याचा नाश करण्यासाठीं. ११. कीर्ति, नामप्रभाव. यापासूनच 'आवाई' शब्द झाला असावा. १२. शत्रूंचा गर्व, त्याला. १३. भार्गवरामाचें नांव ऐकिल्याबरोबर जसा सर्वांचा अभिमान विगलित होऊन जातो, त्याप्रमाणें त्याचे शिष्य जे आपण हे सेनापति झाले ही आवाई ऐकल्याबरोबर शत्रुमदाचा ऱ्हास होवो. १४. स्वच्छ सांगून ठेवितों कीं. १५. धृष्टद्युम्न हा द्रोणवधार्थ उत्पन्न झाला होता. 'पार्षतं तु रणे राजन्न हनिष्ये कथंचन । स हि सृष्टो वधार्थाय ममैव पुरुषर्षभः ॥' (महाभारत—द्रोणपर्व अ० ७.) आपल्या 'वधार्थ उत्पन्न झालेल्या वीराला मी मारणार नाहीं' ही युद्धनीति ज्या काळीं प्रचलित होती, त्या युगांतील लोकांच्या सुनीतिमत्तेचें वर्णन करावें अगर त्यांच्या दैवपरतेविषयीं अनुदार उद्गार काढावे हें कांहींच समजत नाहीं. १६. शत्रूंकडील राजांचीं सैन्यें. १७. येथें दृष्टांत अलंकार आहे. १८. चिमणीनें. १९. गुरूवर प्रेम करणारे. २०. मनापासून.

येईलचि त[1]च्चित्तीं कीं होइल सज्जनांत कु[2]त्सा हें'.[3] ॥ १३
ऐसें वदोनि कुरुगुरु विधिनें अभिषेक करुनि घे, रा[4]या ! ।
त्यासि न शकले पां[5]डवभटकोटिहि धैर्ये करुनि घेरा[6]या. ॥ १४
गुरुरथवेग असह्यचि झाला त्या वि[7]ष्णुपत्ररथवेगा, ।
केला पांच दिवस बहु युद्धचमत्कार तो न कथवे गा ! ॥ १५
धृष्टद्युम्नें वधिला अ[8]न्यायें सकल सैन्य हळहळतें; ।
गुरुमरण तसें देतें जैसें दे मोह दै[9]न्यें हळहळ तें. ॥ १६
धृतराष्ट्र विलाप करी, बहु आपण आपणासि निंदुनि घे; ।
स्मृति ह[10]रपे करपेचि, न तन्नयनांतूनि अश्रुबिंदु निघे. ॥ १७
'सूता ! जो वाढविला [11]स्वपराक्रमसाच विप्र म[12]त्तातें ।
धृष्टद्युम्नें वधिला ! हें वाटो साच वि-प्र[13]मत्तातें. ॥ १८
भीष्मद्रोण रविशशी गिळिले [14]पांचाळकाळराहूनीं ।

---

१. पांडवांच्या मनांत. २. निंदा. ३. उत्साहानें गुरूबरोबर युद्ध केलें असतां, आपली निंदा होईल, ही गोष्ट. ४. धृतराष्ट्रा ! ५. शेंकडों लक्ष पांडवपक्षीय योद्धे. ६. गुरूला कोंडण्यास, त्याच्या भोंवतीं घेरा घालण्यास. ७. पत्र (पंख)+रथ. पंख हेच रथ ज्याचा असा पक्षी. विष्णूचा पत्ररथ=गरुड त्याचा वेग, त्या वेगाला (गतीला). ८. अधर्मानें. ९. जैसें दैन्य मोह (आणि) हळहळ दे (देतें) तसें तें गुरुमरण देतें. दीनता (गरीबी) ज्याप्रमाणें मोह व हळहळ उत्पन्न करिते, त्याचप्रमाणें कुरुगुरूचें तें (तसल्या प्रकारचें) मरण मोहाला व हळहळण्याला कारण झालें आहे. १०. हरपली, जणों काय नाहींशी झाली; जणों काय करपून तिची राखरांगोळी झाली; म्हणून धृतराष्ट्राच्या डोळ्यांतून एक अश्रुबिंदु सुद्धां निघाला नाहीं. धृतराष्ट्राचा शोकावेग इतका प्रज्वलित झाला कीं, त्या बिचाऱ्याची स्मृति नष्ट होऊन गेली व द्रोणाचार्यासारख्या 'शापादपि शरादपि' शत्रूंस स्वर्गलोकीं पाठविणाऱ्या कुलगुरूचा वध झाला हें ऐकून त्याच्या डोळ्यांमधून अश्रूच निघेनात. निघणार कोठून ? अंतःकरण करपून गेल्यावर रडणें तरी येणार कोठून ? असो; येथें करुणरस प्रधान असून शोक हा स्थायिभाव आहे. भरताचार्यांनीं 'तस्य अश्रुपात–परिदेवन–मुखशोषण–वैवर्ण्य–स्रस्तगात्रता–निःश्वास–स्मृतिलोपादिभिरनुभावैः अभिनयः प्रयोक्तव्यः' असें आपल्या नाट्यशास्त्रांत सांगितलें आहे. परंतु धृतराष्ट्राचा शोक अनिवार झाला तेव्हां अंतःकरण करपून जाऊन अश्रूंचा झराच आटून गेला असें पंतांस दाखवावयाचें आहे. ११. स्वतःचा पराक्रम वाढवितात तसा. १२. माझा तात जो भीष्म त्यानें. १३. अतिउन्मत्ताला. अत्यंत भ्रांति झाली आहे अशा मनुष्याला मात्र हें खरें वाटेल. सारांश हें सयुक्तिक अगर संभवनीय नाहीं. १४. येथें रूपक आहे. भीष्मद्रोण हे सूर्यचंद्र व या तेजोराशींचा ग्रास करूं पाहणारे पांचालकुलोत्पन्न शिखंडी व धृष्ट-

निववित होते कीं ते जननयनां सर्वकाळ राहूनी. ॥ १९

मरण न ये, उर न[1] उले, जरि हें बहु शोकपर्व[2] तापवितें; ।
विधि[3] न धरी भेदाया कां या धृतराष्ट्रपर्वता पैवितें[4] ? ॥ २०

कविवृंद[5] सदुपदेशें तुज शिणवुनि, देवि ! वाणि ! तळमळले; ।
हा कोळसा कराया शुद्ध, धुतां व्यर्थ पाणितळ मळले ! ॥ २१

बहु जन बुडवुनि शोकीं दुष्टा दुर्योधना ! बुडालास, ।
मकरालय[6] लंघाया मत्ता मशका ! कसा उंडालास ? ॥ २२

गज[7] गोष्पदीं बुडाला ! हा दैवा ! सिंधु शोषिला मशकें ! ।
न शकें सोसाया हें, वधिला तो[8] केसरी कसा शशकें ? ॥ २३

आली मूर्च्छा; सूता ! उत्तम होइल जरी न वांचेन, ।
कांचेन[10] आधिपाशीं, सुत शोकचि, गुण सुपाक यांचे न. ॥ २४

द्युम्र हे काळराहू होत. धृतराष्ट्र म्हणतो, 'हे रविशशी जननयना (लोकांचे डोळ्यांला) सर्वकाळ राहूनि (अखिलांत असून, प्रकाशून) निववीत होते (समाधान व आनंद देत होते.) रविचंद्र नियमितकाळींच प्रकाश देतात; पण भीष्मद्रोण हे सर्वकाळ प्रकाशित असून लोकनयनांस आनंद देत असत. सारांश, सूर्यचंद्रांपेक्षां भीष्मद्रोणांची योग्यता जास्त वर्णिली आहे म्हणजे उपमानापेक्षां उपमेय थोर असें दर्शविलें आहे, म्हणून येथें द्वितीयार्धांत व्यतिरेक अलंकार झाला आहे.

१. फाटत, विदीर्ण होत नाहीं. उत्तररामचरित तिसरा अंक 'दलति हृदयं' हा श्लोक पहा. २. शोकप्रसंग. ३. ब्रह्मदेव, प्रारब्ध. ४. वज्राला. ५. कविवृंद (व्यास, भीष्म, नारद, विदुर, मार्कंडेय, दुर्वासादि शहाणे पुरुष). हे देवि वाणि ! (वाग्देवते, सरस्वति!) सदुपदेशें (चांगला उपदेश आम्हांला करितां करितां) तुज शिणवुनि (तुला व्यर्थ त्रास दिला, श्रम दिले म्हणून) तळमळले (त्या कविवृंदाला फार चुटपुट लागली. त्यांना फार वाईट वाटलें, खेद झाला.) हा कोळसा शुद्ध कराया (करण्यासाठीं) धुतां (धूत असतां) पाणितळ (तळहात) मात्र व्यर्थ (निष्कारण) मळले (मळीण झाले). कोळसा धुऊन स्वच्छ व गोरा करण्यासाठीं धूत असतां त्यांचे हात मात्र निष्कारण मळून गेले ! धृतराष्ट्रानें स्वतःला कोळसा म्हणवून घेऊन आपली लोभवृत्ति नष्ट करण्याचें काम कोळसा गोरा करण्याइतकें दुष्कर होतें असें सुचविलें आहे. येथें द्वितीयार्धांत निदर्शना अलंकार आहे. ६. समुद्र. ७. दृष्टांत अलंकार मुख्य असून रूपक गौण आहे. ८. येथें अतिशयोक्तिमूलक विरोध अलंकार आहे. कारण अत्यंत अल्प असून कार्य फार मोठें झालें आहे. कोणी यास असंभव म्हणतात; व इतर विरोध म्हणतात. अशक्य वस्तु शक्य झाली आहे. हत्तीनें गाईच्या पावलांत बुडणें वगैरे असंभव गोष्टी होत. ९. द्रोणाचार्य. १०. मी जगलों नाहीं तर चांगलें होईल, असें म्हणण्याचें कारण,

हा [1]भार्गवास्त्रसर्वस्वसुपात्रा ! [2]त्वद्बळें [3]हरिप्रति मीं ।
न चुकलों, नव्हतों जयकण कल्पित अर्जुनीं हरिप्रतिमीं. ॥ २५
'हा द्रोणा ! हा द्रोणा ! हा द्रोणा ! मृत्यु तुज कसा घडला ?' ।
ऐसें रडोनि [4]धडधड धरणीवरि तो [5]धरापती पडला. ॥ २६
यापरि [6]कुरुगुरुच्या बहु शोकभरें होय [7]काय [8]कारा [9]जा; ।
उठविति वारा घालुनि, शिंपुनि [10]शीतांबु वायका राजा. ॥ २७
मूर्च्छा दैवें, [11]आप्तोपायें [12]कश्मलजलधीस तो नरपति तरे; ।
करुनि बहु विलाप म्हणे, 'निंदिल धर्मासि जो नर [13]पतित रे ! ॥ २८
रे संजया ! महात्मा राजर्षि [14]अजातशत्रु कोपविला; ।
पुण्यश्लोक, तपोनिधि, भस्म कटाक्षें [15]करील तो पविला. [16] ॥ २९
एकेंचि [17]गदाघातें भेदिल [18]भीमप्रभाव भीम [19]नगीं; ।
शरभास जसें हरिचें, माझें ऐकोनि त्यास [20]भी मन गा ! ॥ ३०
अर्जुन नर, नारायण कृष्णप्रभु [21]परमपूतनामा, या ।
बाळपणींहि न शकली माराया करुनि [22]पूतना [23]माया. ॥ ३१

माझे सुत (दुर्योधनादि पुत्र) शोकचि (मूर्तिमंत शोक आहेत) व त्यांचे गुण सुपाक (चांगले, प्रशंसनीय) नाहींत, यामुळें [मी जगलों तर] आधिपाशीं कांचेन (दुःखामुळें तिळतिळ तुटेन).

१. भार्गवरामाच्या अस्त्रसर्वस्वाला (सर्व अस्त्रसमूहाला) उत्तम पात्र (भाजन, आंडें, विश्रांतिस्थान) होणाऱ्या गुरुद्रोणा ! २. तुझ्या जोरावर, विश्वासावर. ३. श्रीकृष्णसदृश असाला. दुसरा कृष्णच असा जो अर्जुन त्याला जयलेश प्राप्त होईल असें मला वाटत नव्हतें. ४. 'धडडड' असें पाठांतर. ५. धरापति=भूपति. या अर्थांत पडण्याची क्रिया दाखविणाऱ्या 'ध' या अक्षराची अनेक वेळ आवृत्ति झाली आहे. ६. द्रोणाबद्दल. ७. देह. ८. बंदीखाना. ९. जा=ज्या=ज्याला, धृतराष्ट्राला. १०. गार पाणी. ११. आप्तांनीं उपचार केले म्हणून. १२. मूर्च्छारूपी समुद्राला. १३. पापी. १४. धर्मराजा. १५. तो तपोनिधि पविला (वज्राला) कटाक्षें भस्म करील, असें त्याचें सामर्थ्य आहे. १६. वज्राला. १७ गदेच्या प्रहारानें. १८. भयंकर आहे सामर्थ्य ज्याचें असा. १९. पर्वताला. २०. **उपमा** अलंकार. शरभ हा सिंहाचा पराभव करणारा पक्षिविशेष. २१. अति पवित्र आहे नाम ज्याचें असा. २२. कंसानें कृष्णास मारण्यासाठीं पाठविलेली एक राक्षसी. हिनें स्तनांत विष भरून त्या योगें कृष्णास मारावें, असें कपट केलें होतें. २३. कपट.

मथिला वत्स, अघ, तृणावर्त, कपटि खलवतंस बक, राहो. ।
कालियकेशिदमन हरि हरि, हरि! हरि! होय कंस बकरा हो ! ॥ ३२
न सरेल वानिलें जरि दिव्यसहस्राब्द आठ यामहि म्यां, ।
लाजोनि अनंताच्या ज्ञानें दिधलीच पाठ या महिम्या. ॥ ३३
जात्यंधासहि मजला देवें निज दिव्यरूप दाखविलें; ।
दांडुनि दयोदधीनें दीना सगदास अमृत चाखविलें. ॥ ३४

---

१. खलमुकुटमणी. 'खलावतंस' बद्दल 'खलवतंस' असा प्रयोग वृत्तसुखासाठीं पंतांस करावा लागला. २. कंस हा बकरा झाला व हरि (श्रीकृष्ण) हरि (सिंह) झाला. हरि हरि (हर हर वगैरे जसा आपण श्रीदेवनामाचा उच्चार करितों, तसा धृतराष्ट्र करित आहे.) कृष्णानें गोकुळांत राक्षस मारिले त्यांची यादी या गीतींत आहे. राहो (यांची गोष्ट राहूं द्या). ३. देवांचीं हजार वर्षें. ४. याम=प्रहर. आठ प्रहर (अहोरात्र). ५. मीं धृतराष्ट्रानें भगवद्यशाचें वर्णन केलें. ६. शेषाच्या. ७. पाठीमागें सरलें, पळून गेलें. सहस्रमुखी शेषाचें ज्ञान परमेश्वरमहिम्याला लाजून पळून गेलें. अंत नाहीं म्हणून शेषास अनंत म्हटलें आहे. सर्वकाल असणारा सर्वसाक्षी शेष सुद्धां महिम्याचें वर्णन करितांना भागला, मग माझा काय पाड ? येथें **कैमुतिकन्याय** व **अर्थापत्ति (अनुमान)** अलंकार आहे. ८. जन्मापासून अंधळा, जन्मांध. ९. पांडवांनीं बारा वर्षें अरण्यवास व एक वर्ष अज्ञातवास भोगिल्यानंतर, कौरवांपासून आपला यथायोग्य राज्य-भाग द्यावा म्हणून धर्मानें कृष्णास दुर्योधनाकडे पाठविलें. त्या प्रसंगीं त्यानें कृष्णाचा हितबोध अमान्य करून, तो पांडवपक्षपाती असल्यामुळें त्यास बांधून बंदींत ठेवण्याचा विचार केला. हें वर्तमान सात्यकीनें सभेंत येऊन कृष्ण व इतर सभासद यांस विदित केलें. तेव्हां कृष्णानें तेथें लोकपालांसहित आपलें दिव्यरूप प्रगट करून, सर्वांस आपल्या सामर्थ्याची खरी कल्पना करून दिली. तें विराटस्वरूप पाहाण्याची जन्मांध धृतराष्ट्रास इच्छा झाली, तेव्हां कृष्णानें त्यास थोडा वेळ दिव्यदृष्टी देऊन आपलें विश्वरूप त्यास दाखविलें. या प्रसंगास उद्देशून धृतराष्ट्राचें भाषण आहे. (मोरोपंत–उद्योगपर्व–अध्याय १० गीति १–१९ पहा). १० दयोदधीनें (दयासागरानें) दाडुनि (मुद्दाम) दीना (अनाथ) सगदास अमृत चाखविलें (अमृतरसाची माधुरी आस्वादास दिली). या गीतींत 'द' अक्षर अनेक वेळ आलें आहे म्हणून अनुप्रासालंकार झाला आहे. दीना (दीनाला) या विशेषणाला अभियुक्त भाषेप्रमाणें विभक्तिविकार झाला आहे. मराठींतही हा प्रकार रूढ आहे. **दृष्टांतालंकार** मुख्य आहे. ईश्वराचा साक्षात्कार होणें अमृतपानाप्रमाणें आहे, हें पंतांच्या भक्तिभावाचें द्योतक होय. ११. रोग्यास. गद=रोग.

केला नाहींच नरक निजनामानें तसाचि चक्रानें. ।
बल, पारिजात हरितां, दाखविलें यास काय शक्रानें ? ।। ३५

दुर्वासी भगवान् बहु वर देता जाहला सदारा ज्या; ।
जो जगदीश्वर जपतो, निर्जनिधिला कृपणसा, सदा राज्या. ।। ३६

मरतील जरि कथंचित् सतनय पांडव समस्तहि, तथापी ।
न भलें; कीं राज्यपदीं ईश्वरचि करुनि समस्तहित थापी. ।। ३७

तो ईश्वर कृष्ण करें कवळिल कदना कराल करवाल; ।
सांगा तुम्ही कवि कुशल, काय कसें मग कराल करवाल ? ।। ३८

कौरव मारुनि देइल निष्कंटकें सर्व राज्य औतेला. ।
त्यजुनि हित, अहित घे तो खल, करितो वमुनि आज्य 'आ' तेलीं.।।

---

१. नाहींच (नाहीं असा) नरक केला. नरकलोक नाहींसा केला. कशानें ? तर स्वतःच्या नामसामर्थ्यानें व चक्रानें (सुदर्शनचक्रानें); तात्पर्य भगवद्भजन करतील त्यांस नरक नाहीं व विरोधिभक्ति करून जे ईशाचिंतन करतील त्यांस परमेशाच्या हातून मृत्यु येऊन ते मोक्षपदवीप्रत जातात; अतएव त्यांसही नरक नाहीं. कोण ईश्वराची दयालुता ही ? २. इंद्रानें. पारिजातहरणाची गोष्ट सुप्रसिद्धच आहे. ३. दुर्वासा हा अत्रिऋषीचा अनुसूयेचे ठायीं झालेला पुत्र. हा उत्तम ब्रह्मवेत्ता होता. यानें एकदां द्वारकेस जाऊन. श्रीकृष्णाचा व रुक्मिणीचा छल केला. त्या उभयतांस रथाला जोडून चाबकानें झोडपलेंही ! पण त्या दंपत्यास क्रोध म्हणून प्राप्त झाला नाहीं. तेव्हां दुर्वासा त्यांस अनेक वर देता झाला. सदारा ज्या (ज्या कृष्णाला रुक्मिणीसह) पुष्कळ वर दिले. खालच्या अर्धांत **दृष्टांत** आहे. ४. येथें 'जो' च्या ठिकाणीं 'तो' असा पाठ असावयास पाहिजे होता. ५. स्वतःचा द्रव्याचा ठेवा त्याला. ६. कथंचित्=कदाचित्. तथापि भलें न (चांगलें नाहीं). कीं=कारण, सगळ्यांचें हित करूनि (कल्याणासाठीं) परमेश्वर राज्यपदावर योजना करणें ती करितो. कौरव चांगले नाहींत, तेव्हां त्यांस राज्य मिळणार नाहीं; म्हणून पांडव सपुत्रपौत्र मेले तरी आमचें कल्याण नाहीं. थापी=स्थापना करी. ७. कदनासाठीं ग्रहण करील. ८. भयंकर करवाल (तरवार). ९. शहाणे. १०. ईश्वरानेंच हातांत शस्त्र घेतल्यावर मानवांच्या हातून काय होणार ? ११. सर्व कांटे (शत्रु) नाहींतसे झाले आहेत असें. १२ कुंतीला. १३. दुष्ट कोण तर हित सोडून अहित (अकल्याण) करून घेतो तो. तो कसा आहे ? तर आज्य (घृत, तूप) ओकून टाकून तैलप्राशन करण्यासाठीं आ करणारा (तोंड वासणारा) होय. खल म्हणजे मूर्ख असा येथें अर्थ घ्यावा. **दृष्टांत** अलंकार आहे. कोणी या घृतवमन करून तैलप्राशकाच्या वर्तनाला **निदर्शना** म्हणतील. १४. 'आ' हा शब्द आणि त्याचे पाठोपाठ येणारा तेलातुपाचा दृष्टांत हें पंतांचें आव-

'मी, माझें' हें घातक; लागो या आग आजि मोहाला; ।

डतें युग्म दिसतें. त्याचा उपयोग पंतांनीं अनेक स्थळीं केला आहेः-(१) आम्हांहुनि तूंचि अधिक घृत सोडुनि कोण करिल आ तेला ? [उद्योगपर्व-अ० ६ गी० ३५]. (२) तेचि वदं. कोण रसिक गोघृत सोडुनिं करील आ तेला ? (उद्योगपर्व-अध्याय १०।३९). (३) त्यजुनि हित, अहित घेतो खल करितो वमुनि आज्य आ तेला [द्रोणपर्व अ० १ गी०३९]. या पद्यांतील तेलातुपाचा दाखला हा प्रसंगास अगदीं अप्रयोजक होय, असा 'निबंधमाला'कारांचा आक्षेप आहे. निबंधमालाकार लिहितातः-'काव्याचा उद्देश मनोरंजन असल्यामुळें व जे विषय नेहमींच्या व्यवहारांतले व अत्यंत परिचित त्यांच्यापासून वरील उद्देश साध्य होत नसल्यामुळें, त्यांचे वाचक शब्द व त्यांचे दृष्टांत हे मनास आल्हाद देत नाहींत. उलटें असें सुद्धां होतें कीं एकादें पद्य सुंदर साधलें असून त्यांत मोठा प्रौढ अर्थ संग्रहीत केलेला असतो, पण वरच्या प्रकारच्या एका शब्दानें किंवा दाखल्यानें दुधांत मिठाचा खडा टाकल्याप्रमाणें होऊन जातें.' (निबंधमाला, अंक ६३ पृष्ठ १४.) असा या पद्यावर आक्षेप आहे. व त्याचें निरसन वे० शा० सं० गणेश शास्त्री लेले, त्र्यंबककर, यांनीं येणेंप्रमाणें केलें आहेः-'मोरोपंतांच्या कवितेवर मुख्यत्वें ग्राम्यत्वाचा दोष दिला. परंतु ग्राम्य म्हणजे नांगरहांके वगैरे हलके लोक यांच्याच मात्र भाषणांत येणारे जे शब्द, त्यांचा प्रयोग केला असतां हा दोष होतो. पण तसें मोरोपंतांच्या कवितेंत आढळत नाहीं. त्या कवितेंत ज्या शब्दांचा प्रयोग केला, आहे, ते शब्द सभ्यांच्याही भाषणांत येणारे असे आढळतात, म्हणून तो ग्राम्यत्वरूप दोष आहे असें म्हणतां येत नाहीं. तसें च सभ्य लोकांच्या व्यवहारांत येणाऱ्या गोष्टी दृष्टांतत्वेंकरून सांगितल्या असतां तोही ग्राम्यत्वरूप दोष नव्हे. तर उलटा अर्थ सौलभ्यरूपानें गुणच होय असें म्हणण्यास बाध दिसत नाहीं. तुम्हीं (निबंधमालाकारांनीं) ग्राम्यत्व दोषाच्या उदाहरणार्थ सात आर्या लिहिल्या त्यांतील पहिलीच 'तूं जेविं देवकीला' [उद्योगपर्व-अ० ६ गी० ३५] इत्यादि *आर्या* आहे. या आर्येत आतेला या तीन अक्षरांचें यमक साधलें आहे. येथील 'आ' हा शब्द आणि तेलातुपाचा दृष्टांत हे दोन्ही ग्राम्यजनैकव्यवहार्य (हलक्या लोकांच्या मात्र व्यवहारांत येणारे) नसल्यामुळें यांस ग्राम्य असें म्हणवत नाहीं, (निबंधमाला-अंक ७० पृष्ठें २५-२६). पंतांनीं 'आतेला' 'आ तेला' असें यमक साधण्यासाठीं ओढाताण केली असेंही म्हणतां येणार नाहीं, कारण तेलातुपाच्या दृष्टांताची योजना त्या त्या ठिकाणीं सहज, सरस आणि समर्पक आहे, असेंच रसिक वाचकांस वाटतें. आ करणें=आ पसरणें, पान करण्यासाठीं मोठ्या आशेनें तोंड उघडणें.

१. मायेचा मोह (हें माझें, हा मी, हा मोह) घात करणारा आहे. यापासून सर्व पातकांची उत्पत्ति आहे. स्वतःविषयींच्या ममत्वाचा अतिरेक झाला म्हणजे मनुष्यास राक्षसत्व प्राप्त होऊन त्याचा नाश होतो.

न मनांत अहंममताभ्यधिका लोकांचिया गमो हाला. ॥ ४०
सांग रणकथा, काढिल, नसतां मैनिं मोह, काय बाप ! रडें ? ।
वांकेल ताजव्याचें भारावांचूनि काय बा ! परडें ?' ॥ ४१
संजय म्हणे, 'नृपा ! मन लावूनि अनश्वरीं सुखीं न रडें; ।
हो सावध, काळानें जों नाहीं घातलें मुखीं नरडें. ॥ ४२
पुत्राप्तराज्यमोहें होय जरी तुज व्यथा, परि सराया ।
मोह श्रोत्यांचा, मी कथिन गुरुवरें[9] कथा, 'परिस[10] राया ! ॥ ४३
स्वीकारुनि अभिषेक द्रोण म्हणे[11], 'मज अभीष्ट[12] वर मागें. ।
लोपविलाचि नतजना[13]सुहृदर्क गुरुप्रसादचरमागें.' ॥ अस्ताचल ४४
दुर्योधन नमुनि म्हणे, 'धर्म धरुनि मजसमीप आणावा; ।
गुरुजी ! मज कोटि[14]वरस्थानीं हा वर अभीष्ट जाणावा.' ॥ ४५
द्रोणें[15] म्हणे, 'कुरुराया ! या भरतकुलांत धन्य पांडव गा ! ।

---

१. लोकांचिया मनांत अहंममताभ्यधिका (अविद्येहून अधिक जलाल) हाला (विष) आहे असें न गमो. अर्थात् अविद्या हेंच दुर्धर विष आहे असें लोकांस वाटो. २. 'लोकांस या' असाही पाठ आहे. ३. माझा मोह सर्व नष्ट झाला असतां. परडें=पारडें. दृष्टांत आहे. ४. अनित्य नाहीं असें जें शाश्वत सुख तें मिळालें असतां. ५. मृत्यूनें. ६. तुझा गळा कालमुखांत शिरला नाहीं तों, मृत्यु आला नाहीं तोंवर. ७. पुत्र, आप्त आणि राज्य यांच्या मोहानें. ८. ऐकणाऱ्यांचा मोह सरविण्यासाठीं (नाहींसा करण्यासाठीं). तुला मोहानें व्यथा होते तरी मी सांगतों, तें लोकमोह नष्ट करण्यासाठीं. ९. व्यासांनीं वर दिला आहे त्याच्या सामर्थ्यानें. व्यासांच्या प्रसादानें दिव्य ज्ञान, अतींद्रिय दृष्टि, दुरून श्रवण करण्याची शक्ति, अतीत आणि अनागत यांचें विज्ञान, शास्त्रविधीचें उल्लंघन करणाऱ्या पुरुषांच्या उत्पत्तीचें विज्ञान, आकाशाच्या ठायीं गति, युद्धांत अंगाला शस्त्रांचा स्पर्श न होणें, ह्या सर्व विद्या संजयाला प्राप्त झाल्या होत्या. (महाभारत–भीष्मपर्व, अध्याय १५ श्लोक ७–९ पहा). ह्या वराच्या योगानेंच संजय धृतराष्ट्राला सर्व युद्धवार्ता सांगूं शकला. १०. ऐक. ११. दुर्योधनास म्हणाला. १२. तुला अत्यंत प्रिय असा. १३. नतजन (शरण आलेले लोक)+असुहृत् (त्यांचे अमित्र, शत्रु)+अर्क (त्या शत्रुरूपी सूर्यास). गुरुप्रसाद (गुरुनें दिलेला किंवा गुरु देणार जो वर) हाच चरमाग (पश्चिमेकडील पर्वत; अस्ताचल). सारांश, गुरुवराच्या योगानें शत्रुतेज मंद झालें असें समज. परंपरितरूपक अलंकार आहे. लोपविलाचि (जणूं काय लपवूनच टाकिला) असा उत्प्रेक्षार्थीही अर्थ करावा. १४. शंभर लाख वरांच्या जागीं. १५. दुर्योधनानें मागितलेला

तरिच सुर म्हणति, 'नट हो ! धर्माचे गुण, करूनि तांडव, गा.' ॥ ४६
पुण्यश्लोक, युधिष्ठिर, अजातरिपु, धर्मराज, ज्या नांवें, ।
वानावें भगवत्सम, कविंनीं मानव असें न मानावें. ॥ ४७
बहुधा त्याचा द्वेष्टा कोण्ही नाहींच, आज हें कळलें; ।
मळलें न द्वेषें मन, तैंरिच प्रेमें रसें असें वळलें. ॥ ४८
प्रथम रणीं जिंकावें, मग द्यावें काय राज्यपद भावा ? ।
'आणा धरूनि, न वधा' म्हणसी, धाच्या, स्वयेंचि वद, भावा.' ॥ ४९
त्वत्पुत्र म्हणे, 'गुरुजी ! अर्जुन भीमहि न आंवरायाचा. ।
अवसान पाहुनि तुम्हांसि सन्मुख समरीं, जाईल आंव रायाचा. ॥ ५०

प्रसाद ऐकून द्रोणाचार्यांची आनंदानें वृत्ति फिरून गेली. कुलसंहार होत नाहीं असें पाहून त्यांस अर्थातच बरें वाटलें. आनंदातिरेकांत झालेलें द्रोणाचें बोलणें आहे. त्या ब्राह्मणवीराला कपटपटु दुर्योधनाचें दुर्भेद्य शठत्व काय समजणार ?

१. नृत्य करून धर्माचे गुण गात बसा, असें देव नटांस (गंधर्वादिकांस) सांगते झाले, तें उगीच नव्हे. पांडव तसेच, म्हणजे त्या सन्मानास योग्य आहेत व म्हणून धन्य आहेत. २. पुण्यश्लोक (पुण्यप्रद आहे ज्याची कीर्ति असा). 'पुण्यश्लोको नलो राजा पुण्यश्लोको युधिष्ठिरः । पुण्यश्लोका च वैदेही पुण्यश्लोको जनार्दनः ॥' हा श्लोक सुप्रसिद्ध आहे. युधिष्ठिर (युद्धामध्यें स्थिर असणारा, गडबडून न जाणारा). अजातशत्रु (ज्याला शत्रु उत्पन्न झाले नाहींत असा). धर्मराज (यथाशास्त्र राज्य करणारा). याची कीर्ति भगवंताप्रमाणेंच वर्णन करावी. शहाण्या माणसानें यास 'मानव' म्हणूं नये. दैवी प्रभेचा हा पुरुष आहे असें म्हणावें. साभिप्राय नांवें घेतलीं आहेत म्हणून येथें परिकरालंकार आहे. ३. तुझें मन द्वेषानें दुष्ट झालें नाहीं. धर्माचा द्वेष करणारा कोणी नसावयाचा असें मानणारा द्रोण हें म्हणत आहे. ४. म्हणूनच. ५. प्रेमें रसें (प्रेमभरित रसानें). ६. त्याला मारूं नका, 'धरून या' असें म्हणावयास लावणारें असें (या प्रकारचें). ७. धर्मोला. ८. ह्या तुझ्या म्हणण्याच्या. ९. इंगिताला, तुझ्या मनांतील हेतूला. १०. दुर्योधन म्हणाला, जर धर्माचा वध करावा, असें मी मागेन तर भीमार्जुन क्रुद्ध होऊन ते कोणासच आवरणार, आटपणार नाहींत, आमचा सर्वांचा नाश होईल, म्हणून-धर्माला धरून या-असा वर मागितला आहे. तुम्ही रायास (धर्मास) धरावयास युद्धांत शिरलां तर आला तुमच्या समोर उभें राहाण्याचें अवसान राहणार नाहीं. ११. अवसान.

कीं जरि तेजस्वी[1] तो साधु[2], मृदु, शशी तुम्ही तपनसे[3] हो ! ।
कुतुकें धराल, त्यांच्या[4] पदरांत तुम्हां असें तप नसे हो ! ॥ ५१
कथितों द्यूतीं पहिल्यापरि[5] जिंकायास पांडव धराया; ।
कां अन्यथा न म्हणतों[6] ? 'बा ! हाण उरांत कांड[7], वध राया[8].' ॥ ५२
वधिल्या धर्म, नसे जय, भीमार्जुन परम उग्र[9] अंतकसे[10]; ।
कोपें खवळुनि आम्हां सकळांचा न करितील अंत कसे ? ॥ ५३
म्हणुनि[11] धरुनि दवडावा द्यूतीं जिंकुनि वनास दायादः[12] ।
जाणे स्वहित[13] द्यूता मच्चित्त, जसें वनीं[14] सदा यादः[15].' ॥ ५४
हृदयीं[16] बहु हांसोनि द्रोण म्हणे, 'युक्ति बहु भली[17] सुचली ! ।
राजमना[18] जी कांहीं रुचली, तीच प्रजामना रुचली. ॥ ५५

---

१. कारण तो साधु (पुण्यश्लोक, सत्वस्थ धर्म) पराक्रमी आहे तरी तो मृदु (मऊ, सौम्य, विनयशील) आहे. त्याचें तेज चन्द्राप्रमाणें तापशून्य आहे. म्हणून प्रतापी सूर्याप्रमाणें जे तुम्ही ते त्याला कुतुकें (लीलेनें, सहज) धराल. **उपमा** अलंकार आहे. शशी याचा अर्थ चंद्रतुल्यच घ्यावयास पाहिजे. कारण पुढें 'तपनसे=तपनासारखे' असा शब्द आहे. २. सत्वस्थ. ३. सूर्याप्रमाणें. ४. धर्माच्या पदरीं तुमच्यासारखें सामर्थ्य नाहीं. ५. पूर्वीप्रमाणें द्यूतांत पांडवाला (धर्माला) जिंकण्यासाठीं युधिष्ठिराप्रत धरून द्या, असें मी तुम्हांस सांगतों. 'द्यूतीं···धराया' हा शब्दसमूह 'कथितों' याचें कर्म होय. नामवाक्यें किंवा वाक्यखंडें नामाचें काम करितात, ह्याचें हें एक उदाहरण आहे. 'पांडव धराया कथितों (तें) पहिल्यापरि द्यूतीं जिंकायास (होय)' असा अन्वय घेतला तरी नामवाक्यच कर्म राहत आहे. पांडव याचा संबंध 'जिंकायास' व 'धराया' या दोन्ही शब्दांकडे आहे. असल्या संबंधास 'काकाक्षिगोलकसंबंध' म्हणतात. धराया= धरण्यासाठीं. ६. नाहीं तर असें कां म्हटलें नसतें कीं. ७. बाण. ८. धर्मराजाला. ९. क्रूर. १०. यमाप्रमाणें, मृत्युप्रमाणें अंत करणारा तो अंतक. ११. 'म्हणउनि दवडावा हा' असाही पाठ आहे. १२. दाय (वडिलार्जित मिळकतीचा वांटा, भाग) +आद (त्या भागावर उपजीविका करणारा) तेव्हां दायाद म्हणजे भाऊबंद असा अर्थ झाला. मिळकतींत वांटा मागणाऱ्या लोकांत तंटा व्हावयाचाच, तेव्हां दायाद म्हणजे वैरी, शत्रु— असाही अर्थ झाला. १३. स्वतःचें कल्याण करणारें. १४. पाण्याला, १५. जलचर प्राणी. १६. मनांत हांसून, दुर्योधनाची ती कपटपूर्ण इच्छा समजली, तेव्हां आचार्यांस खेद झाला, तथापि मनांतल्या मनांत मूर्खत्वाबद्दल हांसून ते म्हणाले. १७. चांगली, खाशी. १८. राजाला जें आवडतें, तें प्रजेसही आवडतें; ही फार दिसांची समजूत आहे. 'यथा राजा तथा प्रजा,' 'राजा कालस्य कारणम्' या सुभाषितांतील रहस्य तरी हेंच आहे.

परि जरि हरिसारथि मेज, धर्माला गांठितां, न लक्षील, ।
तरि करिन कार्य हें मी, भीमादि न अन्य शूर रक्षील. ॥　५६
याकरितां सर्व तुम्ही तो कुरुसंताननलिनरवि रोधा, ।
विजयापुढें कवण जय पावेल करूनि बळि नर विरोधा ? ॥　५७
जरि म्यां प्रथम पढविला, बाळपणीं पुत्रसा च खेळविला, ।
तरि मंदधिक, कीं तेणें परमेशास्त्रप्रसाद मेळविला. ॥　५८
वृद्ध ब्राह्मण मी, तो तरुण क्षत्रिय, मला न आंटेल, आटपेल.
भार्गवनदीजसमर स्मरतां मद्वचन सत्य वाटेल. ॥　५९

सारांश, द्रोणाचार्यांस येवढेंच म्हणावयाचें आहे कीं, तुला ही गोष्ट आवडली आहे तर तुझा सेवक जो मी त्या मलाही ही पसंत पडलीच पाहिजे.

१. हरि (कृष्ण) आहे सारथी ज्याचा असा अर्जुन. २. मला. याचा संबंध 'न लक्षील (पाहणार नाहीं)' या क्रियापदाकडे आहे. ३. मी धर्माशीं गांठ घालीत असतां. ४. भीमादि इतर वीर धर्माचें रक्षण करूं शकणार नाहींत. हा भविष्यकाळांतर्गत शक्यार्थ ध्यानांत ठेवण्यासारखा आहे. ५. कुरु+संतान (वंश) हाच कोणी नलिन (कमलविशेष) त्याचा रविरूपी नाश करणारा अर्जुन. सूर्योदय झाला म्हणजे नलिनकमळें कोमेजून जातात. हें **परंपरितरूपकाचें** उदाहरण. ६. आडवा. ७. विजय हा शब्द श्लिष्ट आहे. विजय म्हणजे अर्जुन आणि विजय म्हणजे विशेष जय. येथें **श्लेषालंकार** आहे. विरोध=भांडण. ८. बळवान् योद्धा. ९. माझ्यापेक्षां जास्त (आहे). १०. कारण. ११. महादेवाच्या 'पाशुपता' स्त्राचा प्रसाद (लाभ). (मोरोपंत-वनपर्व-अध्याय ३ पहा). १२. 'वृद्ध', 'ब्राह्मण', 'तरुण', 'क्षत्रिय' हीं सर्व पदें साभिप्राय असल्यामुळें **परिकरालंकार** झाला आहे. तरुणापुढें वृद्धाचा व क्षत्रियापुढें ब्राह्मणाचा टिकाव लागणें शक्य नाहीं हें आचार्यांस सांगावयाचें आहे. 'स्वयें गतवयस्क मी, सरस वीर तूं बा ! नवा' [वामनपंडित-भीष्मयुद्ध-श्लोक ८ पहा]. ही वृद्ध भीष्माचार्यांची अर्जुनास उक्ति व 'सिद्धं ह्येतद् वाचि वीर्यं द्विजानां बाह्वोर्वीर्यं यत्तु तत्क्षत्रियाणाम्। शस्त्रग्राही ब्राह्मणो जामदग्निः तस्मिन् दान्ते का स्तुतिस्तस्य राज्ञः ॥' ही लवोक्ति यांवरून वृद्धत्वाचें व ब्राह्मणत्वाचें अवसान कळून येतें. भीष्मपर्वांत पंत भीष्माकडून वदवितातः—'कैसा जिंकावा हो ! करुनि बळें आहवा युवा जीर्णें ?' (मोरोपंत-भीष्मपर्व-अध्याय ४।९) 'शिष्यादिच्छेत्पराजयम्' ह्याचा खासा प्रत्यय परशुरामास तर आलाच होता. आचार्यांसही स्वशिष्याचें गौरव करितांना फारच गुदगुल्या होत होत्या, हें त्यांच्या भाषणावरून व्यक्त होत आहेच. १३. आटपेल, आंवरेल. १४. परशुराम आणि भीष्म यांमध्यें झालेलें युद्ध.

न्याल उपायें अर्जुन दूर तरि धरिन रणांत धर्मातें; ।
या [1]सांतरवरदानें पावे [2]बालिशसमूह [3]शर्मातें. ॥ ६०
[4]परहित [5]गुरु म्हणुनि करी [6]मंत्रांचा स्वकटकांत [7]बोभाट, ।
होय [8]श्रुतप्रतिज्ञास्थैर्यार्थ नृप स्वयेंचि तो भाट. ॥ ६१
हें दूतमुखें परिसुनि, धर्म म्हणे अर्जुना, '[9]महाबाहो ! ।
बा ! हो त्राता, कोणा [10]व्यसनीं घेऊनि नाम हा [11]बाहो ? ॥ ६२
गुरुनें सुयोधनाला, देतों मज धरुनि, हा दिला वर हो ! ।
न [12]घडो हें समरीं; मी मेल्यावरि तो सुखें [13]इलावर हो ! ॥ ६३
[14]अंतर वरांत आहे वत्सा ! तें कळवितों, [15]बरें परिस ।

(पुढें अध्याय १७ गीति १४ वरील टीपा पहा). द्रोणांनीं हें उदाहरण फार समर्पक दिलें आहे. मूळभारतांत हें उदाहरण नाहीं. पंतांच्या उज्ज्वल प्रतिभेचें हें आणखी एक उदाहरण.

१. अंतर ज्यांत ठेविलें आहे, असा वर, पळून जाण्याला वाट आहे असा संदिग्ध वर, त्याच्या दानानें. २. मूर्खमंडल, मूर्खांचा समुदाय. ३. आनंदाला. ४. शत्रूंचा (पांडवांचा) हितकर्ता. द्रोणाचार्य पांडवपक्षीय आहेत, अशी दुर्योधनास शंका होती म्हणून. ५. द्रोणाचार्य. ६. गुह्य गोष्टीचा, सल्लामसलतीचा. ७. प्रसिद्धि. भाट म्हणजे बोलणारा त्यालाच द्वैगुण्य होऊन 'बोभाट' हा शब्द झाला असावा; किंवा 'बहुभाट' असा मूळचा शब्द असून त्याचा अपभ्रंश 'बोभाट' असा झाला असावा. दुसरा पक्ष बरा दिसतो. ८. स्थिरता (कायमपणा) येण्यासाठीं, द्रोणानें स्वप्रतिज्ञेपासून ढळूं नये म्हणून. श्रुत म्हणजे ऐकलेली, प्रसिद्ध. ९. पराक्रमी, मोठे आहेत बाहू ज्याचे अशा. अर्जुन आजानुबाहु व महापराक्रमी पुरुष; तेव्हां धर्मानें अर्जुनास 'महाबाहो !' म्हणून जी हांक मारिली ती साभिप्रायच होती. अर्जुनाशिवाय दुसरें कोणीं आपलें रक्षण करण्यास समर्थ नाहीं, हें युधिष्ठिरास विदित होतेंच. येथें साभिप्राय 'महाबाहो' म्हटलें म्हणून परिकर अलंकार. १०. संकटांत. ११. हांक मारूं ? १२. 'मला युद्धांत धरून कैद करून न्यावें' हें न घडो (अशी गोष्ट होऊं नये). पूर्वी पराभवापेक्षां मृत्यु किती मधुर वाटत असे हें भारती वीरांच्या भाषणांतून स्पष्ट दिसतें. Death before dishonour याच अर्थी 'संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते' 'न भीतो मरणादस्मि केवलं दूषितं यशः' या पद्यखंडांतील शब्दयोजना आहे. १३. इला+वर=पृथ्वी-पति. १४. अनिश्चितपणा, पळून जाण्यास वाट. 'जर अर्जुन नसेल तर' ही अट. १५. चांगलें, नीट.

'धर्म धरिन जरि विजय न रक्षिल' [1]गुरुवर वदे असें [2]अरिस. ६४
यास्तव समीपचि रहा समरीं होऊनि [3]अनलस [4]मदवना, ।
[5]आश्रयगुणें लघुहि गुरु होय, जनालंघ्य अनलसम [6]दवना; ॥ ६५
विजय म्हणे, '[7]त्या गुरुचा वध, [8]या गुरुचाहि उचित न त्याग. ।
जरि करिन [9]भवदुपेक्षा तरि मग त्याहून कोण [10]अत्याग ? ॥ ६६
सोडीन प्राण, परि न गुरुवरि मरणार्थ बाण सोडीन, ।
मोडीन न [11]प्रतिज्ञा, बोलुनि [12]अनृत न अकीर्ति जोडीन. ॥ ६७
क्षितिवरि खचोनि [13]सहसा सग्रह नक्षत्रमंडल पडेल; ।
पृथ्वी विरेल; परि हे दुष्टाची कार्यसिद्धि न घडेल. ॥ ६८

---

१. गुरुश्रेष्ठ द्रोणाचार्य. २. शत्रूस, दुर्योधनाला. ३. आळस नाहीं असा, दक्ष, तत्पर. ४. माझ्या रक्षणाला. ५. आश्रयगुणें (आधाराच्या सामर्थ्यानें) लघुहि (लहान वस्तुसुद्धां) गुरु (मोठी) होय. कल्पनासादृश्यः—'लोकीं प्रभुप्रियत्वें होय, गुणें अल्प पर महित दवना ।' (मोरोपंत—वनपर्व—अध्याय १४।३०). ६. दवणा, एक शिवप्रिय सुगंधी वनस्पति. दवणा (शंकरास प्रिय असल्यामुळें) अनलसम (अग्नीसारखाच) जनालंघ्य (जनांला अलंघ्य) होतो, म्हणजे लोकांना त्याचें आक्रमण करितां येत नाहीं. त्याप्रमाणें तुझ्या आश्रयानें मी देखील जनालंघ्य होईन, असा धर्माच्या भाषणाचा भाव. ७. द्रोणाचार्याचा. ८. धर्मराजाचा. ९. आपली उपेक्षा. १०. अत्याग (अति+आगस्)=मोठें पाप; मोठा अपराध. 'जर आपली उपेक्षा मीं केली' अर्जुन म्हणतो, 'तर त्याहून अत्याग (ज्यास्त पातक) कोण (कोणतें) आहे ?' अर्थात् हें फारच भयंकर पातक होईल, असें म्हणण्याचा भाव. ११. वर गीति ६६ पहा. प्रतिज्ञापालनाविषयीं केवढा खंबीर निश्चय हा ! १२. खोटें. 'नानृतात्पातकं परम्' हें खरेंच आहे. १३. सहसा (एकदम) सग्रह नक्षत्रमंडळ (ग्रहांसहित सर्व तारामंडळ) खचोनि (ढांसळून) क्षितिवरि (पृथ्वीवर) पडेल; पृथ्वी विरेल (विरघळून जाईल); परि (पण) हे (ही) दुष्टाची (दुर्योधनाची कार्यसिद्धि) (इष्टफलप्राप्ति) न घडेल (होणार नाहीं). मूळ भारतामध्यें 'न पतेत् द्यौः सनक्षत्रा पृथिवी शकलीभवेत्' असें आहे. त्यावर पंतांनीं सुधारणा करून सर्व तारामंडल ग्रहांसह ढांसळून खालीं भूमीवर अकस्मात् पडेल, असा अर्थ आणिला आहे. पृथ्वी विरघळून नाहींशी होईल हें 'पृथिवी शकलीभवेत्' (तुकडे तुकडे होतील) याचें रूपांतर होय. असो; पूर्वकालीं 'सूर्यचंद्रादि राहुकेतुसकट' नव ग्रह आहेत अशी कल्पना होती. आधुनिक कालीं सूर्याची नक्षत्रांमध्यें (न हालणाऱ्या, स्थिर ताऱ्यांमध्यें) गणना होते; व चंद्राची गणना उपग्रहांमध्यें होते. हल्लीं बुध, शुक्र, पृथ्वी, मंगळ, गुरु, शनि, युरॅनस आणि नेप्च्यून असे अष्टग्रह

प्रभुजी ! हा मी सेवक जीवंत असें तेंसें कसें होतें ? ।
पुण्यप्रताप तुमचा सिंह, सकल शत्रुबल ससे हो ! तें. ॥ ६९
जरि ससुरासुर साक्षात् स्मरहर होइल सहाय पापा, हो. । शिव.
समरीं अदृष्टपूर्व स्वपरिभवा तो महातपा पाहो. ॥ ७०
असतां समर्थ सारथि, अरिची आम्हांस काय परवा हो ? ।
शोणितपूरीं गृध्रश्येनकृतग्रासकाय पर वाहो. ॥ शत्रु. ७१

मुख्यत्वानें धरिले जात असून शुक्र आणि पृथ्वी यांच्यामध्यें एक ग्रह आहे व सूर्याजवळ अत्यंतत्वानें राहणारा जो बुध त्याच्या व सूर्याच्या मध्येंही एक ग्रह सांपडावा, अशी कल्पना आहे. एवंच नऊ ग्रह झाले. दहावा एक सांपडं पहात आहे, ही गोष्ट निराळी. हे सर्व ग्रह परस्परांस आकर्षण करीत असून त्या सर्वांस सूर्यानें स्वाकर्षणशक्तीनें आपआपल्या कक्षेमध्यें नियमित गतीनें फिरावयास लाविलें आहे. ही फक्त सूर्यमालेची गोष्ट झाली. प्रत्येक नक्षत्र म्हणजे एक एक सूर्यमालाच होय. तेव्हां हें सगळें जगड्व्याळ खचक्र अकस्मात् कोसळून पडायाचें म्हणजे अत्यंत असंभवनीय, किंबहुना अशक्यच गोष्ट होय. अर्जुन म्हणतो, 'हीही अशक्य गोष्ट शक्य होईल; पण दुर्योधनाची इच्छा सफल होणार नाहीं.' 'जोंपर्यंत मी जीवंत आहें, तोंपर्यंत तुम्हांस धरून नेऊं देणार नाहीं' असें अर्जुनास जोरानें सांगावयाचें आहे. येथें **पर्यायोक्ति** अलंकार आहे. **असंभव** अलंकार प्रधान आहे.

१. जीवंत आहें तोंपर्यंत. २. दुष्ट दुर्योधनाची इच्छा पूर्ण होणें हें. ३. येथें **परंपरित रूपक** अलंकार आहे. तुमचा पुण्यप्रताप हा सिंह आणि तें शत्रुबळ ससे होत. ४. साक्षात् (प्रत्यक्ष) स्मरहर (मदनदहन शंकर) ससुरासुर (देवदैत्यांसह) पापा (दुर्योधनाला) जरी सहाय होईल तरी होऊं द्या. तो महातपा (उग्रतपा, श्रीशंकर) समरीं (युद्धांत) अदृष्टपूर्व (पूर्वी न पाहिलेल्या अशा) स्वपरिभवा (आपल्या स्वतःच्या पराजयाला) पाहो (पाहील. पाहूंद्या, पाहील असें समजा). काय अर्जुनाची प्रशंसनीय दर्पोक्ति ही ! धर्माला असल्या धीरोदात्त गंभीर वाणीनें कां धैर्य येणार नाहीं ! यांत मजा ही आहे कीं, ही सगळी गीति पंतांनीं आपल्या उज्ज्वल प्रतिभासामर्थ्यानें निर्माण केली आहे. 'सर्व देवदैत्यांस गोळा करून प्रत्यक्ष शंकर आले तरी त्यांस पराभवदुःखाचा अभिनव परिचय करून देईन' या अर्जुनोक्तीनें 'द्रोणप्रभृति सेनानी व विशेषतः कर्णदुर्योधन यांचा काय पाड आहे ! लीलेनें त्यांचा पराभव करीन' असें ध्वनित केलें आहे. ५. माझें सारथ्य करणारा श्रीकृष्ण. ६. शोणितपूरीं (रक्तनद्यांच्या प्रवाहांत), गृध्रश्येन इत्यादिकांनीं खाऊन तोडून टाकला आहे देह ज्याचा असा पर (शत्रु) वाहो (वाहून जावो).

दु[1]र्लभ अहिचा बाळा होय स्पर्शींच कालसा[2]चि मणी, ।
होईल काय हंसी, गति टाकूनीहि, आ[3]लसा चिमणी ? ॥ ७२
त्यॆ[4]ाला वर कुरुगुरुनीं, अभयवर दिलॆ[5]ा तुम्हांसि गु[6]रुगुरुनीं,
सिंह शॆ[7]रभाश्रितांचें करतील अनिष्ट काय गुर्रॆ[8]गुरुनी ?' ॥ ७३
अॆ[9]र्जुनवाग्वसानीं बॆ[10]हुधा हे[11] वीर गर्जले हरिसे; ।
अॆ[12]रिसेना भी; जाणो ती सिंहरवासि गॆ[13]जघटा परिसे. ॥ ७४
मग, आॆ[14]म्ही ते[15] करिते झालों स्वजयार्थ आॆ[16]हवारंभा; ।
भट म्हणती, 'वीररसें शृंगाररसांत वाहवा रंभॆ[17]ा.' ॥ ७५

---

१. बाळा (लहान मुलाला) अहिचा (नागाचा) दुर्लभ (कोणास न मिळणारा) मणी स्पर्शींच (स्पर्श केल्याबरोबर) कालसाचि होय. एखाद्या लहान अर्भकानें नागाच्या मस्तकावरील दुष्प्राप्य मणी काढून घेण्यास हात घातल्याबरोबर तो स्पर्श त्याला मृत्यूसारखाच होईल म्हणजे सर्पदंश होऊन तो मुलगा मरेल. ह्याचप्रमाणें दुर्योधनानें तुम्हांला धरण्याचा प्रयत्न केल्यास तो मूर्ख प्राणांस मात्र मुकेल असें सुचविलें आहे. अप्रस्तुत सांगून प्रस्तुत सुचविलें आहे म्हणून येथें **अप्रस्तुतप्रशंसा** अलंकार होय. खालील सालंकारिक अर्धाचा अर्थ स्पष्टच आहे. चिमणीला हंसी होणें शक्य नाहीं. तिची मंदगति तिला टाकितां यावयाची नाहीं—हा भावार्थ. २. मृत्यूसारखाच. ३. आळशी. ४. दुर्योधनाला. ५. 'दिला' ह्याचा दोन्हीकडे संबंध आहे. ६. गुरूंचे गुरु, आदिगुरु जे श्रीकृष्ण त्यांनीं. ७. शरभ म्हणून एक पक्षी आहे. तो सिंहाचा पराभव करितो. नारसिंहाच्या गर्वाचा परिहार शंकरांनीं शरभाचें स्वरूप घेऊन केला होता असें पुराणांतरीं वर्णन आहे. कृष्ण हा शरभ आणि द्रोणादिक हे सिंह. कृष्णास गुरूंचा गुरु म्हटलेंच आहे. तेव्हां तो सहजच द्रोणादिकांस भारी झाला. म्हणून ते गुरगुरले तरी त्यांच्या हातून काय होणार ? खालच्या अर्धांत **रूपक** आहे. ८. ह्या गीतीशीं पंतकृत उद्योगपर्व, अध्याय ४ गीति ८९ ताडून पाहण्यासारखी आहे. ९. अर्जुनाचें बोलणें संपल्यावर. १०. नाना प्रकारें. 'बहु वाद्यें' असाही पाठ आहे. ११. पांडववीर. १२. अरिसेना भ्याली; जणूं काय ती गजघटा सिंहरवासि (सिंहगर्जनेला) ऐकती झाली ! येथें उत्प्रेक्षा तर आहेच; आणखी **रूपक**ही गौणत्वानें विद्यमान आहे. १३. गजांचा यूथ, कळप. १४. कौरव. १५. पांडव. १६. लढाईच्या आरंभाला. १७. वीररसानें तुम्ही रंभा (स्वर्गांगना) शृंगाररसांत वाहवावयास लावा. म्हणजे असें दुर्धर समरकर्म करा, कीं ज्या योगानें हजारों वीरांस धारातीर्थीं मृत्यु येऊन ते स्वर्गलोकीं [illegible]प्सरांबरोबर रतियुद्धांत निमग्न होतील. लढाईंत मृत्यु आला तर स्वर्गलोकीं उ[illegible]प्रकारचीं सुखें भोगावयास सांपडतात असा हिंदूंचाच समज आहे असें नाहीं, मुसलमानी गाझीसही असाच लाभ मिळतो.

आम्हां अर्जुनपालितधर्मनृपबलाकडे [1]पहावेना; ।
[2]त्या पांडवांहि कुरुगुरुरक्षितकटकप्रभा सहावेना. ॥ ७६
राया ! दोन्हीहि चमु [3]स्तिमित क्षणमात्र राहिल्या होत्या; ।
[4]चित्रीं जैंवि लिहाव्या, सर्वांनीं तेंवि पाहिल्या हो ! त्या. ॥ ७७
व्यूहांतुनि [5]रुक्मरथ द्रोण चमूपति निघे [6]महातेजा ।
[7]घनपटलनिर्गत तरुण तरणि म्हणति निपुणही पहाते ज्या. ७८
इतर भट किती ? पाहों न शकेचि [8]श्वेतवाह [9]वीरा या ।
सोमक पांचाळ वधुनि रक्ताची [10]सिंधु वाहवी, राया ! ॥ ७९
भट गांठिती भटातें, [11]अहि अहितें, जैंवि [12]पतंग पतगातें, ।
कीं [13]हरि हरितें, अत्यद्भुत होय [14]द्वंद्वयुद्धशत गा ! तें. ॥ ८०
सौभद्र पौरवाचें [15]अत्युग्र द्वंद्वयुद्ध परिसा हो ! ।
तुमचें, [16]निजापकर्षा [17]धर्मोत्कर्षासि, [18]चित्त [19]परि [20]साहो. ॥ ८१

---

१. अकरणरूपीं 'पहा' याचें शक्यार्थी स्वरूप, अर्थात् भूतकाळ आहे. २. सैन्याचें उत्साहपूर्ण तेज. ३. स्तब्ध. पुनः मनुष्यसंहाराला आरंभ व्हावयाचा म्हणूनच जणुं काय त्यांस युद्धारंभ करण्यास भीति वाटली ! दोन्हीं सैन्यें दिपून गेलीं होतींच. ४. चित्रांप्रमाणें तटस्थ, निश्चल होत्या. येथें **भाविक** अलंकार आहे. ५. सुवर्णरथ आहे ज्याचा असा. ६. तेजस्वी. ७. निपुणही (कुशल, चतुर) पहाते (पहाणारे) ज्या (ज्या द्रोणसेनापतीला) घनपटल (मेघमाला) त्यांतून निर्गत (बाहेर निघालेला) तरुण (बाल) तरणि (सूर्य) म्हणति. सैन्यव्यूहामधून महातेजस्वी वृद्ध द्रोणाचार्य आपल्या सुवर्णरथामध्यें बसून जेव्हां बाहेर पडले, तेव्हां मोठमोठ्या पटाईत वीरांना भ्रांति पडून म्हणूं लागले, कीं हा बालसूर्यच मेघमंडल फोडून बाहेर येत आहे. येथें **भ्रांतिमान्** अलंकार झाला आहे. ८. अर्जुन. याच्या घोड्यांचा वर्ण शुभ्र असे. अर्जुनाला पाहवेना मग इतरांची कथा काय ? येथें **अर्थापत्ति** अथवा **कैमुतिक** न्याय आहे. ९. या द्रोणवीराला. १० मोठी नदी. ११. सर्प सर्पाला. १२. पक्षी. १३. सिंह सिंहाला गांठतो त्याप्रमाणें. येथें **मालोपमा** आहे. १४. शेंकडों द्वंद्वयुद्धें सुरू झालीं. १५. अतिघोर, भयंकर. १६. स्वपराजयाला. १७. धर्मराजाच्या जयाला. 'धर्म' शब्द श्लिष्ट आहे. दुसरा अर्थ 'नीति.' नीतीचा जय आणि अनीतीचा अपजय ह्यांच्या वर्णनाला ऐका व सहनही करा. हा अप्रस्तुत अर्थ निघतो म्हणून **समासोक्ति** अलंकार आहे. १८. तुमचें चित्त. १९. परंतु. २०. सहन करो. शत्रुविजय व युष्मत्पराजयवृत्तांत आहे तरी ऐका.

करितां [1]सारथिमस्तककोदंडच्छेद पौरवें [2]अहितें, ।
[3]आर्जुनि [4]असिचर्म धरुनि गांठी अरितें, जसा गरुड अहितें. ॥ ८२
खंडुनि सूतशिरध्वज [5]वामकरें केशभार दृढ धरिला; । •
पाडूनि रथाखालें धावी जों [6]त्या [7]कबंधता अरिला, ॥ ८३
तों खड्गचर्म घेउनि सिंधुप, टाकुनि उडी रथावरुनी, ।
गर्जुनि हरिपरि, अरिवरि धांवे, [8]तद्वधमनोरथा वरुनी. ॥ ८४
त्या पौरवासि सोडुनि सौभद्र जयद्रथावरि [9]उगारे; ।
हांसुनि म्हणे, 'हरिपुढें [10]थूंक शशकार्या न थावरि, [11]उगी रे !'॥ ८५
[12]सैंधवसैनिकशस्त्रें खड्गें खंडुनि [13]सरोजनाभाचा ।
मोही, वीरजना [14]हरसा, स्मरसा अप्सरोजना, भाचा. ॥ ८६
असि भंगतां प्रहारें, लोकांत [15]न थापटुनि भुजा माता. ।
[16]ज्यामाता भी तें करि, कीं जाय तुझा पळोनि जामाता. ॥ ८७
कटकीं जयद्रथाच्या कदन करी त्यजुनियां दया [17]दैवसा; ।
गमला परां [18]जनकसा तो किंवा दानवांसि यादवसा. ॥ ८८

---

१. सारथिमस्तकाचा व धनुष्याचा छेद केल्यावर. २. शत्रूनें; पौरवशत्रूनें. ३. अर्जुनपुत्र अभिमन्यु. ४. ढाल आणि तरवार. या अर्धांत उपमा आहे. अहितें= सर्पाला. ५. डाव्या हातानें. ६. शत्रूला (पौरवाला). 'कीं' असाही पाठ आहे. ७. शिरोविहीनता. अभिमन्यु पौरवाचें शिर तोडणार तों. गी० ८३ व ८४ यांचें युग्मक आहे. ८. तद्वध (अभिमन्युवध) ह्या मनोरथाला (इच्छेला) वरुनि (धारण करून). ९. शस्त्र उगारिता झाला, तुटून पडला. १०. सिंहासमोर लांडगा ससाची शिकार करण्यासाठीं देखील उभा राहात नाहीं. ११. पौरवाला आश्रय देऊं नको, उगीच ऐस १२. सिंधुराजाचीं, जयद्रथाचीं सैन्यें, त्यांचीं शस्त्रें आपल्या तरवारीनें मोडून. १३. सरोज (कमल) आहे नाभीमध्यें ज्याच्या असा श्रीकृष्ण त्याचा भाचा (अभिमन्यु). १४. या सरोजनाभाच्या भाच्यानें एकसमयींच दोन गोष्टी केल्या. शंकरासारखें युद्धनैपुण्य दाखवून सर्व वीरजनांस मोहून टाकिलें आणि आपल्या मदनासारख्या स्वरूपसौंदर्यानें अप्सरगणास (ह्या विमानांतून युद्धचमत्कार पाहत होत्या) मोहून टाकिलें. हा दीपक अलंकार होय. १५. 'भुजा थापटुनि लोकांत न माता'—हा अन्वय. तरवार मोडल्यानंतर अभिमन्यूनें दंड थोपटून कुस्तीची तयारी केली असती तर तो इतका फुगला असता, कीं तो येथें मावलाच नसता. अतिशयोक्ति आहे. १६. धरणीमाता (ज्या=पृथ्वी) ज्याला भीत होती तें (पलायन) [तो जयद्रथ] करी. १७. अग्नीप्रमाणें. १८. तो शत्रूंस अर्जुनासारखा वाटला किंवा राक्षसांस श्रीकृष्णासारखा वाटला. येथें उल्लेख अलंकार आहे

लोक[1]मुखें 'धन्य' असें जों म्हणुनि, रणांगणांत राहुनि, घे ।
सौभद्र[2]सुधांशुवरि ग्रासाया [3]मद्रराजराहु निघे. ॥ ८९
वारुनि [4]सुतासि **भीम**, स्यंदन सोडुनि, [5]महाभुज गदेतें ।
घेउनि, शत्रुभटांला दे, [6]भेकाला महाभुजग दे [7]तें. ॥ ९०
[8]अवकाश सिंहनादें भरती ते [9]शूरसत्तम नभाचा, ।
[10]मामासा नात्यासि न दे [11]वीररसप्रमत्त [12]मन भाचा. ॥ ९१
भीमगदा **शल्या**तें **शल्य**गदा एकदांचि **भीमा**तें ।
[13]तोंडी, मूर्छित [13]पोंडी; [14]कांपविती सांगतांहि भी मातें. ॥ ९२
कृतवर्मा शल्यातें स्वरथीं वाहोनि शीघ्रतर पळवी. ।
होय स्वयेंचि सावध **भीम**, न तो[15] मोह[15] [16]तद्यशा मळवी. ॥ ९३
उठतांचि तो [17]गदीश्वर **भीम**, पळे कुरुचमू न राहे ती, ।
अमरांहि जी न सोसे त्याची सोसेल कसि नरा हेती[18] ? ॥ ९४
कर्णाचा नंदन **वृषसेन** कुरुबलासि अभय दे, वारी; ।
तेणें केले **पांडववीर**, [19]गुहें जेंवि, सभय [20]देवांरी. ॥ ९५
पाहुनियां निजसैन्यें [21]वृषसेनशरप्रलयघनाकुलितें ।

---

१. रणभूमींतून बाहेर न निघतां, पळून न जातां, 'धन्य' असें म्हणवून घे. २. सुधा+अंशु =अमृतकिरण(चंद्र). **रूपक** आहे. ३. शल्य हाच राहु. ४. अभिमन्यूला एकीकडे सारून. ५. मोठे आहेत भुज ज्याचे असा भीम. ६. बेडकाला. ७. भीति. येथें **उपमा** आहे. ८. पोकळी, आकाश. ('नभाचा' इकडे संबंध आहे.) ९. शूरांतील श्रेष्ठ, शूरावतंस. १०. मामा-प्रमाणेंच (शल्याप्रमाणेंच) भाचा (भीम). ११. वीररसपानानें उन्मत्त झालेला. १२. लक्ष्य न दे. (मामाभाच्यांनीं नात्याकडे लक्ष्य दिलें नाहीं.) १३. येथें दोन कर्त्यांची क्रिया एक शब्दानेंच वर्णिली आहे व दोहोंमध्यें कालसादृश्य आहे. म्हणून **दीपक** अलंकार आहे. १४. 'कांपविते' असा हल्लींचा प्रयोग आहे. 'कांपविती' बद्दल 'कांपवि ती' असा पद-च्छेद करून, ती भी (भीति) सांगतांहि मातें कांपवि (कांपविते)—असा अन्वय केला तरी चालेल. सांगतांना सुद्धां मला (संजयाला) भीति कांपविते. यावरून तें युद्ध किती घनघोर असेल याची कल्पना होते ! १५. ती मूर्च्छा. १६. भीम-कीर्तिला. शल्याचें मात्र यश तो पळून गेला म्हणून नाहींसें झालें. १७. गदायुद्धांत नि-ष्णात जो भीम तो. १८. तरवार. येथें **अर्थापत्ति** आहे. १९. कार्तिकेयानें. २०. राक्षस. **उपमा** अलंकार. २१. वृषसेनाच्या बाणवर्षावरूपी प्रलयमेघानें व्याकुळ अशीं स्वसैन्यें पाहुनियां.

जें [1]आश्रितावनें यश [2]गिरिधर जोडी, स्वयेंहि [3]नाकुलि तें. ॥ ९६
चापध्वज खंडुनि बहु शर सोडी कर्णसुत शतानीकीं, ।
[4]बंधु म्हणति, 'हा केला अहि विकल [5]पिपीलिकाशतानीं कीं !' ॥ ९७
ते द्रौपदेय चवघे वृषसेनीं [6]विशिख वर्षले शतदा, ।
न उरे कुरुकटकमनीं युद्धजयोत्साह, हर्षलेश [7]तदा. ॥ ९८
त्या द्रौपदीसुतांवरि कर्ण, कृप, [8]द्रौणि धांवले हरिसे; ।
त्यांवरि [9]पार्षत, सात्यकि, भीम हि उठले, जवें [10]मनासरिसे. ९९
करिते झाले युद्ध क्रुद्ध शरभसिंह देवदानवसे; ।
मानवसे गमले न, [11]लेशकण हि तन्मनीं तदा न वसे. ॥ १००
उठली युधिष्ठिरचमू जसि महिषासुरबलावरि [12]भवानी; ।
शोभति सुभटभुज जिचे[13] [14]असकृत्कृतशत्रुबलपरिभवांनीं. ॥ १०१
स्वबलक्षय पाहूनि द्रोण करि [15]क्षत्रियान्त भार्गवसा; ।
वीरांसि म्हणे, 'स्वर्गीं जा, [16]मच्छर दावितील मार्ग, वसा.' ॥ १०२
रविला [17]झांकी गगनीं कुरुगुरु, बहुशर भरी, तिमिर विखरी[18]; ।
लीलेनें [19]नरकेसरि [20]लक्ष चिरी, [21]शरभरीति मिरवि खरी. ॥ १०३
धर्माला गांठाया धांवे तो विप्र, [22]कटक विसकटुन. ।

---

१. आश्रितसंरक्षणें. २. गोवर्धनधारी कृष्ण. ३. नकुलपुत्र शतानीक. ४. बाकीचे चौघे भाऊ. ५. शेंकडों मुंग्यांनीं. ६. बाण. ७. द्रौपदेयांनीं हल्ला केला तेव्हां. ८. अश्वत्थामा. ९. द्रुपदराजा. १०. मनासारख्या वेगानें, मनोवेगानें अर्थात् लवकर उठले. ११. मायेचा लेशही. १२. श्रीदुर्गादेवी. येथील उपमा चित्ताकर्षी आहे. 'भवानी' हा शब्द 'भव' (शंकर) याचें स्त्रीलिंग. १३. ज्या सेनारूपी देवीचे हात उत्तम उत्तम वीर हे होत. १४. अनेक वेळ शत्रुसैन्याचा पराभव केला होता म्हणून ते वीर त्या देवीचे हात शोभते झाले. १५. क्षत्रियवीरांचा संहार भार्गवरामाप्रमाणें आचार्यांनीं केला. १६. माझे बाण स्वर्गमार्ग दाखवितील, जा आणि तेथें रहा. १७. बाणांनीं झांकी. १८. पसरी. १९. नरसिंह, द्रोणाचार्य. २०. लाखों वीर मारी. २१. शरभपक्ष्याचा मार्ग जो त्याचें अनुकरण करी. येथें पंतांनीं दशाक्षरी यमक साधला आहे ! ह्या गीतींतील 'र' काराची आवृत्ति प्रेक्षणीय आहे. २२. पांडवसैन्याची दाणादाण करून. 'विसकटणें' या शब्दाची योजना अत्यंत समर्पक आहे.

वाटे तदेकविशिखाहुनि सिंधुजगरलघट कविस कटु न. ॥ १०४
मदमत्त मतंगज, कीं मर्दी जैसा समीर कदलीतें; ।
कुरुगुरु तसें करी, तें परिसा कटकें सकंप वदलीं तें. ॥ १०५
'पक्षिपति पक्षपवनें उडवुनि जल सागरीं अहिस धरितो, ।
करितो तसेंचि कुरुगुरु, हा ! हा ! कृतकृत्य होतसे अरि तो.॥ १०६
हा आला ! हा आला ! कोंडील युधिष्ठिरासि शरैं-भवनीं; ।
शिरला समोरचि, जसा सिंहासि वधावयासि शरभ वनीं.' ॥ १०७
आम्ही वदलों, 'केलें जें हृदय निसर्गमृदुल कर्कश तें, ।
धरिलाचि धर्म गुरुनें;' निश्चय केला असाचि तर्कशतें. ॥ १०८
येतां समीप गुरुला पाहुनि आधीं मनांत कर [10]जोडी; ।
सोडी श्वासैंशर, तया धर्म म्हणुनि धर्म संगरीं झोडी. ॥ १०९

---

१. त्याच्या एका बाणापेक्षां समुद्रांतून निघालेल्या हालाहल विषाचा घट जास्त कडू वाटेनासा झाला. सारांश जलाल विषापेक्षांही द्रोणाचे बाण वीरांस विशेष मारक झाले. **प्रतीप** अलंकार होय. २. कर्दळीच्या झाडांना. काय हा बाणांचा प्रध्वंसकारी प्रभाव व कोण त्यांची कर्मसुकरता ही ! अत्रस्थ उपमांनीं पांडव-सैन्याचा संहार स्पष्ट लक्ष्यांत येतो. ३. गरुड. ४. पंखांच्या वाऱ्यानें. ५. दुर्योधन. ६. बाणांच्या घरामध्यें. घाबरलेल्या वीरांचे आलाप दुःखद तथापि श्रवण-सुभग नाहींत असें कोण म्हणेल ? ७. स्वभावतः कोमल जें हृदय तें कठीण केलें. ८. धर्मराजास गुरुद्रोणाचार्यांनें धरिलें असेंच म्हणा. द्रोणाची ती सावेग चपलता पाहून कुरुसैन्यांतील लोकांस वाटलें कीं, 'आतां धर्मराजा धरिला जाणार आणि युद्धाचा अंत होणार.' भविष्यकाळांत होणारी गोष्ट भूतकाळीं कियापदानें प्रगट केली म्हणजे ती गोष्ट निश्चयानें होणार असें समजतें. 'हा मी आलोंच पहा' वगैरे प्रयोगांत निश्चितपणा दृश्य आहे. पुढें होणारी गोष्ट किंवा अज्ञात गोष्ट अमुक प्रकारें होईल असें ठाऊक असलेल्या गोष्टींवरून आधीं सांगणें ह्यास तर्क म्हणतात. ९. येतां पाहुनि (येत असतांना, येत आहे असा पाहुनि). १०. धर्मराज कर (हात) जोडी. ११. श्वास आणि शर सोडी. गुरूवर शस्त्र उचलण्याचा प्रसंग दैवदुर्विलासानें आपल्यास प्राप्त झाला म्हणून धर्मशील धर्मराजास वाईट वाटलें व त्यानें सुसकारा टाकून शरवर्षाव करण्यास आरंभ केला तो केवळ 'क्षात्रधर्मा'प्रमाणें केला. 'आहूतो न निवर्तेयम्' अशी धर्मराजाची घोर प्रतिज्ञा होती. सभापर्व—अ० ३ गी० ६४ पहा. तेथें धर्म म्हणतो, 'युद्धासहि द्यूतासहि जावें; नाहीं म्हणों नये बा ! हे । माझी अशी प्रतिज्ञा सत्या अत्यादरोन्विता आहे ॥.' भगवंतांनीं अर्जुनास गीता सांगितली, त्यांतही 'स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकं-

धर्मोच्या चापातें कुरुगुरु एकेंचि मार्गणें[1] तोडी; ।
झोडी [2]भीमप्रमुखां बहुतांतें, [3]बहुबळें बळें मोडी.[4] ॥ ११०
[5]भग्नार्तस्वभटोच्चध्वनि परिसुनि विजय [6]निजैयशोदात्या ।
[7]सूता 'हूं, हांक' म्हणे ! ज्या जपल्या [8]देवकी यशोदा त्या. ॥ १११
दुस्तर संकट पडतां मारिति शक्रादि हांक वीरा ज्या, ।
त्या जगदीशाकरवीं 'हूं' म्हणुनि हयांसि हाकवी, राजा ! ॥ ११२
[9]द्रोणानीकीं केला, शरवृष्टी करुनि, घोळं[10] वीरानें. ।
लोळविलीं [11]रथवृंदें बहु, जैशीं वात लोळवी रानें. ॥ ११३
रक्तनदी वाहविली राया ! त्या [12]शत्रुसिंहशरभानें. ।
केवळ कुरुकटकांचीं हरिलीं, विखरुनि अनंत शर, [13]भानें. ॥ ११४
जे विजयमुक्त सायक भरिती, झांकुनि रविप्रति, नभा ते; ।

पितुमर्हसि । धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत्क्षत्रियस्य न विद्यते ॥' असें सांगितलें आहे. श्रीमच्छंकराचार्यांनीं 'धर्म्य' यावर भाष्य लिहितांना 'तच्च युद्धं पृथिवीजयद्वारेण **धर्मार्थं प्रजारक्षणार्थं चेति** धर्मादनपेतं परं धर्म्यम्' असा अर्थ केला आहे. युद्धाविषयीं आपल्या पूर्वजांचे किती तरी औदार्यपरिप्लुत सद्विचार हे ! 'तया' (द्रोणाला) याचा संबंध 'झोडी' या क्रियापदाकडे आहे.

१. बाणानें. २. भीमादि अनेक पांडववीरांस. ३. पुष्कळ सैन्यें. ४. स्वसामर्थ्यानें विसकटी. ५. भग्न (पराभूत होऊन अंगवैकल्य प्राप्त झाल्यामुळें) आर्त झालेल्या (जर्जरित होऊन संकटांत सांपडलेल्या) स्वपक्षीय वीरांनीं मोठ्यानें केलेला कोलाहल शब्द (स्वर) ऐकून. ६. स्वतःस यश मिळवून देणाऱ्या (कृष्णास). ७. त्या सारथ्याला. ८. अर्जुन केवढा भाग्यशाली होता बरें ? ज्याला नंदपत्नी यशोदा व वसुदेवपत्नी देवकीसारख्या महादेवी अत्यंत काळजीपूर्वक जपत असत, किंवा अति घोर संकट प्राप्त झालें म्हणजे ज्याला मात्र इंद्रादि स्वर्गस्थ देवांनीं संकटनिवारणार्थ हांक मारावी, त्या प्रकृतिपेलव (नाजुक) जगन्नायकाला 'सूता ! रथ लवकर हांक' म्हणण्याचा मानप्रद अधिकार प्राप्त झालेल्या अर्जुनाचें भाग्य कोण वर्णन करील ? पंतांनीं व पंडितांनीं वर्णन केलें परंतु ते सुद्धां थकले ! पंडितांचें 'पार्थभाग्य' हें काव्य पहा. ९. द्रोणसैन्यांत. १०. धोंटाळा, तारंबळ. ११. रथसमुदाय. येथील उपमा समर्पक आहे. रानें लोळविणें यावरून रथसमुदायाची कोण दुर्दशा झाली असेल तें सहज लक्ष्यांत येतें. १२. कौरव हे सिंह त्यांचा संहारकर्ता अर्जुनरूपी शरभ त्यानें. १३. देहभान, देहस्मरण. केवळ (समूळ) भानें हरिलीं—असा अन्वय करावा.

सरतिल[1] ? सरतिल मागें कधिंतरि चौरिहि[2] अपांपेति, न भाते. ११५
दाटे बहु निबिड[3] तिमिर राया ! त्या विजयरचित शर-भवनीं. ।
आम्हां दृग्भ्रम[4] झाला, जैसा सिंहासि होय शरभ-वनीं. ॥ ११६
असुरचमूचा बहुधा धीर तसा नृहरिनें[5] नसे नेला. ।
म्यां सर्पदष्टकन्येहूनिं उणें पाहिलें न सेनेला. ॥ ११७
तों रवि गेला, जाणों सकळकटककदन राहवायातें[6]. ।
करिजेल कां न अद्भुत शक्राद्यजितें नराहवायातें[7] ? ॥ ११८
आलों शिबिरा वर्णित विजया गुरुहून[8] अंगपाहून[9]; ।
भ्यालों अन्योन्याचें पर्णकुसुमवर्ण[10] अंग पाहून. ॥ ११९
परते पार्थ, गजांच्या शून्य करुनि जेंवि हरि समस्त वना; ।
अजितत्वगुणें[11] होय स्तोत्यांच्या विषय हरिसम स्तवना[12]. ॥ १२०
द्रोण म्हणे, 'कुरुराजा ! मद्वचन[13] प्रत्ययासि[14] आलें कीं ? ।
विजयनिवारणशक्ति[15] न माझ्या चापीं, न माझिया लेंकीं[16]. ॥१२१

---

१. संपतील ? छेः, कधींही नाहीं. २. चतुःसमुद्र. पूर्व, पश्चिम, दक्षिण व उत्तर असे चार समुद्र पृथ्वीस वेढा घालून आहेत. ते संपतील किंवा मागें हटतील, पण अर्जुनाचे भाते रिकामे होणार नाहींत किंवा मागें सरकरणार नाहींत ! **विरोध** अलंकार. अनंतजलपतींस अंतल दिलें आहे ! ३. दाट. ४. दृष्टी चकूं लागली. **उपमा** अलंकार आहे. ५. नृसिंहानें हिरण्यकश्यपूचा वध अतिमेसुररीतीनें केला हें पाहून त्याच्या सैन्याची जी गाळण उडाली ती कौरवसैन्याच्या तारेबळीपुढें कांहींच नव्हे ! नारसिंहवृत्त ज्यांस श्रुत आहे अशांसच कौरवसैन्याच्या अधीरपणाची कल्पना करितां येईल. साप चावलेल्या कुमारीची गडबड तर प्रस्तुत प्रसंगींची कौरवसैन्याची धांवपळ आपल्या दृष्टीसमोर उत्तम आणिते. ६. थांबविण्यासाठीं. सर्वच संहार व्हावयाचा पण सूर्यच मावळला ! **उत्प्रेक्षा** आहे. ७. नराहवायातें (मनुष्यांचा संहार चालला होता तो पाहण्यासाठीं आलेल्या) शक्रादि अजितें (विजयशाली देवांनीं) अद्भुत कां न करिजेल ? असा अन्वय. ८. गुरूपेक्षां जास्त. ९. कर्णापेक्षां जास्त विजयाची स्तुति करीत. १०. पळसासारखें तांबडें लाल. ११. सदा विजयी असणाऱ्या गुणानें. १२. स्तुतिपाठकांच्या कवनाला अर्जुन हा उत्तम विषय झाला. १३. मीं पूर्वीं सांगितलें तें. (मागें अ० १ गी० ५६-५९ पहा.) १४. अनुभवास. १५. अर्जुनाला मागें हटविण्याचें सामर्थ्य मी वृद्ध म्हणून माझ्या धनुष्यांत नाहीं व माझा मुलगा तरुण तरी तो इतका पंडित नाहीं म्हणून त्याच्या आंगीं नाहीं. १६. अश्वत्थाम्यामध्यें.

युद्ध कराया हटकुनि[1] विजयाला न्याल दूरि जरि सारे; ।
धरिन, न[2] पळेतां, धर्मा; कौरव हो ! हें यथार्थ[3] परिसा रे !' ॥ १२२
तेव्हां म्हणे सुशर्मा, 'जरि, न, द्विभुजहि[4], सहस्रबाहून, ।
अर्जुन नेऊं ओढुनि दूर बळें संगरार्थ[5] बाहून[6]. ॥ १२३.
आम्हांला तो किंवा त्याला आम्ही वधूं प्रतिज्ञानीं[7]; ।
बहु[8] रक्षिति प्रतिज्ञांप्रति जैसे कुलवधूप्रति ज्ञानी ? ॥ १२४
बोलुनि ऐसें स्वमतीं[9] घे तो[10] सुतबंधुवीरवर्गातें[11], ।
स्वर्गातें साधाया सुखवाया रणमुखांत[12] भर्गातें[13]. ॥ १२५
सुतबंधुवीरकटकासह निश्चितचित्त[14] देव-देश[15]-पथ ।
अवलंबाया, होमुनि[16] विप्रांला वित्त दे, वदे शपथ[17]. ॥ १२६
जैसें करण सुशर्मा तैसें तद्भट[18] अशेष[19] पतकरिती[20]. ।
'करितां रणीं पलायन नरक घडावे,' असे शपथ[21] करिती. ॥ १२७
ते संशप्तकसंज्ञ[22] प्रबल[23] सुभट[24] सिद्ध जाहले युद्धा. ।
क्रुद्धाशीविष[25] गरुडा, कीं, जिंकाया अशुद्धधी[26] शुद्धा ! ॥ १२८

• १. बोलावून, आमंत्रण देऊन. २. धर्मराज पळाला नाहीं तर. ३. वस्तुस्थितीप्रमाणें. ४. अर्जुनाला जरी दोनच हात आहेत, तरी तो सहस्रबाहुहून (हजार हात असणाऱ्या सहस्रार्जुनापेक्षां उणा) नाहीं ! तात्पर्य, सहस्रार्जुनाइतका जरी अर्जुन पराक्रमी आहे तरी. **विरोध** अलंकार. ५. युद्धासाठीं. ६. बोलावून. ७. पण लावून. ८. रक्षण करण्यास पुष्कळ झटतात. कुलवधूंचें रक्षण ज्ञानी करितात, तसेंच ते स्वप्रतिज्ञेचें रक्षण करण्यास फार दक्ष असतात. प्रतिज्ञापालन व कुलस्त्रीसंरक्षण यांचें माहात्म्य किती आहे तें पहा:—'गोभिर्विप्रैश्च वेदैश्च सतीभिः सत्यवादिभिः । अलुब्धैर्दानशूरैश्च सप्तभिर्धार्यते मही ॥' ९. आपल्या मसलतींत. १०. सुशर्मा. ११. आपल्या शूर पुत्रांच्या व बंधूंच्या समुदायास. १२. सैन्याच्या आघाडीच्या जागीं, जेथें युद्धाची झंगड चालते तेथें. १३. शंकराला. ही देवता संहारप्रिय आहे. १४. मनाचा निश्चय झाला आहे असा. १५. स्वर्गमार्ग. १६. होम करून. १७. आणभाक केली. १८. त्याचे अनुयायी वीर. १९. एकूणएक. २०. कबूल करिती. 'पतकरणें' असेंही म्हणतात. २१. 'शपथ' हा शब्द संस्कृतांत पुल्लिंगी आहे. २२. संशप्तक नांवाचे शपथ घेऊन लढाईस जाणारे भारती वीर. यांचा मुख्य सुशर्मा होता. २३. बलवंत. २४. निपुण योद्धे. २५. खवळलेला सर्प. आस्यां विषं यस्य=आशीविषः (दंतामध्यें विष ज्याच्या असा सर्प). २६. दोन असंभवी दृष्टांत दिले आहेत व त्यांवरून संशप्तकांच्या हातून अर्जुनाचा पराभव होणें किती अशक्य

अध्याय दुसरा.

(द्वितीयदिनयुद्ध.)

दुसरे दिनीं सुशर्मा जेव्हां रणमख[1] करावया बाहे[2], ।
अर्जुन धर्मासि म्हणे, 'दे आज्ञा शत्रु बाहती बा ! हे.' ॥ १
धर्म म्हणे 'मागितला मद्रहवर[3] कीं सुयोधनें अहितें[4], ।
गुरु धरिल मला, धरितो लीलेनें पक्षिपति[5] जसा अहितें[6].' ॥ २
कृष्णसख[7] म्हणे, 'देवा[8] ! होऊं द्यावें न भीत[9] चित्त रणीं. ।
होइल गुरुशरतिमिराप्रति[10] हा पांचाल्य[11] सत्यजित् तरणी. ॥ ३
रक्षित आला तुमचा धर्म[12] तुम्हांला पुढेंहि रक्षील. ।
गुरु तों करुणचि, कठिनहि[13] काल न कोपें करूनि लक्षील. ॥ ४
जरि सत्यजित् कदाचित् समरीं पावेल मरण, न रहा[14] हो ! ।

होतें हें सुचविलें आहे. अशुद्ध आहे (मलीन आहे, दूषित आहे) बुद्धि ज्याची तो शुद्धा (पुण्यशील, स्वच्छ बुद्धीच्या मनुष्याला) जिंकाया सिद्ध होतो, त्याप्रमाणें. सूक्ष्मबुद्धीच्या मनुष्याला स्थूलबुद्धीच्या किंवा असंस्कृतबुद्धीच्या मनुष्यानें जिंकणें जसें दुरापास्त आहे, तद्वतच संशप्तकांचा प्रकार होय. **विरोध** अलंकार आहे.

१. रणयज्ञ. 'वेणीसंहार' नाटक ज्यांनीं वाचलें असेल त्यांस 'चत्वारो वयमृत्विजः' इ० भीमोक्तीची आठवण होईल. २. आमंत्रण देता झाला. ३. 'मला (धर्माला) धरून दे' असा वर. (मागें अ० १ गी० ४५ पहा.) ४. आमचें अहित (नाश) करण्याविषयीं तत्पर अशा दुर्योधनानें. ५. गरुड. ६. सर्पाला. **उपमा** अलंकार. 'सहज धरून नेणें' हा सामान्यधर्म. ७. कृष्णाचा सखा अर्जुन. 'राजाहःसखिभ्यष्टच्' यावरून मूळ 'सखि'चें 'सख' असें रूप समासाच्या अंतीं होतें. ८. धर्मराजा. ९. भीतियुक्त. १०. द्रोणबाणरूपी अंधकाराला. ११. पांचालकुलोत्पन्न सत्यजित् हा तरणी (सूर्य) रूपी होईल. **परंपरितरूपक** आहे. पंच पुत्राः अलम्=पंचालम्, तस्य इदं पांचालम् (?). भद्राश्वाच्या पांच पुत्रांवरून हें नांव ह्या देशास पडलें. १२. सदाचार. सद्वर्तनानें इहपरलोकीं रक्षण होतें हें विसरूं नये. १३. गुरु तों (द्रोणाचार्य हे तर) करुणचि (प्रत्यक्ष दयाघनच आहेत, ते शिष्यवत्सल आहेत). कठिन ही काल (आम्हांस संकट प्राप्त झालें असतांही तो आमचा पडता काळ) कोपेंकरून (रागावून) लक्षणार नाहींत–हा सान्वय अर्थ. सारांश, आमच्या पडत्याकाळीं आमच्यावर रागावून आमचा नाश करण्यास गुरु द्रोणाचार्य कधींही प्रवृत्त होणार नाहींत. १४. समरांत राहूं नका

स्वस्थमनें आज्ञा द्या, देव संशप्तक-तृणांत नर हा हो.' ॥ ५
'वत्सा ! विजयी हो, ये संहारुनि शत्रुसैन्य सत्वर तें,' ।
या परि वदोनि आज्ञा दिधली सत्वनिरतास सत्व-रतें. ॥ अर्जुन ६
जे जे प्रताप शस्त्रास्त्रांचे संशप्तकांकडे होते, ।
पांडवचंडांशुपुढें झाले तत्काळ कांकडे हो ! ते. ॥ ७
पार्थाचा प्रलयघनाधिक दारुण देवदत्त दर वाजे. ।
दरवाजेसे डोळे झांकिति, आइकति [11]भीतिद रवा जे. ॥
शर्मा, रथ, धर्मा, धनु, बाहु, भ्राते '[12]सु'पूर्व पांच, विती[13] ।
ज्यां, त्यांसि [14]पूतनाशा [15]विजयविशिखवृष्टि पळ न वांचविती. ॥ ९
[16]नरहरशरदृक्पातें पडला सहसा खचोनि सुधनुरवी. ।
धैर्य परजनीं अर्जुन, [17]षड्वर्गा तिलहि जेंवि बुध, गुरवी. ॥ १०
सर्व त्रिगर्तबल त्या प्रेक्षुनि भटनायका [18]द्रवे, यश तें ।
किती वर्णू ? [19]विपतिपुढें ठाकावें काय [20]काद्रवेयशतें ? ॥ ११

---

१ अग्नि. **रूपक** आहे. २. होऊं द्या. ३. सात्विकपणानें नित्य भक्तिपुरःसर वागणाऱ्यास. ४. धर्मशील युधिष्ठिरानें. ५. प्रकर्षानें तापविणारे, तेजोनिधि. ६. अर्जुनरूपी सूर्यापुढें. ७. कांकड्याप्रमाणें मंदतेज. ८. प्रलयकालच्या मेघगर्जनेहून अधिक भयंकरपणानें. ९. देवदत्त नामक शंख. १०. भयंकर गडगडाट झाल्याबरोबर बायकामुलें जशीं घराचीं दारें लावून घेतात त्याप्रमाणें भेदारलेल्या लोकांनीं आपले डोळे झांकले ! येथें **दामयमक** आहे. ११. भीति उत्पन्न करणाऱ्या शब्दाला. १२. 'सु' आहे ज्या पांच त्रिगर्तभावांच्या नांवांच्या पूर्वी ते सुशर्मा, सुरथ, वगैरे पांच भाऊ. १३. उत्पन्न करिती, ज्या शरराशीचा वर्षाव करिती. १४. 'पूतनाशी···वांचविती' असा पाठ 'नवनीतां'त आहे. १५. विजय+विशिख+वृष्टि=अर्जुनानें सोडलेल्या बाणांच्या वृष्टी (वर्षाव). पूतनाशा म्ह० पूतना जशी पळभर वांचली नाहीं त्याप्रमाणें. १६. नर (अर्जुन) रूपी जो हर (शंकर) त्याच्या शररूपी दृक्पातें (नयनकटाक्षप्रेक्षणानें, प्रलयकालीन तृतीय नयन उघडून त्यानें पाहिल्याबरोबर) सुधनुरूपी सूर्य खचोनि पडला. शंकरानें तृतीय नेत्र उघडल्याबरोबर सूर्यमाला जशी खळकन् तुटून खालीं पडते, तसा अर्जुनशरपाताबरोबर सुधन्वा (संशप्तकांचा एक नायक) मरून पडला. **रूपक** आणि **परिणाम** अलंकार आहेत. १७. कामक्रोधादिक सहा शत्रूंस ज्याप्रमाणें सुज्ञ पुरुष थारा देत नाहीं, तसें अर्जुन शत्रुजनांत धैर्य उरूं न देता झाला. 'षड्वर्गांतिलहि' 'षड्वर्गीतिलहि' असे पाठभेद आहेत. १८. विरून गेलें. संशप्तकांचें सर्व सैन्य गलितधैर्य झालें. १९. पक्षिनायक गरुडापुढें. २०. कद्रूचे मुलगे सर्प त्यांचीं शतें (शेंकडे). नपुंसकत्वयोजनेनें सर्पसामर्थ्य किती तुच्छ आहे हें दिसतें.

त्यांला म्हणे सुशर्मा, ‘सुखद न हा वासवाहि लेश पं[1]थ; ।
परता, भीता, तरि कां दावुनि भा[2]वास, वाहिले शपथ ?’ ॥ १२
फि[3]रले ते [4]नारायण गोपालहि, बहु जसे घन र[5]विवर. ।
विवर न त[6]च्छर देती वाता, लोपे पराहिनरविव[7]र. ॥ १३
शरतिमिरीं कृष्ण म्हणे, ‘म[8]च्चेतोंबुजनवातप ! कासि ? ।
चित्रं[9], अपकाहि फ[10]लप्रकरा पाडी, न वात पकासि.’ ॥ १४
पार्थ म्हणे, ‘[11]स्वस्थ असें, होती त्वच्चिंतनेंचि नरक [12]रिते. ।
नसतां आधार तुझा मज भस्म रणीं कधींच न[13]र करिते. ॥ १५
देवा ! नि[14]जप्रसादा म्हणसिल तूं ‘होय दास;’ मी रणगा ।
काळा पळविन, काय न होइन प[15]रतोयदा समीरण ? गा !’ १६
ऐसें वदोनि योजी [16]त्वष्ट्यानें वोपिल्या व[17]ैशास्त्रातें. ।
जेंवि सुकवि [18]सुमतातें [19]कुतुकें खंडावया अ-शास्त्रातें. ॥ १७
अर्जुनरूपें [20]शतशः क्षणमात्रें प्रकट जाहलीं कटकीं ।
भुलले ते संशप्तक; केली बहु आपणांत क[21]टकट कीं ! ॥ १८
वीर म्हणति, ‘हा अर्जुन, हा केशव, काय पाहतां ? हाणा. ।

---

१. मार्ग. पळण्याची क्रिया इंद्रास सुद्धां सुखद नाहीं. २. भक्तिपूर्वक तुम्ही शपथा वाहिल्या. आतां भीति कसली ? मागें फिरा. ३. माघारे फिरले. ४. हे यादवगण दुर्योधनाकडे होते. ५. सूर्यमंडलावर पुष्कळ अभ्रपटलें येतात त्याप्रमाणें. **उपमा** आहे. ६. त्यांचे बाण वाऱ्यास सुद्धां शिरकूं देईनात. ७. पर+अहि (शत्रुरूपी सर्पांचा)+नर (अर्जुनरूपी)+वि-वर (पक्षीश्रेष्ठ, गरुड)=शत्रूंचा नाशकर्ता अर्जुन. ८. माझ्या अंतःकरणकमलास बालसूर्य होणाऱ्या अर्जुना ! कोठें आहेस ? **रूपक** आहे. ९. चमत्कार आहे कीं. १०. फलांच्या समूहाला; घडाला. **विरोध** अलंकार आहे. ११. खुशाल. १२. रिकामे होतात. नुसतें ईशचिंतन केल्यावर नरकलोक जीवशून्य होतो. मला तर तुझें सांनिध्य नित्य आहे. मग मी खुशाल आहें यांत आश्चर्य तें काय ? **अर्थापत्ति** अलंकार. १३. इतर वीर. येथें प्रगट झालेली अर्जुनाची ईशनिष्ठा संस्मरणीय आहे. १४. तुझा प्रसादरूपी जो मी त्या मला जर म्हणशील कीं, ‘तूं माझा दास आहेस’ तर रणाप्रत गमन करणारा मी जो (रणगा) हा, तुझ्या कृपेनें दुर्जय होईन. १५. शत्रुरूपी मेघांस मी समीरण (वारा) होणार नाहीं काय ? १६. विश्वकर्मा. ‘देवशिल्पिन्यपि त्वष्टा’ इत्यमरः. १७. मोहनास्त्र. १८. चांगल्या सिद्धांतांस योजितो. १९. लीलेनें. २०. अर्जुनाचीं शेंकडों रूपें. २१. मारामारी.

आणा मनीं कुलज हो ! ज्या अग्निसमीप वाहिल्या आणा. ॥ १९
वेष्टा धनंजयाला, आत्मयशें सत्यपांड वेष्टाया; ।
चेष्टा करूं न द्याव्या गोपाला सत्य पांडवेष्टा या.' ॥ २०
पार्थ म्हणोनि परस्पर हाणुनि शस्त्रांचिया महा-निकरें ।
मेले, बहुत भुलविले, त्या अस्त्रें शत्रु-धाम-हानिकरें ॥ २१
समरीं स्वयेंहि वासवि बहुशत्रूंतें, हरूनि असु, खपवी. ।
याचा जेंवि शर परा, तैसें देईल काय असुख पवी ? ॥ २२
संशप्तकां नर, जसा नरहरि मारी विशृंखळ खळांतें; ।
होय असृक्स्रोतःशत, वाहे समराजिरीं खळखळा तें. ॥ २३
अरिकदन जसें अर्जुन, कुरुगुरुहि तसेंचि वीरकदन करी. ।
मिरवी तयापुढें भट, जेंवि हरिपुढें बलीहि मद, न, करी. ॥ २४
धृष्टद्युम्नवृकोदरसौभद्रप्रमुख वीर कंपविले ।
द्रोणें बहुशूरांचे समररसोत्साह सर्व संपविले. ॥ २५

---

१. कुलीन हो ! सत्यव्रत हो ! हा शब्द साभिप्राय योजिला आहे, म्हणून **'परिकरा'** लंकार. २. सत्यलोकाचा अधिपति जो ब्रह्मदेव त्याचें अंड, ब्रह्मांड. 'वेष्टणें'पासून 'वेढणें' झाला. अर्जुनास वेढला म्हणजे ब्रह्मांडाला स्वयशानें वेढा घातला असें श्रेय तुम्हांस प्राप्त होईल. सारांश, दिगंत कीर्ति होईल. अर्जुनाच्या पराक्रमाची या शब्दप्रयोगानें उत्तम कल्पना मनांत येते. अर्थगौरवाचा हा एक मासला आहे. **काव्यलिंग** अलंकार आहे. 'हेतोर्वाक्यपदार्थता काव्यलिङ्गम्.' (मम्मटः) ३. पांडवांचें कल्याण करणाऱ्या या श्रीकृष्णाला. ४. भयंकर घावांनीं. ५. मोहनास्त्रानें. ६. धाम= तेज त्याची हानी करणाऱ्या अस्त्रानें. ७. संपवी, मारी. 'क्षै'धातूस प्रयोजकरूप प्राप्त होऊन 'क्षपय' असें झालें. त्याचेंच 'खपविणें' झालें. ८. वज्र. अर्जुनाचे शर वज्रापेक्षांही जास्त तापदायक होते. **प्रतीप** अलंकार आहे. ९. उन्मत्त झालेला (बंधनरहित) असा जो हिरण्यकशिपू त्या दुष्टाला. १०. रक्तप्रवाहांचें शतक. यावरून रक्तस्राव किती झाला याची कल्पना होते. ११. समरांगणांत रक्ताच्या शेंकडों नद्या खळखळा वाहावयास लागल्या ! अर्जुनानें केवढा नरमेधयज्ञ केला हा ! १२. शत्रुसंहार. १३. बलवान हत्तीही जसा सिंहापुढें मद मिरवीत नाहीं, तसा योद्धा कुरुगुरुपुढें आपली मस्ती मिरवीना. सर्व योद्धे मदशून्य झाले. 'भट' एकवचनी शब्द अनेकवचनार्थी आहे. १४. वीररसाचा उत्साह. 'समरसवोत्साह' असाही पाठ आहे. पुष्कळ नांवाजलेल्या शूरांचें वीररसप्रेम अस्तंगत झालें.

[1]कौंतेय गांठिला [2]रणरंगीं [3]नटवुनि [4]महाभट-कबंध, ।
जैसा जलद् समीरें, तैसा विसकटुनियां [5]कटकें-बंध. ॥ २६
धीर धरुनि [6]धर्मज्ञें धीरें [7]धर्में धनुष्य चढवीलें; ।
दाखविलें तें गुरुला जें होतें आपणांसि पढवीलें. ॥ २७
'गुरुनें नृप धरिला रे ! धरिला ! हाणा हयां [8]कशा, हाका; ।
'हा ! काय पाहतां ? [9]द्विजें वेढा,' भट मारिती अशा हाका. ॥२८
तों धांवे वेंचाया धर्मार्थ [10]स्वायुधासुवित्त रणीं, ।
वाटे [11]मुहूर्त, तो [12]द्विजराज [13]द्विजराज, सत्यजित तरणी. ॥ २९
त्या पांचाळातें गुरुराज स्वर्गासि पाठवी, राजा ! ।
[14]तेव्हां 'धर्म पलायन.' धर्म म्हणे, धर्म पाठ वीरा ज्या. ॥ ३०
[15]धर्म न भांडे गुरुसीं, जैसा सत्पुत्र पाठ दे [16]वडिला ।

---

१. धर्मराजा. २. समरभूमीवर. ३. रक्तानें उज्वल वेष धारण करावयास लावून. ४. मोठमोठ्या वीरांचीं शिरोविहीन शरीरें. पंतांनीं येथें समरभूमीस शैलूषांची (नाटकवाल्यांची) रंगभूमी केली आहे ! ५. व्यूहरचना मोडून. आचार्यांचें हें हस्तलाघव विचित्र नाहीं, असें कोण म्हणेल ? ६. क्षात्रधर्मपंडितानें. ७. धर्मानें आपलें धनुष्य सज्ज केलें. सर्व रणांगण उध्वस्त झालें असतांही धर्मानें धीर धरिला हें आश्चर्यच होय. या गीतींत धैर्यसूचक 'ध'कार किती वेळ आला आहे पहा. धर्मास तरी गुरूपुढें परीक्षा देण्याची ही पहिलीच वेळ ! तेव्हां त्यानें धीर धरिला हेंही आश्चर्यच होय. ८. चाबुक. भटांचा हा 'हाहा'कार 'हा'च्या अनुप्रासानें किती तरी खुलत आहे ! ९. ब्राह्मण (द्रोणाचार्य). १०. स्व+आयुध+असु+वित्त=स्वतःचें शस्त्र व प्राणरूपी धनातें. ११. दोन घटकाभर. १२. ब्राह्मणश्रेष्ठ द्रोणाचार्य. १३. चंद्र. 'द्विजराजः शशधरो नक्षत्रेशः क्षपाकरः' इत्यमरः. पांचालकुलोत्पन्न सत्यजितानें मुहूर्तभर असा चमत्कार केला कीं, गुरुद्रोणाचार्य चंद्राप्रमाणें सौम्य आणि सत्यजित् सूर्याप्रमाणें प्रखर दिसले. येथें **उत्प्रेक्षा** आहे. 'द्विजराज' ह्या श्लिष्ट शब्दानें या गीतीस फारच मजा आणिली आहे. १४. ज्या वीरा धर्म (युद्धशास्त्र) पाठ होता तो धर्म म्हणाला, 'आतां अर्जुनानें सांगितल्याप्रमाणें पलायन हाच धर्म आहे.' (मागें गीति ५ पहा). १५. धर्मराजा. नीति असा दुसरा अर्थ करून हें पद्यखंड सुभाषित करावें. १६. बापाला. सत्पुत्र जसा वडिलांचें ऐकितो, त्यांच्या म्हणण्यास पाठ देतो, त्याप्रमाणें. वाऱ्यास पाठ देणें= प्रसंगानुसार वर्तन करणें. नभींचे देव स्तोत्रपाठ सोडून (धर्माचें स्तोत्र गाण्याचें सोडून देऊन) त्याला (धर्माला) ढिला (शक्तिहीन) म्हणते न झाले. म्हणजे धर्म भ्याड म्हणून पळाला असें त्यांनीं म्हटलें नाहीं. शिष्यानें गुरूचा पराजय करूं नये असें समजून

त्यासि न म्हणति नभींचे, सोडुनि स्तोत्रपाठ, देव, ढिला. ॥ ३१
समराजिरासि राया ! सोडुनि जैसा युधिष्ठिर पळाला, ।
कुरुगुरु तसेंचि पळवी [1]त्याच्या स्वनिवारणोद्यत बळाला. ॥ ३२
भ्याले गुरुसि [2]पैर, जसे [3]पंचाक्षरमंत्रजपपरा भूत. ।
[4]हतशेष भट पळाले, जेंवि असुर [5]विष्णुंबलपराभूत. ॥ ३३
कुरुपति कर्णासि म्हणे, 'आचार्यें पळविले पहा [6]पैर ते, ।
भ्याले सात्यकि, धृष्टद्युम्न, वृकोदर; न एकही [7]पैरते. ॥ ३४
गुरु भीष्माहुनि शतगुण अधिक, [8]धनुर्वेद मूर्त हा सत्य ! ।

धर्म मागें सरकला असें देव म्हणूं लागले व त्यांची त्यांनीं स्तुतिच चालविली. गुरु आले म्हणून शिष्याचें रणांगणांतून पळून जाणें हें मर्यादशील झालें, हें खरें. पण शत्रुसन्मुख उभें राहिल्यानंतर 'हा गुरु' असा नागरिक भाव मनांत आणणें प्रत्यक्ष द्रोणाचार्यांसच किती पसंत पडलें असतें वरें ? कर्णार्जुनासारख्या महायोद्ध्यांनीं तर असल्या वर्तनाचें भीरुत्व असें नामकरण करून पळल्या मनुष्याची यथेच्छ निंदाच केली असती. अर्जुनानें (५ वी गीति पहा.) धर्मास राहूं नका असा उपदेश केला होता खरा, पण स्वतःवरच असली पाळी आली असती तर त्या विजयशाली नरपुंगवानें काय केलें असतें, तें ठरविण्यास फारसें लांब जावयास नको. 'न घडो हें कीं समरीं मेल्यावरि मी सुखें इलावर हो।' (मागें अध्याय १ गीति ६३ पहा) या धर्मवाक्याचेंच त्यानें यथास्थित अनुकरण केलें असतें. सारांश, देवांनीं जो स्तुतिपाठ चालविला तो केवळ पंतांची धर्मावर विशेष निष्ठा, म्हणून पंतांच्या भिडेखातर चालविला होता असें दिसतें. असो; हा धर्माचा पराजय फार वेळ टिकला नाहीं हें लवकरच कळेल.

१. धर्माच्या रक्षणासाठीं तयार झालेल्या. २. शत्रु. ३. 'नमः शिवाय' ह्या पंचाक्षरीमंत्राचा जप करण्यामध्यें तत्पर असणाऱ्याला जसें भूत भितें तसे. ४. न मरतां शिल्लक राहिलेले. ५. विष्णूच्या सामर्थ्यानें पराभव पावलेले राक्षस पळतात तसे. दोन्ही चरणांत **उपमा** असून भिणें व पळणें यांचा खासा परिचय होण्याची कवीनें युक्ति केली आहे. ६. शत्रु. ७. गुरुसंमुख युद्ध करण्यास एकही वीर परत येत नाहीं. ८. गुरुद्रोण हा मूर्तिमान् धनुर्वेदच खरोखर आहे. 'धनूंषि तदादीन्यस्त्राणि ज्ञायंते अनेन. चतुष्पादं धनुर्वेदं वदेत् पंचविधं द्विज ! । रथनागाश्वपत्तीनां योधाश्चाश्रित्य कीर्तितम् । यंत्रमुक्तं, पाणिमुक्तं मुक्तसंधारितं तथा, । अमुक्तं, बाहुयुद्धं च पंचधा तत्प्रकीर्तितम् । तत्र शस्त्रास्त्रसंपत्त्या द्विविधं परिकीर्तितम् । ऋजुमायाविभेदेन भूयो द्विविधमुच्यते । क्षेपणीचापयंत्राद्यै यंत्रमुक्तं, शिलातोमरपञ्चाद्यं पाणिमुक्तं, प्रासाद्यं मुक्तसंधारितं, खड्गादिकं अमुक्तं च नियुद्धं विगतायुधम् ।.' (अग्निपुराणे २४८ अध्याये.)

[1]हांस त्यक्तावधि ये, झाला मे[2]द्रिपुगदास [3]नासत्य.' ॥ ३५
[4]राधेय म्हणे, 'राया ! जयहर्षे हांसतोसि परि समज, ।
[5]परम अनर्थ परतला, [6]भीम गमे उग्र मृत्यु-परिस मज. ॥ ३६
पांडववीर पळाले गेले, ऐसें तुवां न मानावें; ।
[7]यांचें बल सत्कविंनीं [8]हरिहरबलसें सदैव [9]वानावें. ॥ ३७
आतां गुरुवरि धर्म स्वकटक फिरवील, भीम [10]परतेल; ।
परम प्रदीप्त होइल कीं[11] तो नररूप वन्हि पर तेल. ॥ ३८
रक्षावा द्रोण रणीं यत्नें आम्हीं तुम्हीं [12]ससेनांहीं; ।
म्हणतिल काय अरक्षित[13]हरिमथनयशःस्पृहा ससे नाहीं ?'" ॥ ३९
ऐसें कर्ण वदे तों मागें [14]सहसा फिरे कटक, राया ! ।
[15]प्रलयींचा [15]पाथोनिधि जैसा पृथ्वी प्रजा [16]गट कराया. ॥ ४०
द्वंद्वशतें किति वर्णूं ? भीम क्रीडे रणीं समु[17]द्धुरसा. ।

---

१. अमर्याद, निःसीम हांसूं येतें. २. माझ्या रिपुरूपी रोगास. ३. अश्विनीकुमार. 'नासत्यौ अश्विनौ दस्रौ आश्विनेयौ च तौ उभौ' इत्यमरः. दुर्योधनाच्या हर्षाचें कारण येथील रूपकानें चांगलें व्यक्त केलें आहे. ४. राधासुत कर्ण. ५. भीमाचें परतणें 'परम अनर्थ परतला' या शब्दांनीं फारच उत्तम व्यक्त झालें आहे. भीम म्हणजे मूर्तिमान् अनर्थच ! शेवटची उत्प्रेक्षा कर्णाचें मतिस्थैर्य प्रगट करिते. ६. 'भीम गमे उग्र मृत्यु, परिस मज' असा पदच्छेद आदर्शप्रतींत होता. मज परिस=माझें म्हणणें ऐक. ७. भीमाचें. ८. विष्णु व शंकर यांच्या बळासारखें. ९. स्तुति करावी, वर्णावें. 'वर्णणें'चा 'वानणें' हा अपभ्रंश. १०. प्रति=मागें या अव्ययापासून तर 'परत' हा शब्द निघाला नाहीं ? ११. कारण तो (भीम) नररूप धारण करणारा अग्नि आणि शत्रु तैलरूपी होत. तेव्हां वन्हितैलाचा संयोग झाला असतां वन्हि प्रदीप्त होणें साहजिकच आहे. रूपक आहे आणि हें पंतनिर्मित आहे. १२. सैन्यांसुद्धां. 'आंहीं' हा तृतीयेचा अनेकवचनी प्रत्यय 'ऐः' या संस्कृतरूपाचा अपभ्रंश. १३. ज्याचें रक्षण करणारा कोणी नाहीं अशा सिंहाचा नाश करून यश मिळविण्याची इच्छा ससे (क्षुद्र प्राणी) करणार नाहींत काय ? म्हणून तुम्हीं आम्हीं सैन्यासकट द्रोणाचें रक्षण करूं चला. (महाभारत–द्रोणपर्व–अ० २२ श्लो० २६-२८ पहा.) १४. एकदम. १५. प्रलयकालचा समुद्र. पाथस्=जल, पाणी. १६. गिळून टाकण्यासाठीं. सर्वांचा, चराचर वस्तूंचा नाश करावयाला जसा समुद्र तयार होतो, तशी ही सेना कुरुसेनेला गट करण्यासाठीं मागें फिरली. पांडवसेनेचा आवेश या उपमेवरून स्पष्ट होतो. १७. समुत्+हरसा=आनंदित शंकरासारखा.

त्या युद्धरसा सेवूं त्वंक्छृति, सेवी जसी अशुद्ध रसा. ॥ ४१
भीमासीं युद्ध करी द्विरदीं बैसोनि पुत्र नरकाचा, ।
टिकला भीमचि, टिकता त्यासीं समरांत काय नर कोचा ?॥ ४२
मर्दुनि करिकटकातें व्याकुल दुर्योधनासि भीम करी; ।
तों प्रेरिला तयावरि अंगें, म्लेच्छाधिपें, स्व-भीम-करी. ॥ ४३
एकेचि शरें मस्तक भेदुनि, येतांचि, नाग लोळविला. ।
परलोकाप्रति अंग, च्छेदुनि मूर्धा, पळांत बोळविला. ॥ ४४
ज्या ऐरावतकुलजा अर्पुनि पूर्वीं महेंद्र साम करी, ।
तो प्रेरिला, सकोपें भगदत्तें, सुप्रतीकनाम करी. ॥ ४५
भीमावरि, न गणुनि शरवृष्टीची झड, करी करी लगट; ।
वाटे जनांसि काळचि तो त्याला झडकरी करील गट. ॥ ४६
तो क्रोधमदांध महानागायुतशक्तिमूळपीठ करी ।

---

१. सेवो. येथें उपमा असून 'स'कारानें अनुप्रासही उत्पन्न झाला आहे. २. तुझे कान. ३. रक्त. ४. पृथ्वी. ५. हत्तीवर. दोन दांत आहेत म्हणून 'द्विरद.' ६. नरकासुराचा पुत्र भगदत्त. गजयुद्धांत हा मोठा कुशल असे. ७. भित्रा. 'कचा' व 'काचा' हे शब्द भाऊभाऊच दिसतात. ८. गजसैन्याला. ९. अंग हा म्लेच्छाधिप असून कर्णाचा एक मांडलिक राजा होता. १०. संस्कृत किंवा तज्जन्य भाषांशिवाय अन्य भाषा बोलणारे ते म्लेच्छ. म्लेच्छ म्हणजे अस्पष्ट बोलणारा. ग्रीक व लॅटिन भाषेतील 'Barbarian' व संस्कृतांतील 'म्लेच्छ' हे एकार्थक शब्द आहेत. ११. आपला भयंकर हत्ती. १२. हत्ती. १३. डोकें कापून. 'लोळविला' शब्द भीमपराक्रम सुचवितो. बोळविला=स्वर्गास रवाना केला. १४. ऐरावतकुलांत उत्पन्न झालेल्या सुप्रतीक नामक गजास. १५. भगदत्ताला हा हत्ती देऊन इंद्रानें याचें सख्य पूर्वी मिळविलें होतें, भगदत्ताशीं सख्य केलें होतें. १६. सख्य. १७. गज. प्रेरिला=भीमाच्या अंगावर घातला. १८. संततधार. १९. सुप्रतीक हत्ती. २०. करिता झाला. २१. गांठ घालणें. येथें नवाक्षरी यमक आहे. २२. हत्ती. २३. भीमाला. गट करील=खाऊन टाकील. २४. क्रोधानें (रागानें) आणि मदानें (उन्मत्तपणानें) अंध झालेला (वेडा झालेला) करी (हत्ती). २५. महानाग (दिग्गज, पृथ्वीला आधार देणारे गज) त्यांचें अयुत (दशसहस्र) त्यांची आहे शक्ति ज्याला अशा गजाच्या ठायीं आहे मूळ पीठ (उत्पत्तिस्थान) ज्याचें असा सुप्रतीक हत्ती. दोन्हीं विशेषणें साभिप्राय आहेत. भीमाची अशा प्रचंड गजाशीं गांठ पडली !

शुंडापादाघातें[1] साश्वरथातें[2] पळांत पीठ[3] करी. ॥ ४७

भीम गमे मेला, परि त्याच्या[4] पोटातळीं दडाला हो ! ।

तो चित्तांत म्हणे, 'बहु मदलाभें[5] ताप या जडाला[6] हो.' ॥ ४८

भ्रमला कुंलालचक्रासम[7] नाग धरावया लपाल्याला. ।

जरि तो प्रवर्तला श्रितनाशीं[8], मदमत्त न त्रपा ल्याला. ॥ ४९

सत्वर निघोनि पळतां[9], धरुनि करें[10] कंठ, दे उरीं गुडघे[11]; ।

चाटावया चीत्कार करी, जाणों पतिला[12] 'चाटावया' म्हणे 'गुड घे.' ॥ ५०

बंधापासुनि सुटला, वेगें भीम भ्रमोनियां उलटा[13] ।

शुंडा तरि होय, बळें जसि पडली साधुच्या गळां कुलटा[14]. ॥ ५१

पोटातळीं पुन्हां त्या द्विपपतिच्या[15] तो पृथासुत लपाला. ।

वाटे जनासि, म्हणती, कवि[16] एक बळी, वृथा सुतल-पाला. ॥ ५२

---

१. शुंडा (सोंड) आणि पाद (चरण) यांच्या प्रहारांनीं. २. भीमाच्या घोड्यासहित रथाला. ३. 'पीठ करी' हा शब्दसमूह त्या सुप्रतीकाचें सामर्थ्य दर्शवितो. अश्वासकट त्यानें रथाचा चुराडा केला. ४. हत्तीच्या. ५. मन्+अ+लाभें=मी न सांपडल्यामुळें. ६. या जडाला (बुद्धिशून्य पशूला, प्रचंड हत्तीला असाही अर्थ घ्यावा) बहुताप होत आहे किंवा व्हावा. मूळांत ही भीमोक्ति नाहीं. ७. कुंभाराचें चाक फिरतें त्याप्रमाणें गरगर फिरला. ८.ज्यानें आपला आश्रय घेतला आहे त्याचा (आश्रिताचा) नाश करण्याचे कामीं जरी प्रवृत्त झाला तरी तो गज मदोन्मत्त झाला होता म्हणून त्याला बिलकुल त्रपा (लज्जा) वाटली नाहीं. ल्याला=घेता झाला. लेणें=घेणें. 'नैवाश्रितेषु महतां गुणदोषशंका.' सारांश, आश्रय केलेल्याला मरण द्यावयाचें नाहीं ही पूर्वीची चाल लक्षांत ठेवावी. ९. भीम पळूं लागला असतां. १०. सोंडेनें भीमाच्या गळ्याला धरून, भीमाचा गळा धरून. ११. उरावर गुडघे ठेविले. काय भीमावर प्रसंग हा ! १२. भगदत्ताला. आपल्या यजमानाला भीमानें फारच त्रास दिला होता म्हणून तो रागावला असेल असें समजून हत्ती त्याला क्रोधशमनार्थ 'हा चाटायला गूळ घे' अशा अर्थाचे चीत्कार (ची ची असे शब्द) करिता झाला. हत्तीच्या चीत्कारावर ही हर्षदर्शक **उत्प्रेक्षा** आहे. १३. उलटें फिरून. १४. वाईट चालीची स्त्री. **उपमा** मुळांत तर नाहींच; पण फारच बहारीची झाली आहे. 'बळें' हा शब्द तर फारच योग्य होय. कुलटा जशी साधूस सोडीत नाहीं तशी ही शुंडा भीमास सोडीना. 'उपमा कालिदासाची' असें म्हणतात. हेंच पंतांविषयीं आपल्यास म्हणावयास नको काय ? १५. हस्तिश्रेष्ठाच्या, सुप्रतीकाच्या. १६. कवि (शहाणा, बुद्धिमान्) हाच एक बळी (बळवान्); 'बुद्धिर्यस्य बलं तस्य'=ज्याला (बुद्धि) आहे तोच बळवंत होय. सुतल-पाला (पातालपती जो बलि त्याला) बळी वृथा म्हणती (म्हणतात),

भीम निघे, दृष्टिपुढें येतां [1]निजगजघटा, शिरे [2]तींतें. ।
[3]श्रम होय **सुप्रतीका** जैसा नटतां नटासि रेतींत. ॥ ५३
जन म्हणति, 'नवल ! साहुनि [4]वज्राघातासि, **भीम** [5]नग जाला; ।
कीं [6]यां **भगदत्ताच्या** देवगजाचेंहि भी मन गजाला.' ॥ ५४
वेष्टिति **भगदत्ताला पांडव** होऊनि [7]एकवट सारे. ।
तेव्हां सुर म्हणति, 'अहा ! गमतो जलधींत एक [8]वटसा रे !'॥ ५५
मुनि म्हणति, 'या बलीं हा गज, त्या [9]सिंधूंत जेंवि **मंदर** तो; ।
[10]एवंविध रणयज्ञ त्यागुनि, [11]यज्ञांतरांत मंद रतो.' ॥ ५६
बहु भग्न, चूर्ण केलें बल त्या [12]भगदत्तसिंधुरागानें. ।
वाटे जग बुडवितसे [13]प्रलयसमयमत्तसिंधु रागानें. ॥ ५७
भीम रथीं बैसुनि ये, त्यावरि 'फू' करुनि तो [14]थुंकी उडवी. ।
बुडवी भयांत [15]वाजी, पळवी, धांवुनि सहाय बहु तुडवी. ॥ ५८

असें जनांस वाटे. बळीला भगवंतांनीं सुतल नामक पाताळाचें राज्य दिलें होतें. (भागवत–स्कं० ५ अ० २४ पहा.) भीमानें स्वबुद्धीनें आपलें रक्षण केलें यावर **पंतांची** ही **उत्प्रेक्षा** आहे. येथें **प्रतीप** अलंकारही आहे.

१. स्वसैन्यांतील गजसमुदाय, गजसेना. २. त्या सेनेंत. ३. वाळूच्या प्रदेशांत नटतांना (नाचतांना) नटाला जसा त्रास पडतो, तसा सुप्रतीकाला श्रम झाला. भीम इकडून तिकडे निसटला त्यावर ही **उपमा** आहे. ४. वज्रासारख्या प्रहाराला सहन करून. ५. पर्वत. ६. कारण भगदत्ताच्या या गजाला (पाहून) देवगजाचें (ऐरावताचेंही) **मन** भी. ७. सारेजण एकत्र, एकवत् होऊन. ८. वटवृक्षासारखा, वडासारखा भगदत्त आणि जलधीसारखी सेना. देवांची ही **उत्प्रेक्षा** चांगली आहे. प्रलयकालीं समुद्रमय पृथ्वी झाल्यावर जो वटवृक्ष शिल्लक राहणार तोच हा, असें देवांस वाटलें. (भागवत–स्कं० १२ अ० ९ पहा.) ९. समुद्रमंथनाच्या वेळीं क्षीरसागरांत असणारा. बलीं=सैन्यांत. ऋषींची ही दुसरीच कल्पना आहे. १०. असल्या प्रकारचा. ११. दुसऱ्या यज्ञांत निर्बुद्ध, मतिमंद लोकांनीं रमावें. या रणयज्ञांतच अनेक रत्नें मिळणार तीं सोडून दुसऱ्या यज्ञांकडे मठ्ठ लोक मात्र जातील. ऋषींचा हा रणयज्ञाचा अभिमान अमळसा चमत्कारिकच नव्हे काय ? १२. भगदत्ताच्या हस्तिरूपी पर्वतानें. सिंधुर=गज. १३. प्रळयकाळचा अमर्याद सागर रागानें जग बुडवितसे, असें वाटे. **उत्प्रेक्षा** आहे. १४. मुळांत 'सोंडेंत धरलेलें पाणी' असें आहे. १५. त्या फूत्काराला व जलवर्षावाला घोडे भ्याले. धांवत गेला तेव्हां साहाय्यास आलेले पळाले, त्यांतलेच पुष्कळ त्या गजानें तुडविले. एकंदरींत

[1]गजगर्जितें धनंजय समजे भगदत्तकृत्य चित्तांत. ।
होय बहु वि[2]कल, [3]कीं बुध लुब्ध यशीं, कृपण जेंवि वित्तांत.॥ ५९
कृष्णानुमतें भंगुनि, भुलवुनि निर्ज[4]विशिखभवतमीं पर ते, ।
मोहूनि सुशर्म्यातें सोद[5]रशोकें, शरें, विजय [6]परते. ॥ ६०
कुरुकटका तप्त करीं पार्थ, ग्रीष्मीं जसा [7]पतंग जगा. ।
तों प्रेरिला तयावरि भगदत्तें काळसा [8]मतंगज गा ! ॥ ६१
दे[9]वें गजासि म्हणे, 'रे ! गर्व [10]अयःस्तंभसमरदा ! न वहा; ।
हा मत्सख [11]नर सिंहचि [12]वज्रधरासह्यसमर, [12]दानवहा.' ॥ ६२
होय पुढेंचि, न मागें [13]पार्थशराहतहि [14]शतमखसख सरे. ।
मुनि म्हणति, 'अर्जुनीं तव शक्ति, [15]जैसी सागरांत खसखस रे !॥ ६३

भगदत्तानें व सुप्रतीकानें मिळून पांडवसैन्याची खूपच तारंबळ उडवून दिली होती म्हणायची ! मुळांत विशेष विस्तार आहे. पंतांनीं मात्र हात आखडता घेतला आहे.

१. या हत्तीच्या ओरडण्यानें, बृंहणानें. अर्जुनानें मनांत गांठ घातली कीं हें भगदत्ताचें कृत्य आहे. २. अर्जुन निस्तेज झाला. ३. कारण शहाणा व कुलीन पुरुष यशाला (कीर्तीला) लुब्ध झालेला असतो. पुढील कृपणाची उपमा स्पष्टच आहे. संशप्तकांशीं लढतांना अर्जुनास जरी जय मिळाला होता, तथापि आपल्यामागें भगदत्तानें पांडवसेनेची वाताहत केलेली पाहून तो फिक्का पडला. ४. आपल्या बाणांनीं उत्पन्न केलेला जो अंधकार व मोह त्यांत (त्यानें) पर (शत्रु) भंगुनि व भुलवुनि. ५. भाऊ मेला त्याच्या शोकानें व बाणांनीं सुशर्म्याला मोहित करून. ६. विजय (अर्जुन) परत फिरला. ७. सूर्य. 'पतंगः शलभे शालिप्रभेदे पक्षिसूर्ययोः' इति विश्वः. ८. हत्ती. 'मतंगजो गजो नागः कुञ्जरो वारणः करी' इत्यमरः. ९. श्रीकृष्ण. १०. लोखंडाच्या खांबासारखे आहेत दांत ज्या तुझे अशा गजा ! गर्व वाहूं नकोस. ११. अर्जुन. १२. वज्र धारण करणारा जो इंद्र त्याला आहे असह्य युद्ध ज्याचें असा व पुष्कळ दानवांस मारणारा माझा सखा अर्जुन तुला सिंहरूपीच आहे. गजावर सिंह हें उत्तम अस्त्र आहे म्हणून हें रूपक समर्पक होय. एक कवि म्हणतो:—'अनिशं मतंगजानां बृंहितमाकर्ण्यते यथा विपिने । मन्ये तथा न जीवति गजेंद्रपलकवलनः सिंहः ॥.' १३. अर्जुनशरांनीं जर्जर झाला तथापि. १४. इंद्रसख जो भगदत्त, प्राग्ज्योतिषांचा राजा तो. शंभर यज्ञ केले म्हणजे इंद्रपद मिळतें म्हणून इंद्रास शतमख म्हणतात. १५. समुद्रांत खसखस जशी सांपडणें मुष्कील तशी हे भगदत्ता ! अर्जुनापुढें तुझी शक्ति मिरवणें व्यर्थ ! ही उपमा मुळांत नाहीं. पंतांनींच मुनींकडून हा अलंकार काव्यवधूस लेवविला आहे ! 'दर्यामें खसखस' ही म्हण प्रसिद्धच आहे.

हाणी वज्र[1]प्रतिम प्राग्ज्योतिषवीरराय तोमर[2] तो. ।
[3]भगवत्प्रसाद सुकवच त्याला जो साधु, काय तो मरतो ? ॥ ६४
प्रकट करूं दे समरीं श्रीदेवी जेंवि [4]सैरिभास कला, ।
तेंवि विजयचापलता; मग दवडी दूर वैरिभा[5] सकला. ॥ ६५
[6]विजयविशिखार्त होतां, पूर्वी [7]दुष्करहि आयकोन, [8]करी ।
[9]भगदत्ताचें [9]कथिलें, [10]अंधनाचें जेंवि बायको, न करी ! ॥ ६६
शस्त्रें सरतां आला [11]पार्थविमथनार्थ अंकुश मनाला; ।
विष्णवस्त्रें अभिमंत्रुनि सोडी, हरि जेंवि रंकु-[12]शमनाला. ॥ ६७
प्रभुनें [13]अनिवार्य म्हणुनि वक्षःस्थल अंकुशास [14]वोढविलें; ।
अत्युग्र वैष्णवास्त्रापासुनि [15]निजमित्ररत्न सोडविलें. ॥ ६८

---

१. वज्रासारखा. २. गरगुंज. एक गदेसारखें लोखंडी आयुध. ३. भगवंताची कृपा हेंच बळकट कवच ज्याच्या अंगावर आहे तो मरतो काय ? अर्जुन मेला नाहीं. तोमरप्रहार निष्फल झाला हें पर्यायानें सांगितलें म्हणून **पर्यायोक्ति अलंकार आहे.** ४. सैरिभ=रेडा, टोणगा. 'लुलायो महिषो वाहद्विषत्कासरसैरिभाः । पंच महिषस्य' इत्यमरः. देवीनें महिषासुराला कला (चातुर्य) प्रगट करूं दिल्या त्याचप्रमाणें विजयाच्या गांडीव धनुष्यानें भगदत्तास कांहीं वेळ खेळविलें. शस्त्रांस लता म्हणतात. उदा० खड्ग-लता. ५. शत्रूचें तेज. सकला=सर्व. ६. विजय+विशिख+आर्त=अर्जुनबाणांनीं जर्जर. ७. भगदत्ताचा हत्ती भगदत्तानें सांगितलेली दुर्घटही गोष्ट पूर्वी ऐकत असे, परंतु जखमी झाल्यावर त्यानें सांगितलेलें तो ऐकेनासा झाला. ८. तो हत्ती. ९. 'भगदत्तानें कथिलें' असें पाठांतर. १०. दरिद्याची आज्ञा जशी बायको ऐकत नाहीं, तसा गज यजमानाचें ऐकेनासा झाला. कारण भगदत्ताचीं शस्त्रास्त्रें संपुष्टांत येत चाललीं होतीं. दरिद्रीपतीचें बायका ऐकत नाहींत, असाच अनुभव सीता, दमयंती इत्यादिकांचीं चरित्रें लिहिणाऱ्या पंतांस सर्वत्र आला काय ? ११. पार्थाचा नाश करण्यासाठीं अंकुश मनाला बरा वाटला. **लोकोक्ति.** १२. सुवर्ण मृग मारण्यासाठीं असा अर्थ केल्यास हरि म्हणजे राम घेतलें पाहिजे. हरि=सिंह असें घेतल्यास रंकु (चित्ता) त्याला मारण्याला सिंह जसा पंजा टाकतो तसा—असा अर्थ होईल. १३. निवारतां न येण्यासारखा पूर्वोक्त अंकुश. १४. पुढें केलें. येथें हें क्रियापद सकर्मक आहे. १५. आपल्या मित्रांतील एक रत्नच. सारांश, अति उत्तम मित्र. मित्राकरितां आपलें वक्षःस्थल अनिवार्य अस्त्राला पुढें करावयाचें काम आपल्यापैकीं किती लोक करतील याचा अनुभव सर्वत्र आला आहे. संकटसमयीं दुसऱ्याला मदत करावयाची नाहीं ह्या लोकनिग्रहावरूनच आपली किती अवनति झाली आहे हें समजतें !

होऊनि वै[1]जयंती अवलंबी अस्त्र विष्णुचें उर तें. ।
त्या अंकुशप्रहारें न निमे[2]षेहि वक्ष जिष्णुचें [3]उरतें. ॥ ६९
हें[4] नेणुनि पार्थ म्हणे, 'वोढविलें अंकुशासि कां उर गा ! ? ।
सुर गाती [5]अनृत मला ? गरुड न [6]खंडील कोणत्या [7]उरगा ? ७०
कां भीसी ? भय कैंचें ? मज असतां त्वत्प्रसादपविकवच. ।
'[9]भक्तः प्रणश्यति न मे' हें कीं वदलासि तूंचि [10]भविकवच. ॥ ७१
[11]समयीं न आठवूं दे हे [12]वत्सलता [13]गुरुप्रतिज्ञा ते. ।
काय [14]व्यासपराशरमुख म्हणतिल तुज गुरुप्रति ज्ञाते ?' ॥ ७२
देव म्हणे, '[15]भूकें म्यां दिधलें याच्या पि[16]त्यास रक्षाया ।
तें वै[17]ष्णवास्त्र, झालें [18]दाय तसें प्राप्त [19]युद्धदक्षा या. ॥ ७३
त्या अस्त्रें अभिमंत्रित भगदत्तांकुश तुला न सोसवता; ।
[20]अथवा तुझेंचि उर हें, भाव, सख्या ! त्वन्मनीं नसो सवता. ॥ ७४

---

१. विष्णूच्या गळयांतील माळ. त्या माळेप्रमाणें सुखद तें अस्त्र होऊन त्यानें विष्णूचें उर अवलंबिलें. २. क्षणभर सुद्धां. 'निमेषः अक्षिस्पंदकालः.' ३. टिकतें, शिल्लक राहतें. ४. वरील गीत्युक्त अभिप्राय. ५. खोटें. देव माझी खोटीच स्तुति करितात ? ते गातात इतका माझा पराक्रम नाहीं ? ६. तुकडे तुकडे करील. **अप्रस्तुतप्रशंसेनें** अर्जुनानें आपला अभिप्राय छान सांगितला आहे. ७. सर्पाला. ८. तुझा प्रसाद (कृपा) हेंच वज्र, तें मला कवच (चिलखत) असतां. ९. 'माझा भक्त नाश पावत नाहीं' हें आश्वासन भगवंतांनीं अर्जुनास गीतेमध्यें ९ व्या अध्यायांत दिलें आहे. १०. कल्याण करणारें वचन. 'भावुकं भविकं मध्यम्' इत्यमरः. ११. कठिण प्रसंग आला असतां. १२. हें तुझे भक्तप्रेम, भक्तवात्सल्य तुला आठवूं देत नाहीं, तुला विसर पाडवितें. १३. 'न धरीं शस्त्र करीं मी' ही मोठी प्रतिज्ञा तूं विसरतोस. १४. व्यास, पराशरप्रभृति ज्ञाते (शहाणीं माणसें). भगवंताच्या कीर्तीला डाग लागूं नये म्हणून अर्जुनाची ही साशंक उक्ति 'ईश्वर भक्तांचें संरक्षण कसें करित असतो' हें स्पष्ट रीतीनें दाखवित नाहीं काय ? १५. भूकें=पृथ्वीच्या सांगण्यावरून. (महाभारत–द्रोणपर्व–अ० २९ पहा.) 'भूतें' असाही पाठ आहे. १६. नरकासुरास. हा पृथ्वीचा मुलगा. देवदानवांस आपला मुलगा अवध्य व्हावा म्हणून तिनें ईश्वरापासून वैष्णवास्त्र मागून घेतलें होतें. नरकासुरास कृष्णानें मारिलें. १७. ज्याची देवता विष्णु आहे, असें अस्त्र. १८. वडिलार्जित संपत्तीचा वारसा. १९. युद्धनिपुण जो भगदत्त त्यास. २०. ही पंक्ति मित्रप्रेम किती दाखविते हें तज्ज्ञांसच समजेल. माझ्या व तुझ्यामध्यें सवता (निराळा) भाव नको म्हणून संकटसमयीं आपण पुढें होणारे स्नेही सध्याच्या काळांत कितीसे सांपडतील ?

अस्त्रबलरहित झाला, जय तुज देतो मरोनि भगदत्त. ।
होसिल सकलरिपुक्षयकर, तुजहुनि अधिक काय मग दत्त ? * ७५
आधीं पट्ट[1] च्छेदीं, त्या वृद्धाचीं मिळोतें बा ! पातीं[2]. ।
दुर्जय सुरासुरांसहि, तूंजही[3], जों लागलीं न बापा ! तीं[4]. ॥ ७६.
मारीं भगदत्तातें, खंडुनि तत्पक्ष्मबंधन[5], करीतें[6].' ।
<u>गुरुवचनरत्न डोळस[7] मान्य करी, मान्य अंध न करी तें</u>. ॥ ७७
प्रभुनें 'हूं वध' म्हणतां वधिला पार्थें महेंद्रसख[8], चुलता. ।
उलता[9] शोकें, परि गुरुबोधें बाधों दिली न आकुलता. ॥ ७८
गांधाररथ[10] खवळले पाहुनि त्या पार्थशरविपन्नास[11]; ।
तेही वधिले विजयें, सिंहें गज जेंवि तेंवि, पंन्नास[12]. ॥ ७९
तेव्हां तुमचे[13] शालक, वृषक अचल, फार तापले रागें, ।
नागें[14] मूषकसे, ते वधिले एकें शरें महाभागें[15]. ॥ ८०

'सवता' हा 'सापत्न' शब्दाचा अपभ्रंश. येथें **आक्षेप** अलंकार आहे. विशेष सांगण्याच्या हेतूनें बोलावयाचें अगर बोललें आहे त्याचा निषेध करणें यास 'आक्षेप' म्हणतात.

१. डोळ्यांवर पापण्या येऊं नयेत म्हणून त्या वृद्ध भगदत्तानें पापण्यांना बांधिलेला पट्टा (पट्टी). भगदत्ताच्या पापण्या फार लांब असल्यामुळें त्यास आपले डोळे उघडे राहावे, म्हणून असा बंदोबस्त करावा लागे. २. पापण्या, डोळे झांकोत. ३. जोंपर्यंत हीं पातीं एकमेकांस लागलीं नाहींत, तोंपर्यंत तूंही भगदत्ताला जिंकण्यास असमर्थ आहेस. ४. तीं पातीं. ५. त्याच्या पापण्यांचें बंधन (पापण्यांस उघडा ठेवणारा पट्टा) तोडून. ६. हत्तीला मार. ७. ज्ञानी आहे तो गुरूचें वचन (आज्ञा) हेंच रत्न मान्य करितो, अंध करित नाहीं. अर्जुनानें वचन मान्य केलें. **अप्रस्तुतप्रशंसा** असून **पर्यायोक्ति**ही आहे. ८. महेंद्र जो अर्जुनपिता, त्याचा मित्र म्हणजे अर्जुनाचा चुलताच. ९. चुलत्याला मारिलें तेव्हां अर्जुन शोकानें व्याकुळ होऊन त्याचें अंतःकरण विदीर्ण झालें असतें; परंतु श्रीकृष्णांनीं जी **गीता** सांगितली त्यामुळें झालेल्या बोधानें (ज्ञानानें) ही आकुलता त्यास बाधली नाहीं. आकुलता= दुःख, मनाचा गोंधळ. १०. गांधारदेशस्थ महायोद्धे. 'गांधारा'चा 'कंदाहार' झाला हें लहान मुलांसही ठाऊक आहे. ११. अर्जुनशरांनीं जर्जर होऊन मरण पावलेल्या भगदत्तास पाहून. १२. पन्नास योद्धे. **उपमा** स्पष्टच आहे. मुळांत पांचशें आहेत. पंतांनीं यमकाकरितां पन्नासच घेतले ! मूळांत पुढें आणखी पन्नास रथीही मारले आहेत. १३. धृतराष्ट्रा ! तुमचे मेहुणे वृषक व अचल या नांवांचे. 'शालका'ला 'स्याल' हा शब्द आहे. आपला 'साळ्या' येथून झाला. लग्नात साळीच्या लाह्यांचा होम देतांना साक्षी देतो तो 'स्याल' होय. १४. सर्पानें उंदीर मारावा याप्रमाणें ! कोठें प्राणघातक काळ-

झाले सुयोधना जरि शोकद [1]शरदलितकाय मातुल ते, ।
तरि [2]धन्यचि देवांसीं, [3]सुचिरहि वांचोनि का यमा तुलते ? ॥ ८१
यत्न करी शकुनि [4]कपटशरदहनीं [5]पार्थकाय होमाया, ।
त्याच्या चालों देइल [6]भगवत्सख पार्थ काय हो [7]माया ? ॥ ८२
[7]मायाक्षयभीत शकुनि [8]सूतासि म्हणे, 'रथा [9]पिटाळावें; ।
जरि [10]रणमरण हित, अहितमर्दनकामें तथापि टाळावें. ॥ ८३
जो [11]नील भूप दावी बल हरिचें मृगकुलांत [12]शिरत्याचें, ।
[13]हटकुनि, तटकरि तोडी [14]भटतिलक द्रोणपुत्र शिर [15]त्याचें. ॥ .८४
[16]कर्णापुढेंचि वधिले त्याचे [17]भीमानुजें तिघे बंधु. ।

सर्पासारखा अर्जुन आणि कोठें उंदरासारखे तुझे ते मेव्हणे ! येथील उपमेनें अर्जुनाचें सामर्थ्य कल्पितां येतें. १५. तेजस्वी अर्जुनानें.

१. बाणानें छिन्नविच्छिन्न होऊन गेलीं आहेत ज्यांचीं शरीरें असे ते मामा जरी सुयोधनाला शोक देणारे (मेल्यामुळें) झाले. २. देवांना आनंद झाला. ते देवांस धन्य झाले हा प्रयोग चिंतनीय आहे. ३. पुष्कळ दिवस वांचले असते तरी त्यांची बरोबरी सर्वांचा नाशकर्ता यम, त्याच्याशीं झाली असती काय ? नाहीं. केव्हां तरी मरायचेंच, ते आतां मेले म्हणून शोक करूं नये. ४. मायावी बाणरूपी अग्नीमध्यें. **रूपक** आहे. ५. पार्थ शरीराचा होम देण्यासाठीं (होम करण्यासाठीं). ६. भगवंताचा मित्र जो अर्जुन तो काय शकुनीच्या मायांना (कपटप्रयोगांना) चालूं देतो ? भगवत्सख हें विशेषण सार्थ व साभिप्राय आहे, म्हणून **परिकरा**लंकार. मायाधीश जो भगवान्, त्याचा मित्र अर्जुन; त्याच्यापुढें शकुनिमायांचें काय चालणार ? ७. आपल्या सर्व कपटास्त्रांचा नाश होणार असें पाहून भ्यालेला. ८. सारथ्याला. ९. 'पीडन'पासून 'पिटाळणें' झाला. १०. रणामध्यें मृत्यु येणें, धारातीर्थीं मृत्यु येणें जरी हित (मंगलप्रद) आहे, तथापि अहित (शत्रु) त्याच्या मर्दनकामें (मारण्याची इच्छा आहे ज्याला अशानें) समरांतील मृत्यु चुकवावा. समरांतून पळायला शकुनि मामांची ही खाशी युक्ति आहे ! पंतांच्या चातुर्यानें मामांस ही युक्ति सांपडली आहे ! ११. अनूपदेशचा पांडवपक्षीय राजा. १२. हरिणांच्या कळपांत शिरणाऱ्या सिंहाप्रमाणें ज्यानें बळ दाखविलें, सारांश, कौरवसैन्याला जो भाजून काढण्यास लागला होता. १३. बोलावून, हाका मारून. 'हट (बाजार)' यापासून 'हटकणें' उत्पन्न झाला. 'सांगून सवरून काम करणें' यालाही 'हटकून काम करणें' म्हणतात. Challenging. १४. वीरशिरोमणि अश्वत्थामा. १५. नीलाचें शिर तोडिता झाला. १६. कर्णाच्या देखत. १७. भीमाच्या पाठचा भाऊ जो अर्जुन त्यानें.

सिंधु[1] अगस्त्याचमना न पुरे; पुरतील काय मग अंधु ? ॥ ८५
दुसरे दिवशीं गुरुशरनिकरें बहु धर्मवाहिनी[2] आटे[3]. ।
कुरुकटकासि किरीटी[4] स्पष्ट कटुकुठारपाणिसा[5] वाटे. ॥ ८६
गुरुनें कर्णादि, जगद्गुरुनें धर्मादि रक्षिले पार्थ. ।
विश्वाच्या यश केलें कर्पूरसुचूर्ण अक्षिलेपार्थ[6]. ॥ ८७

अध्याय तिसरा.

(तृतीयदिनयुद्ध.)

तिसरे दिवशीं प्रातःकालीं वंदन करूनियां राजा[7] ।

---

१. अगस्त्याच्या एका आचमनाला. 'एका आचमनें अगस्त्यमुनिनें माझा पिता शोषिला' ही पंक्ति सुप्रसिद्धच आहे. त्या अगस्त्याला अंधु=विहिरी पुरतील काय ? तसेंच कर्णालाही पुरून उरणारा जो अर्जुन त्याच्यापुढें कर्णबंधूंचा पाड कितीसा असणार ? येथें **अर्थापत्ति** असून **अप्रस्तुतप्रशंसा**ही आहे. २. धर्मसेना. 'ध्वजिनी वाहिनी सेना' इत्यमरः. ३. आटली. वाहिनी हा नदीवाचक शब्द घेतला म्हणजे आटणें याची सुप्रयुक्तता ध्यानांत येते. ४. अर्जुन. ५. कटु (नाशकारक) असा कुठार आहे ज्याच्या हातामध्यें असा परशुराम, त्याच्यासारखा अर्जुन स्पष्ट (उघड) वाटला. रोमनलोकांतही कुठार आयुधाची प्रवृत्ति होती. या ओळींत पंतांनीं 'क'काराची कोण गर्दी केली आहे ! ६. विश्वाच्या अक्षिलेपार्थ (डोळयांत अंजन घालण्यासाठीं) आपलें स्वतःचें भक्तवात्सल्याचें यश हेंच कर्पूरसुचूर्ण (कापराचें उत्कृष्ट चूर्ण) केलें (तयार केलें). कापरानें डोळे निवतात तसे आपल्या यशानें विश्वाचें मन निववावें म्हणून भगवंतांनीं आपलें यश प्रकट केलें. या दोन अध्यायांमध्यें पंतांनीं महाभारतांतील द्रोणपर्वाच्या ३२ अध्यायांचा सारांश वर्णन केला आहे. पंत हे निवळ भाषांतरकार आहेत अशी जोंपर्यंत समजूत दृढ होती, तोंपर्यंत महाभारत, अगर रामायण, अगर भागवत यांतील मूळचा विषय किती व पंतांचा किती, हें वारंवार बघण्यांत व सांगण्यांत मुद्दा होता. आतां त्या दुष्ट समजुतीचा निरास–निदान बहुतेक–झालाच आहे. म्हणून या अध्यायांच्या व गीतींच्या परिगणनाची आतां फारशी मातब्बरी. उरली नाहीं. महाभारताच्या अठरा पर्वरत्नांमधील कोणत्या रत्नाच्या कोणत्या भागाला पंत उजळा देत आहेत हें जागजागीं आम्ही निर्दिष्ट करूंच. पण पंतांच्या काव्यसमुद्राचें आलोडन करून, रसिकांनीं त्यांतील विविध आणि अमूल्य रत्नांविषयीं आपली खात्री करून घेतली आहे. तेव्हां प्रत्येक ठिकाणीं कांटेतोलपणा करून पंतांच्या मालकीचीं रत्नें कोणतीं, हें दाखवीत बसण्याची आतां जरूर राहिली आहे, असें आम्हास वाटत नाहीं. ७. दुर्योधन.

द्रोणासि म्हणे 'गुरुजी ! कां आशाभंग करितसां [1]माजा ? ॥ १
प्राप्त युधिष्ठिर झाला असतां, धरिला तुम्हीं न कां काल ? ।
झांकाल [2]तपन नयनें, तेजें [3]काळासही न वांकाल. ॥ २
आत्माहि [4]उपेक्षावा, परि [5]रक्षावाचि बोल संतांनीं. ।
झाला भक्तमनोरथ न [6]गुरुजनीं, [7]कीं न [8]फोल [9]संतानीं. ॥ ३
सगळी तिकडेचि असे, तुमची इकडे नसे कृपा [10]लेश; ।
ऐसें [11]नसतें तरि, तो कां मरता [12]शक्रसख [13]नृपालेश ?' ॥ ४
द्रोण म्हणे, 'त्यजुनि [14]कुमति, [15]सन्मतिसीं करुनि संग, [16]रम, राया ! ।
निंदिसि कां ? तुजकरितां जरि [17]सजलों, वरुनि [18]संगर, मराया. ॥ ५
[19]त्रिभुवनहि न जिंकिल [20]हरिसखरक्षितधर्मनंदना, [21]सत्य; ।
हे [22]अजित कृष्ण [23]साक्षान्निजजनहृद्रोगकंदनासत्य. ॥ ६

---

१. माझा. २. आपल्या नेत्रांनीं सूर्य झांकाल. ३. सर्वांवर आपलें तेज प्रगट करणारा जो सर्वभक्षक मृत्यु त्यालाही आपण स्वतेजानें वांकणार नाहीं; त्यालाही हार जाणार नाहीं. आचार्यांची स्तुति राजा दुर्योधन एकदां **प्रतीप** अलंकारानें व पुनः **उपमेनें** करित आहे. ४. टाकून द्यावा, प्राणही द्यावा. ५. भर्तृहरीनें म्हटलें आहे:–'तेजस्विनः सुखमसूनपि संत्यजंति सत्यव्रतव्यसनिनो न पुनः प्रतिज्ञाम्.' संत व तेजस्वी पुरुषांनीं वेळेस प्राणही द्यावा, पण केलेली प्रतिज्ञा सोडून देऊं नये. ही उत्कृष्ट नीति **पंतांनींच** दुर्योधनाकरवीं प्रकट केली आहे. भीष्ममहाराजांचें वर्तन **पंतांपुढें** होतेंच. ६. श्रेष्ठ लोकांच्या संगतींत. ७. किंवा ८. निष्फल. याचा संबंध 'गुरुजनीं' व 'संतांनीं' या दोन्हीकडे आहे. ९. कल्पवृक्षीं. १०. थोडकीशीही. ११. धर्म सांपडला असतां त्यास धरिलें नाहीं व भगदत्ताचा मात्र वध आपल्या समक्ष होऊं दिला, हें गुरुजींचें वर्तन पाहून राजानें आचार्यांस चांगलेंच पकडींत धरिलें आहे. १२. इंद्राचा मित्र भगदत्त. १३. नृपश्रेष्ठ. १४. कुत्सितबुद्धि. १५. उदारबुद्धि. Christian Charity. १६. आनंदी ऐस. हा उपदेश त्या मानधन व अभिमानी दुर्योधनास कशाचा पटणार ! १७. सज्ज झालों, तयार झालों तरी. १८. युद्ध. युद्धाचा अंगीकार करून. १९. त्रैलोक्यांतील सर्व वीर, सर्व जगें. २०. कृष्णमित्र (अर्जुन) यानें रक्षण केलेला यमधर्माचा पुत्र (धर्मराजा). प्रत्येक शब्द सार्थ आहे. २१. खरोखर. २२. हे कृष्ण (हे दोघे कृष्ण म्हणजे कृष्णार्जुन) अजित (अजिंक्य) आहेत. २३. स्वजनाच्या हृद्रोगकंदाविषयीं प्रत्यक्ष अश्विनीकुमारच आहेत. धर्म सांपडला असतां कां धरिला नाहीं या मुद्यावर आचार्यांनीं कशी उडवाउडवी केली आहे ती पहा.

जेथें [1]जगदुत्पादक केशव, तन्मित्र विजय [2]सेनानी, ।
तेथें नरवीरांच्या [3]साधावा विजय काय [4]सेनांनीं ? ॥ ७
एक [5]त्र्यंबक वर्जुनि इतर सकल पुरुष जरि [6]बलनदीप, ।
तरि दीन हरिपुढें ते, दाखवितिल रविपुढें बल न [7]दीपें. ॥ ८
पाडीन निश्चयें मी कोणा एका [8]महारथी [9]आजी; ।
गातील जिला सत्कवि ऐसी होईल [10]सर्वथा [11]आजी. ॥ ९
परि [12]हटकुनि दूर तुम्ही त्या पार्था वीरसत्तमा न्या, हो ! ।
[13]योगकथासी [14]प्रबलारिलयकथा हेहि [15]दत्तमान्या हो.' ॥ १०
ऐसें वदोनि चक्रव्यूह [16]सुदुर्भेद्य युक्तिनें रचिला, ।
जो [17]धीरवीरहीरप्रवरप्रकरें करोनियां [18]खचिला. ॥ ११
प्रभुला म्हणे [19]भरातां भू,[20]ज्यांतें 'करुनि बोध वळवा जी !' ।
संशप्तक माराया जाय हटकितांचि तो [21]धवलवाजी. ॥ १२
चक्रव्यूहामध्यें भूप, [22]पुढें द्रोणगुरु महातेजा; ।
अढळ, सदाश्रय म्हणउनि 'मेरु' असें म्हणति कवि [23]पाहाते ज्या. ॥ १३
व्यूहातें भेदाया धर्म झटे, करुनि यत्न, [24]सानुजनी; ।

---

१. विश्वाला उत्पन्न करणारा. २. सेनापति. ३. मिळवावा. ४. सैन्यांनीं. 'नरवीरांच्या' (योद्ध्यांच्या) इकडे संबंध आहे. ५. शिव. शंकराची युद्धनैपुण्याबद्दल कीर्ति प्रसिद्धच आहे. ६. बलसागर एकत्र झाले. ७. दिवे. दृष्टांत खासा आहे. ८. महारथ–दहा हजार योद्ध्यांबरोबर युद्ध करणारा वीर. 'एको दशसहस्राणि योधयेद्यस्तु धन्विनां । शस्त्रशास्त्रप्रवीणश्च विज्ञेयः स महारथः ॥'. ९. आज. 'अद्य'पासून 'आज' झाला. १०. सर्वप्रकारें. ११. संग्राम. १२. बोलावून. १३. योगाच्या कथेप्रमाणें. १४. बलवान् शत्रूच्या नाशाची कथा. १५. श्रीगुरुदत्त हे महायोगी होते. 'त्यांना सुद्धां मान्य होईल असें आज युद्ध करावयाचें' अशी द्रोणप्रतिज्ञा आहे. १६. भंग करण्यास, फोडण्याला अति कठिण. १७, धीरवीररूप उत्तम हिऱ्यांच्या समुदायानें. १८. खचून भरला. १९. भारपीडित. २०. ज्या अर्जुनाला. २१. अर्जुन. याच्या रथाचे अश्व पांढरे होते. अर्जुनावर पृथ्वीची सुद्धां केवढी भिस्त होती पहा. २२. चक्रव्यूहाच्या तोंडाशीं. २३. पाहणारे लोकांनीं द्रोणास मेरूची उपमा दिली. कारण तो अचल व आश्रय करण्यास सुखकर होता. २४. अनु (पाठीमागून) जनी (जन्म) ज्यांचा ते (धाकटे भाऊ) त्यांसह, आपल्या धाकट्या भावांसह.

परि लोपवि [1]प्रतापा गुरु तपना, [2]जेंवि [3]रत्नसानु जनीं. ॥ १४
धर्म म्हणे, '[4]सौभद्रा ! दुर्भेद्य व्यूह, यत्न चालेना, ।
[5]व्यूहपुरःस्थित अस्मद्गुरु [6]कुरुकटकेश लेश हालेना. ॥ १५
गुरुनें सकल पळविले, गज जेंवि मृगेश्वरें [7]समन्यूनें; ।
पूर्ण गुरुदया [8]नव्हतां व्हावें कैसें तयासम न्यूनें ? ॥ १६
तत्काल [9]मातुलें कीं भेदावा व्यूह हा तुझ्या तातें; ।
[10]पांडित्य जें तयाचें तुज पाठ असेचि, बा [11]सुजाता ! तें. ॥ १७
[12]म्हणतिल, म्हणोत [13]परें, परि म्हणेल मज [14]ससख [15]यदुप 'हा [16]साधू'; ।
म्हणुनि व्यूह विभेदुनि बा ! स्वयशें तूंचि [17]मदुपहासा [18]धू'. ॥ १८
अभिमन्यु म्हणे, 'चिंता करितां [19]हे व्यर्थ काय ? हो ! तात ! ।
[20]यां वाक्यें बहु लज्जित कीं हे तुमचेचि [21]पौत्र होतात. ॥ १९

---

१. पुष्कळ तेज आहे अशा सूर्यास. २. **उपमा** आहे. कोठें अनेक सूर्यांस प्रकाश देणाऱ्या मेरूसारखा द्रोण आणि कोठें एक अर्ध मालेस प्रकाश देणाऱ्या सूर्याप्रमाणें पांडव ! सारांश, मेरुपर्वत जसा सूर्याचा प्रकाश नाहींसा करतो, तसा पांडवप्रताप द्रोणापुढें निस्तेज झाला. ३. ज्याच्या ठायीं अनंत रत्नें आहेत असा मेरुपर्वत. ४. हे अभिमन्यो. ५. व्यूहाच्या तोंडाशीं आमचे गुरु द्रोण आहेत म्हणून त्यांच्या सैन्यांमध्यें यत्किंचितही भंग होत नाहीं. ६. कौरवसेनेचा अधिपति व आपला गुरु (द्रोणाचार्य). ७. परम क्रोधानें. येथील **उपमा** बहारीची आहे. ८. न होतां, झाली नसतांना; गुरुकृपा झाल्याशिवाय. 'आपणासारिखे करिती तात्काळ । नाहीं काळ वेळ तयांलागीं ॥ हें केव्हां ! जेव्हां गुरुकृपा होईल तेव्हां ! ९. तुझ्या मामानें (कृष्णानें) किंवा तुझ्या पित्यानें (अर्जुनानें) मात्र हा व्यूह तावडतोब भंगावा, ह्या व्यूहाचा भंग करण्यास फक्त हे दोघेच समर्थ आहेत, असा भाव. १०. युद्धनिपुणत्व. ११. सत्कुलोत्पन्ना ! अभिमन्यु हा अर्जुनाचा मुलगा व कृष्णाच्या बहिणीचा मुलगा. तेव्हां आनुवंशिक संस्कारानेंच अभिमन्यु रणपंडित झाला असें धर्मराज 'सुजात'शब्दानें सुचवित आहेत. **परिकरालंकार.** १२. शत्रु व इतर लोक मला वाटेल तें म्हणोत आणि म्हणतील. सोळा वर्षांच्या पोराला व्यूहभेद करावयास पाठविलें आणि आपण भाऊभाऊ स्वस्थ बसले अशी माझी निंदा शत्रु करतील; करोत बिचारे ! १३. शत्रु. १४. मित्रासहित, अर्जुनासह. १५. कृष्ण. १६. हा (धर्म) साधु (सत्वशील) आहे, अर्थात् युद्ध करण्यास अयोग्य आहे, असें म्हणतील. १७. मत्+उपहास=माझी थट्टा झाली आहे ती धुवून काढ. १८. साफ कर. १९. ही व्यर्थ काळजी कशाला बाळगितां ? २०. वरच्या गीतींतील संशयगर्भ वाक्यानें. २१. काय अभिमन्यूची ही असामान्य

तातें कथिला आहे दुर्भेद्यव्यूहभेदनोपाय; ।
शिरतों, भय काय मनीं ? आहेत सहाय राय ! हे पाय[3]. ॥ २०
व्यूहीं शिरेन शरसा[4], मागें परतेन एक पदही न; ।
युष्मत्पदप्रसादें होतिल युष्मत्सपत्न[5] मदहीन[6].' ॥ २१
धर्म म्हणे, 'त्वद्रचितद्वारें[7] आम्हीं समस्त हे[8] मागें ।
येतों रक्षाया तुज, द्यावें स्वस्थैर्यधैर्य हेमागें[9].' ॥ २२
मारुति[10] म्हणे, 'शिरे अहिरदरचितें[11] जेंवि तद्विष द्वारें; ।
त्वन्निर्मितें[12] शिरेन, व्यूहीं टिकिजेल[13] न द्विषद्वारें[14], ॥ २३
सौभद्र म्हणे, 'शिरतों व्यूहीं, डोहीं जसा मतंगज[15], वा[16] ।
हरिपोत[17] दंतियूथीं[18], कीं देहनीं[19] करुनियां पतंग जेंवा[20]. ॥ २४

विनयशालीनता ही ? 'आपल्या परक्रमी यशानें माझें अपयश धुवून काढ' ही धर्मोक्ति अभिमन्यूला झोंबली. तो म्हणाला, 'काका ! आपल्या पायांच्या प्रसादानें मी युद्ध करितों. तेव्हां आपल्या पायांसंनिध राहाणाऱ्या लहान अर्भकाची इतकी स्तुति करण्यानें आपले पायच लाजूं लागतील !'

१. माझे वडील अर्जुन यांनीं. २. भंग करण्यास कठीण अशा व्यूहाच्या भंगाचें साधन, त्याची युक्ति. ३. 'य'कारांची गर्दी कोण ही येथें ! अनुप्रासासाठीं ही मंडळी आली आहे. य=जाणें असाही अर्थ आहे. तेव्हां 'य'कार अभिमन्यूचें गमन सुचवित आहेत ! ४. बाणाप्रमाणें सरळ शिरेन, घुसेन. बाण जसा मागेंपुढें पाहत नाहीं तसा. **उपमा** हृदयंगम आहे. ५ युष्मत्+सपत्न=तुमचे शत्रु. ६. गर्वशून्य. 'पदहीन' (राज्यभ्रष्ट) असा एका प्रतींत पाठ आहे. ७. तूं पाडलेल्या खिंडारानें, भगदाडाच्या वाटेनें. Breach. ८. सर्वांकडे बोट दाखवून धर्मानें 'हे' असें म्हटलें. ९. हेम+अगें=मेरुपर्वतानें स्वतःचा स्थिरपणा व धैर्य आम्हांस द्यावें. १०. मरुत्+पुत्र=भीम. ११. सर्पाच्या दांतानें उत्पन्न केलेल्या मार्गानें जसें तद्विष (सर्पविष) शिरतें. १२. त्वत्+निर्मित=त्वां केलेल्या. १३. टिकणार नाहीं. १४. द्विषत्+वार=शत्रुसमुदाय, वार=समुदाय, गर्दी. १५. ही **उपमा** व्यूहभेदाची सुकरता दाखविते. १६. अथवा. १७. सिंहशावक. १८. गजसमुदायांत. एका कवीनें म्हटलें आहे:–'सिंहः शिशुरपि निपतति मदमलिनकपोलभित्तिषु गजेषु । प्रकृतिरियं सत्ववतां न खलु वयस्तेजसो हेतुः ॥', 'सिंहाचा कीं बाल तोही चपेटा' हा श्लोक वरील अवतरणाचें भाषांतर होय. १९. पुढील भविष्यसूचनार्थच ही उपमा दिली आहे काय ? सर्व गीतींत **मालोपमा** आहे. पहिली उपमा सौकर्यसूचक, दुसरी पराक्रमसूचक आणि तिसरी परिणामसूचक होय ! २०. वेगानें करून.

जैं करिन [1]आंजि, होइल पितृमातुलसुचरितानुरूपचि तें, ।
[2]क्रव्यादांला खाया देइन [3]उधळुनि बळें [4]कुरूपचितें.' ॥ २५
ज्येष्ठपित्याला देउनि अभय, म्हणे तो सुवीर [5]सूतातें; ।
'हूं हांक रथ, म्हणावी माय सुभद्रा [6]सुवीरसू [7]तातें.' ॥ २६
तो सूत सुमित्र [8]म्हणे, 'भो आयुष्मन्! [9]कुमार आपण कीं ! ।
हांकिन [10]हरि [11]अरिवरि, परि कुरुगुरुशीं गांठि, कठिन हा पण कीं.' २७
हांसुनि सौभद्र म्हणे, '[12]हटकीन हठें रणास [13]भीमातें, ।
शक्रार्जुनकृष्णाशीं करितां समर न शिवेल [14]भी मातें. ॥ २८
'[15]द्रोणानीका [16]मानूं जन सागर, [17]मजहि सत्वरा [18]मकर. ।
घे[19] काय [20]न्यायपरस्वच्छात्रनदीजसत्व [21]रामकर ?' ॥ २९
[22]तन्निर्बंधें नीटचि चालविला रथ [23]विमानसा सूतें; ।
देती [24]प्रभूक्तितें श्रितमति, [25]कुलजा जेंवि मान सासूतें. ॥ ३०

---

१. आज. २. मांसभक्षकांस. ३. हा शब्द अभिमन्यूचें सामर्थ्य सुचवितो. 'उद्धूलन' (धूळ उडविणें) या शब्दापासून हा निघाला. ४. कुरु+उपचितें=कुरुसंपादित सैन्यें. ५. सारथ्याला. 'सुवीर'शब्दांत किती तरी अर्थ आहे ! ६. वीरपुत्र प्रसवणारी, वीरमाता. ७. वडिलांनीं. अर्जुनानें सुद्धां आज माझ्या आईस वीरमाता म्हणावें असें लोमहर्षण युद्ध मी करणार ! वडिलांच्या शिफारशीची कोण हौस ही ! शाबास ! अभिमन्यू शाबास ! ज्येष्ठ पित्याला अभय देऊन ह्या लोकांतील धन्यता मिळवून घेणाऱ्या वीरा ! शाबास ! येथें **विरोध, असंभव** हे अलंकार प्रथमार्धांत असून पुढें **पर्यायोक्ति** आहे. ८. सारथ्यानें आपल्या यजमानास 'भो आयुष्मन्' म्हणून हांक मारण्याचा प्रघात होता. ९. आपण कुमार अर्थात् अल्पवयी आहां, ह्या गोष्टीचें स्मरण सारथी अभिमन्यूस करून देत आहे. कुमार=पंधरा वर्षांच्या आंतील वयाचा मुलगा. १०. घोडा. ११. हा सारथी कसा 'र, र, ट, ट,' करितो आहे पहा ! १२. मुद्दाम बोलावीन. १३. महादेवास. १४. भयाचा विटाळ सुद्धां होणार नाहीं. १५. द्रोण+अनीक=द्रोणसैन्याला. १६. लोकांनीं मानावें. १७. त्वरायुक्त जो मी त्याला. १८. ग्राह, नक्र. १९. घेईल काय ? तसेंच माझेंही सत्व द्रोण घेऊं शकणार नाहीं. २०. न्यायनिष्ठ स्वशिष्य भीष्म जो त्याचें सत्व. २१. परशुरामाचा हात. २२. तत्+निर्बंध=ह्याच्या अति आग्रहानें. २३. विमान जसें अडखळत नाहीं तसा. यांत सारथ्याचें कौशल्य प्रकट होतें. २४. यजमानाच्या आज्ञेला प्रभुनिष्ठ सेवक मान देतात. आपल्या मनाविरुद्ध काम करणें झालें, तरी तें करितात.

भीमादि सबळ[1] सर्वहि उठले[2] तो व्यूहकोट[3] फोडाया; ।
इकडुनि **कौ**रवकटकहि होयें[4] पुढें, शत्रुसैन्य मोडाया. ॥ ३१
रथ थडकले भडकले हय, शस्त्रजवन्हि[5] धडकले वरते, ।
अन्योन्य द्यंगुलही[6] राहों देती न धड[7] कलेवर ते. ॥ ३२
पावत असतां दोन्ही करुनि सुतुमुलाहवास[8] वध सेना ।
व्यूहीं शिरे[9] **गु**रुपुढें; चित्तेंहि जयांत[10] **वा**सव[11] धसेना[12]. ॥ ३३
व्यूहीं गमे[13] **सु**भद्रासुत गजयूथांत जेंवि बाल-हरी[14] ! ।
त्यावरि पडल्या सेना त्या मंथाद्रिवरि[15] जेंवि बा ! लहरी[16]. ॥ ३४
वहुतांशीं एकाकी[17] **सौ**भद्र कलह करी समुत्साहें[18], ।
असकृत्[19] सूतासि म्हणे, 'सुयशस्कर समर हो, समुत्साहें[20]'. ॥ ३५

या **अप्रस्तुतप्रशंसे**नें सूताची प्रभुनिष्ठा उत्तम व्यक्त झाली आहे. पुढील **उपमाही** हाच अर्थ सर्वांस समजेल अशा रीतीनें सांगत आहे. सत्कुलोत्पन्न स्त्री आपल्या सासूस (श्वश्रूस) मानच देते. २५. कुलस्त्री.

१. ससैन्य. २. 'सर्वहि ते उठले' असाही पाठ आहे. ३. व्यूहरूप किल्ला. ४. पुढें सरसावलें. मोडणें=पराजित करणें. ५. शस्त्रांच्या घर्षणापासून होणारे अग्नि. हें वर्णन वाचून आपण प्रत्यक्ष युद्ध चमत्कार पाहतों आहोंत असें वाटतें ! हा **भाविक** अलंकार होय. ६. दोन अंगुळेंभर. ७. सुधेपणा आहे ज्यांत असें, नीट. चिंधड्या कशा झाल्या हें या शब्दचित्रानें उत्कृष्ट समजत आहे. ८. सुतुमुल+आहव=अति तुमुलयुद्धास. येथें Tumult शब्द ध्यानांत आणावा. 'सुतुमुलाहवास' हें 'करुनि' याचें कर्म. दोन्ही सेना सुतुमुल आहवास करुनि वध पावत असतां–असा अन्वय. ९. सौभद्र शिरला. १०. ज्या व्यूहांत. ११. इंद्र. १२. सरसावून जाईना. आपण 'धजेना' म्हणतों. इंद्रानें नुसतें मनांत सुद्धां शिरण्याचें साहस केलें नसतें ! आजापेक्षां नातू किती तरी पराक्रमी ! १३. वाटला, शोभला. **उत्प्रेक्षा** आहे. गजयूथांत मेजवानी झोडणारा सिंहाचा छावाच शोभतो कीं काय असें वाटलें ! १४. सिंहशावक. ह्या गीत्यर्धांत 'सुभद्रासुत' हें उपमेय, 'बालहरी' हें उपमान, 'जेंवि' हा सादृश्यवाचक शब्द होय. परंतु येथें साधारणधर्म स्पष्टपणें दिला नाहीं, म्हणून हें **धर्मलुप्ता उपमेचें** उदाहरण होय. १५. समुद्रमंथन करावयास घेतलेल्या पर्वतावर, मंदराचलावर. १६. क्षीरसिंधूच्या लाटा. समुद्रमंथन झालें त्या वेळीं जशा लाटा पर्वतप्राय उसळून मंथनदंडावर जाऊन आदळल्या असतील, तशा सेना त्या अभिमन्यूवर पडल्या ! १७. एकटा. १८. चांगल्या (अत्यंत) उत्साहानें. १९. वारंवार. २०. समुत्+साहें= आनंदानें सहन कर.

तच्चापलतेसि दुजी दावील [1]श्रीस काय मद नारी ? ।
वाटे करितो कौरवसंहार [2]मनुष्यकाय [3]मदनारी ! ॥ ३६
मूर्त वसंत गमे तो, गमति रिपु वि[4]पत्र ते [5]करीराग. ।
कुरुकटकीं, [6]पशुनिकरीं श्रीरुद्र तसाचि, तो करी राग. ॥ ३७
समरीं [7]बाळासि म्हणे [8]रक्षप, 'गगनींच करुनि आ [9]वर्ते, ।
किं बहुना ? हय, रथ, गज गिळिले शोणितनदींत [10]आंवर्ते.' ॥ ३८
तेव्हां त्वत्पुत्रांचीं वदनें झालीं रणांत [11]शुष्क रसें; ।
शोभे विजयो[12]त्सीहें अभिमन्युमुख [13]प्रफुल्लपुष्करसें. ॥ ३९
दुर्योधन स्वयें मग सौभद्रवधार्थ धांवला कोपें; ।
[14]कलभमथन [15]हरिसि, तसें त्याला तें कर्म वाटलें सोपें ! ॥ ४०
तें द्रोण म्हणे, 'भट हो ! रक्षिति सुर जेंवि [16]तारका [17]सुरसा ।
रक्षा, अभिमन्यु न हो [18]गुहसा, कुरुराज [19]तारकासुरसा.' ॥ ४१
भूरिश्रवा, शकुनि, कृप, कृतवर्मा, कर्ण, शल्य, यांसहित ।
धांवे ससुत गुरु, कसें होऊं देइल [20]समक्ष तो [21]अहित ? ॥ ४२

---

१. श्रीस (लक्ष्मीला) जशी दुसरी नारी मद दाखवूं शकत नाहीं, तशी, [कवी म्हणतात] त्याच्या चापलतेला मद दाखविणारी (तिच्यापेक्षां जास्त पराक्रम करणारी) दुसरी चापलता तेथें कोठून दिसेल ? अथवा दिसली तरी मद काय दाखविणार ? २. मानवशरीरी. ३. सदाशिव. **उत्प्रेक्षा** मनोहर आहे. ४. पत्ररहित. 'विपन्न' असें पाठांतर. विपन्न=घायाळ. ५. करीरवृक्ष. किंवा वेळूचा कोंब. दुसरी **उत्प्रेक्षा**. ६. प्राणीमात्राच्या समुदायांत. प्रलयकालीं रुद्र उग्र स्वरूप धारण करितो, तसेंच अभिमन्यूचें स्वरूप भयंकर दिसलें. ७. अभिमन्यु बाळाला. किंवा मूर्ख दुर्योधनास. ८. राक्षस. ९. आहें. मी (राक्षस) आकाशामध्यें 'आ' पसरून [तुम्हाला गिळण्यासाठीं] तयार आहें. १०. भोंवऱ्यानें. रक्तसंचय होऊन त्यांत भोंवरे बनण्यास प्रवाह किती वेगवान् पाहिजे ? ११. कोरडीं. १२. वीरश्रीनें. १३. विकासित म्हणून सरस कमलासारखें. **उपमा** मनोहर आहे. १४. करिशावक. १५. सिंहाला. अभिमन्यूचा नाश करणें सुकर आहे असें वाटणें ही दुर्योधनाची भ्रांति होय. १६. तारण करणारा जो अमृतरस त्याचें देव रक्षण करितात, तसें तुम्ही यजमानाचें रक्षण करा. ही व खालील **उपमा** पंतांच्या काव्यप्रतिमेचीं फळें आहेत. १७. अमृतातें. १८. षडाननसा. १९. दैत्यविशेष. याला मारण्यासाठीं षडाननाचा अवतार झाला. २०. आपल्या डोळ्यांदेखत. २१. नुकसान.

सोडविला [1]नृप जेव्हां[2] होय नृपा! [3]शस्त्रमय [4]नभ क्षण हो!।
करितेंचि त्या [5]स्मराचें [6]तत्तेजोरुद्रनयन भक्षण हो! ॥ ४३
आठवला जो मारुतिपासूनि सुटोनि बांचला [7]तरणी.।
[8]बसती [9]कुरुपशिरीं [10]परशरशनिची तेधवांच लात रणीं. ॥ ४४
[11]सुप्तोत्थित हरिसा तो उघडी होउनि [12]विमोह दृष्टीतें;।
[13]स्वविशिखनिकरसमीरें [14]उडवी बहु शत्रुशस्त्रवृष्टीतें. ॥ ४५
नृप न दिसतां म्हणे, 'हा! गेलों खाया करूनि आ जवळ,।
तों [15]कवळ पळविला कीं! पावेलचि आज लाज [16]आजवळ. ॥ ४६
सौभद्र बहु क्षोभे, गर्जे पाहूनि [17]कवळहरित्यांतें;।
[18]जाणो अपराधी गज हटकी दापूनि जवळ [19]हरि त्यांतें. ॥ ४७
त्यां सिंहनाद होय, [20]व्यांलां [21]पुच्छीं जसा [22]पदन्यास,।
वेष्टुनि हाणिति सर्वहि; [23]देखवतेंही न तें [24]तदन्यास. ॥ ४८
[25]प्रभुचा, मर्मीं हाणी सर्वांसहि तीन तीन शर, [25]भाचा.।
वाटे, बहु सिंहांशीं समर करी [26]कुपित पोतें [26]शरभांचा. ॥ ४९

---

१. दुर्योधन. २. 'तेव्हां' असें पाठांतर. ३. ही मनोहर **अतिशयोक्ति** युद्धनिकर दाखविते. ४. आकाश शस्त्रमय झालें! ५. मदनाचें. ६. नाहींतर अभिमन्यूचें तेज हाच कोणी शंकराचा तृतीय नेत्र दुर्योधन हाच जणुं काय मदन त्याचें भस्म करावयास बसलाच होता! ७. सूर्य. 'उगवतांचि सूर्यबिंब घेतलें करीं' याला अनुलक्षून मारुतीच्या कृत्याचें स्मरण झालें म्हणून **स्मरणालंकार** आहे. ८. बसली असती. ९. दुर्योधनशिरीं. १०. शत्रूच्या शररूपी शनिग्रहाची. हा ग्रह उग्र असून यानें विक्रमादित्यास पुष्कळ छळिलें, हें प्रसिद्धच आहे. ११. झोंपेंतून उठलेल्या. १२. विगतमोह, ज्याची मूर्च्छा नष्ट झाली आहे असा होऊन. सर्वांनीं त्यास क्षणभर मूर्च्छित केलें होतें व दुर्योधनास पळविलें होतें. १३. आपल्या बाणसमुदायरूप वायूनें. १४. शस्त्रांच्या पर्जन्याला धुडकावून दिलें. १५. ग्रास. तोंडचा घांस पळविला आहे! १६. आजोळ (यादवकुळ.). मातृकुलाला आज लाजेनें खालीं बघावें लागेल! मातृपितृकुलाच्या धवलकीर्तीबद्दल अभिमन्यूची काळजी स्मरणीय आहे. आपला पराभव पर्यायानें सांगितला म्हणून **पर्यायोक्ति**. १७. घांस हिरावून नेणाऱ्या भूरिश्रवादि वीरांस पाहून सिंहनाद करी. १८. जे अपराधी गज त्यांतें दापूनि (दरडावून) हरी जवळ हटकी (बोलावी) जाणो. १९. सिंह. **उत्प्रेक्षा** अलंकार आहे. २०. सर्पांला. २१. शेपटावर. २२. पाय ठेवणें. **उपमा** बहारीची आहे. २३. दुसऱ्यास तो परस्परमार नुसता पाहवता ना देखील! २४. तत्+अन्यास=त्या अभिमन्यूवांचून दुसऱ्यास. २५. प्रभूचा भाचा (अभिमन्यु.) २६. रागावलेला शरभबालक.

द्रोणद्रौणिकृपादि प्रबल बहु भटांसही न तो आटे; ।
फाटे तद्दृष्टिपुढें बैल, जैलदीं मूर्तवातसा वाटे. ॥ ५०
होय पुढें अश्मकपति, कीं तत्तेजें न वीर करपोत; ।
खंडी तद्धय, सूत, ध्वज, धनु, भुज, शिर सलील नरपोत. ॥ ५१
पडतांचि अश्मकेश्वर कर्णद्रोणादि करिति शरवृष्टी; ।
[11]फुल्लपलाशश्री तो निर्वेवी, भिववी, [13]सुराधिपतिदृष्टी. ॥ ५२
भेदुनि शरें उरःस्थळ चळचळ [14]बलजलधि कर्ण कंपविला; ।
मूर्छित करूनि मद्रप सौभद्रें [15]तत्प्रताप संपविला. ॥ ५३
एकें [16]सुषेण वधिला बाणें, एकेंचि [16]दीर्घलोचन हो ! ।
एकेंचि [16]कुंडभेदी, गमले ते घूंक तो विरोचन हो ! ॥ ५४
मानी वीर पळाले, गुरुनेंहि निवारितां, तडक; राया ! ।

'पोतः शिशौ वहित्रे च गृहस्थाने च वाससि' इति मेदिनी. **उत्प्रेक्षा.**

१. आटोपे. २. विसकटून जाई. ३. सैन्य. ४. मेघाच्या ठायीं. 'जलदां' असाही पाठ आहे. ५. मूर्तिमंत वायूच कीं काय असा. **उत्प्रेक्षा** आहे. ६. अभिमन्यूच्या प्रतापानें. ७. तत्+हय=त्याचे घोडे. ८. सारथी. ९. क्रीडेनें. १०. अर्जुनपुत्र. 'पोत' या शब्दानें हत्तीचा छावा लीलेनें केळीचें झाड उपटून टाकितो, तसा सौभद्रानें अश्मकेश्वरास सहज स्वर्गापर्यंत फेंकून दिला असें ध्वनित होतें. ११. फुललेल्या पळसाच्या वृक्षाप्रमाणें शोभा आहे ज्याची असा रक्तानें तांबडा लाल. १२. इंद्रास हें नातवाचें अभिनव युद्ध पाहून समाधान वाटलें व पुढें काय होईल याची भीतिही वाटली. ज्या पराक्रमानें आजोबास आनंद झाला, तोच पराक्रम कौरववीरांस संतप्त करून नातवाचा नाश करवील अशी भीति वाटली. **दीपक** अलंकार आहे. १३. इंद्राची दृष्टी. १४. बलसागर कर्णहि बाणाच्या वेगानें कांपावयास लागला ! १५. शल्याचा (मद्रपाचा) प्रताप विलयास नेला, त्याच्या प्रतापाचा अस्त केला. १६. हे तिघेही धृतराष्ट्राचे पुत्र असें सांपडतें. यांस अभिमन्यूनें मारिलें असें भारतांत व येथें वर्णन आहे. भीमानें सर्व धृतराष्ट्रपुत्र मारिले अशीही आख्यायिका आहे. हा काय घोंटाळा आहे तो उलगडण्यास खात्रीचा मार्ग दिसत नाहीं. सुषेण, कुण्डभेदी, दीर्घलोचन हे तिघेही धृतराष्ट्रपुत्र होते असें 'भारतीय प्राचीन ऐतिहासिक कोशा'त लिहिलें आहे. धृतराष्ट्रास याच नांवांचे अन्य पुत्र असतील व अभिमन्यूनें त्या अन्य पुत्रांस मारिलें असेल असें म्हणण्यास मात्र जागा आहे. १७. घुबड. १८. सूर्य. १९. मानी वीर असूनही व द्रोणानें 'जाऊं नका' म्हणून सांगितलें असूनही ते पळाले ! **विरोधाभास** आहे. पळच्या अर्थात त्यांची कोण तारंबळ उडाली होती ती उत्तम रीतीनें वर्णिली आहे.

स्यंदन शीघ्रहि पिटितां सांगति सूतांसि तांतड कराया ! ॥ ५५
झाला पुढें महाबळ शाल्यानुज जो तयास [2]तो [3]सौपवी. ।
होय, [4]जेयापरि, पावुनि [5]पर्वतपाटनजया, [6]संतोख [7]पवी. ॥ ५६
मर्दी मद्रपकटका असुरबला जैवि [8]तारकाराती, ।
रोधिलें काय परधमू त्या, [10]तो पूर्णावतार [11]कारा [12]ती ? ॥ ५७
सप्रेम पार्थपुत्राप्रति पाहुनि तत्पराक्रमें [13]डोले, ।
कुरुपति परिसत असतां द्रोण कृपाशीं कृपाभरें बोले. ॥ ५८
'[14]हर्षवितो मज पुत्राहूनि, नव्हे हा कुमार सामान्य; ।
धन्या सती सुभद्रा ! नंदन जीचा [15]कुमारसा मान्य. ॥ ५९
मारावें सकलहि बळ, परि सुज्ञा ! [16]तत्व वद न कां मारी ? ।
वांटे धृतरणकुतुकाच्छादितबहुबाहुवदन [18]कुमारी !' ॥ ६०

---

१. लगबग, घाई. २. सौभद्र. ३. मारी. ४. जयापरि=ज्या अभिमन्यूप्रमाणें. याचाच 'ज्या प्रकारचा' असा अर्थ केल्यास अभिमन्यु उपमेय व पवि उपमान असें होतें. मुद्यांत फरक नाहीं. सौभद्रास वज्राप्रमाणें आनंद झाला असें म्हटल्यास **उपमा** होते. वज्रास सौभद्रासारखा आनंद झाला असें म्हटल्यास **व्यतिरेक** अलंकार होतो. उपमेच्या अर्थांत 'होय' यास दोन कर्ते पाहिजेत. व्यतिरेकांत 'पवी'नें तें काम भागतें. ५. ज्याप्रमाणें अभिमन्यूला आनंद झाला त्याप्रमाणें, पर्वताचे विदारणानें प्राप्त झालेल्या जयामुळें वज्रास झाला असेल. ६. सहर्ष. ७. वज्र. ८. तारक+अराति=तारकासुरशत्रू, कार्तिकस्वामी. ९. अडवील. १०. सौभद्र. तो पूर्णावतार होय. वाटेल तेथें जाण्याला परब्रह्माला हरकत नसते तशी युद्धकुशल अभिमन्यूस नव्हती. ११. बंदिशाळा. १२. ती शत्रुसेना. **रूपक** आहे. १३. द्रोण डोलूं लागला. शिष्यप्रेम असें असावें. हें प्रेम इतकें अनावर झालें कीं, प्रत्यक्ष दुर्योधनाच्या समक्ष कृपाचार्यांशीं बोलल्यावांचून आचार्यांच्यानें राहवेना ! १४. असली शिफारस मिळविणें हेंच जन्माचें सार्थक नव्हे काय ? १५. कुमार=कार्तिकस्वामी. येथें **उपमालंकार** आहे. पण हा उपमालंकार आणखी एक उपमालंकार ध्वनित करीत आहे. जर अभिमन्यु कार्तिकस्वामी झाला, तर सती सुभद्रा सहजच पार्वतीसारखी झाली. याप्रमाणें उपमा ध्वनित असली, म्हणजे **'उपमाध्वनि'** झाला. [अलंकारमीमांसा]. १६. रहस्य सांग. कां मारित नाहीं याचें कारण सांग. १७. द्रोणांनीं कारण काय काढलें तें पहा. ते **उत्प्रेक्षेनें** सांगतातः—संहारकर्ता मदनशत्रु शंकर हा या युद्धानें उत्पन्न झालेल्या आश्चर्यानें आच्छादून टाकिलीं आहेत आपल्या दहा हातांनीं पांचही वदनें ज्यानें असा स्तब्ध झाला आहे असें वाटतें ! संहाराचा अधिपतीच स्तब्ध बसल्यावर मृत्यूचा व्यापार बंदच पडावयाचा ! आश्चर्य झालें म्हणजे आपण तोंडावर हात ठेवतोंच. १८. शिव.

[1]कुरुराज म्हणे, 'कर्णा ! कुरुगुरु पळवील अंतकाळाही, ।
गरुडापुढें [3]यमोग्रहि काय न पावेल अंत [4]काळाही ? ॥ ६१
परि झाला त्या शिष्यस्नेहानें मूढ[5] हा तपोराशी[6]; ।
स्तवितो भाट[7] तसा कीं वाटे जोडील हात पोरांशी[8] ! ॥ ६२
बाळा[9] दिलें बल, जसें द्यावें दहनाचिया लवा[10] वातें. ।
हें[11] पाळावा पदरें जेणें तेणेंचि मालवावा तें. ॥ ६३
गुरुनें करुनि उपेक्षा केला दुःसह असाध्य[12] आमयसा[12]; ।
पसरिल न जग गिळाया रुद्रप्रिय[13] भूत[13] कोण 'आ' मयसा ?॥ ६४
दुःशासन बोले, 'जड काय मदनहानिकाम[14] उग्रास[15] ? ।
मद्राहु-राहुचा शशधरसा[16] शिशु हा निकों[17] मउ ग्रास. ॥ ६५

१. दुर्योधनाला ही शिफारस अर्थातच विषाद देणारी झाली, म्हणून तो म्हणतो. २. प्रत्यक्ष यमाला सुद्धां. ३. यमासारिखा उग्र. 'महोग्रहि' (=अत्यंत भयंकर सुद्धां)– असें पाठांतर. ४. कालसर्प. अप्रस्तुतप्रशंसा आहे ५. मोहित झाला, वेडा झाला. ६. द्रोण. ७. राजाची स्तुति करणारे बंदिजन. हल्लीं स्तुतिपाठक, व्यर्थ स्तुति करणारा, बडबडणारा असा अर्थ झाला आहे. ८. या कालच्या पोरापुढें (सौभद्रापुढें) आतां हात जोडितो कीं काय, त्याला शरण जातो कीं काय अशी भीति वाटते ! ९. बाळ अभिमन्यूला. १०. अग्नीच्या फुणगीला. ११. जेणें पदरें (पदराचा वारा घालून) [दहन=अग्नि; दीप] पाळावा, तेणेंचि तो मालवावा [तसें] हें [कृत्य होय]– असा दुर्योधनाच्या म्हणण्याचा मतलब. कौरवांस जय मिळावा म्हणून न झटतां, अभिमन्यूची तारीफ करीत द्रोणाचार्य बसले, म्हणून त्यांच्यावर हा कोरडा दिसतो. 'हें पालावें पदरें, दीपहि जेणेंचि मालवावा तें' असा पाठभेद आहे. येथील 'हें' व 'तें' यांचा संबंध नीटसा जुळत नाहीं. १२. न बऱ्या होणाऱ्या रोगासारखा. १३. प्रलयाधिपति जो शंकर त्यास प्रिय झालेला राक्षस. मयासुराप्रमाणें कोणता राक्षस विश्व गिळण्यास आ पसरणार नाहीं ? दृष्टांत आहे. १४. मदनास मारण्याची इच्छा करणाऱ्या सांबास. दृष्टांत आहे. शंकरांनीं मदनदहन केलें, ही गोष्ट सर्वविश्रुतच आहे. 'कुमारसंभवां'त हा दहनप्रकार उत्तम वर्णिला आहे. १५. शिवास. 'उग्रः कपर्दी श्रीकंठः शितिकंठः कपालभृत्' इत्यमरः. १६. चंद्रासारखा. १७. चांगला. रूपकही चांगलें आहे. राहु नामक दैत्य चंद्रसूर्यांनीं चहाडी केली म्हणून त्यांचा ग्रास करितो ही पौराणिक कथा ग्रहणाची मीमांसा करण्यासाठीं तयार झाली. राहु=छाया–असाही अर्थ आहे.

आहे [1]मच्छरनिकरा अचगल पांडित्य [2]जें अजगरा तें; ।
या अ[3]सुहृदपत्या [4]तें गिळिल, भासी जसा [5]अज [6]गरातें. ॥ ६६
मरतिल [7]सकृष्ण पांडव [8]धीरहि ते सोडितील [9]आवास, ।
[10]आवास अंतकाचा [11]प्रियशोक, हरिस म्हणेल 'आ वास.' ॥ ६७
एकक्षणें समस्तक्षय होय, असें पहा कसें करितों. ।
[12]सौभद्रमस्तकासह आतां निजकटकसंकटा हरितों.' ॥ ६८
ऐसें बोलुनि धांवे, [13]विधुंसि गिळायासि जेंवि राहु निघे; ।
[14]कार्ष्णि म्हणे, 'ये, देतों [15]सच्छलफल, [16]पल समोर [17]रहुनि घे. ॥ ६९
[18]सर्वसहेसही बहु देतो खलकायभार [19]ताप सदा. ।
ताता [20]भीमाचें हें नोहे बल काय ? [21]भारतापसदा ! ॥ ७०
माझे न पावतिल तव हननें साधूंत [22]व्हीप्रति [23]ज्ञाती ।
जरि खल म्हणतिल '[24]भंग;' आम्हीं साधूं तरी प्रतिज्ञा ती. ॥ ७१
'[25]आत्मा पुत्र' असें हें [26]श्रुतिचें मत, भीम तात, [27]हा तनय, ।

---

१. मत्+शर+निकर=माझ्या बाणांच्या समुदायास. २. गिळण्याविषयीं अजगराची प्रसिद्धिच आहे. ३. अ+सुहृत्+अपत्य=शत्रूचा मुलगा त्याला. ४. तें पांडित्य, कौशल्य. ५. शिव. ६. विषातें. ७. सहअर्जुन. ८. अंतःकरणाचे जरी खंबीर आहेत तरी. विरोधाभास आहे. ९. धैर्यास. १०. स्थान. ११. प्रिय जो जन त्याच्या मृत्यूबद्दलचा शोक. हा शोक प्रत्यक्ष मृत्यूपतीचें म्हणजे यमाजी भास्करांचें राहण्याचें ठिकाणच असतें. उत्तम अनुभवाचें हें सार आहे. 'आ वासणें'=मरणें. अभिमन्यूवर कृष्णार्जुनांची व सगळ्यांची किती प्रीति होती बरें ? १२. येथें सहोक्ति अलंकार आहे. त्यानें कौरवसेनेवरील महासंकट उत्तम व्यक्त केलें आहे. सौभद्रमस्तक तुटलें म्हणजे आपलें संकट संपलेंच ! १३. चंद्रास. १४. अभिमन्यु. १५. सत्+छल+फल=साधुछलाचें फल. १६. पळभर. १७. रहा, उभा रहा. क्षणांत तुझा व तुझ्या पापांचा अंत करितों. १८. पृथ्वीस. 'सर्वसहा वसुमती वसुधोर्वी' इत्यमरः. येथें विरोध आहे. १९. संताप देतो. २०. तात (चुलते) भीमाचें (भीमासारखें) हें (पृथ्वीचा भार कमी करण्याचें माझें) बल नोहे काय ? आहेच. २१. भारत+अपसद=भरतवंशजांतील नीचा. २२. लज्जेप्रती. २३. माझे ज्ञाती (कुलबांधव) यांना (मी तुला मारला तर) खालीं मान घालावी लागणार नाहीं. २४. जरी दुष्ट लोक 'भीमाची दुःशासनवधाची प्रतिज्ञा मोडली' असें म्हणतील, तरी आम्ही 'भीमप्रतिज्ञा खरी झाली,' असें सिद्ध करूं. २५. 'आत्मा वै पुत्रः' ऐतरेयोपनिषद्. तेव्हां तुला मीं मारलें काय, अगर माझ्या चुलत्यानें मारलें काय, एकच. २६. उपनिषदांची गणना श्रुतींतच होते. २७. मी मुलगा. चुलता हा बापाप्रमाणेंच पूज्य आहे.

श्रुतिकिंकरांसि देवांधर्मासह जोडितात हात नय[1].' ॥ ७२

परिसुनि धिक्कार रणीं मानी[2] रथ, चाप, कां न नीटे[3] करी ? ।
गमले, सजले[4] क्रुद्ध द्विपे[5] मारायासि काननीं[6] टंकरी[7]. ॥ ७३

सक्षत[8] तव सुत गमला, पुष्पांनीं दाटला पळस साच; ।
मूर्छित म्हणुनि पळवितां सूतानें[9], वाटला पळ[10] ससाच ! ॥ ७४

धर्मादि सर्व झाले दुःशासनपरिभवें परम हर्षी; ।
ज्ञानें मोहपराभव होतां जैसे तपःपर[11] महर्षी[12]; ॥ ७५

धांवति सहाय व्हाया सौभद्रा [13]द्रोणसैन्य फोडूनी; ।
सोडुनि विशिखवृष्टिसि, सारूं पाहति, परांसि [14]मोडूनी. ॥ ७६

भूप म्हणे, 'कर्णा ! शिशु, झटले जरि भट[15] समस्त, न[16] निवारे, ।
स्वभुजांसि म्हण[17]–सुरींचे[18] आलिंगुनि घटसम स्तन निवा रे ! ॥ ७७

तूं या धनंजयाच्या[19] शरवर्षे शमविशील फुणगीतें[20]; ।
घेशिलें[21] चित्तावरि तरि, भुलविशिल सुर स्व-कीर्ति-गुण-गीतें. ॥ ७८

---

१. नय देवांधर्मासह श्रुतिकिंकरांसि हात जोडितात–हा अन्वय. नय=नीतीचीं तत्वें. श्रुति+किंकर=श्रुतींचे, वेदोक्त वचनांचे दास, त्यांना. श्रुतिमार्ग श्रेष्ठ आहे. म्हणून दुःशासनवधांत आपण पाप करीत नाहीं, असें म्हणण्याचा अभिमन्यूचा भाव आहे. २. मानी पुरुष जो दुःशासन तो. ३. सज्ज. ४. 'जमले' असें पाठांतर. सजले=सज्ज झाले. ५. हत्ती. उत्प्रेक्षा अलंकार आहे. ६. अरण्यांत, वनांत. ७. टक्करा. ८. क्षतासहित, जखमी. पळसाची उपमा अगर उत्प्रेक्षा रणवीरांस नेहमीं लावण्यांत येते. ९. सारथ्यानें. १०. पळभर ससाच वाटला ! काय तारंबळ दुःशासनाची ही ! ११. तपोनिष्ठ. १२. महाऋषि. येथील उपमा सर्वांगसुंदर आहे. तपोबळानें ज्ञान उत्पन्न होऊन मोह नाहींसा होतो. १३. द्रोणानें रचिलेला व्यूह तो. १४. मोड करून. पराभव करून सारूं पाहती (नाश करूं पाहती). १५. योद्धे. १६. मागें सरेना. १७. दुर्योधन कर्णास म्हणतो कीं, तूं जीवावर उदार होऊन युद्ध कर. तूं (कर्णे) स्वभुजांसि म्हण [कीं हे भुज हो !] सुरींचे घटसम स्तन आलिंगुनि निवा–असा अन्वय (मागें अध्याय १ गीति ७५वरील टीपा पहा). १८. देवांगनांचे. १९. अर्जुन. (हेंच अग्नीचें नांव आहे म्हणून उपमेकरितां 'अग्नि.') २०. स्फुलिंगातें. समासोक्ति आहे. अग्नि व अर्जुन यांकडे अर्थ लागतो. फुणगी=अभिमन्यु. २१. हा दुष्ट दुर्योधनाचा चिडविणारा टोमणा तर नव्हे ना ? 'देवांना भुलविणें' येथें प्रतीपद्दी आहे.

[1]शस्त्रास्त्रवृष्टि करितां घन कर्ण गमे [2]सुवर्णनग बाळ. ।
[3]किंबहुना ? [4]व्यासेतररचित सविस्तर सुवर्णन [5]गबाळ. ॥ ७९
शस्त्रें, अस्त्रें, छत्र, ध्वज, धनु, खंडुनि, वधूनि [6]अनुजातें, ।
राधेयातें पळवी सौभद्र; [7]कुमार जेंवि [8]दनुजातें. ॥ ८०
व्यूहीं शिरतां पांडव, [9]वारण केलें जयद्रथें बा ! तें ।
[10]हरवरकृत्य !, जलधितें करिल [11]प्रभु थेंब, जलधि थेंबातें ! ॥ ८१
[12]वसुषेणसूत [13]नरजें वधितां झाले रणीं चपळ वाजी; ।
जाणों परस्पर म्हणति, '[14]जीऊं द्या यश, [15]धणीच पळवा जी !' ॥ ८२
वधितां [16]वशात्य राजा तद्भट [17]काळें मुखांत लपवीले; ।
शल्यज रुक्मरथसहित तत्सख शत राजपुत्र [18]खपवीले. ॥ ८३
[19]हरिशिशुवरि [20]यूथवधप्रकुपितमदमत्तयूथपाळकसा ।

---

१. कर्णानें मेघाप्रमाणें शस्त्रास्त्रांचा त्या लहानग्या अभिमन्यूवर भडिमार केला, पण तो वीराचा बच्चा मेरुपर्वताप्रमाणें अचळ राहिला–असा भावार्थ. उत्प्रेक्षालंकार. २. मेरु. ३. फार कशाला ? फार काय सांगावें ? आक्षेप अलंकार आहे. व्यासाशिवाय इतरांनीं केलेलें वर्णन गाबाळ असें सांगून कर्णाभिमन्यूच्या युद्धांचें अवर्णनीयत्व सांगितलें आहे. व्यासांनाही पंतांनीं येथें उत्तम शिफारसपत्र दिलें आहे. कितीही विस्तृत केलेलें किंवा कितीही चांगलें केलेलें वर्णन गबाळच ! ४. व्यास+इतर=व्यासाहून इतरांनीं केलेलें विस्तृत असें चांगलें वर्णन. ५. रद्दी. ६. धाकट्या भावाला. ७. कार्तिकस्वामी. ८. 'दनु'पासून 'दनुज.' येथें तारकासुर. ९. निवारण. १०. शंकराच्या वराचा हा प्रभाव ! जयद्रथास शंकरानीं वर देऊन 'तूं एकटा फक्त एकच वेळ पांडवांचा पराजय करशील' असें सांगितलें होतें. ११. प्रभूला काय अवघड आहे ? १२. 'वसुषेण' हें कर्णाचें मूळनांव. त्याचा सारथी. १३. अर्जुनपुत्रें. १४. येथील अश्वपलायनावर पंतांनीं फारच समर्पक उत्प्रेक्षा केली आहे. १५. आपला मालक (कर्ण). त्याला जिवंत राखूं. यश गेलें तरी फिकीर नाहीं !—हा भाव. १६. मूळांत 'वसातीय' असें नांव आहे. आमच्याजवळ असलेल्या आदर्शप्रतींत व इतर दोन प्रतींत 'वशात्य'च आहे. या तिन्ही प्रती एकाच मूळ प्रतीवरून केल्या नसतील तर पंतांनींच 'वशात्य' असें नांव लिहिलें असावें. Homer at times nods ! १७. मृत्यूनें. मृत्यूचा जबडा खरोखरच केवढा मोठा असला पाहिजे ! The jaws of death. हें शब्दचतुष्टय अर्थानें किती तरी भरलेलें आहे ! पर्यायोक्ति अलंकार. १८. 'क्षि'=नाश होणें यापासून 'क्षप' आणि त्याचा 'खप' झाला. १९. सिंहपोतावर, छाव्यावर. २०. कळपाच्या मरणानें रागावलेल्या मदोन्मत्त गजपतीसारखा.

धांवे [1]कुरुप, परि पुन्हा त्यासि न पळवील पार्थबाळ केसा [2]?॥८४

अंध म्हणे, 'रे संजय ! हें त्या पौत्रा[3]स [4]वर्ष सोळावें, ।

लोळावें मांडीवरि, तेणें द्रोणादिकांसि घोळावें ! ॥ ८५

[6]न पवे [7]सुनीतिचें परमार्थाची वाट लेंकरूं काय ? ।

सत्यचि कथिशी; परि हें मज लटिकें वाटलें करूं काय ?' ॥ ८६

संजय म्हणे, 'म्हण [8]अनृत, भीष्माचा एकला पणतु, [9]मुलगा ।

करिता झाला गुद्सा, बहुतांनीं वेढिला [10]रण तुमुल गा ! ॥ ८७

कुरुसैन्यांत गमे ज्यापरि [11]रंभाकाननांत [12]वारा हो ! ।

त्या विजयश्री देउनि [13]परिरंभा कां न नातवा [14]राहो ? ॥ ८८

समरीं स्मरोनि वदलों, 'मी धन्य !' 'अधन्य' वि[15]नयेना ! [16]तूतें ।

काय कथूं ? कुरुगुरुसहि [17]पळवि पळ [18]त्यक्तविनय नातू तें. ॥ ८९

---

१. दुर्योधन. २. प्रश्नालंकार. पळविला असें इष्ट उत्तर आहे. ३. नातु अभिमन्यूस. ४. 'वर्ष'शब्द 'पर्जन्य'वाची आहे. पूर्वी पावसाळ्यापासून वर्ष मोजित असें 'वर्ष,' 'अब्द' ह्या शब्दांवरून दिसतें. शरदृतूपासूनही वर्षारंभ होत असे असें 'शरद्' शब्दावरून दिसतें. 'मृगा'पासून अद्यापिही वर्ष मोजतात. ५. षोडशवर्षीही मांडीवर लोळणारा मुलगा चमत्कारिकच असला पाहिजे व आजोबांची मांडीही बरीच प्रशस्त असली पाहिजे ! शिवाय या मांडीवर लोळणाऱ्या लेंकरास लेंकरूंही होणार होतें. म्हणजे उत्तरा गरोदर होती. तेव्हां धृतराष्ट्र केवळ लाडा कौतुकानें म्हणत आहे असें घ्यावें. असंभव अलंकार आहे. ६. सुनीतिचें लेंकरूं न पावे काय ? ७. ध्रुवमाता. ८. खोटें म्हण पाहिजे तर पण. ९. बालवय आहे ज्याचें असा एकटा मुलगा बहुतांनीं वेढिला, तथापि तुमुल रण (घोर युद्ध) करिता झाला. भीष्माचा उल्लेख साभिप्राय आहे. १०. युद्ध. 'पण' असें पाठांतर. पण=परंतु. ११. कदलीवनांत जसा वारा. १२. ह्या गीतींत अकरा अक्षरी अंत्ययमक आहे. पण चरणच अकरा अक्षरांचा असल्यामुळें, हें 'चरणयमक' समजावें. १३. आलिंगना. १४. त्या नातवा परिरंभा देऊनि विजयश्री कां न राहो (कां न स्थिर होवो ?). येथील यमकचमत्कार, रंभाकाननांतील उपमा आणि विजयश्रीच्या दृढालिंगनरूपी चेतनीभावाची कल्पना या सर्वांनीं या पद्यांतील उत्तम अर्थास फारच रमणीयत्व आलें आहे. १५. चक्षुर्हीना (धृतराष्ट्रा). १६. 'तूतें' हें 'स्मरोनि' व 'अधन्य' या दोन्हीकडे घ्यावें. मला युद्ध पाहण्यास सांपडलें म्हणून मी धन्य. १७. 'कुरुगुरुही पळवी' असा पाठ आदर्शप्रतींत होता. १८. अमर्यादा करणारा. क्षण=क्षणभर.

लक्ष्मण धांवे, जेव्हां द्रोणाद्यखिळहि [1]सुयोध नावरती; ।
घननाद [2]दशमुखावरि जी स्थिति घाली सुयोधनावर ती. ॥ ९०
[3]हननचि बहुमत झालें, पहिलें, [4]तुमच्या न नातवा नातें ! ।
वदनें न [5]वानवे, तरि शौर्य शिशूचें [6]मनांत वाना तें. ॥ ९१
कार्ष्णि म्हणे; 'ये, शोकद हो ताता [7]साधुगंजन [8]कु-शीला; ।
आलें [9]भानुमतीच्या, मळवाया वंश, [10]अंजन [11]कुशीला ! ॥ ९२
तूं [12]त्यां योग्य ? [13]सुमित्रासुत धरि [14]खलदुर्मिला सुनामा ज्या. ।
[15]काकी म्हणत्ये, 'लुप्ता करुत यशें उर्मिला सुना माझ्या ! ॥ ९३
'लक्ष्मण' हें योग्य मला, योग्य तुला 'मेघनाद' हें नाम; ।
[16]रावणसा बाप तुझा, बा ! माझा [17]शुचियशा जसा राम.' ॥ ९४
[18]धिक् प्रथम, मग करुनि रणं, वधिला लक्ष्मण [19]किरीटितनयानें. ।
हें पुत्रशोकविषफल दिधलें दुर्योधनासि [20]अनयानें. ॥ ९५

---

१. चांगले कसलेले योद्धे यांना सुद्धां अभिमन्यु आवरेनासा झाला. २. इंद्रजित्. हा रामावर धांवला तेव्हां रावणाचें तोंड काळें ठिक्कर पडलें, तसा सुयोधन काळा पडला. लक्ष्मण धांवला व दुर्योधन काळा पडला ! **असंगति** अलंकार. ३. अभिमन्यूचा मृत्यु इष्टतम झाला. नातें राहिलें एका बाजूला ! ४. तुमच्या नातवाला. ५. स्तुति करवे. ६. तोंडानें वर्णन करवेना तर मनांत तरी नातवाच्या शौर्याची स्तुति करा. संजयाचा टोमणा खासा आहे ! ७. साधुच्छलक. ८. हें विशेषण लक्ष्मणास पित्यासह लावावें. ९. सुयोधनस्त्रीच्या. १०. अंजन्=काजळ, अर्थात् काजळासारखी अपकीर्ति. 'भानुमतीच्या पोटीं अंजन' असें म्हटल्यामुळें येथें **विरोध** व **असंभव** अलंकार आहेत. ११. पोटीं, जन्माला. १२. अर्थात् योग्य नाहींस. काकथीनें नाहीं. १३. दाशरथिलक्ष्मण. १४. खलाला दुष्प्राप अशा सुनामाला, चांगल्या नांवाला. १५. काकी (भानुमती) म्हणते, 'माझ्या सुना यशानें ऊर्मिला (दशरथपुत्र लक्ष्मणाची पत्नी) लुप्ता (लोपलेली, झांकलेली) करुत.' काय काकीची आपल्या मुलाविषयींची महदाशा ही ! **व्यतिरेक** अलंकार आहे. १६. 'रावणसा पाप तुझा बा' असाही पाठ आहे, पाप=पापी; बा=बाप. १७. शुभ्र आहे यश ज्याचें. अभिमन्यु लक्ष्मण झाला तर अर्जुन दशरथ झाला पाहिजे होता. पण येथें आपल्याला त्याच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं. राम व रावण यांची कीर्ति व पराक्रम यांस उद्देशूनच अभिमन्यूचें हें भाषण आहे. १८. धिक् करणें, धिक्कार करणें. १९. अर्जुनपुत्रानें. २०. दुर्योधनाच्या अन्यायाचें सुतनिधन हें विषफल त्यास ह्या जन्मींच प्राप्त झालें !

सुत मरतां भूप म्हणे, 'होईल अधर्म म्हणुनि न चंपापा; ।
सारे मिळोनि मारा, राहों द्या एक पळहि नच, पापा. ॥ ९६

द्रोण, द्रौणि, बृहद्बल, कृतवर्मा, कर्ण, कृप असे सा हे ।
वळले घनसे, त्यांतें कार्ष्णि महावातसा न तो साहे. ॥ ९७

कोंडुनि म्हणत होते 'विझवूं मारूं, दिवा-ससासा जे, ।
तो त्यांसि भंगुनि, जयश्रीयोगें श्रीनिवाससा साजे. ॥ ९८

क्राथसुत मथुनि, केला विरथ, कृपाचार्य बा ! तुज्या नातें; ।
कुरुकीर्तिदवृंदारक वधितां स्मरलें न जोतु ज्यां नातें. ॥ ९९

वधितां बृहद्बलातें म्हणती सुर 'सर्व कांपवीना ?' [14]कीं ।
चत्वशताधिक याचे शर; मिरवी गर्व कां पवी नोकीं ? ॥ १००

कर्णासमक्ष मारी त्याचे निधि[16]यक्षवत् सचिव सा हो ! ।
त्यांसि म्हणे, 'होउनि चिर वीरसुगतिसुरभिवत्सचि वसा हो !' १०१

कर्णाचा भंग करुनि मागधसुत अश्वकेतुला खरची; ।
[19]प्रतिकूळ [20]विधि, तसा तो परबळनाशार्थ हेतु लाख रची. ॥ १०२

---

१. भिऊं नका, लाजूं नका, मागें घेऊं नका. २. पापा (अभिमन्यूला) मारा, व राहूं देऊं नका. सर्व मिळून एकट्यावर जाणें पाप आहे असें मनांत आणून चपापूं नका. ३ एका राजाचें नांव. ४. सहा. ५. मेघासारखे. ६. सोसाट्यानें वाहणाऱ्या वाऱ्यासारखा. **उपमा** खाशी आहे ! ७. अभिमन्यूला कोंडून पूर्वोक्त सा वीर म्हणत होते कीं, 'दिवा विझवूं, ससासा (सशासारखा) मारूं'. 'दिवा जसा सांजे' असाही पाठ आहे. सांज=संध्याकाळ. **यथासंख्य** अलंकार. ८. सिद्धीचा लाभ झाला म्हणून. जयश्री व अभिमन्यु हें दंपत्य लक्ष्मीनारायणाच्या दंपत्यासारखें चांगलेंच शोभणार. ९. लक्ष्मीयुक्त कृष्णासारिखा. १०. नातवानें. ११. कुरुसैन्याची कीर्ति वाढविणारा वृंदारक राजा. १२. कदापि. १३. ज्या अभिमन्यूला नातें स्मरलें नाहीं. कुरु आपलेच बंधु यांचा नाश आपण करितों हें स्मरण झालें नाहीं. १४. सर्वांना कसा कांपवीत नाहीं ? कारण. १५. स्वर्गांत. या ओळींत **व्यतिरेक** व **प्रतीप** अलंकार आहेत. १६. निधीचें (द्रव्यभांडाराचें) रक्षण करण्यास ठेवलेल्या यक्षासारखे. १७. वीरांना प्राप्त होणारी सद्गति हीच कामधेनु तिचे वत्स (बालक) होऊन स्वर्गांत चिर (नित्य) वसा (रहा). १८. मागधसुताला, अश्वकेतूला मारी. १९. प्रतिकूल प्रारब्ध असलें म्हणजे नाशाचे लाखों हेतु उत्पन्न होतात तसेंच. २०. दैव.

'कालियसा' दौःशासनि 'करिन' म्हणे 'त्या पेरासु'; धीटांचा ।
प्रभु तन्मर्मी हाणी इषु, जैसा तो पेरा सुधी टांचा. ॥ १०३

त्यासि म्हणे, 'सुत त्याचा कीं तूं ? नरकाय पापवनिं रीस ।
जो झोंबला सतीच्या सोडाया सत्क्रियेसह निरीस. ॥ १०४

मज जिंकाया कैचें बल खलजन्मा ! तुला ? निरी हातें ।
सोडुनि; अजितत्व जगीं एका सन्मातुला निरीहातें. ॥ १०५

जैसा बाप पळाला, तूंही तैसाचि पाप ! पळशील; ।
मळशील अपयशें, कीं आतांचि पतंगसाचि जळशील.' ॥ १०६

ऐसें बोलुनि सोडी दुःशासनसुतवधार्थ नाराचा; ।
छेदी शरत्रयें कुरुगुरु त्या मित्रा सुदर्शनाराचा. ॥ १०७

---

१. मृत. २. धीटांचा प्रभु हें अभिमन्यूस दिलेलें विशेषण किती तरी शोभत आहे ! ३. बुद्धिमान् श्रीकृष्ण. कालियामर्दनाचा प्रसंग एका उपमेनें पंतांनीं व्यक्त केला आहे ! ४. शत्रूस, कालियास. ५. पापांच्या अरण्यांतील. 'पापखनि' असाही पाठ आहे. ६. आस्वल. ७. द्रौपदीच्या सत्क्रियेसह (पातिव्रत्यासह) निरीस सोडाया झोंबणारा व नररूप धारण करणारा पापरूपी अरण्यांतील आस्वल जो दुःशासन त्याचा. येथें **पर्यायोक्ति** व **रूपक** हे अलंकार आहेत. ८. येथें '**सहोक्ति**' आहे. ९. खल जो दुःशासन त्यापासून जन्म ज्याचा असा तूं त्या तुला. 'पित्रपराधे पुत्रस्य दंडः' या विपरीत न्यायानें द्रौपदीसतीची निरी सोडणारा तुझा बाप म्हणजे तूंच या तुला युद्धामध्यें जय कशाचा मिळतो ? १०. अजिंक्यपणा जगामध्यें एकालाच मात्र. सन्मातुला (चांगला आहे मातुल, मामा ज्याचा) अशा मला व निरिच्छ असा जो मी त्या मलाच सिद्धि प्राप्त होणार. 'आशा येषां दासी तेषां दासायते लोकः' या न्यायानें पंतांनीं या जगांत मोक्ष कोणाला मिळेल याचाही निकाल **व्यंजनेनें** केला आहे. येथील यमकचमत्कार हृदयंगम आहेत ! ११. 'मन्मातुला' असाही पाठ आहे. १२. काय अभिमन्यूची दर्पोक्ति ही ! दौःशासनी आपलें यश हारवून पळून जाईल, किंवा मरेल, हा निकाल अभिमन्यूनें त्याच्या तोंडावर देऊन 'तूं मला जिंकणार नाहींस' असें पर्यायानें सांगितलें म्हणून **पर्यायोक्ति** आहे. कृष्णानें अर्जुनास वादांत हटविलें तसेंच अभिमन्यु दौःशासनीस मेडसावीत आहे. 'पळालास तर बेअब्रू होईल, रणांत राहिलास तर मरशील !' ही कोण मीति ! 'शील' शब्दाची पुनरुक्तिही मनोहर आहे. १३. बाणास. १४. सुदर्शन+आर (सुदर्शनचक्ररूपी शनिग्रह) त्याच्या मित्राला (बाणाला), अर्थात् अत्यंत तीक्ष्ण बाणाला. मूळांत द्रौणीनें बाण तोडला असें आहे.

ती शरहानि तया, जशि [1]हरिच्या नाकांत घातली [2]काडी ! ।
द्रोणध्वज सौभद्र च्छेदुनि तत्काल भूतळीं पाडी. ॥ १०८
शल्य पुढें होय तया तत्काळ उरीं शरत्रयें ताडी; ।
मद्रप शर [3]नव [3]नव [4]नवनीतमृदुकुमारदारणा धाडी. ॥ १०९
[5]विरथ करूनि पळविला शल्य जसा तारकासुर [6]कुमारें; ।
[7]शत्रुंजयादिपंचप्रबळरथी मारिले मग कुमारें. ॥ ११०
शकुनि म्हणे, 'कुरुनाथा ! हा [8]सर्वांहीं मिळोनि मारावा; ।
भ्याले यास भट, जसे भीती गजशिशु [9]मृगोत्तमारावा. ॥ १११
मारिल एकैकातें, [10]शरगोचर शूर कोण न खपविला ? ।
[11]मृदु पूर्व, परि न कंपद काय [12]नृहरिरक्तशोणनख [13]पविला ?' ॥ ११२
द्रोणासि कर्णहि म्हणे, 'गुरुजी ! मज तों नसेचि [14]आंवांका; ।
[15]आंवांका युक्ति, म्हणो न तुम्हांसहि [16]हा 'करूनि आ, वांका ?' ११३
गुरुहि म्हणे, 'कर्णा ! हा [17]तक्षकचि [18]गरल, करूनि आ, वमला. ।
[19]आहें संकोचें, परि सोडुनि गेला मघांचि आव मला. ॥ ११४

---

१. सिंहाच्या. २. खिजविणें सांगायला ही उपमा किती समर्पक आहे ? नाकांत काड्या घालणें=कुरापत काढणें, त्रास देणें, मर्मभेदक भाषण करणें. (मोरोपंतकृत सभापर्व–अ० ४ गीति ८४ पहा). ३. नक कोरे. ४. लोण्याप्रमाणें मऊ अंग ज्याचें अशा बालवयस्क अभिमन्युहननार्थ ! ५. भग्न झाला, मोडला रथ ज्याचा असा. ६. कार्तिकस्वामीनें. ७. एक राजपुत्र. असेच इतर नवचे कांहीं राजे व राजपुत्र होते. ८. हा मामांचा मंत्र ! कुनीतिबीज पेरण्यांत यांचा पहिला नंबर ! ९. सिंहध्वनीस. शकुनीनें ही उपमा द्यावी यापेक्षां आणखी कोणती शिफारस पाहिजे ? अनुप्रासही आहेच. १०. बाणाच्या टप्प्यांत आलेला. ११. पूर्वी मऊ खरें, पण नरसिंहाचे रक्तानें आरक्त झालेलें नख वज्राला कांपविणारें नाहीं काय ? आहे–हा काकर्थ. येथें व्यतिरेक अलंकार आहे. १२. नरहरीचे रक्तानें आरक्त झालेलें नख. १३. वज्राला. १४. धैर्य. कर्णाची ही स्पष्टोक्ति व गुरुसंबंधानें भीति आणि उपायचर्चा यांवरून अभिमन्यूनें काय कहर उसकून दिला होता, याची उत्तम कल्पना होते. येवढा बलसागर कर्ण, तोही लटपटून जाऊन युक्ति शोधीत बसला ! १५. योजा. यामयमक. १६. अभिमन्यु. १७. तक्षक हा एका नागकुलाचा अधिपति आहे. येथील रूपक अभिमन्युकृत संहार दाखविलें. १८. विष. 'वमला' याचें कर्म. १९. 'मी येथें राहिलों आहें म्हणजे काय, गेलें तर वाईट दिसेल या संकोचानें राहिलों

मज [1]भंगुनिहि सुखवितो बा ! हा सामान्य काय गा ! बाळ ? ।
उतरुनि सांडावा यावरुनी [2]सर्वस्व [3]काय गाबाळ. ॥ ११५
याचा धन्य गुरु ! जसे धन्य प्रद्युम्न-गुह-[4]कुशलवांचे; ।
न दिसे आज मज रणीं जो सौभद्रापुढें [5]कुशल वांचे. ॥ ११६
स्पष्ट अभेद्यकवच हा [6]बीभत्सुकुमार [7]अंगपा ! [8]त्याला, ।
[9]कीं अभिनवाहि, याचें भ्यावें सुकुमार अंग, पाल्याला ! ११७
म्यां विजयासि पढविली, विजयानें कवचधारणा तनया; ।
भेदुनि कवच करिल [10]सुरपहि तिलतुल्य [11]व्यथा रणांत न या. ११८
जरि इच्छिसि [12]हतसुतकुरुपतिशोकप्रशम [13]कार्ष्णिच्या पैतें ।

आहे. बाकी माझें धैर्य मला सोडून केव्हांच गेलें आहे?' प्रत्यक्ष कुरुगुरूची ही उक्ति ! ! आव=अवसान, धीर.

१. पराभव करून. **विरोध** अलंकार. बा=बाप असा अर्थ केल्यास द्रोणाच्या भंगानें अर्जुनास सुख होणार हा **असंगति** अलंकार होईल. २. 'यावरुनि ससर्वस्व' असें पाठांतर. ३. देह. असला असामान्य कुमार पाहून अर्जुनाच्या गुरूला त्याची दृष्ट काढावी, व आपले सर्वांचे देह गाबाळ म्हणून त्याच्यावरून उतरून टाकावे अशी इच्छा होणें नीटच आहे. ४. रामपुत्रांचे गुरु वाल्मीकिऋषी. गुहाचा शिव. प्रद्युम्नाचा कृष्ण. हे प्रद्युम्नादि वीर कुमारवयांतच प्रसिद्धीस आले होते. ५. या शब्दाची व्युत्पत्ति चमत्कारिक आहे. 'कुशान् लातीति कुशलः' हा ऋषीकाळांतील शब्द होय. चातुर्यानें कुश तोडून आणणें व सुरक्षित पार येणें यास कुशलत्व मिळून पुढें कुशल म्हणजे 'चतुर' व नंतर 'क्षेम' असे अर्थ आले. 'खुशाल' हा 'कुशला'च्याच कुलांत उत्पन्न झाला ! येथें कुशल म्हणजे खुशाल, क्षेमरूप असा अर्थ घ्यावा. चतुर घेतल्यास जो कुशल तो वांचेसा न दिसे–असा अर्थ होईल. पहिल्यापक्षीं विधिविशेषण व दुसऱ्यापक्षीं गुणविशेषण होईल. ६. अर्जुनपुत्र. अर्जुनास कवचधारणेची विद्या आचार्यांनीं शिकविली होती. ७. कर्णा. ८. हा अभेद्यकवच (न भंग पावणारें कवच) त्याला आहे–असा अन्वय. हें स्पष्ट आहे (उघड आहे). हा निश्चय (अगर **अनुमान**) पुढील विधानावरून झाला आहे. ९. कारण, नूतन म्हणून कोमल पाल्याला सुद्धां भ्यावें इतकें यांचें अंग सुकुमार (नाजुक) आहे ! **व्यतिरेकानें** सौभद्राचा नाजुकपणा सांगितला. १०. इंद्र. वज्रधारी इंद्र सुद्धां (अभिमन्यु विगतकवच झाला तरी) त्याला तिळायेवढीही इजा करूं शकणार नाहीं. ही **अतिशयोक्ति** होय. ११. 'व्यधा' असा पाठभेद. व्यधा=जखम. १२. ज्याचा पुत्र मृत झाला आहे असा जो कुरुपति (दुर्योधन) त्याची शोकशांति. १३. अभिमन्यूच्या. १४. पडण्यानें, मरण्यानें. येथून कपटमंत्रास आरंभ झाला.

तरि पाहुं पाड कैसा आधीं तोडोनि [2]कार्ष्णिचापातें. ॥ ११९
कार्मुक, गुण, हय, सारथि, खंडन [3]इतुकें [4]अशक्य बापा ! हें ।
जें यांत घडेल तुला तें तरि करिं, करूनि यत्न बा ! पाहें. ॥१२० [5]
[6]अक्षतधनु तोंवरि हूं [7]वीरशिरोरत्न नावरायाचें; ।
यास्तव सर्वहि रक्षूं, आजि करुनि यत्न, नांव [8]रायाचें. ॥ १२१
[9]प्रभु वृत्रशिरासि जसा खंडी [10]भयदायकास नाकाचा; ।
तैसाचि कर्ण [11]करिता होय तया [12]सायकासना [13]कांचा. ॥ १२२
मारी [14]हयांस सहसा कृतवर्मा; सारथीस [15]गौतमही; ।
परि न गडबडे तो [16]पितृमातुलसम-शुद्धकीर्तिधौतमही । ॥ १२३
सौभद्र विरथ होतां [17]धर्मज्ञहि करिति शस्त्रवृष्टीतें, ।
तें [18]निष्कृपत्व पाहुनि झांकिति [19]बहुसदयसाधु दृष्टीतें. ॥ १२४

---

१. कोणत्या तरी उपायानें त्याचें धनुष्य आधीं तोडून तें खालीं पाड. २. अभिमन्यूच्या धनूतें. ३. इतक्यांचें एकदम खंडन. काय कर्णद्रोणांची घाबरपट्टी ही ! अर्जुनाला क्षणभर खालीं बसावयास लावणाऱ्या कर्णाला अर्जुनगुरूनें असा मंत्र सांगावा यापेक्षां त्यांचें भय दुसऱ्या कशानें व्यक्त होणार ? 'भिऊं नको, तुला येईल तेवढें तरी कर, निदान यत्न तर करून पहा' 'Try again' ही कर्णाची निंदाच होय. ४. 'खंडन इतकेंचि शक्य' असा पाठभेद. ५. 'जें यांत घडेल तुला, तें करिसिल तरी करूनि बा ! पाहें' असाही पाठ आहे. ६. अ+क्षत+धनु=धनुष्यभंग न होई तों. ७. वीरश्रेष्ठ अभिमन्यु. ८. दुर्योधनाचें. म्हणून सर्वही यत्न करून आज रायाचें नांव राखूं. या नांव राखण्याच्या भानगडींत सर्वजण आपआपलें नांव बट्टू करून घेणार होते ! ९. स्वर्गाचा प्रभु इंद्र. १०. भीति उत्पन्न करणाऱ्या (वृत्रशिरास). ११. करिता होय=करिता झाला. १२. धनुष्यास. १३. लेचापिचा. १४. घोड्यांना. १५. कृप. १६. बापाच्या व मामाच्याप्रमाणें धवलकीर्तीनें पावन केली आहे पृथ्वी ज्यानें असा अभिमन्यु गडबडला नाहीं, म्हणजे आपली धवलकीर्ति मलीन होईल असें अपकृत्य त्यानें केलें नाहीं. हें सगळें संस्कृत विशेषण साभिप्राय आहे म्हणून **परिकर** अलंकार आहे. शिवाय 'क्रियासिद्धिः सत्वे भवति महतां नोपकरणे', मोठे लोक साधनाच्या भिस्तीवर अवलंबून नसतात हेंही पर्यायानें सांगितलें आहे. ज्यांना विपत्कालीं धैर्य, तेच खरोखर शूर होत. पुढील १२६ गीति पहा. १७. धर्म ध्यानांत ठेवून युद्ध करणारे सुद्धां. हा **विरोध** होय. 'तेव्हां कोठें गेला होता राधासुता ! तुझा धर्म ?' ही अर्जुनाची प्रश्नावली (मोरोपंत-कर्णपर्व-अध्याय ४९ पहा) या प्रसंगासही अनुसरून आहे ! अत्यंत त्रास झाल्यावर धर्मज्ञांची सदिच्छा कशी लटपटते याचें हें उत्कृष्ट उदाहरण आहे. १८. निर्दयत्व. १९. साधु

म्हणती, 'हाणा, मारा, पाडा [1]ह्या, [2]काय पाहतां तोंडा ? ।
कोंडा, प्राणव्यसनीं बाळ बुडो, [3]कर्दमीं जसा घोंडा.' ॥ १२५
तो [4]खड्ग-चर्म घेउनि [5]अवलंबी वीरनायक [6]विहाय; ।
सु. संकट पडतां, सोडुनि धैर्यासि, म्हणेल काय कवि 'हाय !'.॥१२६
पाहुनि गरुडा गगनीं धैर्य जसें काय [8]काद्रवेयांचें, ।
तैसेंचि [9]भगवदनुजातनुजा कुरुनायका ! द्रवे [10]यांचें. ॥ १२७
केवळ [11]हृदयीं भ्याले जे जे त्या [12]पविपरीस गाढाला, ।
शिरले [13]रथातळीं, मग घेतील शिरीं न काय गा ! ढाला ? ॥१२८
खड्ग[15] क्षितिवरि पाडी द्रोण च्छेदूनियां [14]नवें [15]त्सरुस; ।
[16]चित्तीं म्हणे, 'न मज, तुज 'धन्य' त्रिभुवन म्हणो, न वत्स ! [17]हंस.

म्हणजे प्रपंचांतून विरक्त झालेले महंत मात्र हें निष्कारुण्य व ही अधर्मशीलता पाहून डोळे झांकिते झाले ! काय करतील बिचारे ?

१. अभिमन्यूला. 'ध्या' असा पाठभेद. २. तोंडाकडे काय पहात बसलांत ? स्वस्थ कां ? काय एका बाळावर गर्दी ही ? **उपमा**ही अधर्मशालिनीच आहे ! ३. चिखलांत. ४. तलवार व ढाल. ५. आश्रय करी. अभिमन्यूनें आकाशांत उडी मारिली-असा भाव. ६. आकाश "या पद्यांत 'व' 'स' आणि 'क' या वर्णांच्या आवृत्तीनें **छेकानुप्रास**, 'य-कविहाय' या क्रमोक्त वर्णावृत्तीनें **अंत्ययमक**; व उत्तरार्धांत **अर्थान्तरन्यास**; या अलंकारांचें स्वतंत्रपणानें मेलन झालें आहे" [अलंकारप्रकाश]. ७. ज्ञाता. म्हटलें आहे:-'स एव धन्यो विपदि स्वरूपं यो न मुंचति !' ८. सर्पांचें. कद्रूचे मुलगे म्हणून काद्रवेय. ९. भगवत्+अनुजा+तनु+जा=भगवंताच्या कनिष्ठ भगिनीच्या पुत्रास (अभिमन्यूस) [पाहून.] १०. कुरुसैन्याचें धैर्य पातळ झालें. **उपमा** सरस आहे. ११. पूर्णपणानें जे भ्याले. १२. वज्रापेक्षांही बळकट जो अभिमन्यूचा खड्ग त्याला. **व्यतिरेक** अलंकार. १३. आपल्यावर असिघात येऊं नये म्हणून रथाच्या खालीं लपून बसले. मग दुसऱ्यांनीं आपल्या डोक्यावर ढाला घेतल्या त्यांत काय आश्चर्य आहे ? येथें **भयानक** रस आहे. सैनिकांची कोण दाणादाण झाली याचें थोडक्यांत पण मार्मिक रीतीनें पंतांनीं वर्णन केलें आहे. १४. नवीन. १५. शस्त्राची मूठ तिला, परजाला. 'त्सरुः खड्गादि मुष्टौ स्यात्' इत्यमरः. १६. द्रोणाच्या मनांत हें अधर्म युद्ध कसें खात होतें त्याचें दिग्दर्शन पंतांनीं उत्तम केलें आहे. एकट्या बाळाला सहा महारथ्यांनीं मारला यांत धन्यता त्यांच्याकडे न येतां अभिमन्यूकडेच जाते. **व्यंजनेनें** अधर्म युद्ध आहे असें सुचविण्याची पंतांची खुबी लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे. १७. न हस, हसूं नको.

कर्ण करी चर्मा[1]चे, श्रितविघ्ना[2]चे जसे गणप, टुकडे; ।
तरि पाहोंहि न शकले[3] वीर विशस्त्राहि[4] त्या रणपटु[5]कडे. ॥ १३०
कार्ष्णि म्हणे, 'पळ[6] इकडे पाहुत सज्जन, न पत्त्रिकेतु[7]कडे; ।
चर्मापरि[8] लिहिले. कीं वपुचे मज्जननपत्रिके[9] ! तुकडे ?' ॥ १३१
शत्रुमुखींचें[10], क्षितिवरि उतरुनि घेऊनि चक्र, पाणि हरी[11] ! ।
भासे साक्षात् शिरला असुरसमूहांत चक्रपाणि[12] हरी ! ॥ १३२
वारिति जसें प्रयत्नें एकमतें सर्व [13]संत परचक्रें[14]; ।
कर्णद्रोणादि तसें खंडिति बहु तें स्वअंतपर[15] चक्र. ॥ १३३
मग भेकमूषकां[16] [17]जें क्षुधितक्रोधी महाभुजग दे, तें । *

---

१. ढालीचे तुकडे. २. आपल्या आश्रितांच्या (भक्तांच्या) विघ्नांचे तुकडे. 'त्रुट'पासून 'तुकडा' असा शब्द झाला आहे काय ? गणपतीचें नांवच विघ्नराज, विघ्नहर्ता, असें आहे. 'टुकडा' हें अपभ्रष्ट स्वरूप आहे. येथील **उपमा** स्पष्टच आहे. ३. अशा विशस्त्र झालेल्या अभिमन्यूकडे नुसतें ढुंकून पाहण्याची कोणाचीही छाती झाली नाहीं ! काय रणधुरंधरत्व हें ? अशा धनुर्धरापुढें युद्धामध्यें टिकण्याची वार्ता तरी कशाला हवी ? हें सुचविलें आहे. ४. ज्याच्यापाशीं (स्वसंरक्षणार्थ) शस्त्र नाहीं त्याला. ५. युद्धकुशलाकडे. ६. क्षणभर. सज्जन=साधुजन, पापभीरुजन. ७. गरुड आहे ध्वजस्तंभीं अशा कृष्णाकडे. ८. शरीराचे ढालीसारखेच. ९. मत्+जनन+पत्रिके=माझ्या जन्मपत्रिके ! जन्मपत्रिका अचेतन असून, ती सचेतन आहे असें समजून तीस संबोधिलें आहे. म्हणून येथें **'चेतनधर्मारोपोक्ति'** नामक अलंकार आहे. जन्मकालीन तिथिनक्षत्रादिकांच्या आधारावर जी कुंडली तयार करितात तीस 'जन्मकुंडली' म्हणतात. कुंडल्या करण्याचे नियम '**जातक**शास्त्रां'त सांपडतात. '**भृगुसंहिता**'नामक ग्रंथांत प्रत्येक मनुष्याची जन्मकुंडली व फल हीं सांगितलीं आहेत असें म्हणतात. जन्मपत्रिकेंत लिहिलेलें खरें असतें अशी **पं**तांची समजूत होती, असें वाटतें. १०. खालीं उतरून चक्र घेऊन शत्रूचे मुखावरचें पाणी हरण करी. तोंडावरच्या पाण्यालाच 'अब्रु' असें फारशी भाषेंत म्हणतात. ११. पळवी, हरण करी. १२. चक्र (चाक, शस्त्रविशेष) आहे हातांत ज्याच्या. येथील **उत्प्रेक्षा** व 'चक्रपाणी'मधील खुबी हीं वीररसाला उत्तेजन देत नाहींत असें कोण म्हणेल ? १३. या गीतींत **पं**तांनीं जी उपमा दिली आहे ती तत्कालीन उत्कृष्ट राजकीयविचारसरणीचें निदर्शन करिते. १४. शत्रूचें सैन्य. १५. आपल्या नाशाविषयीं तत्पर असणारें चाक. 'स्वतःचा अंत करणारें' हा शब्द **पं**तांनीं साभिप्राय तर लिहिला नसेल ना ? १६. बेडूक व उंदीर यांस. १७. जें दुःसह भय. फार दिवस खायला न मिळालेला व म्हणून चवताळलेला मोठा नाग. (भुजेन=कौटिल्येन गच्छतीति भुजगः.)

दुःसह भय [1]आम्हां दे धरुनि करीं तो [2]महाभुज गदेतें. ॥ १३४
[3]तेणें, हय सूत वधुनि, अश्वत्थाम्याप्रति [4]प्रभावातें ।
दावुनि, हरिली [5]कौरवदीप्ति, जशी [6]दीपकप्रभा वातें. ॥ १३५
पाहुनि संमुख जेव्हां धांवे सौभद्र सिंहसा रागें, ।
त्यजुनि [7]रथोपस्थ सरे गुरुनंदन तीन पाउलें मागें.[8] ॥ १३६
'खा माते ! देवि ! गदे ! [9]धर्माहितमहिषकालिके ! यातें,' ।
ऐसें म्हणोनि मारी तो [10]सुबलतनूज कालिकेयातें. ॥ १३७
गांधार [11]सप्तसप्तति, [12]बौह्यवसातीयरथ दहा मथिले; ।
कैकेय वीर सप्त, द्विप दश, [13]हे मुख्य मुख्य मीं कथिले. ॥ १३८
केला चूर्ण सहयरथ दुःशासनसूनुचा [14]गदा-घातें; ।
साहे न परबलातें जैसा [15]हरिनाममनु [16]गदाघातें. ॥ १३९
बाहुप्रतापचरितें दावी तो [17]पार्थकायज [17]गदी [18]शें; ।
वाटे [19]वर्तविला यम [20]सामय कोपार्थ काय जगदीशें ? ॥ १४०
त्या सौभद्रावरि [21]बलसा गरगरगर गदेसि फिरवीत ।

---

१. कौरवांना. भेक व मूषकांस सर्पाचें अनिवार्य भय वाटतें. ह्या **उपमेनें** संजयानें कौरवांस किती लघुत्व दिलें आहे ? २. पराक्रमी, आजानुबाहु. ३. अभिमन्यूनें. ४. सामर्थ्याला. ५. कौरवतेज. ६. ही वर्ति-दीपक **उपमा** समर्पक होय. लहान दीप म्हणून दीपक. ७. रथ+उपस्थ=रथीं बसण्याचें जें रथांतील उच्चासन त्याच्या आसपास जी सखल जागा असते ती. ८. अश्वत्थामा परत फिरला ! ९. धर्माला अहितरूप जो हा महिषासुर याला तूं कालिके देवि. १०. गांधारदेशाचा राजा. ११. सत्याहत्तर. १२. मुळांत 'वसातीयरथ' असें आहे. वसाती म्हणून कौरवपक्षीय योद्धा अभिमन्यूस मारीन अशी प्रतिज्ञा करून आला होता, पण बिचारा आपणच मरून गेला ! १३. ही ठळक मंडळीची यादी. किरकोळ खुर्दाचा काय हिशोब सांगावा ? फार संहार केला असें **पर्यायोक्तीनें** सांगितलें आहे. १४. घोड्यांसुद्धां रथांचें चूर्ण करणारा गदेचा रामटोला किती जोराचा असला पाहिजे ? १५. हरिनाममंत्र. मंत्रानें रोग दूर होतात अशी समजूत अद्यापि आहेच. हरिमंत्राला रोग व पाप सहन होत नाहींत. १६. रोगरूप पापातें. १७. पार्थकुमार व गदाधारी अभिमन्यु. १८. शेंकडों चरितें. १९ उत्पन्न केला. २०. स+आमय=रोगांसह. 'वाटे वर्तविला यमसा यमकोपार्थं काय जगदीशें' असाही पाठ आढळतो. २१. बलराम. त्याला गदापति म्हणत. कारण गदायुद्धांत याचा हात धरणारा कोणी नव्हता. भीम व

दुःशासनसुत धांवे निजभुजभुजगप्रताप मिरवीत. ॥ १४१

युद्धचमत्कार [1]रुचिर, [2]सुचिर, प्रकटुनि [3]महागद भ्राते ।
[4]अन्योन्यकृताघातें बा ! मूर्छा पावले [5]अदभ्रा ते. ॥ १४२

आधीं [6]उठोनि, उठतां सौभद्रशिरीं प्रभो ! गदा घाली; ।
[7]विवश करी ती [8]दुष्परिहार्या जेंवि [9]प्रभोगदाघाली. ॥ १४३

पडली जसी कराया [10]प्रेक्षकसुरविरस [11]मस्तकोपरि ती; ।
भूवरि सौभद्रतनुहि ओकुनि सरुधिरसमस्तकोप [12]रिती. ॥ १४४

आधीं श्रम बहु झाला होता, तो त्यांतही [13]असावध हो !. ।
केला दौःशासनिनें धर्म, नय, त्यजुनियां [14]असा वध हो ! ॥ १४५

प्रेक्षक, सुर, मुनि, सज्जन, बहु हळहळले [15]किरीटि-सुत-पातें; ।

दुर्योधन हे बलरामाचे शिष्य. बलसागर=बलसमुद्र येवढें पद काढल्यास तें दौःशासनीचें विशेषण करावें. येथील अंतर्बाह्य यमकचमत्कार व अर्थचमत्कार पंतांच्या कवित्वाला भूषित करितात. गदा फिरवित असतां भुजाचें सर्पाकृति भ्रमण किती खुबीनें आणिलें आहे ? 'त्या सौभद्रावरि खलसा' असा अन्यपाठ.

१. तज्ज्ञाचें मनोहरण करणारे. २. बराच कालपर्यंत. ३. गदानिपुण भ्राते (भाऊ भाऊ). 'मोठ्या गदा हातांत असणारे' असाही अर्थ होईल. ४ परस्परांनी एकमेकांस केलेल्या प्रहारानें. ५. बहुत बळकट. ६. दौःशासनी आधीं सावध होऊन त्यानें सौभद्र उठत असतां त्याच्या डोक्यावर गदा मारिली. ७. विगतवश, मरणासन्न. ८. परिहार करण्यास अशक्य. ९. प्रभोगद (पुष्कळ भोग देणारी)+अघ+आली=पातकपंक्ती. १०. युद्धचमत्कार पहाणारे जे देव त्यांला विरस करण्यासाठीं. ११. अभिमन्यूच्या मस्तकावर ती पडली; त्याच वेळीं सरुधिर (रुधिरासह, रक्तासह) समस्त कोप (सगळा क्रोध) ओकून टाकून रिती (रिकामी) झालेली सुभद्रासुताची तनुही भूमीवर पडली ! येथें **सहोक्ति व दीपक** अलंकार असून त्या योगें काव्यास सरसत्व आलें आहे. प्रेक्षक देवांचा विरस झाला व आपलाही होतो, कारण काव्य सरस व परिणामकारक झालें आहे. १२. रिक्त, रिकामी. १३. भानरहित असा. १४. अशा अधर्मी व अन्याय्य रीतीनें. येथें **समुच्चया**लंकार आहे. 'होकार'-द्वयानें व एकंदरीनेंही पंतांनीं संजयाचें बोलणें शोकरसपरिपूर्ण केलें आहे. १५. अर्जुनाचा मुलगा पडला म्हणून. शूर सरदार अधर्मानें मारला गेला म्हणून सर्वांसच वाईट वाटलें. ज्यांना ब्रह्मज्ञान पूर्ण झालें आहे ते हळहळले यांत आश्चर्य नाहीं. आत्मा अमर आहे, असें समजणारा नारदादि तपोगण हाही ढळढळां रडला ! हा **विरोध** अलंकार आहे.

रडला पाहुनि सत्यब्रह्मज्ञहि [1]नारदादि सु-तपा तें. ॥ १४६
ज्यां[2]चा संकल्प, प्रियसुतशोकें जिष्णुचे [3]असु खपावे, ।
ते तव पुत्रचि झाले [4]मुदित, इतर [5]अहितही अ-सुख पावे. ॥ १४७
धर्म स्वभटांसि म्हणे, '[6]वृत्ति परमदुर्लभा असी मरणीं; ।
कां रडतां ? सौभद्रें वत्सें यश जोडिलें [7]असीम रणीं.' ॥ १४८
[8]चित्तींच पळांत म्हणे शतदां, बाहेर न [9]बहुवस, '[10]हाय !' ।
समजावुनि कटकांतें [11]धैर्यें शिबिरासि जाय [12]ससहाय. ॥ १४९
कवच वि[13]कळ होउं न दे धर्मासि, जसा तुरंगमा तंग ।
सुतशोका [14]शिबिरीं भी, जैसा सिंहा [15]कुरंग, [16]मातंग. ॥ १५०

अध्याय चवथा.

(चतुर्थदिनयुद्ध.)

धर्म म्हणे, 'हा ! हा ! म्यां [17]मंदें [18]दांडुनि कुमार मारविला; ।

---

१. नारदादि तापस. २. ज्या तुझ्या पुत्राचा संकल्प असा कीं. ३. प्राण. ४. आनंदित. ५. शत्रुही असुख (दुःख) पावले. विरोधालंकार. ६. जीवयात्रा. यापेक्षां जन्माचें सार्थक्य जास्ती काय होणार ! 'रमणी' असा पाठभेद. ७. अपार. मुळांत वर्णन फार आहे. ८. धर्मराज लोकांस उपदेश वरच्यासारखा करीत होते, पण स्वतः मनामध्यें 'हाय ! हाय !' ची जपमाळ घेतलेली ! सारांश, 'परोपदेशे पांडित्यम्' हा इतर ठिकाणीं लागू पडणारा न्याय येथें शोकातिशय दाखविण्यास उत्तम उपयोगीं पडतो. ९. पुष्कळ वेळ. १०. चित्तामध्यें पळांत शेंकडों वेळां 'हाय ! हाय !' म्हणे, परंतु बाहेर न म्हणे. ११. अशा प्रसंगीं द्रौपदी, सुभद्रा, उत्तरा इत्यादि स्त्रियांकडे जाण्याला मोठेंच धैर्य पाहिजे. १२. आपल्या इष्टमित्रांसह व सैन्यांसह. १३. अंगांत कवच होतें म्हणूनच धर्माला वैकल्य प्राप्त झालें नाहीं. पुढील उपमा व्यावहारिक आहे. अगावर रणाचा पोषाख होता तोंपर्यंत धर्मानें धीर धरिला. पण शिबिरांत गेल्यावर तो सुतशोकाला भ्याला. कसा ? तर सिंहाला कुरंग किंवा हत्ती भितो तसा. 'सुतशोका वश शिबिरीं' असा एका प्रतींत पाठ आहे. हाही वाईट नाहीं. आदर्शप्रतींत व तेंडुलकरांच्या आवृत्तींत 'शोकाऽवश' असा पाठ आहे तो मात्र प्रशस्त दिसत नाहीं. द्रोणाचार्यांच्या सैन्यापत्याचा तृतीय दिवस येथें संपला. येथपर्यंत मुळांतील पन्नास अध्यायांतील कथानक आलें आहे. १४. शिबिर=सेनानिवेश, सैन्याचा तळ, डेरा. १५. मृग, हरिण. १६. हत्ती. १७. मूर्खानें, जडबुद्धीनें. १८. जाणून बुजून.

[1]बहुवीरसूत दिसल्या अधिक सुभद्रा, उमा, रमा, [2]रविला. १
अर्जुनकृष्णसुभद्रा[3]कृष्णाकुंतींस काय [4]समजावूं ? ।
[5]काळ न भेटे कैसा ? [6]तद्वदनीं [7]पुत्रकायसम जावूं ? ॥ २

अद्यापि उत्तरेचें मुख [8]पीत असेल [9]बहळ [10]हळदीनें. ।
[11]म्यां, जेंवि [12]लब्धसन्निधिनाशें, करिजेल न हळहळ, [13]दीनें. ॥ ३

तुज उत्तरे ! मुलि ! दिल्हा म्यां कापायास मान विश्वास; ।
कलिकाल काय बुडविल, मज बहुपापासमान [14]विश्वास ? ॥ ४
कथिलें कसें असें मज [15]धर्मो ! '[16]करवाल काढ [17]कलहातें. ।

---

१. वीरमाता पुष्कळ आहेत त्यांत. २. सूर्याला तीनच वीरमाता श्रेष्ठतम दिसल्या. अभिमन्युमाता, षडाननमाता व प्रद्युम्नमाता ह्या तीन वीरसू होत. हे तिघेही बालवीर होते. षडाननानें तारकासुर व प्रद्युम्नानें शंबरासुर यांस लहानपणींच मारलें. अभिमन्यूचें वृत्त तर आपण वाचलेंच आहे. 'सूर्याला' आढळली नाहीं, असें म्हणण्याचें कारण सूर्य सर्वसाक्षी आहे. तो भगवंताच्या नेत्रापासून उत्पन्न झाला व त्यास सृष्टींतील सूक्ष्म-स्थूल, जड-अजड वस्तुमात्र दिसतें अशी समजूत आहे. 'रवि' शब्दाची योजना साभिप्राय आहे म्हणून 'परिकरांकुरा' लंकार. ३. कृष्णा=द्रौपदी. ४. काय सांगूं ? कशी समजी करूं ? त्यांचा शोक कसा घालवूं ? इतरांचें समाधान केलें पण यांचें कसें करूं ? समाधान करण्याचें काम घरच्या कर्त्या पुरुषाकडे असतें. ५. काळही मला भेटत नाहीं कसा तो पहा, मला मरणही येत नाहीं ! ६. काळाच्या तोंडांत. ७. पुत्र अभिमन्यूच्या देहाप्रमाणें मला जातां येईल ? पुत्राबरोबर मलाही मरण येईल ? ८. पिंवळें. ९. पुष्कळ. १०. लग्नसमयीं लावलेली हळदही अजून बिचारीच्या तोंडावरची गेली नसेल ! ११. म्यां हळहळ (शोक) न करिजेल (न करावा). १२. प्राप्त झालेल्या उत्तम ठेव्याच्या नाशामुळें. 'लब्धसंनिधनाशें' असें पाठांतर. १३. द्रव्यहीनानें, भिकाऱ्यानें. १४. जगताला कलियुग माझ्या पाप्याइतकें काय बुडवील ? कलियुगांत पातक होणार नाहीं इतकें पातक मीं तुला बुडवून केलें आहे. पापाचा भार पृथ्वीला सहन होत नाहीं व ती बुडते हें प्रसिद्धच आहे. १५. ह्या शब्दावर 'क्षत्रधर्मा' अशी खुद्द पंतांच्या हातचीच टीप आहे. हें भाषण क्षत्रधर्मास उद्देशून आहे. **'चेतनधर्मारोपोक्ति'**-अलंकार. (मागें पृष्ठ ६४ टीप ९ पहा). १६. तरवार. १७. युद्धासाठीं तरवार उपस असें कसें सांगितलें ? युद्धाचा परिणाम पहा कीं कुलाची वृद्धि करणारा, गुणवान्, सुख देणारा असा बालक मात्र मी मृत्युमुखांत ढकलिला. ज्या कृष्णादिकांनीं क्षत्रियांच्या धर्मास अनुसरून युद्ध कर म्हणून धर्मास भर दिली, त्यांच्या वाक्याविषयीं धर्मास संशय उत्पन्न झाला आहे. या पद्यांत 'क'ची गर्दी, अकरा अक्षरी

मृत्युमुखीं कुलकरगुणशर्माकरबालका, ढकल हातें.' ॥ ५
धर्माच्या सुतशोका शमवाया, ये महातपा व्यास; ।
ज्या जोडिले त्रिभुवनें प्रभुच्या जैसेच हात पाव्यास. ॥ ६
तो मुनि म्हणे, 'श्रुतिस्मृतिशास्त्रज्ञा ! पांडवा ! नकोचि रडूं; ।
शोकभरें प्राकृतसा बा ! कृतसाफल्य तूं नको चिरडूं. ॥ ७
गेला उत्तमगतिला, पुरुषोत्तम तो जगीं असामान्य; ।
शोच्य नव्हे, बा ! धर्मा ! पुत्र असावा कुलीं असा मान्य. ॥ ८
मृत्यु हरितसे समयीं अमरांसहि; कवण मृत्युला चुकवी ? ।
ऐसें जाणुनि तत्व, व्यसनांत न मोह पावती सु-कवी.' ॥ ९
धर्म म्हणे, 'हो ! गुरुजी ! मजला मृत्युस्वरूप कळवा हो ! ।

यमक व धर्माच्या निश्चित मनाला संशयाचा वेढा इत्यादिकांनीं बरीच मनोहरता आली आहे. एका हेतूनें कार्यास आरंभ केला असून परिणाम भयंकर झाला म्हणून **विषम** अलंकार आहे.

१. कुलवृद्धि करणाऱ्या, सद्गुण व सुख यांची खाणच अशा लहान मुलास. २. मोठा तपस्वी. ३. त्रिभुवनें (त्रैलोक्यानें) ज्या हात जोडिले; कां ? तर तो जैसा प्रभूचा पावाच होता. (म्हणजे अठरा पुराणें व तितकींच उपपुराणें रचून त्यानें प्रभूच्या अभिनव गुणांची अद्भुत लीला वर्णन करून तो प्रभूचा पावाच झाला होता.) **उत्प्रेक्षा** आहे. अगर प्रभूच्या पाव्यावरील गाण्यास भुलून सर्व त्रिभुवन हात जोडून उभें राहिलें असें भागवतांत सांगितलें आहे. तसेंच ज्याचा पुराणध्वनि ऐकून सर्व त्रिभुवन हस्त जोडून नम्र झालें. **उपमा** आहे. ४. मुरलीस. ५. हें विशेषण सहेतुक आहे. शोक करूं नये असें उपनिषदांत व गीतास्मृतींत सांगितलें आहे. म्हणून **परिकर** अलंकार. ६. सामान्य पुरुषासारखा. Like a layman. ७. ज्यानें आपल्या जन्माचें सार्थक्य केलें आहे असा. ८. युद्धामध्यें मरण पावलेला पुरुष स्वर्गास जातो असें भगवद्गीतेंत सांगितलें आहे. 'स्वर्गद्वारमपावृतं' (श्लो० ३२ अ० २) व 'हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं' (श्लो० ३७ अ० २) पहा. ९. अभिमन्यु हा अलौकिक पुरुषश्रेष्ठ होय. १०. शोक करण्यास योग्य. ११. मान देण्यास योग्य, माननीय. 'स जातो येन जातेन याति वंशः समुन्नतिम्' ह्याचाही अर्थ हाच आहे. १२. वेळ भरली म्हणजे अमरांसही मृत्यु येतो. हा **विरोध** होय. अमर म्हणजे पुष्कळ दिवस जगणारे इतकाच खरा अर्थ. एके ठिकाणीं म्हटलें आहे, 'मातुलो यस्य गोविंदः पिता यस्य धनंजयः । सोऽपि कालवशं प्राप्तः कालो हि दुरतिक्रमः ॥.' तसेंच 'पुरंदरसहस्राणि चक्रवर्तिशतानि च । निर्वापितानि कालेन प्रदीपा इव वायुना ॥.' १३. शोकसंकटांत. १४. शहाणे. १५. सांगा.

या तमावरि तुमची [1]सूक्तिसुधासिंधु एक पळ वाहो.' ॥ १०
व्यास म्हणे, 'कथितों मी [2]इतिहास [3]पवित्र तुज पवित्रास; ।
बाधों न दे बुधा [4]जो शोक, महेंद्रा जसा [5]पवि [6]त्रास. ॥ ११
होता [7]कृतीं अकंपन नृप तो, [8]हरि गांठिजे जसा हरिंनीं, ।
[9]तन्नंदन [10]हरिसमबल 'हरि'नामा मारिला रणीं आरिंनीं. ॥ १२
शोकार्त तूं जसा मज [11]पुससि, अकंपनहि नारदा नमुनी; ।
मृत्युस्वरूप सांगुनि करि [12]त्यातें [13]मोहपारदान मुनी. ॥ १३
[14]जें तूं मज पुससि, पुसे तेंचि अकंपनहि नारदा नमुनी; ।
मृत्युस्वरूपकथनें त्यासि करी मोहपारदान मुनी. ॥ १४
पूर्वी, [15]बहुभारार्ता ऐसें चतुरानना धरा विनवी, ।
'[16]वांटे भय, [17]दाटे, नच आटे, किति म्यां प्रजा धरावि नवी ?' १५
न सुचे युक्ति [18]चतुर्विधभूतग्रामासि संहरायातें; ।

---

१. सु+उक्ति+सुधा+सिंधु=सुवचनामृतरूपी महानदी. रूपक आहे. २. 'इति ह आस' (याप्रमाणें होतें) असें सांगणारा तो इतिहास. ३. पुण्यप्रद. पवित्रास=शुद्धास. ४. इतिहास. ज्याच्या श्रवणानें समंजस पुरुषास शोकाचा ताप होत नाहीं तो. ५. वज्र. ६. (शत्रूंपासून) ताप. ७. कृतयुगीं. याला सत्ययुगही म्हणतात. ८. सिंह. ९. अकंपनाचा पुत्र. १०. इंद्र किंवा नारायण यांसारखा बलवान्. ११. या क्रियेचा अन्वय मध्यमणिन्यायानें 'तूं' व 'अकंपन' ह्यांकडे आहे. १२. 'ऐसे' असें पाठांतर. १३. मोहनदीच्या दुसऱ्या तीराला नेण्याचें दान मुनी करी (त्याचा शोक नाहींसा करी). १४. गीति १३ व १४ समानार्थक आहेत. पंतांनीं दोन गीति केल्या व त्यांतील एक कायम करणें त्यांस इष्ट असेल. पण त्यांपैकीं नापसंत असलेली गीति पंत खोडून टाकावयास विसरले, असें दिसतें. यावरून मनासारखी गीति होईपर्यंत पंत दोन दोन तीन तीन प्रयत्न करीत असत, असें दिसतें. १३ वी गीति त्यांस पसंत पडली असती. १५. भारपीडित अशी पृथ्वी. १६. हें पृथ्वीचें बोलणें आहे. जिवंत असणारे व नवीन उत्पन्न होणारे प्राणी यांचा भार कसा सहन करावा अशी पृथ्वीस चिंता पडून ती ब्रह्मदेवास शरण गेली. ही कल्पना कांहींशी वस्तुस्थितीस अनुसरून व म्हणूनच विशेष सरस आहे. प्रथमतः मनुष्य अमर होता असें ख्रिस्तीशास्त्राचेंही मत आहे. १७. प्रजा जास्त होत आहे, पण मरत नाहीं; आणि नवीन उत्पन्न होतच आहे. म्हणून माझी भीति जास्त वाढत आहे; कमी होत नाहीं. १८. चार प्रकारचे (म्हणजे उद्भिज, स्वेदज, अंडज, जारज) प्राणिसमूह आहेत.

कोपे ब्रह्मा, जाणों त्या भूतांचेंचि [1]अंह, राया ! [2]तें. ॥ १६
तेव्हां विधिच्या रोमच्छिद्र-वदन-नयन-कर्ण-नाकांनीं ।
[3]वमिला वन्हि, अशा या आइकतों कोपवर्णना कानीं. ॥ १७
[4]वनवन्हि तृणासि, तसा भूतग्रामासि वन्हि तो [5]कवळी; ।
रुद्र जगत्क्षयसमर्थी धांवुनि ये [6]पद्मयोनिच्या जवळी. ॥ १८
रुद्र प्रभुला प्रार्थुनि लोकक्षयकारि [7]तेजँ [8]आवरवी. ।
[9]इतर किती विनवाया ? तेजस्वीही धरी न [10]आंव रवी. ॥ १९
प्रार्थुनियां आवरवी जेव्हां कोपानलासि [11]मदनारी ।
प्रकटे रक्ता, कृष्णा, पिंगा, [12]सुरदृष्टिविभ्रमद नारी. ॥ २०
तो [13]प्रभु सांगे, ठेवुनि 'मृत्यु' असें नाम, तेंचि काम तिला, ।
त्या [14]उग्रनामकार्यश्रवणें होइल न खेद कां मतिला ? ॥ २१
मृत्यु म्हणे, 'प्रभुजी ! हें काय ? बरें तेंचि[15] कार्य करवा जी ! ।
मु. योजावा जन सुपथीं [16]धीरें, वीरेंहि कार्यकर [17]वाजी.' ॥ २२
ऐसें म्हणुनि रडे, [18]कीं [19]गुरुहि सुशीलासि सोडवी पाणी ! ।

---

१. पातक. २. त्या ब्रह्मदेवाचें कोपणें म्हणजे प्राण्यांचें पापच जाणों ! **उत्प्रेक्षा.** ३. वन्हिज्वाळा इतक्या द्वारांतून बाहेर आल्या. मुळांत आकाशांतून ज्वाला निघाली असें आहे. ४. दावानल. ५. गिळून टाकी. कवल=ग्रास. ६. पद्मयोनि=ब्रह्मा. ७. तो अग्नि. ८. संकोच करवी. ९. इतरांची काय कथा ? प्रत्यक्ष तेजस्वी सूर्याचें सुद्धां धैर्य खचलें. १०. धैर्य, दुरूप. ११. शिव. शंकरांनीं क्रोधाग्नीचें शमन केलें हें योग्यच ! कारण क्रोध व अग्नि हे उभयतां त्यांच्याच ताब्यांतले ! १२. देवांचे डोळे फिरविणारी, त्यांस भ्रम उत्पन्न करणारी. पिंगा=पिंगट रंगाची, पिंवळसर. **भयानक** रस आहे. १३. ब्रह्मदेव. १४. भयंकर नांव व काम ऐकून त्या मृत्यूलाच खेद उत्पन्न झाला. १५. चांगलें तेंच कार्य करावयास सांगा. १६. शहाण्या माणसानें मनुष्यास चांगल्या मार्गाचें काम सांगावें, चांगल्या मार्गास लावावें. कार्य करणाऱ्या, कार्यक्षम वाजीला वीर पुरुष असला तरी त्यानें चांगल्याच मार्गानें न्यावें. कार्यकुशल आहे म्हणून भलत्या मार्गानें जावयास लावूं नये. **उपमा** सुंदर व लौकिक प्रसंगास अनुसरून आहे. १७. घोडा. १८. कारण. १९. चांगल्या मार्गास नेणारा सद्गुरु सुद्धां सौजन्यावर पाणी सोडावयास लावित आहे. **विरोध** असून **लोकोक्ति** आहे. पाणी सोडल्यानंतर दिलेल्या वस्तूवर आपला हक्क राहत नाहीं, हा दानप्रकार लोकविश्रुतच आहे.

प्रभु अश्रुबिंदु [1]तीचे न गळों दे, क्षिप्र ओढवी [2]पाणी. ॥ २३
[3]द्रुहिण म्हणे, 'मृत्यो ! तूं माझ्या होशील मान्य उक्तीतें; ।
कीं जन्मलीस, योजित असतां [4]संहारहेतुयुक्तीतें. ॥ २४
'लघु, गुरु,' असें न [5]म्हणतां, ओढुनि घे जीव सर्व सरसकट. ।
जैसा [6]गंधगजाचा [7]मोहुनि हरितो अलींस सरस कट. ॥ २५
माझ्या वरें तुला अघ कोणीहि न लावितील [8]अनघेतें[9]". ।
ऐसें बहु समजावी, परि न तिचें क्रूरकार्य मन घे तें. ॥ २६
'[10]करितें [11]आज्ञा' ऐसें स्पष्ट न वदतांहि देवें' हर्षविला. ।
तो [12]पूर्वदग्धजीवांवरि [13]करुणामृतपयोद वर्षविला. ॥ २७
एकें चरणेंचि उभी, धेनुकनामाश्रमीं नृपा ! होती. ।
तप एकवीस [14]पद्में तपली; गमली खरी [15]कृपा हो ! ती. ॥ २८
त्यावरि [16]चवदा पद्में पुण्यारण्यांत ही सती [17]तपली. ।
मग [18]अयुत पद्म [19]मृगसहचर्या करितां पितामहा [20]जपली. ॥ २९

---

१. मृत्यूस स्त्री केलें आहे हें लोकसमजुतीच्या विरुद्ध आहे. या मृत्यूचे अश्रु गळूं दिले नाहींत, याचें कारण अश्रूंपासून कांहीं अनर्थ उत्पन्न होईल म्हणून तर प्रभूनें हात आडवा आणला नसेल ना ? २. हात. झटपट हात पुढें करी–असा भाव. ३. ब्रह्मदेव. ४. नाश करावयाच्या कारणाची युक्ति. कारणाप्रमाणें कार्य होतें असा अनुभव आहेच. तेव्हां तुला हें काम पत्करिलें पाहिजे–असा भाव. ५. असा विचार न करितां, भेदाभेद न ठेवितां. ६. मदोन्मत्त हत्तीचा. मदाचा वास कित्येक प्राण्यांस प्रिय असतो. **उपमा** आहे. शहाणे, वेडे सर्व प्राणी ओढले जातात हें दाखवावयाचें आहे. ७. माजलेल्या हत्तीचें रसयुक्त गंडस्थळ. ८. 'अनघेतें'=(निष्पापेला) तुला. ९. 'अनघे ! तें' असें पाठांतर. तें अघ=तें पाप तुझ्या माथ्यावर कोणी लादणार नाहीं. १०. आज्ञा मान्य करितें. ११. ब्रह्मदेव. १२. पूर्वीच जळून खाक झालेल्या जीवांवर ती ब्रह्मदेवाची कृपा ही एक पर्जन्यवृष्टीच झाली ! **रूपक** आहे. सरसकट जीवांस मारून टाक अशा आज्ञेनें मृत्यूच्या जबड्यांत ब्रह्मदेवाच्या ठरावाप्रमाणें शिरलेले जीव असा **पंतांस** अर्थ इष्ट होता काय ? १३. कृपामेघ. १४. एक संख्या आहे. 'शतकोटी' असें **भारतीय** टीकेंत म्हटलें आहे. १५. मूर्तिमंत दयाच ती वाटली. संहाराचें काम आपल्यास नसावें येवढ्यासाठीं मृत्यूदेवतेची ही तपश्चर्या ! **उत्प्रेक्षा आहे.** १६. 'चौदा वर्षें' असें पाठांतर. १७. तप करिती झाली. १८. दशसहस्र पद्म वर्षें. **तेंडुलकर** यांच्या आवृत्तींत 'समा' असा पाठ सुचविला आहे तो मुळास धरून नाहीं. १९. मृगांसहवर्तमान संचार. २०. [ब्रह्मदेवाच्या नांवाचा तिनें] जप केला.

जीचें अतिशीतोदक त्या [1]नंदेमाजि ती उभी हर्षें ।
होती, [2]निजनियमातें संरक्षुनियां, [3]अशीतिशत वर्षें. ॥ ३०
तितुकेंचि [4]कौशिकीच्या तीरांत, तसेंचि [5]पंचगंगांत, ।
[6]वेतसकांतहि तपली, [7]जों ये केवल कृशत्व अंगांत. ॥ ३१.
तपली [8]तुहिननगीं, [9]सुरयजनस्थानीं निखर्व[10]वत्सर [11]ती; ।
[12]तच्चित्तरति तपीं बहु, जशि जननीच्या स्तनींच [13]वत्सरती. ॥ ३२
गंगातट, मेरु, मलय, पुष्कर, गोकर्ण, [14]नैमिषवनांत ।
तपली, धरिले ते, जे उग्र नियम वाटले प्रिय मनांत. ॥ ३३
भेटे, प्रसन्न होउनि, विधि, आचरतां अनंत तप, तीस; ।
स्मित करुनि म्हणे, 'मृत्यो ! कां [15]दुर्धर नियम धरुनी [16]तपतीस?'॥
मृत्यु म्हणे, 'कांपवितो [17]प्राणिवधाधर्म, म्हणुनि तप वरिलें; ।
जगदीशा ! [18]अभय मला द्यावें, त्वां सर्व [19]विनतभय हरिलें.'॥ ३५
[20]द्रुहिण म्हणे, 'न अधर्म स्पर्शेल, [21]मृषा नसेचि विधिवाणी. ।
सति ! [22]सद्गुरूपदेश न बुडवी कोणाहि, [23]अमृतनिधिवाणी.' ॥ ३६

१. नंदा=कुबेर नगरीच्या बाह्यप्रदेशीं वाहणारी नदी. (भागवत.) शाल्मली द्वीपांतही ह्या नांवाची नदी आहे. २. 'शौचसंतोषतपःस्वाध्यायेश्वरप्रणिधानानि नियमाः' (पातंजलयोगदर्शन.) ३. आठ हजार. ४. विश्वामित्र नदीच्या. ही हिमालयपर्वतीं उगम पावते. ५. पंजाबांत वाहणाऱ्या नदीतीरावर. ६. एक तीर्थविशेष. ७. काय उग्र तपश्चर्या ही ! ८. हिमाचलपर्वतीं. ९. देवांची यज्ञभूमी. १०. वत्सर=वर्ष. 'स्थानींहि खर्ववत्सर' असें पाठांतर. ११. मृत्युदेवता. १२. तिच्या चित्ताची प्रीति. १३. मुलाची प्रीति जशी मातृस्तनावर विशेष असते तशी. उपमा समर्पक असून ती त्या स्त्रीची दया व सत्कार्यप्रेम व्यक्त करित आहे. १४. नर्मदेच्या उत्तरेस व कुरुदेशाच्या पश्चिमेस असणारें वन. सूतानें शौनकादिकांस तेथेंच पुराणें सांगितलीं. ही तपस्वी, व ऋषी यांची राहण्याची जागा होती. १५. दुःसह, उग्र. १६. तपतेस; तपश्चर्या करितेस. १७. प्राण्याचा वधरूपी अधर्म. १८. येथें 'आमय मज द्यावे' असा पाठ आढळतो. (आमय=रोग) पण तो अपपाठ दिसतो. 'अभय मला' असा पाठ आहे तो प्रशस्त असून मुळास धरून आहे. 'भीतायास्तु महाभाग प्रयच्छाभयमव्यय !' (महाभारत–द्रोणपर्व–अ० ५४ श्लो० ३१ पद्य.) हेत्वलंकार. १९. नम्राचें भय. २०. ब्रह्मा. २१. मिथ्या. २२. सद्गुरूचा उपदेश कधींही, कोणालाही घातुक होत नाहीं. २३. अमृतनिधीसारिखा.

मृत्यु म्हणे, 'जरि आग्रह, तरि भूतांची अशीच [1]हो हानी; ।
भेदावें [2]प्राणिवपु द्रोहेर्ष्याक्रोधलोभमोहांनीं.' ॥ ३७
'[3]कर्मानुरूप दुर्गण, रोग, प्राण्यांसि नित्य खातील. ।
तुज, [4]काम कोप सोडुनि करितां संहार, साधु गातील. ॥ ३८
तव अश्रुबिंदु धरिले, रोगांचा तोचि होय हा [5]निकर, ।
[6]प्राण्यायुर्हानिकर; ग्रीष्मीं रवि जेंवि [7]तोयहानिकर.' ॥ ३९
संहारनिमित्त अशी मृत्यु विधिकृता अकंपना ! आहे. ।
रडतोसि पुत्रमरणें कां ? [8]मृत्युग्रास सर्वही बा ! हे.' ॥ ४०
[9]करुणानीरद नारदमुनिच्या वर्षोनि [10]उक्ति गारा या ।
देती अकंपनाला तापापासूनि मुक्ति गा ! [11]राया ! ॥ ४१
सांगे शोक शमाया ऐसा इतिहास हा [12]शुभ व्यास. ।
याच्या श्रवणें श्रोते निवती पावोनि [13]आशु [14]भव्यास. ॥ ४२
धर्म म्हणे, 'पुनरपि मज, निववाया, [15]कीर्तिसत्सुधाभरितें ।
चरितें राजर्षींचीं सांगा; मन याचि [16]सद्वरा वरितें.' ॥ ४३

---

१. होऊं दे. २. प्राण्यांचीं शरीरें द्वेष, असूया, क्रोध वगैरेंनीं भेदावीं असें होऊं दे. ३. हें ब्रह्मदेवाचें वाक्य आहे. ४. काम सोडून व कोप सोडून तूं संहार केलास तर. निष्कामबुद्धीनें व क्रोधविरहित होऊन आपलें काम केलेंस तर. अर्थातच मग अन्याय होण्याचा संभव नाहीं. ५. समूह. वर ब्रह्मदेवानें अश्रु धरिले आहेत त्याची ही मीमांसा ! नशीब सोडून कार्यकारणभावानें उत्पन्न झालेली ही मीमांसा आपल्यास संमत आहे, तथापि 'निर्घृण, दुष्ट' अशीं उपपदें आपण मृत्यूस देतोंच. ६. प्राण्यांच्या आयुष्याची हानी करणारा. पुढील **उपमा** स्पष्टच आहे. ७. ग्रीष्म ऋतूमध्यें जलशोषण रवि करितो तसा. ८. मृत्युदेवतेचें खाद्यच आपण सर्व आहोंत. **हेत्वलंकार.** येथें मृत्युदेवतेची उत्पत्ति, तिची नाखुषी, तपश्चर्या, यजमानानें सांगितल्यावर कर्तव्यस्वीकार इत्यादि गोष्टी संस्मरणीय आहेत. हल्लींच्या हांजी हांजीच्या काळांत प्रथम 'होय' म्हणून मग कुरकुरणारेच सेवक सांपडतात ! ९. दयामेघ नारद. १०. नारदाच्या या उक्तिरूप गारा वर्षून. गारांच्या पावसानें थंडाई येते हें अनुभवसिद्धच आहे. **परंपरितरूपक** आहे. ११. धर्मराजा ! १२. शुभ (मंगलप्रद, पवित्र) इतिहास (कथानक). सकार-शकारांची गर्दी पहा. १३. तत्काल. १४. कल्याण. १५. कीर्तिरूप उत्तम, गोड अमृतानें भरलेलीं. १६. उत्कृष्ट वराला माझें मन वरितें. मला संतचरित्रें ऐकवा.

व्यास म्हणे, 'जरि म्हणसी, श्रवणीं[1] राजर्षिचरितरस ओता. ।
तरि ऐक; श्वैत्यनृपतिसुत[2] सृंजय पांडुनंदना[3] ! होता. ॥ ४४
सख्यें[4]करूनि पर्वत, नारद आले[5] तया पहायाला. ।
सृंजय पूजी प्रेमें, प्रार्थी सर्वस्वही वहायाला[6]. ॥ ४५
तों तत्सुता[7] तयाप्रति येउनि, वंदुनि पदें; उभी राहे. ।
पर्वत म्हणे, 'नृपा ! रविभा[8], ह्री[9], श्री[10], कीर्ति[11], कोण हे आहे?'॥
भूप म्हणे, 'आली वरवर[12] मागायासि पर्वता ! तनया. ।
हें कन्याकृति[13]चिंताह्रदिनीशत; तरति सर्व तात न यीं[14].' ॥ ४७
नारद म्हणे, 'नृपा ! मज योग्य जरि तुझें म्हणेल मन, दे हें; ।
कन्यारत्न न केवळ[15], अर्थिकरीं[16] देति साधुजन देहें[17].' ॥ ४८
भूप म्हणे, 'योग्य सुतारत्ना तूं, जेंवि आनना रदन[18], ।

---

१. कर्णी. कानांनींच हें अमृत प्यावयाचें ! २ मुळांत 'शैब्य' आहे. ३. हे धर्मा ! ४. सख्य होतें म्हणून. ५. इतरत्र 'आला' असा पाठ आहे. 'पाहायाला आले' व 'Came to see' हीं समानार्थक वाक्यें होत. ६. अतिथि मागेल तें द्यावें असा पूर्वीचा प्रघात होता, म्हणून 'इच्छा असेल तें मागावें' अशी त्यानें प्रार्थना केली. ७. सृंजयाची कन्या त्याकडे येऊन. ८. रविप्रभा. ९. लज्जा. येथें सादृश्यमूलक संशय आहे म्हणून **ससंदेह** अलंकार झाला. 'रविभा कीं श्री' असा पाठभेद आहे. १०. लक्ष्मी. ११. यश. १२. उत्तम पति किंवा पतिरूप वर. १३. कन्यारूपी चिंतानदीचें शत. १४. या काळजीरूपी नदीला तरून जाण्याचें सगळ्याच बापांना साधत नाहीं. 'कन्येति जाता महतीहि चिंता कस्मै प्रदेयेति महान् वितर्कः । दत्ता सुखं प्राप्स्यति वा न वेति कन्यापितृत्वं खलु नाम कष्टम् ॥' असें एका कवीनें म्हटलें आहे, तें योग्यच आहे. असेच उद्गार पंतांच्या कवितेंत अन्यत्रहि आढळतात. (१) आत्मा पुत्र, सखा स्त्री, कन्या चिंताचि सर्वकाळ जिला । प्रसवोनि वाहति मनीं श्रीमंतहि पितर सर्व काळजिला. ॥ (आदिपर्व–अ० ३०।२९). (२) कळतां हिरण्यबाहु क्षितिपाळ म्हणे, 'सुता असाव्या' ही । इच्छा अरिसहि न शिवो, न मिळाला मदितरा असा व्याही. ॥ (उद्योगपर्व–अध्याय १३।२०१). १५. याचकाला कन्यारत्नचसें काय, आपलें सर्वस्व त्यास साधु लोक अर्पण करितात. परोपकाराची ही परमावधि नव्हे काय ? कर्ण, शिबि, कबीर इत्यादि दानशूर पुरुषांचीं उदाहरणें सुप्रसिद्धच आहेत. १६. याचकाच्या हातीं. १७. शरीरेंही. १८. दंत, दांतांवांचून तोंड अशुभ दिसतेंच. उपमा सुंदर आहे.

कोण सुबुद्धि म्हणेल ? 'स्वप्रियकर योग्य [1]आन, नारद न.'॥ ४९
[2]स्तव्याचि [3]पिशाचसखा झाली जाणुनि [4]सुपर्वता वरिती ।
[5]स्तविते न ठेविती जरि मन हरिवरि कीं सुपर्वतावरि ती.' ॥ ५०
पर्वत म्हणे, 'न कोणा तूं [6]बहुकलिहेतु वांकशी वरिली ? ।
[7]गति तुज नसो, मनें म्यां वरिली जी, हे तुवां कशी वरिली?' ५१
'[8]वाग्दानादिविधिविना हृदयें वरिली, म्हणोनि कशि भार्या ? ।
तुजहि मजविना स्वर्गति न घडो, कीं व्यर्थ दूषिसी [9]आर्या.' ॥ ५२
ऐसें परस्परांतें शापुनि, [10]संकलारिकालबाहो ! ते ।
सृंजयसदनीं नारदपर्वतमुनि बहुत काल बा ! होते. ॥ ५३
ज्या ब्राह्मणांसि पूजित होता पुत्रार्थ भूप तो [11]भावें, ।
ते म्हणति, 'नारदा ! सुतदीपें सृंजय[12]निशांत शोभावें. ॥ ५४
[13]त्यांशीं देवर्षि, जसा प्रियपुत्राशीं सुखें वदे तात; ।

---

१. अन्य. आपलें प्रिय करणारा दुसरा आहे, नारद नाहीं, असें कोण शहाणा म्हणेल ? कोणी म्हणणार नाहीं—असा काक्वर्थ होय. २. स्तुतीला योग्य. ३. शिवाप्रति. ४. सुपर्वता म्हणजे देवत्व अशी पंतांची टीप आहे. [पार्वतीनें शंकराचे ठिकाणीं] सु-पर्व-ता (देवपणा) [आहे असें] जाणुनि पिशाचसखा (शंकरास, शंकर स्मशानांत राहातात, अशी प्रसिद्धि आहे) स्तव्याची (ती स्तुति करण्यास योग्य अशी, पार्वती) वरिती झाली—असा स्पष्टार्थ. सुपर्वन्=देव, देवता. 'सुपर्वाणः सुमनसस् त्रिदिवेशा दिवौकसः' (अमरकोश). ५. त्याचप्रमाणें जरी स्तविते (स्तवन केलें असतें) तथापि ती आपलें मन हरीवर (विष्णूवर) किंवा सुपर्वतावर न ठेवती (तिनें ठेवलें नसतें). लिंगपुराणांत विष्णूशीं तिचा विवाह झाला असें कथानक आहे. सुपर्वताचें मन तिच्यावर लुब्ध झालेंच होतें. ६. नारदाची भांडणें लावण्याबद्दल प्रसिद्धीच आहे. तूं बहु-कलि-हेतु (तूं भांडणें उत्पन्न करणारा) आहेस, कोणा वांकसी (वांकडेपणा) न वरिली ? (तूं कोणाशीं भांडण केलें नाहींस) असा अन्वय. ७. तूं स्वर्गास जाणार नाहींस. ८. वाग्निश्चयादिक्रियेशिवाय. भारतकालीं वाग्दान, पाणिग्रहण, सप्तपदी इत्यादि विधि झाल्यावांचून लग्नास शास्त्रोक्तत्व येत नव्हतें. त्यांत सप्तपदी झाल्यावांचून तर लग्नास निश्चितत्व येतच नव्हतें. 'मी मनानें अमुक स्त्री वरिली' म्हणजे ती भार्या झाली असें होत नसे. ९. श्रेष्ठ पुरुषा. १०. सकल अरींचे यमच असे बाहु ज्याचे अशा धर्मा ! ११. भक्तीनें. १२. निशांत=गृह. 'निशांतवस्त्यसदनं भवनागारमंदिरम्' इत्यमरः. 'गृहरमानि बालकाः' असें म्हटलें आहे तें ठीकच आहे. १३. संजयाशीं.

‘तुज हे सुसंतति, जशी सुजनासि सुजन [1]सुखेंच देतात. ॥ ५५
बोले जसा तुज व्हावा, ऋषिवरवचनें तसाचि सुत पाहें.’ ।
त्या सृंजयासि वदला होउनि बहुसुप्रसन्न [3]सुतपा हें. ॥ ५६
भूप म्हणे, ‘विख्यात, [4]स्वायुधदहनांत [5]अहित होमुनि, हो ।
[6]यन्मलमूत्रादि सकल कनक, असा पुत्र [7]महित, हो ! मुनि हो ! ५७
दिधला तसाचि वर, सुत अद्भुत झाला, तयासि तो जनक ।
ठेवी नाम [8]सुवर्णष्ठीवि असें, तो हगे मुते कनक ! ॥ ५८
त्याचें कनकचि सारें मल, मूत्र, स्वेद, लाळ, सेंबूड; ।
कां न म्हणेल [9]तेशाचें ‘मोहीं’ ताताशि [10]बाळसें ‘बूड.’ ॥ ५९
[11]भाग्यभरें बहु [12]भारी भासे सृंजयपुरी, जशी [13]अलका; ।
परि [14]इतचि धन वाढे, म्हणउनि दृष्टांत होय हा हलका ! ॥ ६०
[15]किंबहुना ! कौंतेया ! बा ! [16]अनुपायज्ञलुब्धघोरांनीं ।
चोरांनीं, हरुनि बळें वधिला [17]कनकार्थ बाळ तो रानीं ! ॥ ६१
नृपति म्हणे, ‘हा ! हा ! हे होइल मिथ्या शिशो ! [18]कदा वार्ता ? ।
निवविल मंज कवण तुझ्या [19]कुशलसुधेकरुनि [20]शोकदावार्ता ?’॥ ६२

---

१. क्षेमालिंगन. येथील दोन्ही **उपमा** व्यवहारज्ञानदर्शक आहेत. २. तुला कसा पुत्र पाहिजे तें सांग. तसाच तुला मिळेल, पहा. राजानेंही चमत्कारिक वर मागितला. इंग्लंडांतील एका राजाची सुवर्णलोभाबद्दल अशीच प्रसिद्धि असून त्यानेंही देवतेजवळ असाच कांहीं चमत्कारिक वर मागितला होता. ३. तपोनिष्ठ नारदमुनि. ४. आपल्या आयुधाग्नींत. ५. शत्रु. **रूपक** आहे. ६. ज्याचें मलमूत्रादि. ७. पूज्य. ८. सुवर्णरूप आहे ष्ठीवी (मलोत्सर्जन) ज्याचें असा. ९. सुवर्णष्ठीवि पुत्राचें. १०. तशा मुलाचें बाळसें (बाळपणांतील सौंदर्य) ‘मोहीं बूड’ असें ताताला कां न म्हणेल ? सारांश सृंजय राजा आपल्या मुलावर अत्यंत प्रेम करूं लागला. **पर्यायोक्ति** आहे. ११. सुवर्णाच्या राशींनीं. १२. भारवती, श्रेष्ठ. १३. कुबेरपुरी. येथें नऊ निधि आहेत. १४. सृंजयपुरींत. येथें **व्यतिरेक** आहे, कारण उपमेयाचें आधिक्य वर्णिलें आहे. १५. बहुत काय सांगावें. १६. उपाय न जाणणारे लोभी क्रूर अशा. १७. सुवर्णाकरितां. इसापनीतींतील सुवर्णाचें अंडें घालणाऱ्या कोंबडीस मारणाऱ्या दासीची व या चोरांची गति सारखीच झाली ! कोठें इसाप आणि कोठें व्यास, पण दोघांसही समानार्थक गोष्ट सुचली, हें त्यांच्या बुद्धिमत्त्वाचें दर्शक होय. १८. कधीं. १९. तूं कुशल (सुखी जिवंत) आहेस अशी अमृतरूपी वार्ता, तिच्या योगानें. २०. शोक-

नारद त्यासि म्हणे, 'गा ! तुज उचित नव्हेचि शोक [१]तोकाचा. ।
तो [२]कांचा, [३]स्पर्शमणी त्यागुनि जो काय वेंचितो काचा. ॥ ६३
[४]पणजाला, आजाला न रडसि [५]कृतपोषयत्न [६]बालाही ।
श्रेयस्कर ते, कीं हा [७]विरहगरद [८]सुगुणरत्न [९]बालाही ? ॥ ६४
कथितों, [१०]पुण्यतर तुझ्या पुत्राहुनि पुरुष, ऐक, त्यास रड; ।
कवि म्हणति, '[११]उगेंचि शिरःकंपसहहि सूक्त [१२]ऐकत्या 'सरड.' ॥ ६५
होता [१३]यज्वा, दाता, शक्राहुनि [१४]लब्धरस [१५]मरुत्त रणीं; ।
ज्याची [१६]सदुपायनियति इष्ट सुगति, तेंवि न [१७]समरुत्तरणीं. ॥ ६६
यज्ञ कराया [१८]प्रार्थी स्वर्गी त्या [१९]स्वकुलगुरुवरा [२०]जीवा ।
चुंबी [२१]शिरें पदयुगा, जेंवि मुखें [२२]तृषितमधुप [२३]राजीवा. ॥ ६७

दावानलानें पीडित जो मी त्या मला. **रूपक** आहे.

१. बालकाचा. २. कच्चा. **दामयमक** आहे. ३. परीस. परिसाला टाकून कांचेचे तुकडेच कायते वेंचणारा नर काचा (कच्चा, मूर्ख) होय. म्हटलें आहेः—'काचे मणिर्मणौ काचे येषां बुद्धिः प्रवर्तते । न तेषां संनिधौ भृत्यो नाममात्रोऽपि तिष्ठति ॥.' **अप्रस्तुतप्रशंसा** अलंकार आहे. ४. वर (श्रेष्ठ) आजा तो पणजा. आजा हा 'आर्या'चा अपभ्रंश. पणजाला=पणजासाठीं, पणजाप्रीत्यर्थ. ५. तुझ्या पोषणाचा केला यत्न ज्याणें. ६. बापालाही. येथील 'बा'चें विशेषण फारच अवजड होय. ७. वियोगरूप विष देणारा. ८. सद्गुणाचें रत्न त्याजवळ होतें तरी. सर्पाच्या डोक्यावर मणी असतोच. ९. बालरूपी सर्प. **रूपकालंकार**. १०. विशेष पवित्र. ११. 'अरसिकेषु कवित्वनिवेदनं शिरसि मा लिख मा लिख मा लिख'. उगेंचि=व्यर्थ, मर्म न समजतां. 'सरट' मूळशब्द. त्याचा 'सरड' झाला. तूं सरड होऊं नको, मर्म समजून घे—असें सांगण्याचा भाव आहे. चलनवलन करणें हा सरडाचा स्वभावच होय. **पर्यायोक्ति** आहे. १२. उत्तम भाषण शिर डोलवित ऐकणाराला. १३. यज्ञ करणारा. १४. मिळविला आहे रस (कीर्ति?) ज्यानें. 'वीर्य' असाही 'रस' शब्दाचा अर्थ आहे. १५. मरुत्तनामक राजा आविक्षिताचा पुत्र. हा सूर्यवंशीय राजा दिष्टकुलांत उत्पन्न झाला होता. याच्या यज्ञाचा भंग करण्यासाठीं रावण आला होता असें वाल्मिकीरामायण—उत्तरकांडांत म्हटलें आहे. १६. ज्याच्या उत्कृष्ट उपायांच्या नियमांनीं जी इष्ट गति प्राप्त होई. **व्यतिरेक** अलंकार आहे. १७. स+मरुत्+तरणीं=अनुकूल वायुसहित नौकेमध्यें. १८. मरुत्तानें प्रार्थना केली. १९. सूर्यकुलगुरु वसिष्ठ त्याच्यापेक्षांही श्रेष्ठ अशा. २०. बृहस्पतीस. 'जीव आंगिरसी वाचस्पतिः' इत्यमरः. २१. मस्तकानें, शिरानें. २२. ज्याला तहान लागली आहे असा भ्रमर. २३. कमला. **उपमा** आहे.

'[1]सुरपति सोडुनि जाणें नृपयज्ञा, हें नव्हे उचित [2]मातें.' ।
ऐसें मनांत आणुनि जीव उपेक्षी तया [3]शुचितमातें. ॥ ६८
भेटे नारद त्याला [4]फिरतां, पावोनि फार खेदास ।
ऐकुनि वृत्त, म्हणे, 'हो ! [5]लेखावे सर्व सारखे दास.' ॥ ६९
सांगे सुरर्षि, 'आहे गुरुबंधु, तदीयवृत्ति [6]पैशाची; ।
'[7]संवर्त' नाम त्याचें त्यासि यशाची [8]स्पृहा, न [9]पैशाची. ॥ ७०
[10]वाराणसीशवीं [11]शिवधी तो वळखावयासि हे खुण गा ! ।
वळखावा बहुयत्नें, अतिकृपणाचा नृपा ! जसा [12]कुणगा. ॥ ७१
वाराणशीपुरीच्या द्वारीं मांडूनि [13]कुणप उमगावा ।
पुसतां '[14]दहनीं शिरलों' म्हण, कविनीं त्वत्प्रताप [15]धुंम गावा. ॥ ७२
छल [16]सोसितां मरुत्तें [17]गुरुमंत्रबळें [18]विशंक पद नमुनी; ।
होय [19]परमइष्ट, वरद, शिष्टवर दयाप्रसन्नवदन मुनी. ॥ ७३

---

१. इंद्राला. २. हे बृहस्पतीचे विचार आहेत. वशिष्ठालाही असाच प्रसंग नेमिराजाच्या वेळीं आला होता. ३. शुद्धांमध्यें श्रेष्ठ जो मरुत्त त्याला. ४. नारदाचें भ्रमण सर्वविश्रुतच आहे. पण नारदच ही कथा संजयास सांगत आहेत, तेव्हां प्रथमपुरुषीं बोलावयाचें सोडून ते तृतीयपुरुषीं कां बोलतात नकळे ! ५. सर्व दासांना सारखें वागवावें. हा इंद्र व हा मरुत्त असा भेद करूं नये असा भावार्थ **पर्यायोक्तीनें** सांगून नारदांनीं आपला खेद प्रकट केला आहे. ६. पिशाचतुल्य. कांहीं तपस्वी पैशाची वृत्ति, कांहीं अजगरवृत्ति पत्करितात. ७. संवर्त हा अंगिराऋषीचा मुलगा. बृहस्पति हाही अंगिराऋषीचाच मुलगा. हे दोघेही श्रद्धेपासून उत्पन्न झाले म्हणून सहोदर होते. वर गुरुबंधु म्हटलें आहे त्यावरून संवर्त हा नारदाचा गुरुबंधु असावा असें दिसतें. ८. इच्छा. ९. या जगामध्यें मनुष्य कर्म करितो तें पैशाकरितां किंवा कीर्तीसाठीं करितो, अशी प्राचीन कालापासून समजूत आहे. कित्येक साधुलोक परोपकार करितात ते केवळ कर्तव्यप्रीति म्हणून करितात व कित्येक राक्षस कर्तव्य करावयाचेंच नाहीं अशा बुद्धीनें कर्म (अकर्म) करितात ! पंतांनीं इकडे कां लक्ष दिलें नाहीं बरें ? १०. काशीक्षेत्रांतील प्रेतांविषयीं मंगलबुद्धि ज्याची आहे असा, प्रेतास अमंगळ न माणणारा. ११. कल्याणबुद्धि. १२. लोकांस न कळतां ठेवलेलें द्रव्य. **उपमा आहे.** १३. शव. १४. 'मी अग्नींत शिरलों' असें सांग. भारत–अश्वमेधपर्व–अ० ७ पहा १५. तडाक्यानें. १६. 'सोशिला' असाही पाठ आहे. १७. नारदांनीं दिलेल्या मंत्राच्या बळानें. १८. शंकारहित. १९. अतिशय स्नेहयुक्त, व दयेनें प्रसन्न झालें वदन ज्याचें असा शिष्टवर (शिष्टलोकांमध्यें श्रेष्ठ) मुनी झाला.

भक्तां अभयप्रद, जो इतरां लोकां सकाय संवर्त[1], ।
घालील न शरणागतकार्या तो कांस[2] काय संवर्त ? ॥ ७४
करितां मरुत्त मख, ये शतमख[3] उचलूनि वज्र मारा[4]या ।
कांहीं चालों न दिला संवर्तें तदभिमान वा ! राया ! ॥ ७५
ज्याच्या मखीं सभासद सुर सर्व, मरुत्समूह[5] परिवेष्टा[6]. ।
म्हणति परस्पर[7] भुक्तद्विज, जरि पट[8] न धरि पोट, परि वेष्टा. ॥७६
शक्रा धनदा[9] देऊं[10], उधळुनि बहु कनक, तो त्रपा[11] दास[12] ।
म्हणउनि गुरु[13] दे ज्याला कांचनमय[14]तुहिनगोत्रपादास; । ७७
केली सफला ज्याची संवर्तें सर्वपावन[15]सवेहा; ।
ज्याच्या राज्यांत म्हणे, 'तस्कर[16], दारिद्र्य, दुःख, नसवे[17]' हा. ॥७८
राहे पथींच ऋत्विग्[18] ! विप्र[19]जना बहुत दक्षणा विटवी ! ।
त्या सुगुणसागराचा पावेल न अंत सु-कवि-धी-टिटवी[20]. ॥ ७९
कां रडसि सुताकरितां ? यज्वा[21], दाता, असा मरुत्त मरे ! ।

---

१. मूर्तस्वरूप धारण करणारा प्रलयकाल. २. कांस घालणें=काम करण्यासाठीं कंबर बांधणें, तयार होणें. ३. इंद्र. ४. कोण इंद्राची परोत्कर्षासहिष्णुता ही ! त्याची संवर्तानें फजितीच केली आहे. ५. हे मरुद्गण दितीचे पुत्र. यांचे इंद्रानें गर्भांतच तुकडे केले तरी ते मेले नाहींत. ६. वाढपी. 'वेष्ट्र' आणि 'Waiter' हे शब्द किती जवळ जवळ आहेत पहा ! ७. आपसांमध्यें. ८. येथें **हास्यरस** आहे. भोजनप्रिय ब्राह्मण परस्परांस म्हणतात कीं आतां पोटावर धोतरें रहावयाचीं कठिण पण तीं कशीं-तरी गुंडाळून घ्या. ९. कुबेर. हा धनाचा अधिपति आहे. १०. द्यावी म्हणून. ११. लज्जा. १२. भक्त. मरुत्त दान देऊन इंद्रकुबेरांस खालीं पाहण्यास लावो म्हणून. **हेतु** अलंकार आहे. पण या अलंकाराची गणना **मम्मटाचार्यांनीं** केली नाहीं. १३. संवर्त. १४. सुवर्णमय हिमाचलाचा पाद (चतुर्थांश) 'अद्रिगोत्रगिरिग्रावाचल-शैलशिलोच्चयाः' इत्यमरः. १५. सर्वांत (अत्यंत) पवित्र अशी सवाची (यज्ञाची) ईहा (इच्छा). १६. चोर. १७. असणार नाहीं. १८. 'ऋतौ यजंति ते ऋत्विजः' 'वृताः कुर्वंति ये यज्ञं ते ऋत्विजः' यजमानेन धनानि दत्वा वरणीयाः इत्यमरः. येथें ऋत्विजांस इतकें मिळालें कीं ते नेतां नेतां वाटेंतच थकले ! १९. विप्र म्हणजे ब्राह्मण त्यांना सुद्धां मरुत्ताच्या दक्षिणेचा वीट आला ! ब्राह्मणास दक्षिणेचा वीट येणें कठिण आहे. २०. चांगल्या कवीची बुद्धिरूप टिटवी (समुद्रतीरींचा पक्षी). **परंपरितरूपक** आहे. २१. यज्ञकर्ता.

होता बहुप्रकारें त्वत्तनयापरिस परम उत्तम[1] रे ! ॥ ८०
देवर्षि म्हणे[2], 'सृंजयराजा ! दुसरा सुहोत्र[3] नृप होता. ।
न तसा दुजा प्रतापी, अहितमहीपतिमहाहुतीहोता[4]. ॥ ८१
त्याच्या राज्यामध्यें वर्षति घन बहुत वारिपरि[5] सोनीं[6] ।
चित्तीं 'मिथ्या' न म्हणें, हें परमाश्चर्यकारि[7] परिसोनी. ॥ ८२
ज्या तद्राज्यांत[8] नद्या, वापी[9], जे कूप, काय कासार[10], ।
तत्तोय, पंक, शैवल[11], कनकचि ! तें मनुजनायका सार[12]. ॥ ८३
त्यांतील स्वर्णमय प्लव[13], दर्दुर[14], मकर, मीन, कांसव, हो ! ।
ऐसा सभाग्य न करिल, होउनि गुरुचरणलीन, कां सव[15] हो ? ८४
जें हेमयाद[16] पडलें मेघांतुनि तेंहि हेमयादा[17] वी. ।
अद्भुत[18] दाखवि त्या, अतिअद्भुत नृपभाग्य हें, मया[19] दावी. ॥ ८५
यज्ञांत सर्व सोनें दे, छत्रचि त्यां[20] न देववे[21], दानें ।
त्या यादांचींहि दिलीं; यजिले जे[22] उक्त देव वेदानें. ॥ ८६
जो हयमेधसहस्रें[23] सविधि[24] यजी, वीर राजसूयशतें; ।
परवीरसू[25] न जें तिल मिरवि बहु सुहोत्रराजसू[26] यश तें; ॥ ८७

---

१. **सार** अलंकार आहे. २. दुसरी गोष्ट सांगतात. ३. यावर इंद्र प्रसन्न होऊन त्यानें सुवर्णवृष्टि एक वर्षभर याच्या राज्यावर केली होती. ४. अहित+महीपति+महाहुती+होता=शत्रुरूपी राजांच्या आहुतींचा हवनकर्ता. काय 'ह'कार हे ! ५. पाण्याप्रमाणें. ६. सुवर्ण. (पुढें अध्याय १४।२२ पहा). ७. ही अत्यंत आश्चर्यकारक गोष्ट ऐकून, ती खोटी असावी असें मनांत देखील आणूं नको. ८. त्याच्या राज्यांत. ९. मोठी विहीर. १०. तळीं. ११. शेवाळ. १२. 'सारें (सगळें)' ह्या अर्थी 'सार' असा पंतांनीं शब्दप्रयोग केला नसेल. तेव्हां 'तें मनुजनायका सार [वाटे]'–असा अन्वय करावा. १३. पानकोंबडीं. १४. बेडूक. १५. यज्ञ. १६. सुवर्णजलजंतु. १७. सुवर्णमत्स्याला. '**उदात्तं** वस्तुनः संपत्' असें **उदात्तालंकाराचें** लक्षण आहे. एथें संपत्ति आहे, पण चमत्कार फारसा नाहीं. १८. मयासुर हा अद्भुत गोष्टी दाखविणारा होता. यानेंच धर्मसभा निर्माण केली होती. १९. मयासुरास. २०. सुहोत्राला. २१. राजचिन्ह म्हणून छत्र देववेना. २२. जे देव वेदानें उक्त ते यजिले. २३. अश्वमेधसहस्रें. अश्वमेध यज्ञानें राजाचें सार्वभौमत्व प्रकट होतें, व राजसूय यज्ञानें राज्याभिषेक सूचित होतो. २४. यथाविधी यजन करी. २५. दुसऱ्या वीरमाता. २६. सुहोत्र राजाची माता जें पुष्कळ यश मिरवी त्याचा इतर वीरसूंस अल्पांशही मिळाला नाहीं.

मेला असाहि. कोणिहि जननमृतिस करुनि [1]पुण्य तरतो कीं ? ।
वद आपणांत, अथवा गुण [2]ऐसो कवण पुण्यतर [3]तोकीं ? ॥ ८८
[4]हयमेधसहस्रांचें जेणें केलें [5]सहस्र [6]सन्मत रे ! ।
ऐसाहि [7]अंग मेला. काळाला कोण, वरुनि [8]जन्म, तरे ? ॥ ८९
जो शतसहस्र देता [9]झाला यज्ञांत दक्षिणा कन्या. ।
मख उत्तरोत्तर अधिक. वर्णाव्या [10]दानजाति किति अन्या ? ॥ ९०
मखनटनर्तकसुख तें ऐकुनिहि दिलें नृपा ! सुख न कानें. ।
अंगें [11]मखक्रिया, मरुमार्गी, केली, कूपा [12]सुखनकानें. ॥ ९१
तुजहुनि [13]चतुर्गुण बरा, त्वत्पुत्रापरिस पुण्यतर अंग; ।
तोही मेला राया ! कां रडसी ? सोड [14]शोककर संग.' ॥ ९२
देवर्षि[15] म्हणे, 'राया ! श्रवण तुवां तो नसेल शिबि केला. ।
ज्याच्या कीर्तिहुनि उणी म्हणति सुकवि [16]अमृतवर्षिशिबिके[17]लीं.॥ ९३
[18]युद्धहताहितनृपहृतवित्तें विष्ण्वादि सर्व देव [19]यजी. ।

---

१. कारण पुण्य केलें म्हणून कोणी मृत्यूच्या जबड्यांतून सुटतो असें नाहीं. २. सुहोत्र राजासारखा. ३. बालकाचे (अभिमन्यूचे) ठायीं. ४. येथून अंगराजाची गोष्ट सुरू झाली. ५. अश्वमेध सहस्रांचे सहस्र केले. ६. शिष्टमान्य. ७. श्रेष्ठ, अंग नामक. ८. जन्म घेऊन काळाला कोण तरेल (काळाच्या पलीकडे कोण जाईल !) सारांश 'जातस्य हि ध्रुवो मृत्युः' असें भगवंतांनीं अर्जुनास सांगितलें तेंच खरें आहे. ९. 'मग' हा अपपाठ दिसतो. १०. दानाचे अन्य प्रकार. ११. सुखनकानें (उत्तम खणणाऱ्यानें) मरुमार्गी (निर्जल प्रदेशांत) [जेंवि] कूपा [करावी] (विहिरी, तलाव वगैरे खणून पाण्याची सोय करावी) [तेंवि] अंगें (अंगराजानें) मखक्रिया (यज्ञयागादि) केली–असा अन्वय. १२. सु+खनक=उत्तम प्रतीचा खणणारा त्याणें. **दृष्टांत** आहे. १३. चौपट. १४. शोकप्रद संग (बंधन). १५. नारद पुनः शिबिराजाची गोष्ट सांगतात. १६. चंद्रयान. चंद्राला सुधांशु (अमृतवर्षी) म्हणतात. १७. पालखीला. चंद्राची शिबिका अत्यंत शुभ्र असावयाची. ती शिबीच्या कीर्तीपेक्षां कमी पांढरी कवींस वाटली. म्हणून **प्रतीप** अलंकार. कीर्तीचा रंग पांढरा असतो, असा कविसंकेत आहे. १८. युद्ध+हत+अहित+नृप+हृत+वित्त=युद्धांत मारलेल्या शत्रुराजांपासून हरण केलेल्या द्रव्यानें. १९. यावरून शिबीचें शौर्य व धर्मश्रद्धा व्यक्त होतात. ह्या गीतींत गोब्राह्मणांचा प्रतिपाल व प्रजेचें संरक्षण यांमध्येंच त्यानें आपलें सर्व आयुष्य घालविलें हें **पर्यायोक्तीनें** सांगितलें आहे. शिवाय धर्मालाही सचेतनत्व दिलें आहे.

गो[1]ब्राह्मणप्रजावननिजधर्मकरींच सर्व दे वय. जी ! ॥ ९४
श्री[2]गणपतिजवळ गणकें[3]सिद्धांतरहस्य जो [4]सुधी [5]सिकता ।
तो त्याबळें न मोजिल कां [6]गंगासिंधुजंतुसह [7]सिकता ? ॥ ९५
मोजील [8]वर्षधारा, तारा, सारा [9]सुमेरुपाखाण. ।
[10]शिबिदत्तधेनु [11]वर्णिले जरि [12]वरदेश्वर म्हणेल 'वाखाण'. ॥ ९६
रथ-[13]हयचतुष्टय, जसें प्रेरित [14]अस्तो [15]कवि [16]प्रतोदानें; ।
[17]वपु बोधें प्रेरी, बहु सुखवी [18]अस्तोक विप्र तो दानें. ॥ ९७
बहु अश्वमेध केले, बहु गोकन्यादि दक्षिणा दिधल्या. ।
कवि म्हणति, 'कंठकर्णी [19]सन्मुक्तावृंद [20]यंद्यशोभिध [21]ल्यो.' ॥ ९८

---

१. गोब्राह्मण व प्रजा यांचें पालन हा जो स्वधर्म त्याच्या हातींच. २. गणेश दैवज्ञ म्हणून एक नामांकित ज्योतिषी शके १५ व्या शतकांत होऊन गेला. कोंकणांत नंदिग्राम (नांदगांव) येथील हा ज्योतिषी राहाणारा. याचे वडील केशव दैवज्ञ यांनीं गणपतीची आराधना केली म्हणून गणेश हा ईश्वरी अंशानें पृथ्वीवर अवतरला असें म्हणतात. 'ग्रहलाघव' हा याचा मुख्य ग्रंथ होय. (शं० बा० दीक्षित कृत भारतीय ज्योतिःशास्त्र.) कवीला असेंही वाटलें कीं 'लीलावती'चें ही अध्ययन गणेश दैवज्ञानें केलें असावें म्हणून गंगेची वाळू, पावसाच्या धारा, वगैरेंचें गणित तो करीत असावा. 'लीलावती' भास्कराचार्यांनीं शके ११ व्या शतकांत उदयास आणिली. 'लीलावती'च्या साह्यानें यौवनाश्व राजानें झाडाचीं पानें मोजून नळास दाखविलीं, ही आख्यायिका सुप्रसिद्धच आहे. (मुक्तेश्वरकृत वनपर्व, अध्याय ८।११२ पहा). ३. ज्योतिषाच्या सिद्धांतांतील रहस्य. ४. उत्तम बुद्धिवान. ५. शिकणारा. ६. गंगा+सिंधुनदींतील प्राण्यांसहित. ७. वाळुका. ८. जलधारा. ९. मेरूपर्वतांतील पाषाण. १० 'शिबिदत्तधन न वर्णिल' असाही पाठ आढळतो, व हाच चांगला दिसतो. हा पाठ घेतल्यास **असंभव** अलंकार होतो. ११. 'वर्णिल' त्याचा कर्ता ज्योतिषशास्त्र शिकणारा (गीति ९५ पहा). १२. गणपति (?). वरदराज म्हणून 'लघुकौमुदी' व 'मध्यसिद्धांतकौमुदी'चा कर्ता होता त्याच्यासंबंधानेंही म्हटलें असेल. १३. ज्या रथाला चार घोडे आहेत असा. १४. 'असतो' पाहिजे. यमकासाठीं 'अस्तो' केलें आहे. अष्टाक्षरी यमक आहे. **उपमाही** खाशी आहे. शरीररूपी रथास हांकणाऱ्या आत्म्याचें **रूपक** प्लेटो नामक ग्रीक तत्वज्ञानें सुरेख साधलें आहे. मोठे पुरुष एकसारखा विचार करितात. हें विचारसादृश्य कुतूहलजनक होय. मनोनिग्रहाचा बोध यावरून होतो. १५. चतुर सारथी. १६. चाबुकानें. १७. शरीर. १८. अनल्प; पुष्कळ. १९. उत्तम मौक्तिकघोंस. २०. यत्+यशस्+अभिध=ज्याची कीर्तिनामक. २१. ग्रहण करा. 'आपल्या कंठामध्यें आणि कानांमध्यें शुभ्र यशोरूपी उत्तम मोत्यांचे

ज्या **शिव** म्हणे, '**शि**वे[1]चा धन[2]पत्वें अ[3]पर मित्र दे[4]वर, हो.' ।
अक्षय धर्मश्रद्धा, सुयश, असे बहुत चित्र दे वर हो ! ॥ ९९
धर्मा ! देवर्षि म्हणे, 'गेला, मेला, असाहि **शि**बिराजा. ।
यास्तव नको रडों, म्हण या सा[6]श्रुजनांसहि, 'स्व[7]शिबिरा जा.' १००

अध्याय पांचवा.

दे[8]वर्षि म्हणे, '[9]होता दशरथनृपपुत्र **रा**मराजा, गा[10]. ।
जेणें साधूनि दिला [11]लोकां, सुरसिद्धपामरां, ज[12]गा. ॥ १
वधिला जेणें राक्षसवर, विश्वविनाशकर, दशानन गा ! ।
आली, ध्या[13]या यत्पदयश, देवांच्या[14]हि व[15]रदशा न न[14]गा. ॥ २
यच्चरणाच्या घेती, मस्तक मळवूनि, देव धूलीला. ।
तीर्थाधिक [16]हे; **गौ**तम[17]मुनिची कळवूनि दे व[17]धू लीला. ॥ ३

घोंस धारण करा' असें कवि म्हणतात. सारांश शिबिराजाचे यशाचें श्रवण व कीर्तन करा, असें सांगण्याचा भाव आहे. **रूपक** फारच मनोहर झालें आहे.

१. पार्वतीचा. २. कुबेराप्रमाणें धनपति आहे म्हणून. ३. दुसरा. ४. दीर. शंकर हे कुबेरास भाऊच मानतात, तसेच शिबीस मानूं लागले. ५. 'तुझी धर्मश्रद्धा व सयश अनंत कालपर्यंत राहो' असे शंकरांनीं अनेक सुंदर वर शिबीस दिले. ६. या रडणारे लोकांस. ७. आपल्या रावटींत जा. ८. व्यासांनीं धर्माचें व नारदांनीं सृंजयाचें किती प्रकारांनीं तरी समाधान केलें आहे बरें? या अनेक प्रकारांवरून अभिमन्यूबद्दल धर्मराजास केवढा जबरदस्त शोक झाला होता हें दिसून येतें. ९. रामचंद्राची कथा सुरू झाली. रामचंद्र हें पंतांचें कुलदैवत ! तेव्हां 'अधिकस्य अधिकं फलम्' असेंच काव्य आपल्यास दिसेल. १०. याची कीर्ति गात बसा. ११. सर्व लोकांस (देव, योगी, साधु व अज्ञजन) यांस. या चरणांत रामचंद्राचें प्रेम दाखविणारा अर्थ ओतप्रोत भरला आहे. 'जागा' शब्द पुल्लिंगी क्वचितच असतो. १२. स्वर्गवास. १३. 'ध्याया' असा पाठभेद. १४. कल्पवृक्षास. १५. श्रेष्ठ स्थिती. १६. ही रामचरणाची धूळ पावन करणाऱ्या तीर्थापेक्षांही जास्त योग्यतेची आहे असें गौतमभार्या अहल्या, प्रभुलीलेचा अनुभव घेऊन, लोकांस कळविती झाली. १७. गौतमपत्नी अहल्या.

[1]कीं पाहे शापतमीं चिंतुनि चित्तांत [2]जे चिमीत शिळा. ।
यत्पदयशें सुधारस विरस, [6]सुरसिकांसि जेंवि भाव शिळा. ॥ ४
[7]द्रवबुनि [8]अजडा केली [9]यत्पादरजोलवानिळें [10]कुशिला; ।
यज्जननीच्या, होउनि [11]दुग्धधिनें [12]लोल, [13]वानिलें, [14]कुशिला. ॥ ५
[15]यत्तेजें जलनिधिच्या तरले न [16]दगड, [17]विशैलनगहि, [18]वर; ।

---

१. किंवा शापरूपी घनदाट अंधकारामध्यें चित्तांत जे (रामचंद्रचरण) त्यांचें ध्यान करून (ध्यान केलें म्हणून) त्या शिळेला (शापग्रस्त अहल्येला) प्रातःकाळचा सुखद प्रकाश दृग्गोचर झाला ! **विरोध** आहे. २. चरण. ३. प्रभात. ४. रामचिंतनाचा प्रभाव कवीनें सांगितला आहे तो कोणत्याही धर्मास भूषणप्रदच होईल. पाप करणारा अत्यंत मलीन पुरुष असला व आपण पाप करितों असा त्यास उद्बोध झाला व तो ईश्वरचिंतन करूं लागला म्हणजे तो मुक्त होण्याच्या मार्गाला लागला, असें क्रिस्तीशास्त्राचेंही तत्व आहे. ५. ज्याच्या पायांच्या कीर्तीपुढें अमृत सुद्धां नीरस वाटलें ! ६. भोजनशास्त्रामध्यें पटाईत (विद्वान् लोक) जे त्यांस. ७. शिळेला विरघळून, पाप्याच्या अंतःकरणांस द्रव आणून. ८. हलकी, निष्पाप. **अतिशयोक्ति** आहे. ९. ज्याच्या पादरजाच्या लेश (मंद) वायूनें. १०. कुत्सित शिळा. किंवा अत्यंत पापी स्त्री. ११. क्षीरसागर चंचल (कावराबावरा) होऊन त्यानें कौसल्येच्या कुसव्याची स्तुति केली. आपल्या शुभ्रवर्णापेक्षां कौसल्येच्या कुसव्याची कीर्ति ज्यास्त म्हणून क्षीरसागर भयभीत झाला—असा भाव. १२. येथें **प्रतीप** अलंकार आहे. 'दुग्धोदधि लोल' असा पाठ आहे. १३. स्तविलें. १४. कुसव्याला. १५. ज्या रामचंद्राच्या पराक्रमानें. १६. वस्तुस्थितीच्या उलट दंतकथा कशा प्रचलीत होतात त्याचें हें एक उदाहरण आहे. राम वानरसैन्यासह लंकेवर चालून गेले. तेव्हां समुद्रापलीकडे जाण्याकरितां त्यावर त्यांनीं सेतु बांधविला. ह्या सेतूचे दगड नळाला मिळालेल्या वरामुळें पाण्यावर तरले, अशी आख्यायिका आहे. पण तीस रामायणांत मुळींच आधार नाहीं. वानरांनीं मोठमोठे वृक्ष तोडून आणून ते समुद्रांत टाकून, समुद्र भरून काढिला. वानर समुद्रांत पर्वत टाकूं लागले असता पाणी एकदम वर उसळे व आकाशापर्यंत वर जाऊन खालीं येई, असें वर्णन आहे. 'एष शैलशिलाभिस्तु पूरयित्वा महार्णवम् । द्वारमावृत्य लंकाया रामस्तिष्ठति सायुधः ॥' [युद्धकांड सर्ग ३०।११] म्हणजे—पर्वत आणि पाषाण ह्यांनीं समुद्र भरून काढून त्या मार्गानें राम आला व तो लंकेच्या द्वारापाशीं येऊन सशस्त्र राहिला आहे. ह्या श्लोकांतील 'पूरयित्वा' ह्या पदानें तर समुद्रावर दगड तरल्याची दंतकथा खरी नाहीं, असें सिद्ध होतें. नळ हा विश्वकर्म्याचा पुत्र. ह्याला सर्ववस्तुनिर्माणसामर्थ्यरूप वर पित्यानें दिला होता. तसेंच विश्वकर्म्यानें आपल्या पत्नीस असा वर दिला होता, कीं तुला माझ्यासारखा पुत्र होईल. ह्या वराच्या योगानें तो सेतु बांधण्यास समर्थ झाला—अशी वस्तुस्थिति होती. तिचा विपर्यास कसा झाला तें देव जाणे ! १७. मोठमोठे पर्वत. १८. जलनिधीच्यावर दगडच तरले असें नाहीं तर मोठमोठे पर्वतही तरले.

ज्याच्या सुयशें आला स्पष्ट दृशमुखास मात्र न गहिंवर[1]. ॥ ६
न तुला[2] शेतांत पहिल्या मधिल्या अंत्याहि तुरगमेधा त्या ।
गुरुकुळ मखश्रुतींचें साक्षात् [3]साकेतपुर गमे [4]घाल्या. ॥ ७
[5]युवृत्त असो, चाविति सर्प पिसा[6] वा हि न वपु ढेंकुण. गा ! ।
राष्ट्र[7] प्रेमें पोषी, कृपण जसा नित्य नव पुढें कुणगा. ॥ ८
करिते झाले ज्याच्या कीर्तिसुखें [8]शंभुसेचि कपि[9] लास्य[10]. ।
यद्दर्शनेंचि सर्वहि[11] तत्वज्ञ न पाहतीच [12]कपिलास्य. ॥ ९
[13]रुद्रसहस्राब्द करुनि रंजन[14], दे शेवटीं सुपद[15] विश्वा; ।
किं[16] बहुना ? पाववीला जेणें यतिपतिमता सुपदवि श्वा[17]. ॥ १०

रामानें दक्षिणसमुद्रावर सेतु बांधिला त्यास अनुलक्षून हें वर्णन आहे. रामचंद्रानेंच जगांत पहिला सेतु येवढ्या प्रमाणावर बांधिला. दगडांनीं आपला धर्म सोडून अन्य धर्म घेतला म्हणून **तद्गुण** अलंकार होय. **विरोध**ही आहे.

१. रावण मात्र सात्विक भाव धारण केल्याशिवाय राहिला ! अतएव तो जड दगडापेक्षांही अप्रबुद्ध नव्हे काय ? २. रामांनीं जे शेंकडों अश्वमेध केले त्यांस तुला (साम्य)च नाहीं. ३. साकेतपुर (अयोध्या नगरी) ही यज्ञ आणि वेद यांचें जणुं काय गुरुकुलच बनली होती 'गुरुकुल मुख श्रुतीचें' असा पाठभेद. ४. ब्रह्मदेवास. ५. तरण्याताठ्या अर्थात् पुंड लोकाची गोष्ट तर राहूं द्या, पण क्षुद्र प्राणी कसे वागत होते तें सांगतों. ६. 'चिरटें पिसवाहि न वपु ढेंकुण गा' असाही पाठ आढळतो. दुसरा आणखी एक पाठ आहे तो असाः—'चाविति सर्व पिसाचांहि न वपु ढेंकुण गा !' ७. लपविलेलें द्रव्य. कृपणाची नव्या कुणग्यावरची प्रीति प्रसिद्धच आहे. रामाचे प्रेमाला ही उत्तम **उपमा** होय. ८. शंकर हे नृत्य व लास्य या कलांचे आदिगुरु होत. शिवाय रामकीर्तीनें शंभूला अत्यंत आनंद होऊन त्यांनीं नाचायास लागणें साहजिकच होय. ९. वानर. १० नृत्य. लास्य हा शब्द स्त्रियांचे नृत्यास लावितात. ११. 'यद्दर्शनेंहि सर्वेहि' असा पाठभेद. १२. कपिल+आस्य=महायोगी कपिल ऋषीचें मुख. १३. अकराहजार वर्षें. १४. 'रंजयतीति राजा.' राज्य करून, असें सुचविलें. १५. मुक्ति, वैकुंठवास. १६. फार काय सांगावें ? १७. कुत्रा. श्रीरामचंद्र राज्य करीत असतां, वादी आणि प्रतिवादी न्याय मिळविण्यासाठीं महाद्वारावर आले असें फारच क्वचित् होत असे. असें राज्य सुरळीत चाललें होतें. परंतु एकदां एका श्वानाचा वाद असल्यामुळें तो महाद्वारीं येऊन उभा राहिला. त्या प्रकारणाची चौकशी रामानें केली, तेव्हां असें आढळून आलें, कीं त्या कुत्र्याच्या समोरून रस्त्यानें जात असलेल्या एका यतीनें, हा आपणास चावावयास येत आहे असें समजून, त्या कुत्र्यास दंडानें ताडण केलें होतें. त्या यतीस शासन काय

गेला ऐसाहि प्रभु. बा ! करिसी शोक काय तोकाचा ? ।
सोनें हगो, मुतो; जो स्वजना दे शोक काय तो कोचा ॥ ११
भूप [6]भगीरथ होता जो शत्रूंतेंहि सुगति दे वधुनी. ।
ज्यासि म्हणे, 'त्वत्पुत्री मी' ऐसें नमुनि सुगतिदे वधुनी ॥ १२
उगमापासुनि सागरसंगमपर्यंत [12]इष्ट-काम-हिता ।
[13]गंगाचयनें रचिलीं कनकाच्या करुनि [14]इष्टिका महिता. ॥ १३
यज्ञांत दक्षिणा दे विप्रांला भूप [15]भूपसुतकन्या. ।
[16]अन्या न घडायाचें, घडलें हें दान त्याचि अतिधन्या. ॥ १४
विप्रांसि [17]सहस्रांचें कन्यांच्या दे सहस्रें तो भूप; ।
आच्छादिलें जयांचें दिव्यांबररत्नभूषणें [18]रूप. ॥ १५
[19]प्रतिकन्याकनकरथीं, जोडियले चार, नव, चतुर गमनीं; ।
कैंची [20]कशा ? [21]प्रतोदहि ? साहति 'हूं' हेंहि[22] न वच [23]तुरंग मनीं.

करावें असें रामानें त्या श्वानास विचारिलें. तेव्हां श्वान म्हणाला, कीं ह्या यतीस अल्पकालपर्यंत कुलपति (एखाद्या ग्रामाचा अधिकारी, अर्थात् कुळकर्णी) करा म्हणजे झालें. त्याप्रमाणें रामानें यतीस दंड करून, श्वानास मार्गस्थ केलें—अशी कथा आहे. कुळकर्णीपणाचें काम यतीस अयोग्य, म्हणून हा त्यास दंडच होय—असें तात्पर्य. जेणें यतिपतिमता (यति-श्रेष्ठाला मान्य असलेला) श्वा (कुत्रा) सुपदवी (थोर पदाप्रत, मोक्षाप्रत) पावविला (पोंचता केला, पाठविला)—असा अन्वयार्थ.

१. सर्व जगाचा उद्धार करणारा. पुढें **अर्थापत्ति** आहे. २. बालकाचा. ३. 'सोनें हगे मुते जो' असें पाठांतर. ४. शरीर, देह. ५. कच्चा, क्षुद्र. ६. भगीरथ हा सूर्यवंशीय राजा. यानेंच पृथ्वीवर भागीरथी आणली. अति प्रयत्नास 'भगीरथ प्रयत्न' म्हणतात. कारण भागीरथी आणण्यास त्यास अतोनात श्रम पडले होते. ७. उत्तम गति, मोक्ष. ८. हा **विरोधाभास** पहा. ९. तुझी कन्या मी. १०. संथ चालणारी (?) ११. भागीरथी. १२. इष्ट मनोरथाची हितकर्त्री. १३. चयनें=स्थंडिलें. अगर घाट. (महाभारतटीका.) १४. विटा. १५. राजांचे मुलगे व मुली व राजे सुद्धां ! १६. दुसऱ्याच्या हातून असलें दान होणें अघटितच. १७. सहस्रांचे सहस्र=दशलक्ष कन्या ! काय कन्यादानें हीं ? १८. शरीर. अगर ज्यांच्या स्वरूपापेक्षांही अति सुंदर व अति तेजस्वी वस्त्रभूषणें होतीं म्हणून त्यांचें रूप (सौंदर्य) झांकून गेलें. १९. दरएक कन्येच्या सुवर्णरथाला. २०. चाबूक. २१. आरी. २२. ते घोडे इतके चपल असत कीं, त्यांस मनांत सुद्धां कोणीं 'हूं' म्हटलेलें खपत नसे ! मग चाबुकाची किंवा पराणीची अगर जेरबंदाची गोष्ट कशाला ? **आक्षेप** अलंकार. २३. घोडे.

एका एका रत्नध्वजभूषितकन्यकारथामागें ।
शत शत सुमणिसुवर्णस्वंबरधर[1] गज दिले महाभागें. ॥ १७
[2]नागानागामागें कांचनमाली सहस्र दे [3]वाजी. ।
तें [4]हरिहरां म्हणति कवि, 'तुमचें देणें अनंत देवाजी !' ॥ १८
वाजीवाजीमागें शत [5]सवत्सा [6]यथोक्त दे गाई ।
[7]विप्रसती म्हणति, 'शिवे ! ऐसेंचि सदा [8]कथोक्त दे[9]ऽगाई !' ॥१९
गाईगाईमागें जें, वर्णूं काय किति [10]अंजाविक तें ? ।
हें साधुभाग्य घेइल विश्वस्रष्ट्याहि[11] त्या अजा [12]विकतें. ॥ २०
ऐसाहि [13]भूरिदक्षिण यज्वा, राजा भगीरथ [14]न रहि ।
राहेल कसा त्वत्सुत ? [15]कवणा न स्पर्शली गति नरा हे ? ॥ २१
देवर्षि म्हणे, 'होता सत्पालक विष्णुचा दिलीप[16] गडी;' ।
जेणें [17]अप्रणतांच्या न शिरीं शाश्वत उरों दिली [18]पगडी. ॥ २२
यत्सुपदासीं [19]हरिच्या मैत्री संपादिली पदानें हो ! ।

---

१. सु+अंबर+धर=उत्तम वस्त्रें, (सु+मणि) उत्तम रत्नें, (सुवर्ण) उत्तम सोनें धारण करणारे. २. प्रत्येक गजामागें (सुवर्णमालायुक्त सहस्र अश्व). ३. अश्व, घोडे. ४. विष्णु व शंकर या देवतांची उपासना भगीरथानें केली होती म्हणून कवी त्या देवांस आळवून सांगतात. ५. वत्सांसह. ६. यथा+उक्त=शास्त्रांत जशा सांगितल्या तशा कपिलादि. ७. ब्राह्मणस्त्रिया. ८. कथेंत सांगितल्याप्रमाणें. ब्राह्मणांस सवत्स धेनूंची फार आवड असतेच. ९. दे+अगाई. येथें यमकासाठीं पंतांस ओढाताण करावी लागली आहे. १०. शेळ्यामेंढ्यांचा कळप. ११. सृष्टि उत्पन्न करणाऱ्या ब्रह्मदेवास. १२. विकतें घेईल=विकत घेईल, असा अर्थ दिसतो. १३. बहुत दक्षिणा देणारा. १४. जिवंत राहिला नाहीं ! पुनः **अर्थापत्ति** आहे. १५. सगळ्यांची हीच गति, असा काक्वर्थ. **अर्थान्तरन्यास** आहे. १६. येथून दिलीपकथेस आरंभ झाला. विष्णूचा गडी, विष्णूचा दास किंवा प्रियमित्र. 'गण'पासून 'गडी' हा शब्द निघाला म्हणतात. सूर्यवंशाचा स्थापक इक्ष्वाकु त्याच्या वंशांतील दिलीप हा प्रसिद्ध राजा. १७. अप्रणत=उद्धत. नमस्कार करण्यास शिर वांकवावें लागतें. नमस्कार न करणाऱ्या उद्धत लोकांस इतकें नम्र केलें, इतकें त्यांस वांकण्यास लाविलें, कीं त्यांचीं शिरोभूषणें नेहमींचींच खालीं पडलीं ! **पर्यायोक्ति** आहे. १८. पगडी उरों न दिली=पागोटें राहूं दिलें नाहीं, नम्र केलें. हा शब्दसमूह कोशकारांनीं लक्षांत ठेवण्यासारखा आहे. १९. इंद्राच्या पदानें त्याची मैत्री संपादिली ! **प्रतीप** होय. राजाचें ऐश्वर्य केवढें होतें पहा.

सुर[1]निळयरत्नसानुहि पावे कंपा दिलीपदानें हो ! ॥ २३
यज्ञांत दक्षिणा वसुपूर्णा[2] वसुधा दिली पहा नमुनी ! ।
ऐसें हें अत्यद्भुत गाती प्रेमें दिलीपदान मुनी[3]. ॥ २४
शतमन्यूपें[4] जो प्रभु मान्य, जसा व्यजनवायु वायूपें[5]. ।
ज्याच्या, लाजविला विधु सुदृगाहत[6] भजन वा युवा, यूपें[7]. ॥ २५
असति कनकमय वेदी, मंडप, यूपहि; परंतु[8] हेमाचे ।
यज्ञवाटवाटहि[9], ज्यांत निजुनि नृपहि[10] म्हणति हे मांचे[11]. ॥ २६
सुर शिवसे देखति ज्या करित्या सुखवृष्टिच्या[12] दिलीपातें ।
दूरुनि विलोकित्यांहि स्वर्गति यद्दृष्टिच्या दिली पातें[13]. ॥ २७
ज्याचें रथचक्र[14] जळीं न बुडे, आत्मज्ञमन[15] जसें भवनीं. ।
कृपण जसा वित्ताच्या[16] सत्याच्या अति निविष्ट[17] जो अवनीं. ॥ २८

---

१. देवांचा स्थानभूत रत्नशिखर मेरु. तो सुद्धां दिलीपाच्या दानानें कंपित झाला ! **प्रतीप** अलंकार आहे. २. संपत्तीनें पूर्ण. 'द्रव्यं वित्तं स्वापतेयं रिक्थमृक्थं धनं वसु' इत्यमरः. वसुधा=पृथ्वी. ३. ब्रह्मचिंतनांत निमग्न झालेले ऋषीही प्रेमानें हें अत्यद्भुत दान गाऊं लागले. 'मुनी'शब्द सहेतुक आहे. विचार करणारे लोक सहसा विकारवश होत नाहींत. ते येथें झाले हें सुचविलें आहे. ४. इंद्रापेक्षां. मन्यु=यज्ञ. 'मन्युर्दैन्ये क्रतौ क्रुधि' इति विश्वः. इंद्रापासून त्रास होतो. दिलीपानें संतोष दिला—हें सुचविलें. ५. महावायूपेक्षां. कारण व्यजनवायु संतोष देतो. ६. (चंद्रपक्षीं) चांगल्या दृष्टींनीं स्वीकारिलें आहे भजन ज्याचें असा; (युवापक्षीं) सुलोचना स्त्रियांनीं ज्याच्या सेवेचा आदर केला आहे असा. 'सुदृगादृतभुज नवा युवा' असा आदर्शप्रतींत पाठ होता. **प्रतीप** आहे. यूपाची तेजस्विता व उन्नति सांगितली. ७. ज्याच्या यज्ञस्तंभानें. ८. इतकेंच नव्हे परंतु. ९. ज्याच्या यज्ञशालेची वाट 'वाटः पथि' इत्यमरः. १०. काय अलोट संपत्ति ही ? **उदात्त** अलंकार आहे. 'उदात्तं वस्तुनः संपत्' (काव्यप्रकाश.) ११. 'मंचका'पासून मराठींत 'माचा' असा शब्द झाला. १२. सुखाचा वर्षाव करणाऱ्या दिलीपास देव हे शिवा-प्रमाणें (मंगलदायक देवेश्वराप्रमाणें) लेखीत. देव नुसती वृष्टि करितात. दिलीप सुखाचा पाऊस पाडित असे ! देवांहून श्रेष्ठता वर्णिली म्हणून **व्यतिरेक** अलंकार. १३. ज्याच्या दृष्टीच्या पतनानें, नेत्रकटाक्षानेंच जो लांबच्या मनुष्यांस ही स्वर्गति देई. संतसंमतीनें सुख मिळतें. येथें नुसत्या नेत्रकटाक्षांनींच काम होत आहे ! काय पुण्यशीलता ही ! १४. विरोधाभासमूलक **अतिशयोक्ति**. १५. ब्रह्मज्ञान्याचें मन संसारांत बुडत नाहीं तसें. **उपमा** आहे. १६. द्रव्याच्यां. १७. रक्षणीं तत्पर. ही कृपणाची **उपमा** त-त्परता व दक्षता दाखविण्यास उत्तम असते.

कवि वदले, 'नेत्रांहीं कर्णांहीं लोकहो ! दिलीपा प्[1]या.' ।
पुण्यश्लोकें रामें सद्गति [2]जेणें तसी दिली पा[3]प्या. ॥ २९
[4]स्वाध्यायज [5]चापगुणज 'खा' 'जेवा' 'प्या' असे, जसे अब्द ।
तैसे, उदार ज्याच्या सदनीं हे [6]पांच न जिरती शब्द. ॥ ३०
मेला असाहि; ज्याचें अरिला [7]लिहिलेंहि दे [8]वपु त्रास; ।
कां आठवूनि शोचिसि ? रे सृंजय ! [9]मनुजदेव ! पुत्रास.' ॥ ३१
नारद म्हणे, 'वियोगें पुत्राच्या पावलासि कष्ट महा; ।
तरि परिस, सांगतों तुज शोक सराया [10]समर्थ अष्टम हा:-॥ ३२
नृपति युवनाश्व होता, गेला मृगयार्थ तो वनीं दूर; ।
तेणें श्रांतें, तृषितें, [11]ऋषिसत्रींचा विलोकिला धूर. ॥ ३३
सत्रीं शिरोनि, न पुसे देउनि एकाहि हाक विप्राशी ! ।

---

१ प्रत्यक्ष दर्शनानें व कीर्तिश्रवणानें सुख सेवन करा. प्राशन करा. २. दिलीपानें. ज्यांच्या विरुद्ध शत्रूंस ब्र सुद्धां काढितां येत नाहीं, ते पुण्यश्लोक होत. अथवा 'पुण्यदायकः श्लोको यशश्चरित्रं वा यस्य.' ३. पापी लोक सुद्धां पुण्यवंत झाले. 'आपणासारिखे करिती तात्काळ । नाहीं काळ वेळ तयां लागीं ॥' ह्याचा हाच अर्थ. रामाची उपमा समर्पक होय. ४. वेदघोषापासून उत्पन्न झालेला. ५. धनुष्कोटीपासून झालेला. ६. वेदांचा घोष, धनुष्यांचा टणत्कार व खा, प्या, उपभोग घ्या, असे एकंदर पांच प्रकारचे औदार्यसूचक शब्द ज्याच्या राज्यांत कधींही नाहींसे झाले नाहींत. [पंच शब्दा न जीर्यन्ते खट्वाङ्गस्य निवेशने । स्वाध्यायघोषो ज्याघोषः पिबताश्नीत खादत ॥] सारांश, वेदघोष चालला आहे, शत्रूचा संहार चालला आहे, व प्रजेस जेथें सर्व प्रकारचें सुख आहे, अशा प्रकारचें दिलीपाचें राज्य होतें. 'विरती' असाही पाठ आहे. The sun never sets on the British Empire ही महाराणीसाहेब यांच्या अतिविस्तृत राज्याचें सामर्थ्य दर्शविणारी उक्ति व वरील उक्ति ह्या ताडून पहाव्या. ७. चित्रांत लिहिलेली मूर्ति, चित्र. ८. नरपते ! ९. सारांश, कोठें तुझा पुत्र आणि कोठें दिलीप राजा, कीं जो मेल्यावरही आपल्या चित्रानें पापी लोकांस भिववीत आहे ! १०. पराक्रमी राजाची आठवी गोष्ट सांगतों. युवनाश्वपुत्र यौवनाश्व राजाची गोष्ट येथून सुरू होणार. यासच 'मांधाता' हें नांव आहे. ११. यज्ञप्रारंभापासून यज्ञ संपेपर्यंत जो अवधि त्यास 'सत्र' म्हणतात. १२ पासून १०० दिवसपर्यंत हें 'सत्र' चाले. सत्र म्हणजे Session !

[1]भाविबळें स्वार्थचि, मुनिसाधितपृषदाज्य हा कवि प्राशी. ॥ ३४
तत्काळ गर्भवान् नृप होउनिया, होय सभय, [3]सत्रप, 'हा; ।
[4]पृषदाज्यपानसंकट जाणुनि वदले समस्त [5]सत्रप [6]हा !' ॥ ३५
भेटुनि युवनाश्वाला, हांसोनि म्हणे [7]सदेव वासव, 'हो ! ।
हें संकट हरितों, परि सांगुनि पुत्रासि [8]यजवा [9]सव हो ! ॥ ३६
वैद्यांकरवीं तदुदर, व्हाया गर्भासि वाट, तो चिरवी; ।
या कर्मे [10]बहुकरही [11]द्विकरसुतन्यून वाटतोचि रवी. ॥ ३७
काढुनि उदरांतुनि शिशु, मोहांतुनि नृपहि, [12]तूर्ण बाहेर. ।
शक्रासि [13]दस्र म्हणती, 'केला [14]आदेश पूर्ण, बा ! [15]हेर.' ॥ ३८
शक्र म्हणे, 'युवनाश्वा ! करिताहे उर्वशीहि बा ! [16]लास्य. ।
ऊठ सख्या ! नेत्रांहीं प्याया [17]पीयूषपूर [18]बालास्य.' ॥ ३९
अमर म्हणति, 'कां [19]धास्यति ?' तों '[20]मां धाता' असें म्हणे शक्र; ।
घाली अंगुलि वदनीं, तीहि [21]अमृत, जेंवि [22]गोपिकां [23]तक्र. ॥ ४०
'मांधाता' शक्र म्हणे; झालें [24]तन्नाम तेंचि गा ! राजा ! ।

---

१. पुढें होणार त्याच्या योगानें. 'भावि चेन्न तदन्यथा' 'भवति च भाव्यं विनापि यत्नेन.' सारांश नशीबीं लिहिलें होतें त्या अन्वयें आपली तृषा शांत व्हावी यासाठीं. बळें स्वार्थचि भावी, म्हणजे आपलें हित होईल, आपली तृषा हरेल, असें भावी (उपाय योजी), असाही अर्थ होईल. युवनाश्वानें न विचारतां आपलें आपणच आदरातिथ्य करून घेतलें, यावर कवीनें छान तोड काढिली ! २. अभिमंत्रित आज्य. ३. सलज्ज. ४. अभिमंत्रित आज्य प्याल्यामुळें उत्पन्न झालेलें संकट. पुत्रप्राप्तीसाठीं तें आज्य अभिमंत्रित होतें. ५. सत्र+प=ऋत्विज, याज्ञिक. ६. 'हा हा कष्ट.' ७. देवांसह ८. पुत्राकडून यज्ञ करवा. ९. अश्विनीकुमारांकडून. ह्या शस्त्रविद्येचा भारतांतही उल्लेख आहे. कालवशात् सर्व शास्त्रें नष्टप्राय झालीं, त्यांतच आमच्या अज्ञानानें हेंही शास्त्र नष्ट झालें. पुढील कौशल्य पहा. १०. बहुत किरण (हस्त) ज्याचे असा सूर्य. **प्रतीप** आहे व **दीपक** आहे. ११. होणारा जो द्विकर पुत्र त्याहून न्यून रवी. १२. त्वरित. १३. अश्विनीकुमार. 'नासत्यौ अश्विनौ दस्रौ' इत्यमरः. १४. आज्ञा पूर्ण केली. १५. पहा. १६. स्त्रीनृत्य. १७. अमृतपूर. १८. पुत्रमुख. **पर्यायोक्ति** आहे. 'अमृतं गृहबालकम्.' १९. 'कां धास्यति'=कोणाचें पान करील ! २०. मां धाता=माझें पान करील. २१. दुग्धस्वरूपी. २२. गोकुळांतल्या गोपींना (गोपांगनांस). २३. ताक. भोजनान्ते किं पेयं ? 'तक्रं.' २४ त्याचें नाम.

बत्कीर्ति सुखा देती पीतां, [1]वष्रा जनासि गारा, [2]ज्यां. ॥ ४१
झाला श्रुतिशास्त्रनिपुण, तरुण, [3]सुभटहि भरतां दिवस तीस ! ।
[4]दिवसांतचि तो विजयी जिंकुनि देवासुरा[5]दिवसतींस. ॥ ४२
[6]विषयीं प्रथम शिरावें, जैसें पावोनि यौवना [7]श्वानें. ।
ऐशी [8]जंतुस्थिति; परि वरिलें [9]शुचि शील यौवनाश्वानें. ॥ ४३
गमला मूर्त [10]घटजकर [11]परनृपबलसिंधुपतित मांधाता, ।
ज्यातें निर्मुनि पावे कीर्ति त्रिजगांत [12]अतितमा [13]धाता. ॥ ४४
'यद्राजसूयहय[14]मखशत' म्हणति 'अपूर्व !' अमरही, राजा ! ।
भंगावया न शकले पर[15]नृपमणि, करुनि समर, [16]हीरा ज्या. ॥ ४५
विश्वहि, शतदां पावुनि ज्याचें तें यज्ञ[17]पुण्यपर्व, तरे; ।
घृतमधुदुग्धनदीशत ज्यांत बहुत ते [18]सदन्नपर्वत रे ! ॥ ४६
जो जो [19]गयादि होता समरीं, जिंकी [20]पराक्रमांधा त्या. ।
आलेंचि मरण बापा ! सृंजयराया ! अशाहि मांधात्या. ॥ ४७
भाग्यें, शौर्यें, ज्ञानें, जो विश्वाधिक, असाहि [21]तो मेला. ।

---

१. उन्हाळ्यांतील वळवाच्या पावसांत गारा कोण खात (पीत) नाहीं ? 'करका'शब्दाचा 'गारा' हा अपभ्रंश दिसतो. २. ज्या सुखाला. ३. उत्तम योद्धा. ४. एका दिवसांत ! ५. देव आणि दानव यांचीं स्थानें. ६. रतिसुखांत, प्रापंचिक सुखांत. कुत्र्याच्या विषयसेवनाची निर्भर्त्सना भर्तृहरि–वैराग्यशतकांत फार चांगली केली आहे. ७. कुत्र्यानें. ८. प्राणिमात्राची हीच गति. 'आहारनिद्राभयमैथुनं च समानमेतत्पशुभिर्नराणाम्.' **अर्थांतरन्यास** व **उपमा** अलंकार. **विरोध**ही आहे. ९. शुद्ध. १०. अगस्तीचा हात. ११. शत्रुसेनासागरामध्यें पडलेला. **उत्प्रेक्षा** आहे. १२. अतिशयित. १३. ब्रह्मा. मांधाता निर्माण केल्याबर धात्याची कौशल्यमूलक कीर्ति प्रसिद्ध झाली. पर्यायोक्तीनें हा सर्वांगसुंदर होता, असें ध्वनित केलें आहे. १४. ज्यानें केलेले शंभर राजसूय व अश्वमेध यज्ञ. १५. शत्रुपक्षीय नृपश्रेष्ठ. १६. हिऱ्याला. 'हिरा ठेवितां ऐरणीं । वांचे मारितां तो घणीं ॥' ही तुकारामोक्ति वरील चीजर्थाचें स्पष्टीकरण करिते. १७. पुण्यकालपर्वणी. १८. उत्तमान्नाचे गिरी. **अतिशयोक्तिमूलक रूपक** आहे. रूपक भोजनबंधूंस मनोहर खरें ! मूळभारतांतील वर्णन पहावें. १९. नामविशेष. जनमेजय, सुधन्वा, गय, पुरु, बृहद्रथ अशा राजांची आदिशब्दानें गणना होते. गयाची कथा पुढें आली आहे. २०. पराक्रममदानें अंध. २१. मांधाता.

ऐकसि कीं ? कां शिशुच्या शोकें त्वन्मुखशशांक कोमेला ? ॥४८
होता असाचि हरिच्या जो सुगुणें उतरला ययाति तुकीं. ।
वदले कवि, 'सत्कर्में, सुयशें, जीं; तीं वेशें जया सिद्धीं.' ॥ ४९
वज्रधरासहि बहुभयदायक यत्पाणिवर्तिकुश नीकीं, ।
तो ज्यांचा श्वशुर असुरपतिवृषपर्व्यासमेत उशना कीं. ॥ ५०
ज्याच्या प्रसूस परिसुनि, 'धन्य' म्हणे देवराजसू 'यश तें;' ।
'कीं तो यजिला झाला हयमेधशतें सराजसूयशतें. ॥ ५१
बहुधा घडलें नुरवी तिल जें अघ वाजपेयशत, मा यें. ।
यत्त्रासें बहु 'हरिहर' नामें मघवा जपे, यश तगाया ! ॥ ५२
अरि यत्समरीं, हरिच्या जेंवि शिरःपुंडरीकद शश, तरे; ।
दशशत 'अतिरात्र' करी जो विधिनें 'पुंडरीक' दशशत रे ! ५३
सत्रें 'चातुर्मास्यें' त्यांची संख्या बरी कथावि किती ? ।
स्वल्पचि रसिक मत वदति. बहुत लिहुनि काय कवि कथा विकिती?

एक एक गुणच त्याला विश्वापेक्षां मोलवान् करणार. येथें तर इतके आहेत. समुच्चयालंकार.

१. तुझा मुखचंद्र. २. सुकला. ३. येथून ययातीचें उपाख्यान सुरू होतें. तुकीं उतरला=तुलना केली असतां बरोबर भरला. इंद्राच्या तोडीस उतरला असा भाव. हरि= इंद्र. ययातीचें आख्यान प्रसिद्धच आहे. (मोरोपंत-आदिपर्व-अध्याय ११ पहा). ४. स्वाधीन, नम्र. सारांश चारही पुरुषार्थ यास साध्य झाले होते. ५. इंद्रास. ६. ज्या शुक्राच्या हातांतील दर्भ. काय शुक्राचें भय इंद्रास होतें हें ! ब्राह्मणाचा दर्भ वज्रधराला सुद्धां असह्य आहे ! **विरोधाभास** आहे. ७. स्वर्गी. ८. तो उशना, शुक्र. 'शुक्रो दैत्यगुरुः काव्य उशना भार्गवः कविः' इत्यमरः. ९. आईस. १०. देवराज (इंद्र), त्याची माता अदिति. ११. कारण इंद्रानें केवळ शंभर अश्वमेध व शंभरच राजसूययज्ञ केले होते ! १२. पाप. १३. यज्ञविशेष. हें यज्ञशत घडलेल्या पापांपैकीं एक तिळभर सुद्धां शिल्लक ठेवित नव्हतें. १४. या ययातीला. **प्रतीप** अलंकार आहे. १५. ज्याच्या भयामुळें इंद्रानें शिवविष्णूंच्या नांवाचा जप करून, आपलें पद व यश कसें तरी राखिलें. 'काय असे बहु ? हरिहरनामें'—असाही पाठ आहे. १६. इंद्र. १७. ज्या ययातीच्या युद्धांत. उपमा गोड आहे. १८. सिंहाच्या. १९. शिरकमल दणारे. २०. यज्ञविशेष. २१. यथासांग. २२. रसिक (रसज्ञ) पंडितांचें समाधान करण्यास लहानसेंच काव्य पुरें होतें. पंत विचारतात, 'इतका पुष्कळ कथाविस्तार करून लोक सांगतात तरी

भूमंडल विप्रकरीं, करुनि [1]ब्रह्मस्व वेगळें, दे [2]हो. ।
आधीं राज्यश्री, मग वरुनि तपस्या, म्हणे 'गळें [3]देहा !' ॥ ५५
जें [4]हिमहेममहीध्रीं क्रीडे बैसोनि [5]देवयानीं, तें ।
नृपरत्न क्षण रडवी, करुनि [6]विरक्तीस, देवयानीतें. ॥ ५६
ऐसाहि प्रभु मेला, 'बरवा तुजपरिस जो [7]चतुर्गुण गा ! ।
गुण गाउनि पुत्राचे काय रडसि ? शुद्ध [8]शंभुचे गुण गा. ॥ ५७
नृप [9]अंबरीष होता; यत्पितृसंबंधि नाम नाभागः ।
जो नित्य म्हणे, 'न विषयभजनें [10]हरिनतिविना मना ! भाग. ॥५८
क्षितिस प्रजा, प्रजेस क्षितिहि, म्हणे, '[11]सुगुण-सद्म-नाभागा ।
आम्हांकरितां [12]करिता जो [13]सदय, तयाचि [14]पद्मनाभा गा.' ॥ ५९
परिपालिल्या प्रजा बहु जैशा [15]भगिनी, सुता, सुना, भाच्या; ।

काय ?' सारांश, द्रव्याकरितां लोक ग्रंथविस्तार करितात; हा पंतांचा अभिप्राय दिसतो. ग्रंथविस्ताराचें भय पंतांस केवढें होतें हें दाखविण्यास हें विधान उत्तम आहे. पण विस्तार करून लिहिणाऱ्यांवर त्यांनीं जो कोरडा ओढला आहे, तो नेहमीं वस्तुस्थितीस धरून असतो असें नाहीं.

१. ब्राह्मणास दिलेलें धन, दक्षिणा. २. ययाति. ३. देहत्याग करून मुक्तीस गेला. आधीं संसार व नंतर तपश्चर्या हा पूर्वींचा मोक्षमार्ग दिसतो. ४. हिमालय व मेरुपर्वत यांवर. ५. देवांच्या विमानीं. येथें ययातीचे विहार सांगितले. सुखोपभोगानें शांति होईना तेव्हां ययाति वैराग्यशील झाला. देवयानीस रडूं येणें साहजिक आहे. ६. विरक्ति=कामक्रोधादि विकारांच्या स्वाधीन नसणें, उदासीनता. ७. चौपट गुणी. ८. शंकर वैराग्याविषयीं प्रसिद्धच आहेत. ९. येथून अंबरीषाचें उपाख्यान लागलें. हा नाभाग राजाचा मुलगा. १०. ईश्वरनमनाशिवाय. हरीला शरण गेल्याशिवाय राहूं नको. विषयोपभोगामध्यें हे मना ! व्यर्थ भागूं नको (थकून जाऊं नको.) ११. सद्गुणांचें माहेरघर जो नाभाग, त्याला आम्हांसाठीं उत्पन्न करणारा जो सदय पद्मनाभ, त्या पद्मनाभालाच गा ! १२. उत्पन्न करणारा. १३. दयाशील. कारणाची स्तुति करून कार्य उत्तम आहे असें सुचविलें आहे. म्हणून **अप्रस्तुतप्रशंसा** आहे. १४. विष्णूला. १५. प्रजेस बहिणींप्रमाणें, मुलींप्रमाणें, सुनांप्रमाणें व बहिणीच्या मुलींप्रमाणें वागविलें. या सर्वांचा एका ओळींतच निर्देश पाहून मुली झाल्या म्हणजे नाकें मुरडणाऱ्या व 'सासुरवास' हा शब्द सार्थ करणाऱ्या लोकांच्या मनांत पंतांच्या स्त्रीदाक्षिण्याविषयीं आदर उत्पन्न झाल्यावांचून राहाणार नाहीं.

जेणें[1] आशीराशी वरिल्या, मर्दूनि खल, [2]सुनाभाख्या. ॥ ६०
अरिराजसहस्रांचें जिंकुनि सहस्र, जो सदय न [3]वधी; ।
[4]शरणागताभयव्रत सोडुनि [5]सुकुलज कशी करिल नव धी ? ॥ ६१
न[6] सुवेशीं ज्याच्या [7]मखविप्रोच्छिष्टान्नवसुवास [8]वंदे. ।
[9]हा एकींहि सवीं, तें हयमेधशतींहि न [10]वसु [11]वासव दे. ॥ ६२
[12]यज्वे [13]वदान्य राजे [14]सपरिच्छद लक्षसंख्य, विप्रकरीं ।
दिधले; यज्ञांत जसे पशु द्यावे ! ख्यात हें [15]कविप्रकरीं. ॥ ६३
येथें सर्वहि पहिला संपन्न [16]गणेशदेव दोंदानें, ।
बा ! अन्नदान एकचि ज्याचें, दुसरीं न दे वदों दानें. ॥ ६४
[17]मूर्धाभिषिक्तदानें तो [18]दे तैशीं सदा [19]नगजदानें; ।
किति सांगों ? दिधलीं हयगोदानें त्या [20]सदानगजदानें. ॥ ६५

१. आशीर्वादाच्या राशी. २. सुदर्शन हें विष्णूचें चक्र. त्याकरवीं अनेक खलांचा संहार होतो. त्या चक्राचें काम अंबरीषानें केलें म्हणून तें आशीर्वाद देतें झालें. ३. राजकुलांतील अगर श्रेष्ठवर्णांतील शत्रूंस जिंकलें असतां त्यांचा वध न करण्याची पद्धति ग्रीस व रोम येथेंही होती. अर्थातच दयेचा अंकुर उत्पन्न झाल्यावांचून ही गोष्ट होणें शक्य नाहीं. ४. शरण्यास अभय देण्याचें व्रत सोडून. ५. उत्तमकुलोत्पन्न. उत्तम कुलामध्यें जन्म झाला असला म्हणजे कित्येक गोष्टी साहजिक रीतीनेंच मिळतात. नव धी=नवी बुद्धि, विलक्षण प्रकार. शरण आलेल्यास मरण द्यावयाचें नाहीं ही शिष्टजनरीतच आहे. **अर्थान्तरन्यास** अलंकार आहे. ६. अमृताशीं बोलेना. ७. यज्ञांतील ब्राह्मणांच्या उष्ट्या अन्नाचा नूतन सुवास. ८. अंबरीष. ९. एकाच यज्ञांत हा द्रव्य देई तितकें इंद्रास शंभर अश्वमेधांतही देतां येत नसे ! **प्रतीप** अलंकार आहे. दानप्रकार पुढें वर्णिलाच आहे. **उपमा**ही पाहण्यालायक आहे. १०. द्रव्य. ११. इंद्र. १२. यज्ञ करणारे. १३. उदार. १४. लव्याजम्यासह. १५. काव्यकुशल कवींच्या ग्रंथांत हें प्रसिद्ध आहे. १६. येथें सर्वहि पहिला (सर्व ठिकाणीं प्रथमतः स्मरण करितात ज्याचें) असा दोंदानें संपन्न (लंबोदर) गणपती हा, ज्याचें (ज्या अंबरीषाचें) एक अन्नदानच वदों दे (सांगूं देतो). दुसरीं (अन्यदानें) न. मोदकप्रिय गणपती अन्नदानवर्णनास मात्र अनुकूल होता. विद्येचा स्वामीही तोच. तेव्हां अन्नाव्यतिरिक्त इतर दानवर्णनें कवींस करूं देईना. १७. पट्टाभिषिक्त राजदानें. १८. दोन्ही दानांकडे 'दे' याचा संबंध आहे. १९. हत्तींचीं दानें (नगज=हत्ती). २०. सदान+गज+द=मदोन्मत्त हत्ती देणारा जो अंबरीष त्यानें (दान=हत्तीच्या गंडस्थळांतून श्रवणारें मदोदक).

प्रमुदित विप्र [1]पहाया यशचमत्कार अंबरीख रची. ।
इतरीं धन, नग्नजनीं निज अंबर, जेंवि [2]अंबरी [3]खरची. ॥ ६६

'हा पुत्रा !' काय म्हणसि ? काय रडसि ? जो असा [4]अरिसभारी.
मेला तुजपरिस [5]चतुर्गुण गुणवान्; त्वत्सुतापरिस भारी. ॥ ६७

देवर्षि म्हणे, 'राजा ! परिसावा [6]नृपजनेंद्र [7]शशबिंदु; ।
यद्दृष्टिपुढें अरिनृपसिंह [8]तयांचा बलाब्धि, [9]शश, बिंदु. ॥ ६८

[10]त्यां शतसहस्र होत्या [11]सुगुणामृतसिंधु बायका, रांजा; ।
लिहिति 'रतिस्तुति' पूर्वीं मात्रा देऊनि बा '[12]यं'कारा [13]ज्यां. ॥ ६९

पुत्र [14]सहस्रसहस्र [15]स्वसमगुण दिले [16]स्वदारलक्षातें ।
जेणें, कथिलें, 'देणें हें धर्माचें; स्वदार ! [17]लक्षा तें.' ॥ ७०

सुरुचिर, सुशील, सुचरित, [18]साक्षर, ते सर्वही [19]अयुतयाजी, ।
देहं[20] प्राणासि, तसे जे येतां ब्राह्मणां म्हणति 'या जी !' ॥ ७१

---

१. देखाया. विप्रांचा आनंद पाहण्यासाठीं. खालची **उपमा** दानशौर्य प्रकट करिते. २. वस्त्रवान्. ३. देतो. नग्नजनीं=वस्त्ररहित भिकारी. Give to him that needeth. ही दानपद्धतिच प्रशस्त होय. ४. शत्रुसमेचा शत्रु. ५. **अर्थापत्ति आहे.** ६. राजशिरोमणी. ७. राजविशेष. ८. शत्रूंचा. ९. ससा. (ज्यापुढें शत्रु-सिंह, ससे आणि त्यांचा बलसमुद्र, थेंब—असा अर्थ.) **यथासंख्य** अलंकार असून अतिशयोक्तिमूलक **रूपक**ही आहे. १०. त्या राजाला. ११. सद्गुणरूपी अमृताचा सागर अशा असणाऱ्या. १२. 'य' या वर्णास (रतिस्तुतिपूर्वीं 'ये' लिहिती म्हणजे 'येरतिस्तुति,' ती रतीची स्तुति येर (निष्फळ). एका 'ये'नें रतीचें सौंदर्यसर्वस्व 'येर' झालें ! काय कवींच्या शब्दचमत्काराचें सामर्थ्य पहा कीं एका 'य'काराने **श्लेष** होऊन पुनः **प्रतीप** अलंकारही झाला ! १३. बायका. १४. दहा लक्ष. १५. आपल्यासारखेच गुणवंत. १६. आपल्या लक्ष स्त्रियांस. १७. हा स्वतःच्या दारांस उपदेश आहे. धर्मसंबंधी शुद्ध निष्ठा पूर्वींच्या राजांची जबर होती. म्हणूनच त्या वेळचा समाज सुखांत नांदत होता. लक्षा=ध्यानांत ठेवा. हें धर्माचें देणें आहे. मी धर्म करितों म्हणून मला देणें देतां आलें, किंवा धर्माच्या सरक्षणार्थ हें देणें दिलें आहे, अथवा धर्मानें हें दिलें आहे, मला गर्व वाहण्याचें कारण नाहीं. १८. वेदशास्त्रसंपन्न. १९. दशसहस्र यज्ञकर्ते. हीं सर्व मुलांचीं विशेषणें आहेत. २०. देह प्राणाला बोलावतात, त्याप्रमाणें ते ब्राह्मणांस आदरानें बोलावित असत. ब्राह्मण हे विद्येचे प्रतिनिधि, तेव्हां विद्येशिवाय राजे म्हणजे प्राणशून्य कलेवरें होत ! **उपमा** उत्तम आहे.

तितुकेहि अश्वमेधीं विधले, देतांहि सुत [1]नवे दानीं ! ।
[2]कथिला एकहि भावी ऐसा [3]कविलोकनुत न वेदांनीं. ॥ ७२
एकैकसुतामागें शत शत कन्या दिल्या महाभागें. ।
कन्येप्रति शत शत गज, बा ! आइकतां [4]ने या [5]महा भोगें. ॥ ७३
एकैक गजामागें शत शत रथ दे; रथारथामागें ।
शत शत [6]हरि दे; हरिला [7]श्रद्धा, परिसावया कथा, [8]मागें. ॥ ७४
एकैका हरिमागें दशशत ज्या भरिति घट सुधेनु [9]तिघे; ।
ज्यांच्या पयें म्हणावें करुनि अयज्ञोचिते [10]सुंधे, '[11]नुति घे.' ॥ ७५
एकैक धेनुमागें बहु दे जो दानपति [12]अजावि हि रे ! ।
ज्यासि तसे विषय, जसे [13]क्षीरसमुद्रालया अजा [14]विहिरे. ॥ ७६
हयमेधांतीं उरले [15]क्रोशोन्नत अन्नराशि तेरा हो ! ।
[16]कांचनयूपाद्यद्भुतसाहित्याची कथाचि ते [17]राहो. ॥ ७७
ऐसा शशबिंदु न, जो करितां [18]अरिकायहोम, [19]घामेलों; ।

---

१. दिले असते. दुसरे मुलगे झाले असते तर त्यांसही त्यानें ब्राह्मणांना दिलें असतें. २. वेदांनीं अशा एकाही राजाचें वर्णन केलें नाहीं. भावी=खास होणाऱ्या, निश्चयानें जन्म पावणाऱ्या ! ३. कविलोकनुत=कवींनीं (शहाण्या माणसांनीं) व लोकांनीं स्तुति केली आहे असा. हा समास व त्याचा विग्रह विशेष मनोहर आहे. Praised by the classes and the masses. ४. उत्सवास. ५. शिणून जाऊं नकोस. शीण येण्याजोग्या गोष्टी तर खऱ्याच ! ६. अश्व. ७. निष्ठा, विश्वास. ८. ही कथा ऐकण्यास श्रद्धा पाहिजे ती हरीपासून (इंद्रापासून) मागून घे. इंद्राला यज्ञ कोणीं किती केले त्याचा हिशेब ठेवावा लागतो, असा अर्थ दिसतो. ९. तीन घागरी. तिघे, दोघे, चवघे वगैरे विशेषणें सजीवांच्या संबंधानेंच हल्लीं उपयोगांत येतात. १०. अमृताला यज्ञाच्या कामीं निरुपयोगी करून त्याला धेनुपय म्हणूं लागलें, कीं 'आमची स्तुति करण्यास लाग.' अलंकार **प्रतीप** आहे. ११. स्तवन. १२. अजा+अवि=शेळयामेंढ्या. १३. क्षीरसिंधुवासी. १४. झरे. पुल्लिंगी शब्द आहे. **उपमा** योग्य आहे. १५. कोसभर उंच. १६. सुवर्णयज्ञस्तंभादि. १७. विशेष सांगण्याच्या हेतूनें प्रस्तुताचा निषेध केला म्हणजे **आक्षेप** अलंकार होतो. १८. शत्रुदेहाचा होम. कारण असून कार्य नाहीं तेथें **विशेषोक्ति** अलंकार होतो. १९. न घामेला=ज्याला घाम आला नाहीं, जो थकला नाहीं असा.

तोही [1]वृद्धमुनि म्हणति, 'बहु पुसतां काय ? हो ! मघा मेला.' ७८
देवर्षि म्हणे, 'भूपा ! परिस बरें हें सुवर्णन [2]गयाचें. ।
[3]प्रतिहयमेधीं धरि भय अधिकाधिक [4]मणिसुवर्णनग याचें. ॥ ७९
मेळविलें, पुण्य, यश [5]न्यायाचरणें [6]अनंत रायें हो ! ।
केलें शतवर्षें हुत[7]शिष्टान्नाशन [8]अनंतरायें हो ! ॥ ८०
गय, सुप्रसन्न होतां अग्नि, म्हणे त्यासि, 'पावका ! मातें ।
जरि वर देसी, पावसि, [9]या पुरवायासि पाव कामातें. ॥ ८१
वरदा ! [10]वरदानाधिक कांहीं जरि नाठवे दयावेगा ! ।
तरि सद्गुरुप्रसादें [11]यम[12]नियमें पाठ वेद यावे गा ! ॥ ८२
मज [13]अक्षय्य मिळावीं [14]धर्में, न करूनि अन्यहानि, धनें. ।
या सुवरें [15]धन्य जरि न करिशिल, हा दास [16]धन्य हा [17]निर्धनें.॥ ८३
देतां सर्वस्व, सदा श्रद्धा ब्राह्मणपदावरि असावी. ।
[18]शिवमूर्ते ! नाशाया सर्व [19]सुरद्रुममदा, [20]वर असा [20]वी. ॥ ८४

---

१. मार्कंडेयासारखे किंवा बकदालभ्यासारखे चिरंजीव मुनी कोणालाही 'तो मघाच मेला' असेंच म्हणणार ! २. येथून गयराजाची कथा सुरू झाली आहे. ३. प्रत्येक अश्वमेधाचे वेळीं मेरूस भय पडे कीं, आपलें पुष्कळ सुवर्ण व रत्नें खर्च होणार ! ४. मेरु. ५. पंतांच्या दरबारांत न्याय्याचरणाचीच विशेष मातब्बरी होती हें सांगावयास नकोच. ६. पुण्य व यश यांचें विशेषण. ७. हवन केल्यानंतर शिल्लक राहिलेल्या अन्नाचें भोजन. ८. निर्विघ्नपणें. ९. या कामाला (इच्छेला) तृप्त करण्यास पाव. १०. वरदान देण्यापेक्षां ज्यास्त कृपा कोणत्या रीतीनें करावी, हें आठवत नसेल, तर वेद पाठ यावे, असा वर दे–असा भावार्थ. 'वरदानादिक' असाही पाठ आहे. ११. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, परिग्रह अशा पांच नित्य कर्मांच्या नियमानें. १२. चित्तशुद्धि, संतोष, तप, स्वाध्याय, ईश्वरप्रणिधान हे नियम आहेत. (पतंजलि.) १३. सुचिर. १४. धर्मानें व न्यायानें धन मिळावें, दुसऱ्याची हिंसा करून मिळूं नये अगर दुसऱ्याचा तोटा करून मीं श्रीमंत होऊं नये, असें गयाचें मागणें. हाच खरा प्रवृत्तिपंथाचा धर्म होय. व्यवहारांत याचा जितका प्रसार होईल तितकें चांगलें होईल. गयाचें पुढील आर्यार्ध तर सोन्याच्या तसबिरींत घालून ठेवून त्याचा नित्य पाठ करावा, इतकी त्याची योग्यता आहे. १५. श्रीमंत. १६. सुखी. ही सर्व पंतांची मखलाशी आहे. १७. मरणानें, मरण पावून. 'भिकारीपणानें' असाही अर्थ आहे. १८. कल्याणमूर्ते. १९. कल्पवृक्षाच्या गर्वास. २० असा वर दे. 'शिवमूर्ते' हें विशेषण सहेतुक आहे, म्हणून येथें '**परिकरा**'लंकार आहे.

भार्या भल्या सवर्णा थोड्याचि बहुत, नको बहु कु-शीला. ।
पुत्रत्वें [3]साध्वींच्या यावें म्यां, द्यावया यश, कुशीला. ॥ ८५
श्रद्धा बहु दे, आले असतां अशना वैराक राजे वा; ।
[5]सम विनवावें कीं, 'द्या सूदां यश, नावरा करा, जेवा. ॥ ८६
बा ! जेंवि पि[6]शुनमन परमर्मी, धर्मीच मन्मन रमो, जी ! ।
धर्मरतिविना वानरजन्मांतचि कां न जन्म नर मोजी ? ॥ ८७
माझ्या विहितांचरणीं दृक्पांत नसोचि अंत[11]रायाचा. ।
व्हाया या नि[12]जधर्माचरणांतासहचि अंत रायाचा.' ॥ ८८
अग्नि म्हणे, 'अप्रतिम प्रभुसत्तम, तूं नृपा ! [13]इलेवर हो.' ।

---

१. आपल्या जातींतील. भल्या=सद्गुणी. थोड्याच भार्या मला पुष्कळ अशा होतील. **विरोध** आहे. २. वाईट चालीच्या. ३. साध्वींच्या कुशीला मीं पुत्रत्वानें यावें. 'आत्मा वै पुत्रनामासि' या न्यायानें पति पुत्ररूपानें पत्नीच्या ठिकाणीं उत्पन्न होतो, अशी समजूत आहे. ब्राह्मण जातकर्मसंस्कारसमयीं पुढील मंत्र म्हणतातः–'अंगादंगात्संभवसि हृदयादधिजायसे । आत्मा वै पुत्रनामासि स जीव शरदां शतम् ॥' ह्याचा अर्थः–[पुत्रास उद्देशून पिता म्हणतो] 'हे पुत्रा ! माझ्या प्रत्येक अंगापासून तुझा संभव आहे, तूं हृदयापासून झालास, तूं माझें प्रतिबिंब आहेस, यास्तव शंभर वर्षें वांच.' तसेंच 'पतिर्जायां प्रविशति गर्भो भूत्वा स्वमातरम् । तस्यां पुनर्नवो भूत्वा दशमे मासि जायते । तज्जाया जाया भवति तदस्यां जायते पुनः ॥' असें स्मृतिवचनही आहे. सारांश, पति पुत्राच्या रूपानें आपल्या जायेच्या ठायीं उत्पन्न होतो, अशी समजूत आहे. तीस उद्देशून हें वर्णन आहे. ४. भिकारी व राजे यांच्यावर सारखीच श्रद्धा असावी. अशना=जेवणासाठीं. पूर्वी आतिथ्याचे नियम कसे होते पहा. ५. उभयतांसही सारखीच प्रार्थना करावी, कीं अन्न चांगलें झालें आहे याचें यश आचाऱ्यांस आहे; आतां हात आवरूं नका, यथास्थित जेवा. हेंही पंतांचेंच भाष्य आहे. पंतांच्या वेळेस भिडस्तपणानें जेवण्याची व आपला नाजुकपणा दाखविण्याची चाल सुरू झाली होती असें दिसतें. पाहुण्यानें संकोच दाखविल्याशिवाय यजमानासही अगत्य दाखवितां येत नाहीं ! हास्यरस आहे. एका प्रतींत 'द्या'बद्दल 'या' असा पाठ आहे. ६. चहाडखोराचें मन. पंतांनीं उत्तम **उपमा** काढिली. 'मर्मी'बद्दल 'धर्मी' असा पाठ आहे पण तो सरस दिसत नाहीं. ७. धर्मप्रीतीशिवाय ८. गणीत नाहीं ? वानर+धर्म=नर; हें पंतांचें समीकरण ! ९. कर्तव्याचरणांत. १०. दृष्टिपात. गयाला किती कळकळ आहे बरें धर्माची ? ११. विघ्नाचा. १२. 'या निजधर्माचरणीं तनुसहित अंत रायाचा' असाही पाठ आहे. **सहोक्ति अलंकार** १३. पृथ्वीवर, जगांत.

जे मागितले ते त्या [१]रूपें जगदीश्वरें दिले वर हो ! ॥ ८९
नित्य प्रातःकाळीं शतवर्षें जो प्रभु प्रमोदानें ।
अयुत [२]वरतुरगदानें दे, [३]निष्कैहि लक्ष, लक्ष गोदानें; ॥ ९०
[४]मणिवालुकान्वित कनकमय करुनि [५]क्षोणिवलय दे हातें. ।
करि गय [६]हयमेधयशश्चंदनशतनिलयमलय देहातें. ॥ ९१
[७]सव्विस गांवें जीची रुंदी, जी लांब तीस गांवें गा ! ।
असि [८]गयहयमखवेदी, [९][१०]काशीस तसेंच तीस गावें, गा ! ॥ ९२
ती विप्रजना [११]गयनृपवाक् [१२]हयमेधक्रियासुखनि वेदी, ।
[१३]मणिकनकमयी जसि तनु साध्वी व्हाया प्रिया सुख [१४]निवेदी. ९३
[१५]द्विजदत्तशेष बहु [१६]मणिकांचनमययूप [१७]इक्षुसे [१८]वेची; ।
ज्यास रुचि [१९]अर्थिरतिची जेंवि [२०]मुमुक्षूस [२१]भिक्षुसेवेची; ॥ ९४
ने तृप्तिप्रति [२२]भूतग्रामातें खमहिसिंधु[२३]निलयातें, ।
गय हयमखीं; रणींही [२३]विशिखें मर्मीच विंधुनि [२४]लयातें. ॥ ९५

---

१. अमिस्वरूपानें. २. श्रेष्ठ असे घोडे त्यांचीं दानें. ३. 'सुवर्णानां कर्षाणां साष्टे शते निष्कः' इत्यमरः. ४. रत्नें हीच वाळू. पृथ्वीचीं चक्रें अथवा वर्तुळें सोन्याचीं करून तीं देण्याची चाल होती कीं काय ? ५. भूमंडल. ६. अश्वमेधांचे यशोरूपी चंदनतरुशतांस स्थानभूत जो मलयागिरि तो आपल्या देहास करिता झाला. रूपक आहे. शंभर अश्वमेध केले असें सांगायाचें आहे. ७. सव्वीस योजनें. ८. गयाची अश्वमेधभूमी. ९. 'वेदि परिष्कृता॰ (डमरुकाकारा) भूमिः' इत्यमरः. १०. काशीची उपमा योग्य आहे. 'विना सांख्येन योगेन काश्यां संस्थोऽमृतो भवेत्.' (काशीखंड.) ११. गय राजाची वाणी (कर्त्री). १२. जी अश्वमेधकर्मांची उत्तम खाण अशी वेदी, कर्म. 'विप्रजन' संप्रदान. १३. सुवर्णांचे व रत्नांचे अलंकार घातलेली तनु, कर्म. साध्वीचें वर्तन हें गयाचे वाणीस फार उत्तम उपमान आहे. इकडे प्रियपति तिकडे विप्रजन, इकडे अलंकृत देह तिकडे अलंकृत वेदी. १४. देई. १५. ब्राह्मणांस देऊन राहिलेलें शेष. १६. रत्न आणि सुवर्ण ह्यांनीं मंडित असे यज्ञस्तंभ. १७. उंसासारिखे. १८. खर्ची. १९. द्रव्येच्छूंवर प्रीति करण्याची. २० मोक्ष हवा आहे ज्यास तो मुमुक्षु. २१. भिक्षुकांच्या (संन्याशाच्या) सेवेची. २२. आकाश (ख), पृथ्वी (महि) व समुद्र (सिंधु) यांत राहणाऱ्या प्राणिसमूहांना. 'ने तृप्तिप्रति भूतग्रामातें मखहि सिंधुनिलयातें' असाही पाठ आहे. २३. बाणानें. २४ 'ने' ह्या क्रियापदाचा अन्वय काकाक्षिगोलकन्यायानें येथेंही लावावयाचा.

[1]परमपवित्रान्नाचे पृथ्वीपाताळ [2]तृप्तिला पुरले ! ।
[3]पुर लेखांचें धालें, परि पर्वत पंचवीस कीं उरले. ॥ ९६
वाहत होत्या पुष्कळ [4]पूतपयःप्रमुखसर्वरसकुल्या[5]. ।
तैशाचि बहुत उरल्या वस्त्रालंकारराशि गिरितुल्या. ॥ ९७
वर्णू [6]अक्षय्यकरण वट ? कीं तें ब्रह्मसरचि[7] ? न गयाचें ।
यश वर्णवे कविशता; 'देणें बहु' म्हणति [8]अमरनग 'याचें.' ॥ ९८
वा ! लागलाचि समयीं पुरवावा [9]अंतकालकाम गया. ।
राजा ! त्वां शोचावें कां ? हें ऐकोनि, बालका मग या ? ॥ ९९

अध्याय सहावा.

नारद पुन्हा म्हणे, 'गा राया ! सोडूनि [10]खंति दे, [11]वाची ।
[12]मंजुळ हरिहरस्तोत्रांपरि, चरितें नित्य [13]रंतिदेवाचीं. ॥ १
[14]अभ्यागतातिथींतें ज्याचे [15]सूद द्विलक्ष ओगरिते ! ।
कीं अन्य रंतिदेवा गमले [16]यांहूनि सर्व योग रिते. ॥ २
ज्याचें स्वयेंचि वरिती स्वर्गार्थ सुसत्र [17]पशु, भय जनाचें ।

---

१. येथें 'पर्वत' शब्द अध्याहृत घ्यावा. २. पृथ्वी आणि पाताळ येथील लोकांस आकंठ तृप्ति झाली. ३. देवांचें नगर (अमरावती). दामयमक. ४. पवित्र दुग्धप्रमुख सर्व रसांच्या नद्या. ५. पाण्याचा पाट, कालवा. 'कुल्याल्पा कृत्रिमा सरित्' अमर. ६. अक्षय्यवट प्रसिद्धच आहे. वट अगर ब्रह्मसर यांसारखें यांचें यश आहे. याचें किंवा ब्रह्मसराचें वर्णन कविशतांसही करितां येत नाहीं. उपमा सुंदर आहे. ७. 'ब्रह्मरसचि' असें पाठांतर. ब्रह्मसर—गयराजानें यज्ञ केलेलें गयसीर पर्वतासमीपचें तीर्थ. ८. कल्पवृक्षसुद्धां 'याचें देणें फार' असें म्हणूं लागले. येथें परिकर अलंकार ९. यमाची इच्छा. पर्यायोक्ति आहे. १०. शोक, हायहाय, स्मरणपूर्वक दुःख होतें तें. ११. पठन कर. १२. गोड स्तोत्रांसारखीं चरित्रें. थोरांच्या चरित्रांचें माहात्म्य पंतांस विदित होतें. १३. राजविशेष. १४. अभ्यागत=पाहुणा. अतिथि=न बोलावतां आलेला. १५. आचारी, स्वयंपाकी. 'उद्गिरण'पासून 'ओगरणें' झाला. ओगराळ्याची पीठिका हीच आहे. १६. अन्नदानांतीहून इतर सर्व योग. १७. ज्याचें सुसत्र पशु स्वर्गार्थ स्वयेंचि

न धरिति; हें वर्णिति यश [1]शतमखमुख [2]सत्रप शुभ-[3]यजनाचें. ॥ ३
पशुचर्मराशिपासुनि झाली [4]चर्मण्वती नदी, नांदे ।
[5]कृमि [6]यत्पानें स्वर्गीं; जी [7]भलत्या अर्थ तीन [8]दीनां दे. ॥ ४
[9]साष्टशत सुवर्णात्मकनिष्कशतसहस्रदान ओपावें ।
जेणें, द्विजां म्हणावें, [10]'अणु' [11]वितरणपाणिनें 'न कोपावें.' ॥ ५
जो एकदिवसमात्र द्विज राहे [12]निष्ककोटि तो लाहे ! ।
किति [13]वनद-धनद-कीर्ति ? [14]प्रभुकीर्तिसवेंचि कीर्ति तोला हे. ॥ ६
देउनि कोटि म्हणे, 'हे वाहिलि,' जोडूनि हात '[15]पाकोळी ! ।
तंतुपटें काय हरिल [16]दिग्गिभाच्या [17]घनहिमातपा [18]कोळी ? ॥ ७
[19]अभय न देऊ, माझ्या, तुमचा, वदतां मृषा, कुला, पाणी; ।

वरिती–हा अन्वय. यावरून हिंसादोष नाहींसा झाला. **पर्यायोक्ति** आहे. जनाचें भय पशूंस नव्हतें याचें तात्पर्य असें दिसतें, कीं यज्ञकाळीं होणाऱ्या त्रासाला ते पशु भीत नसत. ही स्थिति कीर्तिदायकच होय.

१. इंद्रप्रमुख देव. २. त्रपायुक्त, सलज्ज. ३. कल्याणदायक हवनाचें. ४. कुंतिराष्ट्राच्या दक्षिणेस ही नदी आहे. 'महानदी चर्मराशेरुत्क्लेदात्ससृजे यतः । ततश्चर्मण्वतीत्येवं विख्याता सा महानदी ॥' (भारत–शांतिपर्व–अ० २९). भागवतामध्यें नर्मदाफल व दक्षिणसिंधुफल सांगून मग चर्मण्वतीचें माहात्म्य सांगितलें आहे, यावरून ती दक्षिणेकडे होती असेंही दिसतें ! ५. कीटक. ६. ज्या नदींतील रक्त प्याल्यामुळें. ७. अधर्माचरण करून पश्चात्ताप पावलेल्या अनाथांना. ८. धर्म, अर्थ, काम, असे तीन अर्थ. ९. एकशें आठ. १०. किंचित्. ११. दानशूर हातानें (हात जोडून–असा भावार्थ). १२. एक कोटी निष्क. निष्क=१०८ तोळे वजनाचें सोन्याचें नाणें. 'साष्टे शते सुवर्णानां हेम्न्युरो–भूषणे पले । दीनारेऽपि च निष्कोऽस्त्री' इत्यमरः. १३. मेघ व कुबेर यांची कीर्ति. **प्रतीप** असून **उपमा**ही आहे. वन=जल, पाणी. 'क्लीबं स्यात्कानने नीरे निवासे निलये वनम्' इति रभसः. १४. परमेश्वराच्या कीर्तिबरोबर. १५. पाकळी. ('फूल नाहीं फुलाची पाकळी' अशी म्हण प्रसिद्धच आहे.) 'पंख'शब्दापासून 'पाख' व त्यापासून 'पाकोळी, पाकळी,' असा शब्द निघाला. १६ दिग्गजाच्या. कोळ्याच्या धाग्यापासून तयार केलेल्या वस्त्रापासून दिग्गजाचें थंडीवाऱ्यापासून निवारण होईल काय ? अर्थात् नाहीं. त्याप्रमाणें रंतिदेव ब्राह्मणांस संतुष्ट करूं शकेल काय ? असा भावार्थ. १७. पाऊस, थंडी आणि उष्ण यांना १८. कीटकविशेष, सुतेरा. **दृष्टांत** आहे. हा रंतिदेवाच्या आंगचा विनय दर्शवितो. १९. तुमचा पाणी (हात) मृषा (खोटें) वदतां माझ्या कुला अभय न देऊ–हा अन्वय. खोटें

आवडतें मज यांचें दर्शन, जैसें तृषाकुला[1] पाणी. ॥ ८
प्राणविरह सुसह, पळहि बहु दुःसह विप्रपाणिविरह मला. ।
वमला जो विष वासुकि, ऐसा[2] तापद[3] नसेल तो गमला. ॥ ९
मी मीनसाचि, माझ्या द्विजवृंद घरीं, जसेंचि आप[4] सरीं[5]. ।
पाहुनि मेघांशि जसा चातक, मी ब्राह्मणांशि 'आ' पसरीं.' ॥ १०
जो रंतिदेव ऐसें बोले, विप्रांसि कनक दे हातें, ।
द्विजबहुमानासि जपे, साधु[6] जसा वृद्धजनकदेहातें. ॥ ११
कांचनमयगोशतयुत[7] कांचनमयवृष सहस्रशः पूर्ण. ।
शतवर्षें नित्य दिले, कीं हें जाणार सर्वही तूर्ण[8]. ॥ १२
श्रीरंतिदेवसदनीं अतिथि द्विज एक रात्र जो राहे, ।
तो एकविस सहस्र प्रातःकाळींच धेनुधन[9] लाहे. ॥ १३
जें अग्निहोत्रहयमखमुखयज्ञगृहोपकरण[10] सर्वहि तें ।
विप्रांसि दिलें भूपें सर्वजनांचीं[11] करूनि सर्व हितें. ॥ १४
कव्यास[12] पितर घेती, प्रत्यक्ष[13] तसेचि देव हव्यास[14]. ।

बोलण्याविरुद्ध केवढी ही जबरदस्त तयारी. अमळसा दूरान्वय या गीत्यर्थांत आहे. पुढील उपमा ब्राह्मणविषयक प्रीति दर्शविते.

१. तृषार्तास. २. द्विजवियोगासारिखा ताप देणारा. **व्यतिरेक** होईल. **प्रतीप**ही होईल. ३. पीडा करणारा, दुःखदायक. ४. उदक. ५. सरोवरांत. **उपमा** हृदयंगम खरी. ब्राह्मणांचें माहात्म्य समजण्यास ही व पुढील उपमा चांगली आहे. ६. वृद्ध मातापितरांची काळजी घेणारा पुरुष पंतांच्या मतें साधूच होय. यावरून आईबापांच्या मानापमानासंबंधीं ओरड होण्याला हल्लींचें मन्वंतरच कारण नाहीं. ही ओरड फार दिवसांची आहे असें दिसतें. ७. युत=सह. कांचनमयवृष=सोन्याचे बैल. ८. लौकर, कारण संसार क्षणभंगुर आहे. ९. धेनुरूपी धन. १०. अग्निहोत्र व अश्वमेधप्रमुख यज्ञगृहांतील यज्ञसाहित्य. ११. प्रजाजनांस त्रास न देतां ! इतकेंच नव्हे तर त्यांचें सर्व प्रकारचें कल्याण करून. 'Charity begins at home but does not end there' याचें हें उत्कृष्ट उदाहरण होय. १२. कव्य=पितृभाग. १३. प्रत्यक्ष=स्वतः, मूर्तिमंत, ब्राह्मणद्वारा नव्हे. १४. हव्य=देवभाग. 'क्रूयते पितृभ्यः कव्यं, हूयंते देवा येन हव्यं, विप्रमुखेन पितृभ्योऽन्नं, अग्निमुखेन देवेभ्योऽन्नं दीयते.' अमरटीका. 'घेती' शब्दाचा देहलीदीपन्यायानें दोन्हीकडे संबंध आहे.

हव्यास धरुनि करि बहु यज्ञाचा जनसुखावह [1]व्यास. ॥ १५
श्रीस न आली, वेंचुनि बहु[2]मणिकार्तस्वरा, [3]जरा ज्याच्या; ।
लाजवि समृद्धिला जो, न हरुनि [4]आर्तस्व, [5]राजराजाच्या; ॥ १६
मेला असाहि, करिता जो हयमेधादि सर्व [6]सव सु[7]कृती. ।
न रडति, अनित्य जाणुनि, [8]जातां सुत, दार, वपुहि सवसु [9]कुंती. १७
नारद म्हणे, 'प्रसवली ज्या कण्वसुता शकुंतला, गावा, ।
परिसावा [11]भरत; तुज न [12]सुतशोकहुताशकुंत लागावा. ॥ १८
म्हणसी 'शकुंतला[13]सुतरत्नाचा सुमहिमा वदा,' तरि तें ।
पाडी गहन, हरुनि [14]हरिशत मल्लीसुमहि[14]मावदात, रितें. ॥ १९
व्याघ्रवराहमहिषगजमद नुरवी मूर्ति [15]सुरुचिरा शिशुची, ।
हरिशत दमुनि मुनिवनीं [16]जी बहु [17]वर्धिष्णु [18]सुरुचिराशि [19]शुची. २०
सुतपोवनांत लावी [20]हरिहरितोकांस [21]दामनीला जो ।
तेणें न कण्व [22]हरिसह [23]हरि, हरि, [24]तो कां सदा मनीं लाजो? २१
सिंहादि सर्व [25]सत्वें सोडी तो [26]सर्ववीरवर [27]दमुनी; ।

---

१. विस्तार. 'व्यास' शब्दाची पुनरावृत्ति पहा. २. अनेक रत्नें आणि सुवर्ण यांस. 'रुक्मं कार्तस्वरम्' इत्यमरः. ३. वृद्धदशा. त्याची लक्ष्मी अखंड होती, असें सांगावयाचें आहे. ४. दुःखितांचें धन. ५. कुबेराच्या. **व्यतिरेक** आहे. ६. यज्ञ. ७. पुण्यशील. ८. मरतां. जगाचे क्षणभंगुरत्वाचा आपण जितका विचार केला आहे तितका कोणीं केला आहे कीं नाहीं हरि जाणे! सर्व वेदांताचें सार काढल्यास त्यांतून एक तत्त्व असें निघतें, कीं हें दृश्य सर्व क्षणजीवि असल्यामुळें त्याबद्दल सुखदुःख मानूं नये. ९. सद्रव्य. १०. सुज्ञ, तत्वज्ञ. ११. येथें तेराव्या कथेस आरंभ झाला. १२. पुत्रशोकाग्निरूप भाला. येथें **रूपकावर रूपक** आहे. १३. भरताचा. तें=तें शकुंतलापुत्ररत्न. १४. मल्ली–सुम+हिम+अवदात=जाईचें फूल आणि हिम तद्वत् शुभ्र जें सिंहशत त्यातें हरुनि गहन (वन) रितें पाडी. १५. तेजःपुंज. १६. मूर्ति. १७. वाढणारी. १८. अत्यंत मनोहर अशा तेजाची राशि. १९. शुद्ध. २०. सिंह, व त्यांच्या बाळकांस. २१. दांव्याला. २२. शिवासह. 'हरिसह' असें पाठांतर. २३. हरण करी. त्यानें कण्वाचेंच मन हरण केलें असें नाहीं, तर शिवासह विष्णूच्या मनाचेंही हरण केलें, अशा त्या भरतानें कशाची लाज धरावी ? त्यानें कोणास नम्र असावें, असा अर्थ दिसतो. २४. भरत. २५. प्राणी. २६. सकल वीरांत श्रेष्ठ. २७. त्यांचा मद शांत करून.

यास्तव 'सर्वदमन' हें ठेविति भरतासि नाम वरद-[1]मुनी. ॥ २२
शत [2]यमुनेच्या तीरीं, तीनशत सरस्वतीतटीं भरतें, ।
गंगातटीं चतुःशत केले हयमेध धर्म-[3]लाभ-रतें. ॥ २३
पुनरपि हयमख केले दशशत, शत राजसूय साधूनी. ।
स्तविला रिपुंनींहि भरत, केवळ [4]वाखाणिला न [5]साधूंनीं. ॥ २४
तैसाचि विश्व[6]जित्सव, अग्निष्टोम[6]ातिरात्रसन्मख गा ! ।
[7]इतरां भरतयश, गरुडयश दुर्लभ जेंवि नीड-[8]जन्म-खगा. ॥ २५
बा ! 'वा[9]जपेय' म्हणति ब्राह्मण पुण्यर्धिच्या अंगारा ज्या ।
त्या यज्ञसहस्रांचीं तीन सहस्रें [10]करी, अगा ! राजा ! ॥ २६
हं[11]स-तसा [12]आरब्धाखिलमखकर्माब्धिला भरभर तरे. ।
[13]शुचिसचिवशिरीं ठेवी राज्याचा सर्वही [14]भर भरत रे ! ॥ २७
अर्पुनि शुचि [15]जांबूनदपद्मसहस्र [16]क्रतूंत, पद नमुनी, ।
जेणें केला कण्वचि न, सकलही सुप्रसन्नवदन [17]मुनी. ॥ २८
शंभर [18]वांवें ठो[19]सर कनकाचा यूप भूप-रत्नानें ।

---

१. कण्वऋषि. २. गंगा, यमुना व सरस्वती यांच्या संगमास 'त्रिवेणीसंगम' म्हणतात. ३. धर्माचा लाभ व्हावा एतद्विषयक आसक्ति ज्याची अशा भरतानें. ४. 'व्याख्याना'पासून 'वाखाणणें' झाला. ५. साधू सर्वांचीच स्तुति करणार म्हणून रिपुस्तवाची योजना आहे. 'परगुणपरमाणून्पर्वतीकृत्य नित्यम्' हा साधूंचा धर्म. 'दोषग्राही गुणत्यागी पल्लोलीव (चाळणीप्रमाणें) दुर्जनः'. ६. यज्ञविशेष. ७. इतर लोकांस. ८. घरोब्यांतल्या पक्ष्यांस. उपमा आहे. ९. गृहा. पुण्याच्या समृद्धीचें घरच जो वाजपेय त्याला. १०. ह्याचा 'कर्ता'–भरतराजा. ११. पंतकृत कर्णपर्वांत हंसाचे उड्डाणाची उत्तम गोष्ट आहे. (अध्याय २८ पहा). १२. आरंभिलेल्या सर्व यज्ञकर्मरूपी समुद्राला. १३. शुचि=शुद्ध मनाचे, इमानी. ही भरताची पद्धति चांगली दिसते. प्रधानांवर राज्याच्या निरनिराळ्या खात्यांची जबाबदारी ठेवून आपण देखरेख करावयाची हें राजाचें मुख्य कर्तव्य होय. हल्लीं कोठें कोठें हें तत्व विस्मृत झाल्यासारखें दिसतें. शिवाजीची व भरताची पद्धति एकच. १४. भार, जबाबदारी. १५. सुवर्णकमळें. जांबुनद=जंबु वृक्षापासून उत्पन्न झालेलें सुवर्ण. 'जंबुशाखीचीं सुवर्णें' (मुक्तेश्वरकृत सभापर्व–अध्याय ८।१३६). १६. यज्ञांत. १७. मुनिवर्य कण्व आजोबा. तेव्हां त्यांस कौतुक वाटेलच, पण इतर मुनिगणांसही त्यानें संतुष्ट केलें. वर्गदर्शक एकवचनाचा उपयोग लक्षांत ठेवावा. १८. 'व्याम'पासून 'वांव' झाला. १९. दृढ.

यज्ञांत घडविला,[1] तो होय उभा सामरेंद्र-यत्नानें[2] ॥ २९
धनधान्यगृहक्षेत्रग्रामरथद्विरद[3]धेनुहयदानें ।
दिधलीं, नकोनको तों, त्या भरतानें कुबेरभयदानें[4] ! ॥ ३०
दासी बहुकोटि दिल्या पात्र[5] करुनि बहु-सुवस्त्र-मणि-कनका ।
ज्या म्हणती, 'भूषणभर[6] दुर्वह[7], इतुकाचि फार, अणिक नका.' ३१
बहु कोटि दिले भूषिततनु, कार्यसमर्थभुज[8], नवे दास, ।
स्वामीस आदरें जे भजणारे, जेंवि सुजन वेदास. ॥ ३२
ऐसाहि भरत मेला. मग संसारांत कां न इतर मरे ? ।
त्याणुनि सुतशोक, सदा जाणुनि भगवत्पदींच हित, रम रे !' ३३
देवर्षि म्हणे, 'बहुधा त्वां आइकला नसेल पृथु कानें, ।
तरिच मरोनि तुझें मन मोहीं केलें निमग्न पृथुकानें[9]. ॥ ३४
पृथुचा पृथु[10] प्रताप प्रेक्षुनि झाली भयें इला[11] दुहिता[12]; ।
गाईस गोपसा, जो राजा झाला स्वयें इला[13] दुहिता[14]. ॥ ३५
पृथ्वी अकृष्टपच्या[15], सर्वसुखस्पर्श दर्भ कनकाचे[16] ।
झाले. कोणालाही ज्याच्या राज्यांत अर्भक[17] न कांचे[18]. ॥ ३६

---

१. केला. (भरींव यज्ञस्तंभ–असा भावार्थ.) २. देव व इंद्र यांच्या यत्नानें. इतका जाड यज्ञस्तंभ उभा करण्यास देवांचें साहाय्य अवश्यच लागलें असेल ! ३. द्विरद=गज. ४. कुबेरास भय देणाऱ्या भरतानें. सर्वनिधि संपणार म्हणून कुबेरास भीति पडली वाटतें ! ब्राह्मणसुद्धां 'नको नको' म्हणूं लागले ! ब्राह्मणांची द्रव्याशा आणि बायकांचा दागिन्याचा सोस नाहींसा करणारा राजा किती श्रीमंत पाहिजे ? कारण हें वैराग्य तृप्तीनंतर आलें होतें. ५. दागिने ठेवण्याचें स्थान म्हणजे पात्र. दासी हींच पात्रें ! ६. अलंकारांचा भार. बायकांची सुद्धां नको म्हणण्याची उक्ति **अतिशयोक्ति**दर्शक होय. **विरोध**ही आहेच. ७. वाहण्यास कठीण, फार जड. ८. काम करण्यास ज्यांचे भुज समर्थ आहेत असे. ९. बालकानें. १०. मोठा. ११. पृथ्वी. १२. मुलगी. प्राचीन काळीं दोहनाचें (दूध काढण्याचें). काम घरांतील मुलींकडे असावें व म्हणून त्यांस 'दुहिता' असें नांव पडलें असावें, असा यूरोपियन पंडितांचा तर्क आहे. किंवा सासर व माहेर ह्या दोन्ही कुलांचें हित करणारी ती 'दुहिता'. १३. भूमीला. १४. दोहनकर्ता. अर्थात् पृथ्वीचा राजा. १५. कर्षणाशिवाय पिकणारी अशी झाली. १६. सोन्याचे दर्भ झाले. १७. बालक. १८. भिई.

वत्सें [1]प्यावें, द्यावें गाईनीं दुग्ध भरुनि घागर गा ! ।
[2]कुसुमरसमिश्रितामृतकल्पोदकपूरपूर्णसागरगा. ॥ ३७
वृक्षांच्या वल्लींच्या [3]पुटकीं पुटकीं [4]प्रभूत मधुरस रे ! ।
बा ! ज्यापुढें न अमृतहि म्हणवाया आपणासि 'मधुर' [5]सरे. ॥ ३८
जन तुष्ट पुष्ट, [6]अकुतोभय, [7]नयमय, सर्वही अ-[8]गद-वार्त ।
पृथु राज्य करित असतां नव्हतेच वनांतही [9]अग [10]दवार्त. ॥ ३९
बहुतचि जन रंजविला लावुनि निजगुणरसीं पृथु-कथांनीं; ।
जननींनीं जेंवि, करुनि तप परम, [11]चरमवयीं पृथुक थानीं. ॥ ४०
[12]स्तिमितजल होय जलधि, देती ज्या प्रभुसि मार्ग पर्वत रे ! ।
जन ज्याचें यश गाउनि, पावुनि काशींत जेंवि [13]पर्व, तरे. ॥ ४१
[14]सवदैवतमात्रास न, दे [15]विश्वास प्रमोद तो यजनीं. ।
मखमंडपीं न तितुकें दानजल, बहु [16]प्रमोदतोय जनीं. ॥ ४२
क्षितिवरि होते [17]पार्थिव जे जे ते करुनि [18]हेममय सारे ।
दे दान [19]हयमखीं, पृथु परिस [20] गमे अर्थिलोक–[21]अयसा रे ! ॥ ४३

---

१. वासरें प्यालानंतर घागरभर दूध द्यावें. २. पुष्परसानें मिश्रित अशा अमृत-तुल्य उदकांच्या पूरांनीं भरलेल्या अशा नद्या समुद्रास वाहत जात. ३. गुच्छागुच्छास. ४. पुष्कळ. ५. 'मी मधुर आहें' असें म्हणण्याला अमृतही त्यापुढें सरेना–म्हणजे, अमृतापेक्षांही मधुर. ६. निर्भय. ७. न्याय्य आचरण करणारे. नय=नीति. 'मय' प्रत्ययाचा अर्थ 'विशिष्ट' 'युक्त' 'परिपूर्ण' असा आहे. ८. रोगवार्तारहित. ९. वृक्ष. १०. दावानलानें पीडित नव्हते. (प्रफुल्लित होते–असा भावार्थ.) ११. म्हातारपणीं. पृथूच्या कथा ज्या, त्यांनीं आपला गुणरूप रस पाजून बहुतजनांचें रंजन केलें. जसें, पुष्कळ तपांच्या प्रभावानें वृद्धपणीं आयांनीं बालक थानीं लावावें त्याप्रमाणें. **दृष्टांता**लंकार आहे. १२. स्थिरोदक. १३. पुण्यकाल पावून. १४. यज्ञदैवतांस. तो यज्ञांच्या योगानें केवळ यज्ञदेवतांनाच आनंद देई असें नाहीं; तर तो सर्व जगताला आनंद देई. आणि तेणेंकरून, यज्ञमंडपामध्यें जितकें दानजल (दानें देण्याला सोडलेलें पाणी) वाहिलें, त्याहून अधिक जल, जनांच्या आनंदाश्रूंचें वाहिलें–असा अर्थ. **अतिशयोक्त्यलंकार.** १५. सर्व जगताला. १६. आनंदाश्रु १७. राजे. १८. सुवर्णमय. १९. अश्वमेधकालीं. पृथ्वीवर जितके राजे होते त्या सर्वांच्या सुवर्णप्रतिमा करून ब्राह्मणांस अर्पिल्या. २०. याचकरूप लोहाला पृथु हा परिस झाला. म्हणजे त्याच्या योगानें ते सुवर्णमय होऊं लागले; धनवान् झाले. २१. भिक्षुकरूप लोहास.

पृथु सांगे, ‘गज ओतां,[1] पाहुनि [2]हरिचा करी लपो. [4]कळतो ।
श्रम मज, [3]किती घेत्याचें देत्याचें हित करील पोकळ तो ? ॥ ४४
ओतविले कनकरसें साससष्टसहस्र भव्य [5]दंती हो ! ।
विप्रांसि दिल्हे. तेव्हां मी होतों, हे न [6]किंवदंती हो ! ॥ ४५
मणिरत्नभूषिता हे कनकाची करुनि दान दे [7]वसुधा ।
[8]पृथुकीर्तिरत विसरले, रंभा विसरतिल कां न ? देव सुधा. ॥ ४६
एवंविध चरितसुधानिधिहि [9]निधन पावलाचि पृथु कवि रे ! ।
ज्या कालाच्या वदनीं मेरु विरे, त्यांत कां न [10]पृथुक विरे ?’ ४७
देवर्षि म्हणे, ‘भार्गवरामाची सृंजया ! कथा परिस. ।
अतुलप्रताप दुःसहशर जो [11]विश्वास [12]मन्मथापरिस. ॥ ४८
[13]रणपंडितकोटिपुढें ज्याचा मागें न परशु [14]कवि सरला; ।
जो आपणा समरपर, जैसा हरिकीर्तिपर शुक, [15]विसरला. ॥ ४९
भिववी [16]ज्यांची श्रीमद्दत्ताप्तसहस्रबाहुता [17]शमना; ।

---

१. सुवर्ण ओतून त्याचे हत्ती करा. २. इंद्राचा हत्ती (लाजेनें) लपो. ३. कितीसें, अर्थात् फार थोडें. ४. या कार्याला श्रम किती लागेल हें मला कळतें. पण पोकळ हत्ती देत्याघेत्याचें हित कितीसें करील ? ५. हत्ती. ६. लोकवार्ता, गप्प. अहो ही गप्प नव्हे, त्या वेळेस मी तेथें प्रत्यक्ष हजर होतों–असें नारद सांगतात. ७. पृथ्वी. ८. पृथूच्या कीर्तीमध्यें रममाण झालेले देव अमृताला सुद्धां विसरले. ते रंभेला तरी कां विसणार नाहींत ? अर्थात् विसरतील–असा भाव. प्रश्नालंकार आहे. ९. मरण. १०. पोहा. ११. जगास. येथील अतुलप्रताप व दुःसहशर हीं विशेषणें भार्गवराम व मन्मथ या दोघांसही सारखींच लागू पडतात. अतुलप्रताप=अत्यंत पराक्रमी; (पक्षीं) अत्यंत पीडादायक. दुःसहशर=ज्याचे बाण सहन करण्यास कठीण आहेत असा. भार्गवरामाचे बाण लोखंडी किंवा पोलादी व मन्मथाचे बाण म्हणजे नाना तऱ्हेचीं सुवासिक फुलें, किंवा मनस्ताप. १२. मदनापेक्षां. मदनाचे पांच बाण आहेत:–‘अरविंदमशोकं च चूतं च नवमल्लिका । नीलोत्पलं च पंचैते पंचबाणस्य सायकाः’ ॥ किंवा ‘उन्मादनस्तापनश्च शोषणः स्तंभनस्तथा । संमोहनश्च कामस्य पंचबाणाः प्रकीर्तिताः ॥’ १३. युद्धपंडितसमुदायापुढें. १४. चतुर, शूर. १५. जसा शुकाचार्य हरिकीर्तनीं निमग्न होऊन आपणास विसरला, तसा हा युद्धामध्यें मग्न होऊन आपणाला विसरला. १६. हें वर्णन सहस्रार्जुनाचें आहे. श्रीमत् दत्तकृपेनें त्याला सहस्र हस्त प्राप्त झाले होते आणि त्यांच्या योगानें जो यमाला सुद्धां भिववी. १७. यमास.

जो [1]अर्जुन [2]अर्जुनता दे अरिच्या, होय वा ! [3]हुताश, मना; ॥ ५०
[4]त्या [5]जलधीस शरकरें [6]भृगुवंशघटज महातपा [7]त्याला; ।
[8]तप्तायःपिंड तसा [9]जो लावूं दे न हात पाप्याला. ॥ ५१
जो प्रभु म्हणे, 'दिले [10]क्षितिवर्ति क्षत्रिय, सुखें [11]कुठारा ! खा. ।
उठलां कबंध हो ! यश राखाया ? बहु बरें, उठा, राखा.' ॥ ५२
राम [12]चतुःषष्टिअयुत [13]बाहुज मर्दी धरूनि [14]कोदंड, ।
कोण म्हणेल पितृ[15]वधक्रुद्ध प्रभुला 'करूं नको दंड ?' ॥ ५३
खड्गें सहस्र [16]हैहय ताडी, पाडी सहस्र तो मुसळें. ।
खळरक्तासि म्हणे, 'जा भेटें मित्रा [17]कुजा [18]कुजा ! उसळें.' ॥ ५४
अत्यंतोत्कंठित जो, ओतु[19] जैसा[20], मत्त[21]परशुकापाया. ।
लागों दे अयुतातें पळहि न हर[22]दत्त परशु कापाया. ॥ ५५
[23]उद्बंधनेंहि वधिले प्रबळ [24]ब्रह्मघ्न पाप दशशत रे ! ।

---

१. सहस्रार्जुन. २. तृणता. ३. अग्नि. ४. जो सहस्रार्जुन शत्रूच्या मनाला तृणता देई आणि स्वतः आपण अग्नि होई. शत्रूचा नाश करणारा—असा अर्थ. ५. सहस्रार्जुनरूपी सागरास. ६. भृगुकुलोत्पन्न परशुरामरूप अगस्ति. **रूपक** आहे. ७. त्याचा ज्यानें पराभव केला—असा अर्थ. ८. तप्त लोहाचा गोळा. ९. जो परशुराम. १०. पृथ्वीवर राहणारे. ११. हे परशु ! येथें '**चेतनधर्मारोपोक्ति**' अलंकार आहे. १२. चौसष्ट दशसहस्र. (सहा लक्ष चाळीस सहस्र.) अयुत=दशसहस्र. १३. क्षत्रिय. १४. धनुष्य. १५. तातवधामुळें तापलेला. परशुरामाचा पिता जो जमदग्निऋषि त्यापाशीं कामधेनु होती. सहस्रार्जुन कार्तवीर्य राजा एके समयीं त्याच्या आश्रमांत गेला. जमदग्नीनें त्याचें उत्तम आतिथ्य केलें. पण राजानें दांडगाईनें त्याची कामधेनु ओढून नेली. हें वृत्त त्याचा पुत्र परशुराम यास कळतांच त्यानें सहस्रार्जुनाचे सहस्र हस्त तोडून त्याचा वध केला, आणि कामधेनु परत आणिली. पुढें परशुराम घरीं नाहीं अशी संधि साधून सहस्रार्जुनाच्या पुत्रांनीं एकाएकीं जाऊन जमदग्नीचा वध केला, अशी कथा आहे. १६. कार्तवीर्याच्या देशाचें आणि तेथील लोकांचें नांव. १७. मंगळास. मंगळ हा रक्तवर्ण ग्रह असल्यामुळें त्यास रक्ताचा मित्र असें म्हटलें आहे. १८. दुष्टांच्या रक्ता. येथें '**चेतनधर्मारोपोक्ति**' अलंकार आहे. १९. मांजर. २०. 'तसा' असें पाठांतर. २१. मत्तशत्रुरूप राव्याला अपाय करण्याला. ओतु जसा शुकाच्या अपायाला अत्यंत उत्कंठित असतो, तद्वत् जो मत्त शत्रुरूप शुकाच्या अपायाला अत्यंत उत्कंठित; असा तो. २२. शिवानें परशुरामाला दिलेला परशु. तो हरदत्त परशु अयुतातें कापाया पळहि न लागों दे—असा अन्वय. २३. गळफासानें. २४. ब्रह्मघातक.

[1]क्षत्रिय एकहि न, जसा लावुनि [2]मृगभूमिपा पद शश, तरे. ॥ ५६
[3]देखिलि रामें केली निःक्षत्रा एकवीसदा महि म्यां; ।
[4]या गाती, जे [5]हरिहरचरितरसिक, ते कवी सदा महिम्या. ॥ ५७
[6]रक्तें भरी प्रतापी [6]प्रभु तो [7]रक्तप-चमू-सुखकर तळीं; ।
स्थापी स्वयश कविमुखीं, सर्वक्षत्रियवधूमुख [8]करतळीं. ॥ ५८
[9]निष्कंटक [10]सद्वीपक्षितिमंडल सर्व [11]वश्य पाहून ।
राम म्हणे, 'या दाना पात्र नसे अन्य कश्यपाहून.' ॥ ५९
संपादुनि सर्वहि, सत्र करुनि सकलरत्नहेममंडित हो !।
कन्यारत्न तसें, दे भूमंडल [12]युद्धयज्ञपंडित हो ! ॥ ६०
कश्यप रामासि म्हणे, 'माझ्या राहों नकोचि [13]विषयांत, ।
कीं[14] [15]यशआयुःक्षयकर [16]दत्तपुनर्ग्रहणरूपविष यांत.' ॥ ६१
राम म्हणे, 'बहु उत्तम.' मागे स्थल तो [17]नदीनदेशाला. ।
[18]प्रभुनें प्रभुला द्यावें, देइल [19]दीना न दीन देशाला. ॥ ६२
उत्तरहि याचकास न जैसें बहुभाग्यमत्त मानव दे, ।
तैसेंचि तोहि [20]जलधी कांहीं त्या [21]वीरसत्तमा न वदे. ॥ ६३
बहुधा [22]घटजापासुनि पूर्वी जें काय होय तें विसरे. ।

१. क्षत्रिय न तरे, जसा शश न तरे–असा अन्वय. २. मृगराजास (सिंहाला). ३. रामें एकवीसदा निःक्षत्रा मही केली (केलेली) म्यां पाहिली. ४. ते कवि या महिम्या गाती–असा अन्वय. ५. शिव आणि विष्णु यांच्या गुणवर्णनाविषयीं ज्यांस गोडी आहे असे. ६. प्रभु रक्तें तळीं भरी–असा अन्वय. ७. रक्त पिणाऱ्यांच्या चमूला म्ह० पिशाचसमुदायाला सुखदायक. हें विशेषण 'प्रभु' आणि 'तळीं' या दोहों नामांला लागेल. ८. तळहातीं. सर्व क्षत्रियवधूंना हातानें तोंड झांकून दुःख करावयास लावी–असा भावार्थ. ९. शत्रुरहित, निर्वैर. १०. सर्व चांगल्या (ज्यांत राहणारे लोक सदाचारसंपन्न आहेत अशा) द्वीपांसहित भूमंडल. ११. स्वाधीन. १२. युद्धरूप यज्ञामध्यें पंडित (ज्ञाता, परशुराम). हा 'दे' याचा कर्ता. १३. देशांत. १४. कांकीं, यांत (माझ्या देशीं राहण्यांत) यशआयुःक्षयकर असें दत्त-पुनर्ग्रहणरूप विष आहे–असा अन्वय. १५. कीर्ति आणि आयुष्य यांचें नाश करणारें. १६. दान दिलेल्या वस्तूचा पुन्हा स्वीकार करणें, हेंच विष. १७. नदी+नद+ईशाला=समुद्राला. १८. समर्थानें समर्थाला द्यावें. अर्थान्तरन्यास. १९. दरिद्री दरिद्र्याला देश देऊं शकत नाहीं. २०. समुद्र. २१. वीरश्रेष्ठास (परशुरामास). २२. घटज (अगस्ति) यानें समुद्र पिऊन टाकिला होता–ही गोष्ट.

शर सुटतां मागें, [1]खलबल जेंवि, [2]समुद्रतोय तेंवि [3]सरे. ॥ ६४
त्या [4]इषुपातक्षेत्रीं पाहोनि [5]महेंद्रनामनग रमला. ।
राम म्हणे, 'करिन सुचिर रुचिर तप. कशास देश नगर मला ?'॥
ऐसाहि राम अंतीं [6]मरणार यथार्थ जाण सन्मत रे ! ।
[7]संसृतिनदींत [8]कालावर्तीं पावोनि कोण जन्म तरे ? ॥ ६६
व्यास म्हणे, 'हें षोडशराजिक आख्यान सर्व[9]सन्महित; ।
धर्मा ! याच्या श्रवणें एकीं जन्मींच कोटिजन्महित. ॥ ६७
हा सोळा राजांचा महिमा पूर्णायु करि [10]लवायूतें; ।
यापरि जें मंद [11]दहनतेज, सबल काय करिल [12]वायू तें ?' ॥ ६८
सांगुनि आख्यान असें [13]देवर्षि म्हणे, '[14]नृपा ! असे [15]तोकीं ।
होते गुण ? सांग खरें, गेला [16]तच्छोकभर, असे तो कीं ?' ॥ ६९
भूप म्हणे, 'बा ! चातकचित्ताला [17]मुदिर हर्ष दे, [18]वर्षे, ।
परि अल्पचि तो, म्यां तुज सांगावा काय हर्ष देवर्षे !'॥ ७०
जो [19]अस्मदादिजीव [20]प्राकृत, होईल तो कसा मान्य ? ।
ज्यासि रडत होतों मी बहु मानुनि, तेंहि तोक [21]सामान्य. ॥ ७१
त्वदृष्टिपुढें [22]प्रबलहि [23]नतमोह, ज्ञानिनायका ! [24]सरतो. ।

---

१. दुष्टाचें सैन्य जसें. शब्दसाम्यावरून, 'खळबळ' असा ध्वनि करीत–अशा अर्थाचा ध्वनि निष्पन्न होतो. २. समुद्राचें पाणी. ३. मागें सरके. ४. बाण पडलेल्या स्थळीं. (परशुराम म्हणून क्षेत्र आहे तेथें.) ५. पर्वतविशेष. (नग=पर्वत). ६. 'अश्वत्थामा बलिर्व्यासो हनूमांश्च युधिष्ठिरः । कृपः परशुरामश्च सप्तैते चिरजीविनः ॥' या उक्त्यन्वयें परशुराम हा चिरजीवी. म्हणून तो 'मेला' असें म्हटलें नाहीं. तथापि तोही सर्वदा जिवंत राहील असें नाहीं–असा भावार्थ. ७. संसारनदींत. ८. कालचक्रांत. रूपकालंकार ९. सर्व सज्जनांस पूज्य. १०. अल्पायुष्याला. ११. अग्नीचें तेज. १२. जें जात्याच मंददहन तेज त्याला वायु कशानें सबळ करणार आहे ? अर्थात् अभिमन्यूचें आयुष्यच संपलें तेथें कांहीं उपाय नाहीं–हा इत्यर्थ. १३. नारद. १४. हे संजया ! १५. पुत्रांत. १६. तत्+शोक+भर=त्याच्या विषयींच्या शोकाचा भार. १७. मेघ. १८. वर्षाव करी. १९. आमच्या सारखा प्राणी. 'जीव' या स्थलीं 'जनन' असा पाठ आढळतो पण तो अप्रशस्त दिसतो. २०. क्षुद्र. २१. साधारण, मध्यम प्रतीचें. २२. हें मोहाचें विशेषण. २३. नम्रांचा मोह. २४. संपतो, नाहींसा होतो.

देवीसमक्ष उरला, त्रि[1]भुवनदुर्जयहि, काय [2]कासर तो ?' ॥ ७२
देवर्षि म्हणे परिसुनि, '[3]सूक्ति न घे पशु. भला भला ! [4]मागें. ।
उपदेशासि न वळतां, कोणीही न शुभ लाभला [5]मागें.' ॥ ७३
वंदुनि तो भूप म्हणे, 'जे झालां सुप्रसन्न, हाच वर. ।
श्री[6]कर माथां असतां, बहु काय [7]छत्र ? काय बा ! चवर ?' ७४
नारद म्हणे, 'कृपेची [8]त्वत्साधुत्वें न आवरे [9]उकळी; ।
हो पूर्णकाम, [10]सुरभीपोषक जन ताक काय गा ! [11]उकळी ? ॥ ७५
भेटो त्वत्सुत तुज, जो गेला होउनि [12]परासु नरकास. ।
घालूत साधु भजनें, पावाया [13]गति [13]परा, [14]सुनर कास.' ॥ ७६
या [15]वागवसानीं तो[16] अंकींच प्रकट होय [17]जनकाच्या. ।
स्वनकाच्या [18]बंधुपुढें. [19]अमृतकथा म्हणति सुज्ञ जन 'काच्या.' ७७
धरिला पुत्र सुवर्णष्ठीवी हृदयीं द्रवोनि मग, नमुनी ।
प्रथम प्राज्यप्रेमें नित्यनव [20]दयामृताभ्र [21]गगन-मुनी. ॥ ७८
हयमेधादि मखाच्या ठेवी सप्रेम चित्त तो यजनीं. ।
वर्षे सृंजय-[22]धाराधर सर्वत्र स्व-[23]वित्ततोय जनीं. ॥ ७९
शिशु [24]अनपत्य [25]अयज्वा रणयज्ञांतहि न पावला मरण, ।

---

१. भुवनत्रयास अजिंक्य. २. रेडा (महिषासुर). उरला नाहीं, नाश पावला–असें अपेक्षित उत्तर. ३. सु+उक्ति=आशीर्वचन, उपदेश. ४. तूं भला आहेस, भला वर माग. '**आक्षेपा**'लंकार. ५. यापूर्वी. ६. लक्ष्मीचा हस्त. ७. संस्कृत शब्दांतील 'छ'वर्णापूर्वी ऱ्हस्व अक्षर असेल तर 'छ'च्या स्थानीं 'च्छ' होतो. आणि त्यामुळें येथें 'य'ला गुरुत्व आणि दोन मात्रा. ८. तुझ्या सदाचरणामुळें, तुझ्या भलेपणामुळें. ९. कढ (उत्कंठा). १०. कामधेनुपालक. ११. उकळणें=वसूल करणें, घरोघर फिरून मागणें. १२. मृत. १३. शेवटची गति (मोक्ष). १४. सुनर (सज्जन) कास घालूत (सिद्ध होवोत). १५. भाषणांतीं. १६. तो पुत्र. १७. बापाच्या (संजयाच्या). १८. नारदासमक्ष. १९. सुज्ञजन अमृतकथा काच्या (क्षुद्र) म्हणती. २०. दयामृतमेघ. **रूपका**लंकार. २१. आकाशांत संचार करणाऱ्या मुनीतें (नारदातें). वर्णनसादृश्यः–'...भरला नारद मुनींद्र गगनींच' (मोरोपंत–सभापर्व–अध्याय ७।७६). २२. संजयरूपी मेघ. **रूपका**लंकार २३. आपलें वित्त (द्रव्य) हेंच तोय (पाणी). २४. निपुत्री. २५. ज्यानें यज्ञ केलेला नाहीं असा.

म्हणुनि उठविला मुनिनें करवाया सुगतिकर सदाचरण. ॥ ८०
अभिमन्युसि 'धन्य' म्हणति गेले करुनि सुकृतें सुगतिला जे; ।
ज्यास स्वर्गति घडली या [1]मर्त्यगतीस तो सुगति [2]लाजे. ॥ ८१
निववितसे, जो विखरुनि सुखकर [3]करनिकर इंदु नित्य जगा, ।
तोचि [4]अभिमन्यु. धर्मा ! धरिल्या शोकासि निंदुनि त्यज गा ! ८२
उरले [5]शोच्यें. [6]सुगतिला गेल्याचा शोक कां करावा हो ? ।
कर्पूर कुशल वाहे नेत्रीं, [7]जड लोक [8]कांकरा वाहो. ॥ ८३
जोडावा स्वर्ग तुम्हीं, सोडावा सर्व मोह, माजा तों ।
हा भाव. शोक सारा सरला कीं ? [9]राजसत्तमा ! जातों. ॥ ८४
स्पर्श न मोहाचा हो तुज, [10]अंतर्हित परा शराचा [10]हो.' ।
ऐसें बोलुनि [11]झाला सुत [11]अंतर्हित [12]पराशराचा हो ! ॥ ८५

---

१. मृत्युलोकींच्या वस्तीस. २. रणामध्ये पराक्रम करून मरण पावला, या धन्य कृत्यापुढें स्वर्गति काय विशेष आहे ? ३. किरणसमुदाय. ४. अभिमन्यूत्पत्तीसंबंधीं व तो सोळाच वर्षे कां वांचला यासंबंधीं पुढील उतारा वाचनीय आहे:— "...देवीं अवतार धरिले कार्या । चंद्रासी प्रार्थितां, म्हणे, राया ! । बाधी मातें पुत्राची ॥ २१६ ॥ त्याचा वियोग न साहे मला । तुमच्या आग्रहें भूमंडळा । येतों, परी माझिया कळा । तितुकी वर्षे क्रमणें. ॥ २१७ ॥ ऐसें वदोनी शीतकर । पार्थकुक्षी वर्धला सुर । प्रतापे दिशा उजळोनि सैर । जाता जाहला स्वस्थाना ॥ २१८ ॥ पुराणांतरींचा सौरस । सौभद्र सहस्रार्जुनाचा अंश । चक्रव्यूहकथन हृषीकेश । सुभद्रेतें सांगतां, ॥ २१९ ॥ निद्राभरें व्यापितां तितें । गर्भे हुंकार दिधला तेथें । चमत्कारुनी रुक्मिणीकांतें । कथाभाग आवरिला ॥ २२० ॥ चक्रें कवळोनी पाणी । मागुती अर्पी चक्रपाणी । सहस्रभुजा छेदुनी क्षणी । दोन ठेवी जगदात्मा. ॥ २२१ ॥" (नरहरि मोरेश्वरकृत द्रोणपर्व–अध्याय १२). ५. शोकपात्र. मागें जे राहिले तेच खरे शोच्य होत. ६. मोक्षाला. 'गतीला' असा पाठभेद. ७. मूढ. ८. खडा. ९. 'साधुसत्तमा' असा पाठभेद. १०. तुझ्या गुप्त शत्रूंना बाणाचा स्पर्श होवो. 'स्पर्श न मोहाच्या हो तुज अंतर्हितपरा शराचा हो !' असाही पाठ आहे. तुज अंतर्हितपरा (अंतःकरणपूर्वक हित करण्याविषयीं तत्पर अशा तुला) मोहाच्या शराचा स्पर्श न हो (होवो)– असा अन्वय. हाही पाठ बरा आहे. ११. अंतर्धान पावला. १२. पराशराचा सुत, व्यास.

नृप आपणा मनिं म्हणे, ‘कोठें तो वत्स उत्सवदशील[1] ?’ ।
हें पुसतां[2], विजया तूं काय कसें प्राप्तकुत्स[3] वदशील[4] ?” ॥ ८६

·अध्याय सातवा·

संसप्तक[5] मथुनि[6] विजय सांजे[7] शिबिराशि यावया परते; ।
प्रभुसि म्हणे, ‘कां कांपे[8] मन; कांपविले जरि स्वयें पर[9] ते ? ॥ १
कंठ गहिंवरें भरला, शिरली हृदयांत केशवा ! धडकी, ।
येतें रडें वृथा कां ? बा ! माझी प्रकृति[10] काय गा ! रडकी ? ॥ २
स्फुरण[11]हि अनिष्ट[12], भिवविति उत्पातहि, सांग काय बापा ! हें. ।
कुशल असे कीं माझा राजा ध्यानांत नीट बा ! पाहें.’ ॥ ३
देव म्हणे, ‘कुशल असे प्रभु, ऐसें मन्मनास वाटतसे, ।
कीं थोडे जन जगतीवरि धरिते धर्मनीतिवाट तसे. ॥ ४
झालें असेल आणिक कांहीं. त्वद्विक्रिया[13] नव्हे वंध्या[14]. ।
यद्वातद्वास्तु[15], करूं[16] आधीं न गणूनि आंधिला[17] संध्या[18].’ ॥ ५
संध्या करवुनि नेतां सेनेंत, मनीं म्हणे परस्वामी[19], ।

१. आनंददायक शील ज्याचें असा. २. असें अर्जुनानें पुशिलें असतां. ३. प्राप्तानंद, निंदित असा. ४. हे धर्मा, तूं प्राप्तनिंद होत्साता, त्या विजयाला, कसें काय उत्तर देशील ? ५. अर्जुनाला मोठ्या युद्धांतून बाहेर काढून, हटकून मारावें, या हेतूनें शपथ घेऊन सिद्ध झालेले, ते संशप्तक अथवा संसप्तक. (अध्याय १ गीति १२७ पहा). ‘सम्यक् शप्तमंगीकारो यस्य सः संशप्तकः’ असा ह्या शब्दाचा विग्रह आढळतो. त्रिगर्तराजाचे पुत्र सुशर्मा, सुरथ, सुधनु, सुबाहु आणि सुधन्वा, हा एक संसप्तक वर्ग. आणि सत्यवर्मा, सत्यरथ, सत्यव्रत, सत्येषु आणि सत्यकर्मा हा दुसरा संसप्तक वर्ग. या दोहोंनाही अर्जुनानें मारिलें. ६. ‘वधुनि’ असें पाठांतर. ७. सायंकाळीं. ८. ‘कां कंपे मन’ असें पाठांतर. ९. शत्रु. १०. देहस्वभाव. ११. वामनेत्रादिक स्फुरण. १२. वाईट. १३. तुला होणारीं चिन्हें. १४. तुझ्या अंतःकरणांत जो विकार उत्पन्न झाला आहे, तो निष्फळ नव्हे. त्याला कांहींतरी फळ आहे. म्हणजे कांहींतरी अनिष्ट घडलें आहे. १५. जें कांहीं असेल तें असो. १६. ‘करीं’ असें पाठांतर. १७. शोकाला. १८. संध्यावंदन. १९. श्रेष्ठाधीश, श्रीकृष्ण.

'स्वधना न जपों कैसा ? [1]काय रथीं वाहतों [2]परस्वा मी ?' ॥ ६
अर्जुन अस्वस्थहृदय होऊं [4]गतश्रीक शिबिरें [5]पाहून ।
प्रभुसि म्हणे, '[6]महदप्रियसूचक बहु चिन्ह काय याहून ?॥ ७
मी [7]नायकें सुवाद्यें स्तुतिगीतरवासि, तूंहि नायकसी. ।
मज पाहुनि आप्त अधोमुख होती. गति असेल हाय ! कसी ?॥ ८
अतुल प्रताप लोकीं ज्या खलबलजलधिवाडवाभाचा ।
तो कृष्णा ! आज तुझा मज आला कां न [9]आडवा [10]भाचा ? ९
व्याकुळ होय महाजन, [11]भाजन होउनि जसा [12]महाघातें, ।
लोक तसा हा दिसतो, व्हावें विकलत्व हें [13]महाघातें.' ॥ १०
शिबिरीं शिरोनि विजयें धर्मादिक देखिले अधोवदन. ।
तें पुत्ररत्न एकचि न निरखिलें [14]सद्गुणर्द्धिचें सदन. ॥ ११
[15]मृदुलप्रकृति न साहे सुतशोका, जेंवि न रविला पाला; ।
शिबिरीं करी [16]परोपरि नारायणमित्र नर विलापाला. ॥ १२
'मज आडवा न आला, तरि या [17]पांचांत [18]पृथुनयन [19]सावा ।
[20]कां [21]नीरजनाभाचा भाचा सुगुणाब्धि [22]पृथुनय [23]नसावा ? ॥ १३
बोले, [24]कृष्णमुखींची वेणु तसा, परम [25]लाडिका [26]वाणी. ।

१. रथामध्यें परधन आहे काय ? अर्थात् हें माझेंच धन. मी याचें रक्षण केलेंच पाहिजे. २. परद्रव्य. ३. 'जाय' असें पाठांतर. ४. हततेज. ५. सैन्याचा तळ. ६. महत्+अप्रिय+सूचक=मोठें अनिष्टदर्शक. ७. न आयकें. ८. कृष्णा ! ज्या खल-बल-जलधि-वाडव-आभाचा प्रताप लोकीं अतुल, तो तुझा भाचा (अभिमन्यु) मज आज आडवा कां न आला ?–असा अन्वय. खल (दुष्ट), बल (सैन्य), जलधि (समुद्र), वाडव (वडवानल), आभ (त्या सारखा शोभणारा)=दुष्टांच्या सैन्यरूप समुद्रास वडवानलासारखा शोभणारा. वडवानल समुद्राचें पाणी शोषून घेतो, असें पुराणांत वर्णिलें आहे. येथें **रूपक** अलंकार आहे. ९. सामोरा. १०. कृष्णाचा भाचा अभिमन्यु. ११. पात्र. १२. महा+अघातें=मोठ्या पातकाला. १३. मोठ्या घातानें. १४. सद्गुणऋद्धीचें (वृद्धीचें) स्थान. १५. कोमलप्रकृति अर्जुन. १६. अनेक प्रकारांनीं. १७. प्रतिविंध्यादि पांच द्रौपदीपुत्रांत. १८. दीर्घनेत्र. १९. सहावा. २०. 'कीं' असें पाठांतर. २१. पद्मनाभाचा (कृष्णाचा) भाचा (अभिमन्यु). २२. नीतिमान्, अभिमन्यु. २३. कां नसावा=कां बरें नसावा ? येथें 'तरि' याचा 'तर्हि' (म्हणून, त्या अर्थी) असा अर्थ समजावा. (जरि ज्या अर्थी) मज आडवा न आला, तरि (त्या अर्थी) तो या पांचांत सावा (सहावा) कां नसावा ?–असा अन्वय. २४. 'बोले, कृष्णमुखींचा वेणु' असा पाठभेद. वेणु=पांवा, बांसरी. २५. लाडका. २६. भाषण. 'बोले' याचें कर्म.

जो स्पर्शे शिशुहि, न घें गुरुसन्निध पर, मला डिकेवाणी. ॥ १४
जो बहु पैरपृतनासीं, गोपींसीं बाळकृष्णसा, रमला, ।
दावा हो ! सत्वर तो स्वगुरुवचनगीतकृष्णसार मला. ॥ १५
बालहि जो खड्ग परशु चक्र गदा चाप तोमरा वाहे, ।
संकल्प दुर्जनांचे झाले कीं सफल 'तो मरावा' हे. ॥ १६
ज्याची शास्त्रीं शस्त्रीं व्यवहारीं वासुदेववत् समज, ।
काय तुम्ही केला ? हो ! आणुनि तो भेटवाचि वत्स मज. ॥ १७
बहुधा तुम्हीं धरुनि गुरुकृतचक्रव्यूहभेदकामातें ।
केलाचि पुढें. नाहीं तरि करिता स्पर्श खेद कां मातें.? ॥ १८
न तुम्ही, न कौरवहि, मी तद्धातक; कीं तया रिघायाचा ।
कथिला उपाय चपला; आधीं म्यां न कथिला निघायाचा. ॥ १९
इतुक्यांसि एक बालकसंरक्षण कठिन कां ? नवल यांचें ।
भुजसौकुमाय ! सुचलें अपनयनहि सेवकां न वलयांचें. ॥ २०
तुमच्या भुजशस्त्रांतें धिक् ! हा निःसार हो ! खटाटोप. ।
सु. शिर ज्या न रक्षवे, तो कार्याचा काय ओखटा टोप ? ॥ २१

१. जरी वडिलांसमक्ष मी त्याला घेईना, तरी तो मला गोंदाप्रमाणें चिकटून राही. २. डिकासारिखा. ३. शत्रुसैन्यासीं. ४. आपल्या पित्याचें वचन हेंच गीत, त्याला लुब्ध होणारा हरिण–म्हणजे पित्राज्ञापालनाविषयीं जो अत्यंत उत्सुक. ५. हरिण. ६. गुरगुज, हा घुसळण्याच्या रवीसारखा असतो. ७. तो=अभिमन्यु. ८. 'ज्याचा' असें पाठांतर. ९. कृष्णासारखे ज्ञान. समज=आकलनशक्ति. १०. द्रोणरचित चक्रव्यूहाचा भेद करण्याच्या इच्छेला. ११. 'खेद' हा कर्ता, 'स्पर्श' हें कर्म. येथें '**असंगति**'अलंकार आहे, असें कित्येकांस वाटण्याचा संभव आहे. परंतु पिता व पुत्र यांच्यामध्यें पोष्यपोषकसंबंध असल्यामुळें, मुलास दुःख झालें असतां, बापास दुःख होणें साहाजिकच आहे. म्हणून येथें असंगति (विसंगतपणा) आहे असें म्हणतां येत नाहीं. १२. त्याचा वध करणारे तुम्ही, किंवा कौरवही नव्हेत; पण मीच त्याचा घातक, कां तर त्या चपळ मुलाला चक्रव्यूहांत शिरण्याची युक्ति मी शिकविली. आधीं बाहेर निघण्याची युक्ति शिकवायाची ती शिकविली नाहीं. १३. तत्+घातक=त्याचा घात करणारा. १४. शिरायाचा. १५. यांच्या भुजांचें कोमलत्व हें एक नवलच होय ! त्यांच्या हातांतील कडीं काढण्याची गोष्ट यांच्या सेवकांस कशी बरें सुचली नाहीं ?–हें निंदापर भाषण आहे. १६. सौकुमार्य=सकुमारता, नाजुकपणा. (अशा कोमल भुजांतून कडीं कां काढलीं नाहींत–असा भाव.) १७. काढणें. १८. कड्यांचें. १९. निंद्य, वाईट. ज्या शिर न रक्षवे तो ओखटा टोप (शिरस्त्राण) कार्याचा काय ?

वदला असेल, 'कृष्णा ! अव्हेरिसि बाळनमन कां ? पावें.' ।
अथवा त्यांतें ज्यांचें समयीं अेलुमाळ न मन कांपावें. ॥ २२
हर ! हर ! जाणों चुरिला तो बाळ करेणुनीं चरणपातें. ।
शिव ! शिव ! भरितिल कीं हो ! तो बाळक रेणुनींच रणपातें. २३
कुंतीस काय सांगूं ? कृष्णेला दाखवूं कसें वदन ? ।
दुष्कर मला सुभद्रासांत्वन, दुर्दर्श उत्तरा-सदन. ॥ २४
जाऊं दिलें मजविना परलोका काय एकला भाचा ? ।
होता उपाय हातीं सुयशाच्या हाहि एक लाभाचा. ॥ २५
खाताचि अद्वितीय सुदर्शनें परबळ पळांत चादून । ।
सु. परि बुडविल निज यश तें कर्मे करिल कवि कशास दौडून ? २६
यांचें स्वरूप कळतें तरि, पळ न विसंबताचि बाला हीं ! ।
'शिव ! शिव !' म्हणेल मरणावधि वैधव्याधिमग्न बाला 'हा !' २७

ज्याला मस्तकाचें रक्षण करितां येत नाहीं, असें मोडकेंतोडकें शिरस्त्राण काय कामाचें ? त्याचा उपयोग काय ? अर्थात्–अशा शिरस्त्राणाचा कांहींच उपयोग नाहीं.

१. हा पांडवांना मारिलेला टोला दिसतो. येथें पंतवंशज रा. रा. रा० द० पराडकर यांनीं प्रसिद्ध केलेल्या प्रतींत 'त्या तेजाचें' असा पदच्छेद केला आहे. तोही चांगला आहे. तें तेज=पराक्रमी अभिमन्यु. टीपेंतील पाठाचा स्वीकार केल्यास येथें **आक्षेप** नामक अलंकार होतो. २. यत्किंचित्. ३. हत्तिणींनीं. ४. धुळीनें. ५. रणपतनें. रणपातें रेणुनीं बाळक भरितील–असा अन्वय. ६. पाहण्यास कठिण. उत्तरेच्या घराकडे देखील पाहवत नाहीं, तिला भेटण्याची गोष्टच बोलावयास नको. येथे एकापेक्षां एक कठीण गोष्टींचें वर्णन आहे म्हणून येथें **'सार'**लंकार होतो. येथील **करुणरसा**चा परिपाकही हृदयद्रावक झाला आहे. ७. कृष्णानें–असा अर्थ. ८. हा, बालक. किंवा, अभिमन्यूबरोबर परलोकीं जाणें हा. ९. एकटा, अनुपम. १०. कृष्णाचें सुदर्शन चक्र. ११. एकटें सुदर्शन चक्र शत्रूच्या सर्व सैन्याला मारून पार करितें. १२. शस्त्र न धरण्याचा नियम मोडणें हें कर्म. १३. शत्रुनाशनाचा नियम. १४. शहाणा (कृष्ण.) १५. जाणून बुजून, मुद्दाम. १६. धर्म, भीम, नकुळ व सहदेव यांचें. स्वरूप=सहजगुण, मूळ स्वभाव. १७. बाळाला. १८. मी (अर्जुन). 'याचें स्वरूप कळतें तरि, पळ न विसंबतोंचि बाला हो !' असाही पाठ आहे. १९. मरणपर्यंत. २०. वैधव्यरूप व्याधींत निमग्न. २१. अभिमन्यूची स्त्री उत्तरा. २२. 'हो !' असें पाठांतर. बाला=सोळा वर्षे वयाची स्त्री. 'बाला स्यात्षोडशाब्दा तदुपरि तरुणी त्रिंशतिर्यावदूर्ध्वं । प्रौढा स्यात्पंचपंचाशदवधि परतो वृद्धतामेति नारी.' ॥ (रतिरहस्य).

समयीं कोठें गेल्या बा ! तुज सोडूनि [1]गुरुजनवराशी ? ।
[2]वाहेल आधिच्या किति ती [3]मृदुलप्रकृति नित्य नव [4]राशी. ॥ २८
स्वार्थपर, अकृप, [5]निस्त्रप, आम्ही म्हणउनि मनांत [6]विटशील, ।
परि उत्तरा सती [7]परगतिकामा तुज म्हणेल [8]विट-शील. ॥ २९
न म्हणे 'अमृतरस अधिक,' करि ज्याच्या बाप लालना, [9]कवि तो.
काय [10]पितृपरिष्वंगज जें सुख त्या बा ! [11]पलाल [12]नाक [13]वितो ? ३०
कां माझें उर न [14]उले ? कवि '[15]पवि' कीं म्हणति [16]तोकशोकाला ।
लोकां[17] लाजे मन, कीं जावें यश हारवूनि [18]ओकाला. ॥ ३१
न तुतें पार्थ, कदाचित् कृपणहि, वांचेल सोडुनि, [19]धनातें ।
चुकविल न चकोराच्या [20]विधुवांचुनि सर्व [21]सोडु [22] निधनातें [23].॥ ३२
हा वत्सा रक्ताक्षा ! झाले [24]त्वत्सुगुण आजि [25]घातक-से ।
बा ! [26]वाहिले परांचे तुजला हाणावयासि हात कसे ? ॥ ३३
[27]अभिमुख [28]परप्रहारें पडला कीं; धर्मराज ! सांगावें. ।

---

१. गुरुजनाचे वर (श्रेष्ठ) आशी (आशीर्वाद). 'आशीः' असा मूळ शब्द. हा स्त्रीलिंगी आहे. २. साहील. ३. कोमल प्रकृति (उत्तरा). ४. आधिच्या (मनोव्यथेच्या) नव्या राशी. ५. निर्लज्ज. ६. कंटाळशील. ७. मोक्षाची इच्छा करणाऱ्या. ८. जार स्वभावाचा. स्वस्त्री सोडून परगतिरूपी परस्त्रीची इच्छा धरणारा. ९. तो बुद्धिमान् पुत्र अमृतरस अधिक न म्हणे. १०. पित्याच्या आलिंगनापासून झालेलें. पित्याच्या कडेवर बसण्याचें जें सुख तें क्षुद्र अशा स्वर्गामध्यें मिळणार आहे काय ? ११. तृण; अर्थात् तृणप्राय, क्षुद्र. १२. स्वर्ग. १३. देतो. १४. फुटे. १५. वज्र. १६. पुत्रशोकाला 'वज्र' म्हणतात. १७. यश घालवून घरीं जावें लागतें, म्हणून जनापुढें मनाला लाज होत आहे. १८. स्थानाला. १९. कृपण हा कदाचित् धनाला सोडून वांचेल, पण तुला सोडून पार्थ (मी) वांचणार नाहीं. २०. चंद्रावांचून. २१. स+उडु= नक्षत्रांसह अशा (चंद्रावांचून). २२. नक्षत्रांसहित चंद्राखेरीज सर्व (इतर कोणीहि) चकोराच्या निधनातें न चुकवील—असा अन्वय. चकोर चंद्रकिरणांचें पान करून राहतो, असा कविसंकेत आहे. चकोर शब्दाचा विग्रह असा आहे:—'चकति चंद्रामृतपायित्वाद्विषं प्रतिहंति, चक् तृप्तौ प्रतिघातेच चकोरः । चकति तृप्यते ज्योत्स्नाया इति चकोरः' इति स्वामी. २३. मरणातें. २४. तुझे सुगुण. तुझे पराक्रम हेच तुझ्या मरणाला कारण झाले. २५. येथें 'लेश' अलंकार आहे, असें म्हणतां येईल. ह्याला व्याजोक्ति असेंही म्हणतात. २६. शत्रूंचे हात कसे चालले ? २७. मुखासमोर. २८. शत्रूंनीं

प्रभुजी ! न जें यशस्कर तें स्वगुरुसमक्ष तोक कां गावें ? ॥ ३४
संरक्षिलें न, असतां शस्त्र नयन बाहुही विपुल, याला; ।
निष्फल भार वहातां कां ? सोडा, [1]जो नव्हे [2]रिपु-लयाला ?' ॥ ३५
भगवान् म्हणे, 'बुडाला कीं हा मोहांत ! [3]रक्ष भो [4]गीते ! ।
[5]जीवांला विषय, तसे संमोहाया न दक्ष [6]भोगी ते.' ॥ ३६
प्रभु पार्थासि म्हणे, 'भो [7]बुधवीरशिरोमणे ! सखे ! दमन ।
केलें तुझेंहि शोकें; माझें [8]येणेंचि बहु सखेद मन. ॥ ३७
[9]गळबंधन कीं पुत्रप्रेम; विवेकेंचि तोड बापा ! हें. ।
सुखकर नव्हेचि. उघडुनि [10]विषरत्नाचा न तो [11]डबा पाहें. ॥ ३८
[12]सोत्साह युद्धधर्मा होता; नव्हताचि तो असावध हो ! ।
गेला उत्तम गतिला; त्याचा कां शोक हा [13]असा [14]वध हो ?' ॥ ३९
धर्म म्हणे, 'जें झालें तें कथितों सर्व ऐक बा ज्ञात्या ! ।
म्यां 'व्यूहीं द्वार करीं', ऐशी केली स्वयेंचि आज्ञा [15]त्यां. ॥ ४०
द्वार करी, शिरतां भी न व्यूहा, जेंवि सागरा [16]मकर. ।
नुरवी [17]कुमार [18]परमद लवहि, जसा धरुनि राग [19]रामकर. ॥ ४१

मुखावर प्रहार केल्यानें पडलाना ? सांगा. तसें जर नसेल तर (पाठीवर घाय घेऊन पडलेल्या) अयशस्कर मुलाचें वर्णन कशाला करावें ?–असा भाव.

१. जो शस्त्रादिकांचा भार. २. जो रिपुलयाला समर्थ नव्हे तो भार सोडा. ३. रक्षण कर. ४. हे भगवद्गीते. ५. जीवांना मोहात गुंगविण्यास विषय (एथें पुत्रप्रेमादि) जसे समर्थ आहेत, तसे त्यांना गुंगविण्यास सर्प देखील समर्थ नव्हेत. ६. सर्प. ७. तूं ज्ञानिजनांचा आणि वीरांचा शिरोमणि असतां शोकानें तुझें दमन केलें; तुला दाबून टाकिलें. यामुळें माझ्या मनाला फार खेद होत आहे. 'शिरोमणि' व 'सखि' यांचीं 'शिरोमणे' व 'सखे' हीं संस्कृत भाषेच्या नियमानें झालेलीं संबोधनें आहेत. ८. यामुळेंच. ९. गळफांस. उत्प्रेक्षालंकार. १० पुत्रप्रेम हा विषयुक्त रत्नाचा डबा आहे. जरी तें रत्नासारखें प्रिय आहे, तरी विषासारखें घातुक आहे. तें उघडून पाहूं नको. ११. करंडा. १२. स+उत्साह=उत्सुक. १३. रणांगणीं मरणें असा. १४. त्याचा वध हा असा शोक (शोककारक) कां व्हावा ? १५. अभिमन्यूस. १६. सुसर. १७. बालक अभिमन्यु. १८. शत्रूचा गर्व. १९. परशुरामाचा हात. परशुरामानें पृथ्वी एकवीस वेळ निःक्षत्रिय केली, या कथेवर येथें कटाक्ष आहे.

होय जयद्रथ आम्हां हेतु कुमारास अंतरायास. ।
त्यास[1] न निवारवे, बा ! जेंवि प्रबलास[2] अंतरायास[3]. ॥ ४२
आम्हां त्या क्षुद्रें[4] रुद्रवरें[5]करुनि वारिलें[6] वाटे. ।
प्रभुनें[7] सौभद्रासि न, पांचांसहि आजि मारिलें, वाटे. ॥ ४३
कृतवर्मा द्रोण कृप द्रोणज[8] कौशल्य-कर्ण रथ सा[9] हे ।
शर वर्षले[10] जलदसे; परि धैर्यें-करुनि धर्मपथ[11] साहे. ॥ ४४
केला विरथ अधर्में[12], दूषुनियां शुद्धयुद्धसव, सानीं[13], ।
दौःशासनिनें[14] वधिला स्वगदेनें कश्मलांत[15] अवसानीं[16]. ॥ ४५
अष्टसहस्र रथ, द्विपपति नवशत, राजपुत्र रणदक्ष ।
द्विसहस्र, मर्दिले बा ! सौभद्रें अश्वपति बहुत लक्ष. ॥ ४६
गुरुला[17] न सांपडावें म्हणउनि ऐसें करावया गेलों, ।
तों शोका सांपडलों. पुत्रा[18]आधींच मी न कां मेलों ?' ॥ ४७
पाडी[19] विजयास, म्हणे, 'तुजही मी' शोकवेग 'मोहीन'. ।

---

१. त्या जयद्रथाचें निवारण करणें झालें नाहीं. २. प्रबल यमाचें निवारण करणें होत नाहीं त्याप्रमाणें किंवा प्रबल मनुष्याला देखील यमाचें निवारण होत नाहीं त्याप्रमाणें. ३. यमास. ४. नीचशिरोमणीनें. ५. शंकराच्या वरामुळें. पांडव वनवासांत असतां जयद्रथानें द्रौपदीस पळवून नेण्याचा प्रयत्न केला होता. पण तो पांडवांच्या पराक्रमामुळें सिद्धीस गेला नाहीं व त्यास धर्मास शरण जावें लागलें. ह्या अपमानाचा सूड घेण्यासाठीं जयद्रथानें शिवाराधन केलें. तेव्हां शंकरांनीं त्यास पुढीलप्रमाणें वर दिलाः—'यश एकदाचि अर्जुनरहितहि चवघां रणांत भंगुनि घे. ॥' (मोरोपंती वनपर्व–अध्याय ९ पहा). ह्या वरास अनुसरून अर्जुन दुसरीकडे गुंतला असतां, जयद्रथाने जय मिळविला. ६. निवारिलें. ७. शंकरानें. ८. अश्वत्थामा. ९. सहा. १०. 'वर्षले' हें क्रियापद कर्तरि आहे म्हणून हे 'सहा रथी' असा कर्ता. ११. धर्ममार्गी अभिमन्यु. १२. शुद्ध असा जो युद्धरूप यज्ञ, त्याला दूषण लावून, सहाजणांनीं मिळून त्याला अधर्मानें रथाखालीं पाडिलें. सारालंकार. १३. सहाजणांनीं. १४. दुःशासनपुत्रानें. याचें नांव स्पष्ट ज्ञात नाहीं. १५. मूर्छित असतां. १६. शेवटीं. १७. द्रोणाचार्याला. १८. अभिमन्यूच्या पूर्वीच. १९. 'शोकवेग' हा कर्ता, 'विजयास' हें कर्मपद आणि 'पाडी' हें क्रियापद. शोकवेग हा विजयाला पाडी. म्हणजे त्या शोकवेगामुळें अर्जुन पडला. तो शोकवेग त्याला म्हणे, 'मी तुलाही मोहांत पाडीन'. हा शोकवेग विषापेक्षांही फार भयंकर; कांकीं विष हें मनुष्याला मूर्छित करितें खरें, तरी औषधादिकांनीं तें ओकून टाकितां येतें. म्हणून तें या शोकवेगापेक्षां हीन म्हणजे हलकें गमो, वाटो.

हा[1] अधिक, क्ष्वेडें[2] करी मूर्छित तरि ओकवे, गमो हीन. ॥ ४८
धर्ममुखें वृत्तांत स्वसुताचा ऐकतांचि तो कानें, ।
पडला मूर्छित अर्जुन 'हाँ[3] ! वत्स !' असें म्हणोनि शोकानें. ॥४९
सर्वाप्त-वीरमंडल झालें अत्यंत घाबरें हो ! तें. ।
धर्म म्हणे, 'दाखवितें[4] न तपोवन[5] या अघां[6], बरें होतें.' ॥ ५०
सावध होउनि अर्जुन सोडी बहु दीर्घ उष्ण निःश्वास. ।
कोपें पेटे, वाटे जाळील संधार्तराष्ट्र[7] विश्वास[8]. ॥ ५१
विजय म्हणे, 'सत्य[9] उद्यां मारीन जयद्रथासि आपण, हो ! ।
म्यां केलां[10], होइल जरि मिथ्या, शरणागतींच[11], हा पण हो[12]. ५२
वांचेल कराया तप, जरि जाइल काय[13] तो अरण्यातें; ।
अथवा म्हणेल, 'शरणागत मी या केशवा शरण्यातें[14];' ॥ ५३
किंवा युधिष्ठिराच्या आश्रय तो[15] जरि करील पायाला[16], ।
गेला शिवाहरिभयें[17] प्रभुमागें तरि करी[18] लपायाला; ॥ ५४
अथवा भीम–नकुळ–सहदेवांसि म्हणेल, 'वांचवा दास,' ।
तरि खोट्यासहि राखिति साधु, जसे काय लांच वादास[19]. ॥ ५५
ज्या जीवदान दिधलें, तो हा कीं ? कां अंजी[20] ! वदाना तें ? ।

---

१. हा पुत्रशोक. व्यतिरेकालंकार २. विष. 'क्ष्वेडस्तु गरलं विषम्' इत्यमरः । क्ष्वेडते (मोहयति) स क्ष्वेडः. ३. हाय हाय. ४. तपोवन या अघा न दाखवितें. म्हणजे तपोवनांत पूर्वी होतों, त्याप्रमाणें आतांही असतों, तर हें पाप, हें कुकर्म आमच्या हातून घडतेंना. आणि तसें घडतें तर फार बरें झालें असतें. ५. वनांतच असतों तर बरें–असा भाव. ६. या कुकर्मास. ७. धृतराष्ट्रपुत्रांसह. ८. जगताला. ९. खरोखर. १०. केलेला (पण). ११. शरणागताचे ठायीं मात्र मिथ्या होवो. १२. होवो. म्यां केला (केलेला) हा पण जरि मिथ्या होईल, तरी शरणागतींच मिथ्या हो–असा अन्वय. १३. तो देह (जयद्रथाचा.) १४. शरणागताचें रक्षण करण्याविषयीं समर्थ अशातें. १५. जयद्रथ. १६. किंवा जर युधिष्ठिराच्या पायाला आश्रय करील (पाय हाच आश्रय करील) तर दुर्गेच्या सिंहाच्या भयानें करी (हत्ती) प्रभुमागें (शिवाच्या मागें) लपायाला गेला, म्हणायाचा. म्हणजे दुर्गादेवीचें वाहन जो सिंह त्याच्यापासून हत्तीचें रक्षण फक्त महादेवच करूं शकतील, त्याप्रमाणेंच माझ्यापासून जयद्रथाचें संरक्षण श्रीकृष्ण किंवा धर्मराजच करूं शकतील–असा भाव. १७. दुर्गावाहन सिंहाच्या भयानें. १८. हत्ती. १९. [खोट्याही] वादास. २०. अहो ! हें भाषण केशव, युधिष्ठिर, भीमादिकांस उद्देशून आहे.

कळलें, [1]पात्र, दुखविला अहिसा वैरी, न जीवदानातें. ॥ ५६
वेधिलाचि रणांत उद्यां म्यां [3]बालकघातहेतु [4]सिंधुप हा ।
[5]यो गरुडें धरिला [6]तो अहि उडवुनि [7]शत्रुसैन्यसिंधु, पहा ॥ ५७
मारिन जयद्रथाला, कोंडिन [8]दोघे गुरूहि शर-[9]भवनीं. ।
भ्रमतिल कौरव माझ्या [10]इषुपटलीं जेंवि सिंह शरभ-वनीं. ॥ ५८
न वधिन जयद्रथा तरि पावेन [11]असत्यसंध नरका मी; ।
ज्या [12]ज्यों पावे क्रोधी, लोभी, [13]बहुसंपदंध, नर कामी. ॥ ५९
मारिन जयद्रथ, करिन यश भुवनी, [14]विशिखजाल [15]वितते रणीं ।
हें न घडतां जळेन [16]ज्वलनीं, होतांचि [17]अस्तमित [18]तरणी.' ॥ ६०
करितां अशी प्रतिज्ञा, जगदीशें पांचजन्य वाजविला. ।
लाजविला [19]प्रलयजलद, नादें ब्रह्मांडगोल गाजविला. ॥ ६१
वाजवुनि शंख [20]झाला कौरवहृदयासि देव [21]दत्त-दर. ।
तैसाचि सखा त्याचा [22]अर्जुन फुंकोनि [23]देवदत्त दर. ॥ ६२
देतां दुर्जनहृदया [24]स्वदररवें–करुनि कंप [25]देवोत्तमें ।
प्रकटिति [26]कटकीं भेरिप्रमुखें बहु [27]नादसंपदे वाद्यें. ॥ ६३

१. अहिसा (सर्पासारखा) दुखविलेला जो वैरी, तो जीवदानाला पात्र नव्हे. २. निश्चयेंकरून वधिला, असें समजा; खचित वध करणार. ३. बालकघातांला कारणीभूत. ४. सिंधुराज (जयद्रथ.) ५. या गरुडानें (म्यां.) ह्या गीत्यर्थाशीं अध्याय १ गीति १०६ चा पूर्वार्ध ताडून पाहावा. ६. तो सर्प (जयद्रथ.) ७. शत्रुसैन्यरूप समुद्रामध्यें तो लपला असला तरी त्या समुद्रालाच उडवून देऊन, त्या सर्पाला (जयद्रथाला) या गरुडानें मारिलें असें समजा. रूपकालंकार. ८. द्रोणाचार्य व कृपाचार्य. ९. बाणांच्या घरामध्यें–वेढ्यामध्यें. हें पंतांचें आवडतें यमक आहे (अध्याय १।१०७ पहा). १०. बाणांच्या आच्छादनांत. ११. ज्याची प्रतिज्ञा खोटी ठरली आहे असा. १२. नरकास. १३. बहु(अत्यंत)+संपत्+अंध=श्रीमदांध. १४. बाणांचें जाळें. १५. विस्तृत, पसरलेलें. १६. अग्नीमध्यें. १७. अस्तम्+इत=अस्तमान पावलेला. १८. सूर्य. १९. प्रलयमेघ. २०. शंख वाजवून कृष्णानें कौरवहृदयाला भीति उत्पन्न केली. २१. ज्यानें भय दिलें आहे असा. २२. तसाच अर्जुन कौरवहृदयाला भीति देता झाला. २३. देवदत्तनामक शंख. 'दर' शब्दाचे (१) शंख, (२) भीति, (३) अल्प, असे तीन अर्थ होतात. ह्या तिन्ही अर्थी हा शब्द पंतांनीं आपल्या काव्यांत योजिला आहे. २४. आपल्या शंखाच्या ध्वनीनें दुर्जनहृदयाला कंप देतांच. करुनि=योगानें, द्वारें. २५. देवश्रेष्ठानें, कृष्णानें. २६. सैन्यांमध्यें. २७. नाद-

चारकथित[1] प्रतिज्ञा परिसुनि बहु सिंधुराज तो भ्याला. ।
भिववी धननाशाची वार्ता अत्यंत जैंवि लोभ्याला. ॥ ६४
राजसभेप्रति जाउनि पार्थाची श्रुत करी प्रतिज्ञा ती. ।
'पळतों' म्हणे; 'न रक्षिति पैळ[2] हरिभागा[3] करीप्रति ज्ञाती' ॥ ६५
'जाँच[4] म्हणा, न उगे[5] तुम्हि धरुनि असा ध्यान[6], हा निरोपाला ।
पावो, रिपुची त्यांच्या[7] लेश असाध्या न हानि रोपाला[8].' ॥ ६६
कुरुप[9] म्हणे, 'पतनावधि[10] निजधर्मी काय[11] हा निभावो जी ! ।
शुद्धयशोहानिपरिस[12] बहु वपुची काय हानि भावोजी[13] ? ॥ ६७
दुःशासनादि आम्ही आहों तुज सर्व वज्रकोट[14], रहा. ।
कर्ण भुजाश्रितजीवा न म्हणों दे कीं सुरद्रुकोटर[15] 'हा !.' ॥ ६८
आहेत कृप, द्रोण, द्रौणि, शुचियशासि सर्व थारा जे, ।
रक्षितिल तुला यत्नें हे कालिंगादि सर्वथा राजे. ॥ ६९
आहेस शूर; तूंही सोडूं धृति[16]-धर्म-नय नको, पावें. ।

बाहुल्यातें. भेरिप्रमुखें बहु वाद्यें नादसंपदे प्रकटिति—असा अन्वय.

१. दूतांनीं सांगितलेली. २. पळभर देखील. ३. सिंहाचा भाग जो हत्ती त्याला. ज्ञाती=ज्ञातिबांधव, जातभाई. ४. जाच म्हणा (तूं समरांगणांतून जा, असें मला म्हणा) [पण] तुम्ही ध्यान धरुनि उगे न असा (तुम्ही मौन धारण करून स्वस्थ बसूं नका, पांडवांशीं युद्ध करा.) हा (जयद्रथ) निरोपाला पावो (मला जाण्याची परवानगी द्या). त्याच्या(अर्जुनाच्या) रोपाला (बाणाला) रिपुची हानी (माझा नाश करणें) असाध्या न (साध्य आहे, अर्जुन आपल्या बाणानें माझा नाश करील)—असा अन्वयार्थ. येथें दोन 'न'कार मिळून एक 'हो'कार झाला आहे. 'द्वौ नञौ प्रकृतार्थं गमयतः' असा वचनाधार प्रसिद्धच आहे. ५. रहा. ६. मौन. ७. अर्जुनाच्या. ८. बाणाला. ९. दुर्योधन. १०. पतन+अवधि=मरणपर्यंत. मरण येई तोंपर्यंत हा देह स्वधर्मांत (क्षात्रधर्मांत) निभावो. ११. देह. १२. शुद्धयशोहानिपरिस (विमलकीर्तीच्या हानीपेक्षां) वपुची (शरीराची) हानि (नाश) बहु (ज्यास्त, महत्वाचा) [आहे] काय?—असा अन्वय. 'न भीतो मरणादस्मि दूषितं केवलं यशः' ही चारुदत्तोक्ति प्रसिद्धच आहे. पुढें अ० २३।२३ पहा. १३. धृतराष्ट्रकन्या दुःशला तिचा हा पति. म्हणून त्याला 'भावोजी' म्हटलें आहे. १४. अभेद्य कोट. १५. सुर+द्रु+कोटर=कल्पतरूची ढोलच कीं [काय] असा कर्ण भुजाश्रित जीवा (त्याच्या बाहुबळाचा आश्रय करणाऱ्या जीवास) 'हा !' (हाय ! हाय !) [असें] न म्हणों दे—असा अन्वय. १६. धृति=धैर्य.

कोपुनि काय करिल पर? न [1]महेशाचेंचि नयन कोपावें.'॥ ७०
बोलुनि ऐसें, येउनि वंदुनि [2]गुरुच्या पदाप्रति ज्ञाते।
कुरुसिंधुराज कथिती पार्थकृता [3]तापदा प्रतिज्ञा ते.॥ ७१
सिंधुपति म्हणे, 'गुरुजी! [4]लाघव दृढ [5]दूरलक्षवेध रणीं।
बहु जाणें मी, [8]कीं तो, [7]रविलाचि [6]अशेष लक्षवे धरणीं.'॥ ७२
द्रोण म्हणे, 'सिंधुपते! ठावें हें तुजहि, त्याहि [9]सभ्यास, ।
परि तुजहुनि विजय अधिक; त्याचा [10]चापीं अखंड अभ्यास.॥७३
बहु खवळला धनंजय वनवासें; त्यांत आजि [11]सुत-पातें।
[12]तत्तप बहुमत त्यां, जे तपले [13]पंचाग्निमाजि सु-तपातें.॥ ७४
परि तूं भिऊं नकोचि; त्यजुनि मरणभय सुखें करीं समर.।
न शकतिल [14]मद्भुजाश्रितमर्त्यविलंघन करावया [15]अमर.॥ ७५

१. महेश्वराचें (शिवाचें.) जयद्रथानें तप करून शंकरास प्रसन्न केलें होतें, त्यास उद्देशून हें भाषण आहे. २. द्रोणाचार्यांच्या. ३. ताप देणारी. ४. चापल्य. ५. लांबचें निशाण मारणें. ६. सर्व. ७. पाहवतो. ८. तो (वेध) धरणीं (धरितांना, नेम धरण्याचे वेळीं) रविलाचि अशेष (सर्व, पूर्णपणें) लक्षवे (पाहवतो)-असा अन्वय. सूर्यास द्वादश नेत्र आहेत व तो सर्वसाक्षी आहे, अशी समजूत आहे. तीस अनुलक्षून हें वर्णन आहे. रा० पहाडकर ह्यांच्या प्रतींत 'बहु जाणें मी कीं तो; रविलाचि.........धरणी' असा पाठ आहे. ९. सभ्य असा जो अर्जुन त्यास. १०. धनुष्यामध्यें. ११. पुत्रमरणानें. १२. तत्+तप=अर्जुनाचें तप. १३. पंचाग्नींमध्यें. 'पंचाग्निसाधन', 'पंचाग्निसेवन,' अथवा 'पंचाग्निधूम्रपान' हा एक तपश्चर्येचा प्रकार आहे. यांत साधकाच्या चार बाजूंला चार अग्नि पेटविलेले असून त्यांचा धूर त्यानें सेवन करावा असें आहे. या अग्नींचीं नांवें:-दक्षिणाग्नि, गार्हपत्य, आहवनीय, प्रणीत (संस्कृत-अनल) आणि पांचवा अग्नि तपन. [स्तुतिकुसुमांजलि-स्तोत्र २० श्लोक २१ टीका.] रघुवंशाच्या तेराव्या सर्गांत सुतीक्ष्ण नामिक ऋषीच्या पंचाग्निसाधनाचें वर्णन आहे, तें असें:—"चोंहींकडे ज्वलन पेटवुनी दुपारीं, माथ्यावरी तपतसे जंव सूर्य भारी; बैसोनियां मुनि सुतीक्ष्ण म्हणोनि हा कीं, पंचाग्नि साधन करी अबले! विलोकीं॥" कुमारसंभवाच्या पांचव्या सर्गांत पार्वतीच्या तपाचें वर्णन आहे. त्यांतही ग्रीष्म ऋतूंत पार्वती चोंहोंबाजूंस चार अग्नि पेटवून त्यांमध्यें बसून सूर्याकडे एकसारखी टक लावून पहात होती असा उल्लेख आहे. [श्लोक २१ पहा.] या 'पंचाग्निसाधन'रूप तपोविशेषांत सूर्य हाच पंचम अग्नि होय. [पंचमः पंचतपसस्तपनो जातवेदसाम्' शिशुपालवध-सर्ग २ श्लोक ५१]. १४. मत्+भुज+आश्रित+मर्त्य+विलंघन=माझ्या बाहूंचा आश्रय करणाऱ्या मनुष्याचा पराभव. १५. देव.

रक्षीन [1]असंशय मी, तूं वदन करूं नकोचि [2]अवनत रे ! ।
[3]कांसेसि लागल्याचें क्षुद्र [4]अलाबुहि करूनि [5]अवन, तरे. ॥ ७६
करिन असा व्यूह, [6]जया तो न शके [7]वासविहि तरायातें. ।
प्रिय, हित, सत्य, वदावें; मज [8]भूदेवास विहित, राया ! तें. ॥ ७७
अनुभविलें [9]साध्वीसुतरत्न-परिष्वंग-सुरस्रदामहि म्या. ।
गाती [10]यशोरसाच्या, अमृतरसाच्या न, सुर सदा महिम्या. ॥ ७८
पुरवी, प्रयागसा कीं, हा धीरांचा समस्त काम, रण. ।
नाचवि [11]अमस्तका हें, कां नाचविना [12]समस्तका मरण ? ॥ ७९
कौरव, पांडव, यादव, अन्यजन तसाच, ससुत मीहि, महा ।
[13]अध्रुव सर्वहि. नुरवी काल जगीं [14]स्थिति, जसा [15]तमी [16]हिमहा. ८०
नरवर्या ! [17]पर्यायें आम्ही हरिलों असोंचि काल-बलें. ।
[18]सुगतिद रणमरण [19]उपस्थित होतां केंवि चित्त [20]कालबलें?' ॥ ८१
गुरुच्या अभयें, बोधें, [21]काळेंही सिंधुपाळक वळविला. ।
[22]हो काय ? मृत्युकरवीं दैवें [23]प्रभुमित्रबाळ [24]कवळविला.' ॥ ८२
सैंधव म्हणे, 'विभय मी झालों; कीं गुरु नव्हे [25]अलीकवचा. ।

---

१. निःसंशय. २. खालतें. ३. आश्रयास राहणाराचें. ४. भोंपळाहि. ५. रक्षण. ६. ज्यातें तरायाला, ज्यांतून सुटून जाण्याला. ७. इंद्रसुत अर्जुनहि. ८. ब्राह्मणास; मला ब्राह्मणाला. ९. साध्वीपुत्राचें आलिंगनरूप उत्तम हार. ह्या गीत्यर्धाचा स्पष्टार्थ नीटसा कळत नाहीं. १०. यशस्+रसाच्या. ११. कबंधातें. १२. मस्तक असणारास. १३. अशाश्वत. १४. स्थिति=जगताची उत्पत्ति झाल्यापासून विनाश होईपर्यंत जी मध्यमावस्था ती. १५. रात्र. जसा हिमहा (सूर्य) रात्रीला नुरवी, तद्वत्. 'तमीं' असें पाठांतर. १६. हिम+हा=हिमनाशक सूर्य. १७. प्रकारांतरानें. १८. सुगति देणारें. १९. प्राप्त. २०. कालवलें. येथें प्रासाकरितां 'व'च्या स्थानीं 'ब' घेतला आहे. २१. यमानेंही म्हणजे याचें ओढवलें होतें म्हणून—असा भाव. समुच्चयालंकार. २२. सिंधुराज, जयद्रथ. 'काव्यार्थापत्ति' अलंकार. २३. अभिमन्यु. 'पर्यायोक्ति' आहे. २४. ग्रासविला. 'कवळ' म्हणजे ग्रास. २५. मिथ्यावादी. अलीक=असत्य. 'अलीकवचस्' हें प्रातिपादिक म्हणजे मूळ शब्द. त्याचें 'अलीकवचाः' हें प्रथमैकवचन आहे. सकारान्त पुरुषवाचक आणि बहुव्रीहिसमासान्त जें नाम येईल त्याची प्रथमा संस्कृताप्रमाणेंच केल्याचा मोरोपंती नियम आढळतो. शेवटचा विसर्ग मात्र सोडिला आहे.

गुरुवचना कीर्ति जशी, कैंची [1]पविच्या तशी भली [2]कवचा?' ॥ ८३
[3]सस्मित [4]साचिंत होउनि गुरुशिष्यांच्या [5]गुरु प्रतिज्ञांनीं, ।
प्रार्थिति, 'अपकीर्ति न हो,' ऐसें [6]त्रिजगद्गुरुप्रति [7]ज्ञानी. ॥ ८४
ऐकुनि [8]गुरुप्रतिज्ञा [9]कुरुकटकीं [10]वाद्यमात्र वाजविलें, ।
बहु [11]नरसिंहध्वनिनीं घटिकाभरि सर्व गगन [12]गाजविलें. ॥ ८५

अध्याय आठवा.

देव म्हणे, '[13]सखया ! मज, धर्मो, भीमाहि, न पुसतां स्वमतें ।
कशि दुर्घट प्रतिज्ञा केली ? बा ! परम कठिन [14]हें गमतें. ॥ १
जाणों, वेडे ते ! जे स्वगुरुजना सुमतिदायका [15]पुसते. ।
बा ! तूं सत्य [16]धनंजय काय ? द्रोणादि काय [17]कापुस ते ? ॥ २
हे [18]चार म्हणति, 'भ्याला सैंधव परिसुनि गुरुप्रतिज्ञा ती. ।
कथिते झाले त्यासह पाय धरुनि हे गुरुप्रति [19]आप्ती. ॥ ३
[20]तद्रक्षणार्थ केली स्वमुखें गुरुनें [21]तुझ्या प्रतिज्ञा. ते ।
कीं हे [22]सत्या ? गातिल त्याच्या, कीं तव भुजाप्रति, ज्ञाते ? ॥ ४
[23]शकटव्यूहीं [24]पद्मव्यूह, तयाच्याहि [25]कर्णिकेमाजी ।
राहेल जयद्रथ कीं; बहु चिंता बुद्धि पावली [26]माजी. ॥ ५

---

१. वज्राच्या. २. इंद्राच्या वज्राच्या कवचाला. ३. हर्षयुक्त. ४. सखेद. (द्रोणप्रतिज्ञेनें सस्मित आणि अर्जुनप्रतिज्ञेनें सखेद.) **यथासंख्य** अलंकार. ५. मोठाल्या. ६. कृष्णाप्रति. ७. 'ज्ञानी' हा कर्ता; 'अपकीर्ति न हो' हें कर्म; 'प्रार्थिति' क्रियापद. ८. अर्जुनाची मोठी प्रतिज्ञा ऐकून (तिचा परिणाम आपल्या हिताचा होणार, अशा खोट्या समजुतीनें) वाद्यें वाजविलीं. ९. कौरवांच्या सैन्यामध्यें. १०. प्रत्येक वाद्य; सर्व वाद्यें. ११. नररूप सिंहांच्या (वीरांच्या) गर्जनांनीं. १२. गर्जविलें. १३. मित्रा अर्जुना! १४. ही गोष्ट. १५. विचारणारे. १६. अग्नि. १७. क्षुद्र पदार्थ. **विषमालंकार.** १८. दूत. १९. आप्तजन. २० जयद्रथाच्या रक्षणार्थ. २१. तुझ्या गुरूनें (द्रोणाचार्यांनें.) २२. जयद्रथ भ्याला ही गोष्ट खरी, कीं त्याचें संरक्षण करण्याची द्रोणाचार्यांनीं प्रतिज्ञा केली ही गोष्ट खरी. २३. पाचराच्या आकृतीची सैन्यरचना, तिच्या आंत. २४. कमळाच्या आकाराची सैन्यरचना. २५. मध्यभागीं. कर्णिका= कमलांच्या मध्यभागीं असणारा केसरपुंज. २६. माझी.

कर्ण, [1]वृषसेन, [2]गुरुसुत, [3]मद्रप, [4]भूरिश्रवा, कृपाचार्य, ।
सिंधुपतिपुढें [5]षड्रथ हे; तेव्हां साधतें कसें कार्य ? ॥ ६
हे [6]दुर्जेय जिंकावे त्वां आधीं; मग [7]सुदुर्जय द्रोण. ।
ते[8]व्हां कीं सैंधववध; हें शक्य म्हणेल तुजविना कोण ? ॥ ७
[9]मंत्रज्ञ सचिवें, सात्यकि, भीमादिक, धर्मराज, [10]हे आर्य ।
[11]साध्यासाध्य वि[12]चारोत, कीं [13]व्हावें सिद्ध योजिलें कार्य.' ॥ ८
अर्जुन म्हणे, 'मुकुंदा ! मानिशि ज्या [14]सा रथांसि [15]अधिकवळ, ।
ते मद्बलार्ध; समबल न; जसे नवनीत[16]कवळ दधिकवळ. ॥ ९
कृष्णा ! असोत मदधिकबल, ते कर्णादि सा रथ, [17]कवीन, ।
कोदं[18]डवेदपंडित; मी त्यांसि, हरूनि [19]सार, थकवीन. ॥ १०
सैंधवशिर हरिन, करिन रण, [20]सगणद्रोणगुरुसमक्ष, [21]महा. ।
चिंता करूं नको बा ! गुरुमाहात्म्येंचि गुरुसम [22]क्षेम [23]हा. ॥ ११
किंबहुना, जरि ति[24]कडे होइल, जिंकीन [25]तूर्ण वि[26]श्वास. ।
माझ्या [27]शस्त्रास्त्रांचा मजला आहेचि पूर्ण वि[28]श्वास. ॥ १२
मजसीं करील गुरु, त्या [29]पापा रक्षावयास, [30]कटकट कीं, ।
एकहि अभग्न राहों देईन न मी, तयासकट कटकीं. ॥ १३
गांडीव यशस्वि; जयश्रीचें लोकीं [31]अगार मानिल [32]यां ।

---

१. कर्णाचा पुत्र. २. द्रोणपुत्र, अश्वत्थामा. ३. मद्र देशचा राजा, शल्य. ४. सोमदत्ताचा एक पुत्र. ५. हे सहा रथ. (हे सहा महारथी.) ६. जिकायास कठीण. ७. अत्यंत दुर्जय. ८. त्यानंतर मग जयद्रथाचा वध. येथें 'सारा'लंकार आहे. ९. बुद्धिवादक प्रधान, सल्लामसलत देणारा दिवाण. १०. 'हा आर्य' असें पाठांतर. 'आर्यः साधुकुलीनयोः' इति विश्वः. ११. साध्य आणि असाध्य गोष्टीचा विचार करोत. १२. 'विचारूं' असें पाठांतर. १३. योजिलें कार्य सिद्ध व्हावें म्हणून. १४. सहा. १५. अधिकबळ. यमकासाठीं 'ब'च्या स्थानीं 'व' केला आहे. १६. कवळ=ग्रास. दह्याचा घांस व लोण्याचा घांस यांची योग्यता सारखी नाहीं, लोणी दह्यापेक्षां श्रेष्ठ, त्याप्रमाणें माझें बळ कौरव वीरांपेक्षां ज्यास्त—असा भावार्थ. १७. कवि+इन=कविश्रेष्ठ. १८. धनुर्वेदपटु. १९. बळ हरून. २०. गण=समुदाय, कळप. २१ मोठें. २२. समर्थ. २३. मी अर्जुन. २४. सर्व विश्व तिकडे (त्या पक्षाचें)होईल, तरी. २५. त्वरित. २६. जगास. २७. शस्त्रांचा आणि अस्त्रांचा. अस्त्र=फेंकण्याचें आयुध. २८. भरंवसा. २९. त्या पातकी जयद्रथास. ३०. भांडण. ३१. स्थान. ३२. यांसिवा.

दुर्योधनहि उद्यां, अभिमानी तो कीं; अगा [1]रमानिलया ! ॥ १४
गांडीव चापयोद्धा मी, सारथि तूं [2]श्रितस्वरग, काय ।
मग ? जिंकिला न मार्गे कोण ? पुढेंही न, [3]मत्करगकार्य. ॥ १५
'[4]सर्वार्थदर्शक,' म्हणों तुझिया [5]भास्वच्छवि प्रसादास; ।
या [6]स्वार्थपात्र, सुगृहस्था अतिथि स्वच्छ विप्रसा, [7]दास. ॥ १६
मद्रथ सिद्ध असों दे उदयापूर्वींच. हेंच कर. जा, गा ! ।
आहेचि तुझा स्वीकृतसर्व[8]समवनीं सदैव [9]कर जागा.' ॥ १७
त्या रात्रींत श्रांतहि गज [10]मन निद्राकरीं न दे, [11]वाजी ।
जो, तोहि म्हणे, 'सैंधव मेल्या निद्रा करीन देवा जी !' ॥ १८
विजय म्हणे, 'माधवजी ! दावाया वदन न [12]स्वसे लाजा, ।
[13]शोकाग्नि तिचा विझवा, भिजवा पुसुनि नयन [14]स्वसेला, जा. १९
सुविवेक सुभद्रेच्या या [15]परिदेवनपरा [16]सुनेला हो ! ।
बहुधा देहं[18] [17]शिवांनीं त्याचा होता परासु नेला, हो !' ॥ २०
अंतःपुरांत जाउनि देव सुभद्रेसि बोध [19]युक्त करी. ।
त्या सकरुणासि हें किति ? केला जेणें क्षणांत मुक्त [20]करी. ॥ २१
'तूं [21]वीरजा सुभद्रे ! बाइ ! [22]उगी. [23]वीरबांधवा कन्यो, ।
झालीस वीरपत्नी, वत्से ! तैशीच [24]वीरसू धन्या. ॥ २२
सुयशें पितृमातुलकुल उज्वल करिता असा असावा गे ! ।
बाई ! वदले सुर, [25]'गिरिजासुत [26]तारकबलीं असा वागे.' ॥ २३

---

१. हे रमावासा कृष्णा. २. श्रित+स्वर्+अग=आश्रितांना कल्पतरूच असा. ३. माझ्या हस्तगत ज्याचा देह झाला आहे असा. ४. सर्व पुरुषार्थ देणारा. 'म्हणे' असें पाठांतर आहे. ५. भास्वत्+छवि+प्रसाद=देदीप्यमान आहे शोभा ज्याची अशा प्रसादास. ६. या प्रसादरूप स्वार्थ (द्रव्यासाठीं) पात्र दास होय. ७. भक्त, अर्जुन. ८. सम्यक्+अवन=उत्तम प्रकारें रक्षणाविषयीं. ९. हात. १०. निद्राकरीं मन न दे. ११. अश्व, घोडा. १२. सुभद्रा भगिनीस. १३. शोकरूप अग्नि. १४. आपला शेला. १५. विलापमग्न. १६. उलरेला. १७. कोल्ह्यांनीं. १८. मृत देह. १९. उत्तम. २०. हत्ती, गजेंद्र. इंद्रद्युम्नराजा अगस्तिमुनीच्या शापानें गजेंद्र झाला होता. त्याला विष्णूनें शापमुक्त केलें, या कथेस अनुलक्षून हें वर्णन आहे. २१. वीराची कन्या. २२. उगी हो. २३. वीर आहे बांधव जिचा अशी. २४. वीरप्रसवा, वीरमाता. २५. कार्तिकेय. २६. तारकासुराच्या सैन्यांत. तारकासुराच्या सैन्यांत देवांचा सेनाधिपति कार्तिकस्वामी यानें असा पराक्रम गाजविला, त्याप्रमाणें अभिमन्यूने कौरवसैन्यांत पराक्रम गाजविला—अशा

त्यजुनि अमृत, मधुर म्हणुनि जेंवि न मधुखंड[1]-पायसा गावें; ।
तव सुतयश इतरयशोऽधिक, ऐसें बहुत काय सांगावें ? ॥ २४
वत्से ! आम्हांशि असी गति देवू वरदनायक पिनाकी[2]. ।
रणमरण अमरताधिक[3]. झाले नाहींत काय कपि[4] नाकी[5] ? ॥ २५
उडविल उद्यां स्वसुतवधहेतुजयद्रथशिरासि सितवाजी[6]. ।
आण तुझी, होईल प्राप्त दशा योग्य होय कितवा[7] जी.' ॥ २६
ऐकुनि म्हणे सुभद्रा, 'हा वत्सा ! काल काय हा निर्धना ? ।
झाली कशी अकस्मात् धनलुब्धांच्या[9] समूळ हानि[8] धना ? ॥ २७
शोकीं कसे बुडविले माझे असु उत्तरासुसह[10], सारे. ।
झालासि स्वप्नींचा निधिसा[11] तूं, दृष्टनष्ट[12], सहसा[13] रे !? ॥ २८
धिक् ! पांडुयदुबळातें, रक्षाया न शकलें मुलाला जें. ।
स्वपतिपराक्रमवर्णन[14]शीलत्वें मीहि बा ! तुला लाजें. ॥ २९
झालें व्यर्थ वृकोदर[15]भावोजीचें बलाढ्यपण आजी. ।
वाटे मरेल शोकें, नातू आहेत फार पण, आजी[16]. ॥ ३०
हा वत्सा ! धैर्यनिधे ! हा वत्सा ! जनमनोहराकारा ! ।
हा वत्सा ! कुलतिलका ! हा वत्सा ! सर्वसद्गुणाधारा ! ॥ ३१
जी शूरसाधुधार्मिकपितृसुरगुरुविप्रभक्तपरमगति, ।
प्राप्त असो तुज वत्सा ! विरह न देऊ कदापि परं[17] मग ती.' ३२
इतुक्यांत उत्तरेसह कृष्णा[18] ये, होय भर[19] विलापाला. ।
शोकीं आप्तसमागम, विषतरुचा जेंवि भरविला[20] पाला, ॥ ३३

भाव. 'गिरिजासुत-तारक-बळी असा वागे' असाही पाठ आहे. सुर=देव. हे विमानांत बसून युद्धचमत्कार पाहात असतात, असें वर्णन ठिकठिकाणीं आढळतें.

१. शर्करायुक्त क्षीरींना. २. शिव. ३. अमरताहून श्रेष्ठ. ४. वानर. ५. ज्यानां स्वर्ग प्राप्त झाला आहे असे. नाक=स्वर्ग. ६. शुभ्रवाह, अर्जुन. ७. दुष्टाला. ८. मरणा. ९. लोभ्याच्या, कृपणाच्या. १०. उत्तरेच्या प्राणांसह. ११. द्रव्यासारिखा. १२. दिसून अदृश्य. १३. एकाएकीं. १४. शीलत्व=अभ्यास, प्राविण्य, वहिवाट. मला आजपर्यंत अर्जुनाचा पराक्रम वर्णन करण्याचा अभ्यास होता, पण तुझा पराक्रम पाहून त्या वहिवाटीची आतां मला लाज वाटते. तुझा पराक्रम अर्जुनाहूनही ज्यास्त होता, असा भाव. १५. भीमाचें. १६. कुंती शोकानें मरेल असें वाटे. १७. परंतु. १८. द्रौपदी. १९. अतिशय. २०. चारला. हें पंतांचें

मूर्छित पडे सुभद्रा, शीघ्र तिला सांवरी कमलपाणी, ।
वारा घाली, लावी नेत्रांला शीतसें अमल पाणी. ॥ ३४
कृष्ण म्हणे, 'कृष्णे ! दे पुण्य, असावीच उत्तरा सासू; ।
हा हे तिची वदविती; परि किमपि न देचि उत्तरा सासू.' ॥ ३५
प्रभुला 'हाय !' म्हणाया लावी मोहीं बुडोनि घटिका हो ! ।
स्नेह असाचि असे, जरि लटिका करितील साधु, लटिका हो. ३६
उठवुनि अनुजेसि म्हणे, 'हें तुजला योग्य काय गा ! बाळ ! ? ।
त्यजिति, हित सुयश जोडुनि, कवि पलभुग्भोग्यकायगाबाळ[11]. ३७
जें[12] तव उदार, देता झाला सर्वां परां, सुत रणीं, तें ।
मुनिदुर्लभ; कीं भेदुनि गेला तत्कृतपरासु[13] तरणीतें[14]. ॥ ३८

आवडतें यमक होय (सभापर्व–अध्याय ७।५५ पहा.)

१. कमलासारिखे आहेत हात ज्याचे असा कृष्ण. २. आपली पुण्याई खर्च कर. ३. स+असु=जिवंत. ४. हा मी कृष्ण. ५. ही तिची सासू सुभद्रा. ६. प्रत्युत्तरा. ७. सुभद्रा. ८. प्रीति. ९. जरी साधु लटिका करितील (समजतील) तरी तो लटका (खोटा, आभासरूप) हो (होवो) [पण] स्नेह असाचि (प्रत्यक्ष श्रीकृष्णाला सुद्धां 'हाय' म्हणावयास लावणारा) असे–असा अन्वय. १०. पाठच्या बहिणीस (सुभद्रेस). ११. पलभुक्+भोग्य+काय+गाबाळ=मांसभक्षक अशा श्वापदांना भोग्य शरीररूप गाबाळाला. १२. जें यश. १३. त्या शत्रूच्या कृतीनें मृत असा. १४. जें (यश) तव उदार सुत सर्वां परां (शत्रूंला) रणीं देता झाला, तें यश मुनिदुर्लभ; कीं; तत्कृतपरासु [असा तो] तरणीतें (सूर्याला) भेदून गेला–असा अन्वय. रणांत पाठ न दाखवितां शत्रूच्या समोर उभें राहून जे वीर धारातीर्थी प्राण देतात त्यांच्या गळ्यांत अप्सरा माळ घालतात अथवा ते सूर्यमंडलास भेदून वर ब्रह्मलोकास जातात, असें शास्त्रांत सांगितलें आहे. या गोष्टीवर येथें लक्ष ठेवून वर्णन केलें आहे. असें वर्णन संस्कृतांत वारंवार आढळतें:—(१) उद्दंडे भुजदंडे तव कोदंडे परिस्फुरति । अरिमंडलरविमंडल–रंभाकुचमंडलानि वेपंते ॥, (२) सूचीमात्रविभेदसंभ्रमगुणः क्षोणीशनामभ्रुवामुत्तंगस्तनमंडलेषु लभते लीलारतिं कंचुकः । नाराचैर्निबिडैर्विभिन्नवपुषां पुंसां महायोधने स्वर्गस्त्रीकुचकुंभसंभ्रमपरीरंभः कथं दुर्लभः ॥, (३) विपक्षशस्त्रक्षपणैः पुनः पुनः क्षताखिलग्रंथि निजास्थिपंजरम् । चकार चंडद्युतिमंडलोदरे सुखप्रवेशामिववापरो भटः ॥, (४) द्वाविमौ पुरुषव्याघ्र सूर्यमंडलभेदिनौ । परिव्राड् योगयुक्तश्च रणे चाभिमुखो हतः ॥. यांचा भावार्थः—(१) हे राजा ! तुझ्या बलाढ्य बाहुदंडावर धनुष्य चढलें असतां, शत्रुमंडल, सूर्यमंडल आणि रंभाकुचमंडल हीं कांपूं लागतात. (२) केवळ सुईनें टोंचून घेतल्यामुळें जर कंचुकाला नृपांगनांच्या उन्नत स्तनमंडळांवर विलास करायास मिळतें, तर

सत्य करिल प्रतिज्ञा, हा न कधीं विजयिबाहु टळला गे ! ।
न उडेल अरिशिरस्तृण कां, ज्या [1]विजयेषुबाहुटळ लागे ?' ॥ ३९
कृष्णोत्तरासुभद्राधेनूंच्या मथुनि मोह[3]यवनातें, ।
भवनातें येउनि, तो प्रभु विजयाच्या करी [4]समवनातें. ॥ ४०
प्रक्षालुनि करचरण, प्रभु विमल जलें करूनि आचमनें, ।
शुचि शयन रची; मानी मित्रा[5] [6]मणि, आपणास काच, मनें. ॥ ४१
[7]लिप्तस्थंडिलशयनीं एकहि सोसेल शुष्क दर्भ कसा ? ।
देवाला भक्त नवा नवसाचा, [8]गतवयास अर्भकसा. ॥ ४२
शयनासमीप मांडी गांडीवप्रमुख सर्व [9]हातेरें. ।
[10]श्रितंतेज वाढवी; निजतेजाचें घे करूनि मातेरें. ॥ ४३
निजतां रात्रौ [11]त्र्यंबकबलिविधि हा शिष्टपथ सदा साचा ।
त्या [12]महदस्वास्थ्यांतहि लोपों दे [13]लोकगुरु न दासाचा. ॥ ४४
अर्पावें गंधकुसुमउपहार त्र्यंबकासि जें कांहीं, ।
कृष्णासि अर्पिलें तें पार्थें, कीं स्वास्थ्य मानसीं नाहीं. ॥ ४५
स्मित करुनि मनिं म्हणे प्रभु, 'गेलें सोडूनि भान निज यातें.' ।
[14]स्मितदर्शन होतां [15]स्वस्खलित समजलें मनांत विजयातें. ॥ ४६

रणांगणांत छिन्नगात्र झालेल्या योद्ध्यांस देवांगनांच्या कुचकुंभालिंगनाचा लाभ घडला, त्यांत आश्चर्य कसचें ? (३) एक वीर आपणांस सूर्यमंडळांत प्रवेश करितां यावा म्हणूनच कीं काय शस्त्रांनीं आपल्या अस्थिपंजरांच्या ग्रंथी तोडिता झाला. (४) दोघे सूर्यमंडळाचा भेद करणारे होत; एक योगी व एक धारातीर्थी मरण पावलेला वीर. याच अर्थाचीं प्रसिद्ध कवींचीं वचनें अनेक आढळतात.

१. शत्रूचें मस्तक हेंच गवत. २. विजय+इषु. अर्जुनाच्या बाणांची वावटळ. रूपकालंकार. ३. मोहरूपी यवनातें. यवन आणि गाय यांचा दृष्टांत पंताच्या काव्यांत वारंवार आढळतो. (सभापर्व, अध्याय ५।७५ पहा). रूपकालंकार. ४. चांगल्या प्रकारें रक्षणातें. ५. अर्जुनाला. ६. रत्न. ७. यज्ञासाठीं केलेल्या सारविलेल्या ओट्यावरील शयनाचे ठायीं. या गीतीचा संबंध वरचे गीतीशीं आहे, म्हणजे 'शुचि शयन रची' इत्यादिकाचा हा विस्तार आहे. ८. वृद्धास. ९. हत्यारें, शस्त्रें. १०. आश्रिताचा पराक्रम. 'तत्तेज' असाहि पाठ आहे. ११. शंकरपूजाविधि. १२. महत् + अस्वास्थ्य= अत्यंत अस्वस्थपणा. १३. श्रीकृष्ण. १४. हास्यमुद्रावलोकन. १५. आपली चुकी.

यच्चापरवें[1] खचले पावुनि अहितासमेत[2] कांप हुडे[3], ।
तो पार्थ [4]स्वापार्थ प्रभुनें संप्रार्थिला, न कां [5]मुडे ? ॥ ४७
समजुनि [6]शरण्यवर्य, [7]स्वर्गी स्तवितो जयाशि [8]शिबिराजा, ।
अर्जुन म्हणे तयाला, ‘श्रमलासि, निजावयासि शिबिरा जा.’ ४८
[9]निधिरक्षणार्थ जैसा अतिसादर [10]राजराज यक्षांतें, ।
[11]पार्थावनार्थ तैसा स्थापी शिबिरीं मुकुंद [12]दक्षांतें. ॥ ४९
शयनीं निजोनि पाहे परमेश्वर, परि न पळहि निज लागे. ।
चित्तीं चिंतेसि म्हणे, ‘त्वां वरिला कोण जडहि निजला गे ! ?’ ५०
देव [13]निशीथीं शयनीं बैसे; मग [14]दारुकासि आणवुनी ।
त्यासी वदे प्रतिज्ञा पार्थाची, प्रथम सर्व जाणवुनी. ॥ ५१
‘भक्तीं जसा मदात्मा, देहींहि तसा न, दारुका ! रमला. ।
या [15]विजयवेदवचना द्यावा लागे सदा [16]हुंकार मला. ॥ ५२
निजरक्षणाधिक ध्वजरक्षण राजासि दारुका ! पडतें. ।
मोलें राजशिराहुनि बहु असतें काय [17]दारु, [18]कापड तें ? ॥ ५३
मद्रथ सिद्ध असों दे. जाणोनि व्यसन कां [19]गळाठावें ? ।
पतिच्या, [20]श्रितं प्रतिज्ञा बुडतां, पडती स्त्रिया गळां, ठावें. ॥ ५४

---

१. ज्याच्या धनुष्याच्या शब्दानें. यच्चापरवें अहितासमेत हुडे कांप पावोनि खचले –असा अन्वय. २. शत्रुसहित. ‘सहोक्ति’ अलंकार. ३. बुरुज. ४. निद्रार्थ. ५. निजे. ६. श्रेष्ठ संरक्षक. ७. ज्या प्रभूला, कृष्णाला. ८. हा सोमवंशीय राजा. यानें आपल्या पुत्राचें (बृहद्गर्भाचें) मांस विप्रवेशधारी ब्रह्मदेवास देण्याची सिद्धता करून आपलें अनुपम औदार्य प्रकट केलें. याच शिबिराजानें आपलें मांस देऊन पक्षिवेशधारी इंद्राग्नीला संतुष्ट केलें, अशी कथा आहे. ९. भांडाराच्या रक्षणासाठीं. ‘विधिरक्षणार्थं’ असें पाठांतर. १०. कुबेर. ११. पार्थ+अवन+अर्थ=पार्थाच्या संरक्षणाकरितां. १२ चतुर वीरांतें. १३. मध्यरात्रीं. १४. दारुक नांवाच्या आपल्या सारथ्याला. १५. अर्जुनाच्या वेदवत् (निश्चित) वचनाला. १६. मान्यता. १७. लांकूड, अर्थात् ध्वजाची काठी. १८. निशाणाचें कापड. कल्पनासादृश्यः–‘निशाण फडकें तें काष्ठ त्याचें मोल काय ! परि त्या अभिमानास्तव, रायाचें शिर जाय. ॥’ (दयाळनाथ). १९. दुर्दशेंत पावावें, निराश व्हावें. २० स्वीकृत. श्रित प्रतिज्ञा (स्वीकारलेल्या प्रतिज्ञा) बुडतां, पतिच्या गळां (गळ्यांत) स्त्रिया पडती, [हें] ठावें (माहीत, प्रसिद्ध) [आहे]–असा अन्वय. आपल्या प्रतिज्ञेचा भंग झाला तर स्त्रिया रडत बसतात, मर्द पुरुष आपली प्रतिज्ञा पूर्ण करण्याचा प्रयत्न करितात–असा भाव.

[1]विश्वासहि कुरुगुरुचें [2]आप्तविपत्सरिदलाबु धनु ठावें. ।
कोण म्हणेल 'व्यसनीं स्वजन[3]संरक्षणा' मला बुध '[4]नुठावें?' ॥ ५५
तूं पांचजन्यनाद श्रवणीं शिरतांचि शीघ्र [5]पाव कसा. ।
पेटेन बसोनि रथीं मी कुरुकटकीं, तृणांत [6]पावकसा. । ५६
[7]साची करिन सख्याची, मारुनि सर्वहि अरि, प्रतिज्ञा ते. ।
[8]जोडितिल उद्यां बहु कर या [9]शार्ङ्गाप्रति [10]अरिप्रति ज्ञाते. ॥ ५७
[11]प्राकृतहि [12]लुब्ध, जातां पदरींचा एकदा [13]रुकाहि, मरे. ।
सर्वहि पदार्थ तापद मज, भक्तचि एक दारुका! [14]हिमें रे!' ॥ ५८
दारुक म्हणे, 'अवश्य. स्यंदन आहेचि सिद्ध. अजि [15]तरणी ।
तेज न मिरविल; तुमचा प्रभुजी ! सेवकहि सर्व अजित रणीं.' ॥ ५९
मोहे प्रियसुतशोकें करुनि पणहि, [16]दुःशलाविलापार्थ, ।
स्वप्नीं दर्शन दे प्रभु; कीं तो कांसेस [17]लाविलें पार्थ. ॥ ६०
स्वप्नींहि प्रेमें दे [18]प्रत्युत्थानासनादि [19]वासवि त्या; ।
जोडी कर तेजस्वी [20]तेजस्वीशा, जसा दिवा सवित्या. ॥ ६१
श्रीपति म्हणे, 'सख्या ! कां म्लान वदन, चित्त काळजी वाहे ? ।
चिंता चतुर न वरिती; नाशी [21]धृतिवित्त, काळ जीवा हे. ॥ ६२
भीती न [22]कालकालप्रभुचे, [23]कालाहिच्या विषा, [24]दास ।

---

१. सर्व जगताला. २. आप्त+विपत्+सरिद्+अलाबु=प्राप्त झालेल्या विपत्तिरूप नदींत भोपळ्यासारिखें तारणारें. रूपकालंकार. ३. संरक्षणाला. ४. न+उठावें. ५. येऊन पोहोंच. ६. अग्नीसारिखा. ७. सत्य. ८. बहु ज्ञाते कर जोडितील. ९. धनुष्यातें. १०. सुदर्शनचक्रातें. ११. सामान्य. १२. लोभी. १३. पैशाचा तिसरा भाग. १४. थंड (शांतिदायक). १५. सूर्य. १६. जयद्रथस्त्रीच्या विलापार्थ. दुःशला ही धृतराष्ट्राची मुलगी. १७. कांसेस लावणें=आश्रय देणें. 'लोकोक्ति' आहे. १८. प्रति+उत्थान+आसनादि=अभ्युत्थान आसन इत्यादि. १९. अर्जुन. वासवाचा (इन्द्राचा) पुत्र. 'इ' प्रत्यय 'अ'कारान्त शब्दापुढें गोत्रापत्यार्थी होतो. जसें:—रावण—रावणि, दक्ष—दाक्षि, व्यास—वैयासकि. २०. तेजस्वी ईशाला. येथील उपमा हृदयंगम आहे. २१. धैर्यरूप धन. २२. कालाचा काल (मृत्युंजय) अशा प्रभूचे (शिवाचे). २३. कालसर्पाच्या. २४. कालकालप्रभुचे दास कालाहिच्या विषा न भीती.

सांग स्पष्ट सख्या ! तूं कां सांपडलासि या [1]विषादास?' ॥ ६३
पार्थ म्हणे, 'देवा ! कशि होइल केली खरी प्रतिज्ञा ती? ।
रक्षितिल सकल [2]सैन्यें व्यूहामागें अरिप्रति [3]आप्ती. ॥ ६४
मज दुर्घट न सकळकुरुकटक[4]चटककर्दनकर्म; परि सविता ।
[6]द्रुतगति; कृतप्रतिज्ञ द्रोणगुरुहि सर्वधर्मपरिसविता. ॥ ६५
सैन्धवशिर न उडवितां [7]जरि जाइल काय भानु [8]अस्तनगा, ।
तरि जीवित अयशस्कर व्यर्थ, क्षीरत्न जेंवि [9]अस्तन, गा ! ॥ ६६
दुसरी तरि प्रतिज्ञा रक्षिन, दहनांत [10]काय [11]होमीन. ।
[12]नाकहि नरक तुजविना. वांचे [13]अन्यत्र काय हो मीन ? ॥ ६७
[14]स्पर्शमणे ! संगक्षणविघ्नें[15] धरिला [16]विषाद या [17]लोहें. ।
[18]मित्रें तुझें पात्र न हो विरहा[19]पयशोविषा दयालो ! हें.' ॥ ६८
प्रभु करुनि जलस्पर्श [20]प्रांङ्मुख बैसे उगाचि पळ आधीं; ।
मग विजयास म्हणे, 'मी सांगेन तसेंचि कार्य तूं साधीं.' ॥ ६९
परमास्त्र सनातन जें, ज्ञाते म्हणताति पाशुपत ज्याला, ।
जेणें देव महेश्वर समरीं असुरासि मारिता [21]झाला; ॥ ७०
तें जरि असेल [22]अवगत, मारिसिल उद्यां जयद्रथास रणीं. ।
अवगत नसेल तरि, मन लावीं त्या [23]श्रितसुरद्रुच्या चरणीं. ॥ ७१
करिल प्रसाद; देईल अस्त्र, सुनिश्चय करीं असा; [24]ध्यैं तें ।
शिवपद; सुसाध्य करितें, ध्यातां, मोक्षाहि कीं [25]असाध्यातें. ॥ ७२

---

१. खेदास. २. सर्व सैन्याच्या साधनानें. ३. आप्त. ४. चटक=चिमणी. रूपकालंकार. ५. मारण. ६. त्वरित चालणारा. ७. जर का. ८. अस्ताचलास. ९. स्तनरहित. १०. देह. ११. जाळीन. १२. स्वर्ग. १३. जलावांचून इतर ठिकाणीं. १४. हे परिसा ! परिसाच्या स्पर्शानें लोखंडाचें सोनें होतें, अशी समजूत आहे. १५. समागमोत्सवामध्यें आलेल्या विघ्नामुळें. क्षण=उत्सव, समारंभ. 'संगाक्षणविघ्नें' असा पाठभेद. १६. खेद. १७. ह्या अर्जुनरूपी लोखंडानें. १८. 'मित्र' शब्द संस्कृतव्याकरणानुसार नपुंसक आहे. १९ विरह+अपयश+विष=अभिमन्यूचा विरह व युद्धांत पराजय हींच विषें त्यांस. रूपकालंकार. २०. पूर्वाभिमुख. २१. झाला. २२. ज्ञात. २३. आश्रितांचा कल्पतरु (शिव), त्याच्या. २४. ध्यान कर. २५. साध्य करण्यास (मिळविण्यास) कठीण अशातें (मोक्षातें).

बैस स्वस्थ ध्यानीं, पात्यासीं पातयासि लाव, कसा[1]. ।
हो श्येनेसा[2] सख्या ! तूं, शत्रु जयद्रथहि शीघ्र लावकसा[3].' ॥ ७३
उदकस्पर्श करुनि नर बैसे दर्भासनीं असा ध्याया, ।
कीं नारायणहि म्हणे, 'परमा सिद्धिहि नसे असाध्या या.' ॥ ७४.
धरितां समाधि पार्थ ब्राह्ममुहूर्तींच[4] तो असें पाहे, ।
जातों स्वयें उदीचीप्रति[5] गगनपथें, सवें[6] हरिहि आहे[7]. ॥ ७५
चालविला, दक्षिणभुज[7] धरुनि, नभीं पार्थ जलजनाभानें[8]. ।
ज्याच्या तेजःश्रवणीं[9] सोडुनि जावेंचि खलजना[10] भानें[11]. ॥ ७६
पाहे हिमनग मणिमान् श्वेताद्रि धनाधिपप्रिया[12] नलिनी[13]; ।
कविनीं शिवलीलासी, जी सादर सेविली सदा अलिंनीं[14]. ॥ ७७
स्वर्गासि सुखें[15], जीच्या स्नानें पानें, सुराप[16] गेला हो ! ।
अवलोकी नारायणसख[17] बहु मानें सुरापगेला[18] हो ! ॥ ७८
प्रेक्षी मंदारद्रुमभूषित मंदरगिरिप्रदेश तदा. ।
पाहुनि कालनगातें[19] 'दृष्टि न लागो,' असें वदे शतदा. ॥ ७९
जो ब्रह्मतुंगपर्वत[19] तैसाचि सुतुंग[19] आणि शतशृंग[19], ।
शार्यातिवनीं तापस, कमलवनीं जेंवि हंस खग भृंग; ॥ ८०
अश्वशिरःस्थान[20] सकल सिद्धीचें जें सभाग्य माहेर; ।
आथर्वणाश्रमहि, ज्या त्यजुनी पल न मुनि निघति बाहेर. ॥ ८१
वृषदंश महामंदर पूर्वी हृदयांत रेखिले होते, ।
जे परम रम्य तापससुरसिद्धनिवास देखिले हो ! ते. ॥ ८२
श्रीरामबाणसमगति[21] देउनि दावी सख्यासि नवल हरी ।

---

१. 'कसा' हें अव्यय आग्रहार्थी आहे. २. अंडजांमध्यें एक मारक पक्षी असतो, ज्यास बहिरी ससाणा असें म्हणतात, तसा. ३. पक्षीविशेष. (लाव्हा). ४. पहांटच्या रात्रीं. ५. उत्तर दिशेस. ६. संगतीला कृष्णही आहे. ७. उजवा हात. ८. कमलनाभ कृष्णानें. ९. पराक्रमवर्णनाच्या श्रवणामध्यें. १०. खलजनांला सोडून. ११. भानानें, ज्ञानानें. १२. कुबेरप्रिया. १३. कमलयुक्त सरोवर, नदी. १४. भ्रमरांनीं. १५. सहज, अनायासें. १६. मद्यपी. १७. अर्जुन. १८. सुर+आपगा=देवनदी, तिला. १९. पर्वतनामविशेष. २०. हयग्रीव नांवाचें स्थान. २१. रामाच्या बाणाच्या गतीनें, अत्यंत त्वरेनें.

देवदया दासा दे सुख, न तसें अमृतसिन्धुनवलहरी[1]. ॥ ८३
तो श्रीनारायणसख नर तेजःपुंजपर्वता पाहे. ।
चित्तीं म्हणे, 'निवाले डोळे सोडूनि सर्व तापा हे.' ॥ ८४
त्या शैलाच्या अग्रीं झाले सुर चित्रसे पहाते ज्या, ।
अवलोकिला भवानीसह भगवान् भूतपति[2] महातेजा. ॥ ८५
ज्याच्या[3] शुद्ध तपा सम कोठेंही किमपि तप न भास्वर[4] गा, ।
कृष्ण नमस्कारी त्या दासांच्या कोटितपनभास्वरगा[5]. ॥ ८६
अजित तसा विजय नमी, क्षितिवरि ठेवूनि सुचिर शिर गुडघे; ।
बहु नमनलाभ, लोमी जाणो दुष्काळसुक्षुधित गुड[6], घे. ॥ ८७
ईश्वर म्हणे, 'उठा. बहु साधु तुम्हीं मुनि कविप्रवर दास ! ।
मज आशुतोष[7] म्हणती सर्वज्ञ अनेकविप्र वरदास[8]. ॥ ८८
झालों प्रसन्न; मागा.' ऐसें ऐकोनि अभयदान मुनी[9] ।
स्तविती प्रेमें सात्विकभावांत बुडोनि, अभयदा[10] नमुनी. ॥ ८९
'त्वत्सेवासुरमीच्या कासेला भक्त-वत्स लागावा, ।
कविनीं तुझा प्रसादचि अनुदिन, बा भक्तवत्सला ! गावा. ॥ ९०
सर्वार्थसंप्रदर्शक[11] अर्क तुझे पाय, [12]अंधकाराते ! ।
याचे आश्रित जे जे, मीति भवाख्या[13] न अंधकारा ते.' ॥ ९१

---

१. अमृत+सिन्धु+नव+लहरी. २. शंकर. ३. ह्या गीत्यर्धांत '**असम**' अलंकार आहे. ४. देदीप्यमान. ५. कोटि सूर्यांसारखी कांति ज्याची अशा स्वरगा म्हणजे कल्पवृक्षाला (शंकराला). **पर्यायोक्ति** आहे. ६. गूळ. 'गुडौ गोलेक्षु विकृती स्नुही गुडिकयोर्गुडा' इति रुद्रः. ७. त्वरित संतुष्ट होणारा. ८. 'मज' याचे विशेषण. ९. नरनारायण मुनींचे अवतार (कृष्णार्जुन). १०. अभय देणाऱ्या शंकराला. ११. सर्व इष्ट हेतु दर्शविणारे (पाय). १२. अंधक+अराते=अंधकासुररिपो ! अंधकासुराची कथा अशी आहेः—या असुरानें लावण्यमोहित होऊन पार्वतीचें हरण करण्याचा प्रयत्न केला. त्यावरून त्याचें आणि शिवाचें मोठें घोर युद्ध झालें. त्यांत त्याच्या रक्तापासून अनेक अंधकासुर उत्पन्न होऊं लागले. म्हणून त्याचें रक्त शुष्करेवती नामक देवतेकरवीं नाहींसें करविलें. तेव्हां तो एकटाच अंधक अवशिष्ट राहिला व त्यानें हतवीर्य होऊन महादेवाचें स्तवन केलें. नंतर शिवानें प्रसन्न होऊन त्यास आपलें गणत्व म्हणजे सेवकत्व दिलें. अंधक हा भृंगी नामक सेवक झाला. (सौरपुराण, अध्याय २९). १३. भव+आख्य=संसारनामका.

नमनें स्तवनें अर्जुन होय स्नात प्रसादवृष्टींत; ।
आलें धैर्य मनांत, प्रभुदर्शनयोग्य तेज दृष्टींत. ॥ ९२
जें आपण कृष्णासि त्र्यंक्षबलिद्रव्य[1] वाहिलें होतें, ।
प्रभुच्या पायांपाशीं पार्थें पुष्पादि पाहिलें हो ! तें. ॥ ९३
पार्थिवमूर्तिसमर्पितमाल्य[2] किरातीं, तसेंचि हें वाटे. ।
हरिहररूपाभेदज्ञानानंदाप्तिनें[3] गळा दाटे. ॥ ९४
मागे मग प्रतिज्ञासिद्ध्यर्थ प्रभुसि पाशुपत[4] नमुनी; ।
कीं म्हणति, 'न हो अयशीं, हो मृत्युमुखांत आशु[5] पतन,' मुनी.॥ ९५
स्मित करुनि महेश म्हणे, 'यदुकुरुवर[6] हो ! पुरेल हा हेत. ।
जा, चाप बाण आणा; त्या अमृतसरोवरांत आहेत.' ॥ ९६
कृष्ण[7] प्रभुसि नमुनि जों गेले रविमंडळप्रभा सु-सरा[8], ।
तों एक नाग आहे, घोर सहस्रास्य[9]; घोरतर दुसरा. ॥ ९७
पहिल्याहुनि बहु दुसरा दुष्प्रेक्ष्य, विषाग्निसंपदे वमुनी; ।
ज्यातें पाहुनि पावति दूरस्थित नतहि कंप देव मुनी[10]. ॥ ९८
वंदुनि भावें, म्हणतां शतरुद्रियपाठ, हात जोडून, ।
झाले धनुष्यशर ते नाग, स्वमहोग्ररूप सोडून. ॥ ९९
कृष्ण स्कंधीं घेती[11]; चाप गमे हल[12], विशाल शर भाला[13]. ।
प्रभुला नमुनि निवेदुनि, नमिति पुन्हा, सिंह जेंवि शरभाला. १००
गुण[14] शर जोडुनि जेव्हां प्रभु[15] मांडुनि ठाण, चाप आकर्षी, ।
तें ध्यान पाहुनि, 'जितं,'[16] कृष्णचि न म्हणति, समस्त नाकर्षी. १०१

---

१. त्रि+अक्ष+बलि+द्रव्य=शंकराचें पूजासाहित्य. (गीति ४५ पहा). २. पार्थिव लिंगास अर्पण केलेलें पुष्प जसें किरातस्वरूप धारण केल्यावेळीं प्रभुच्या ठायीं पाहिलें, तसें आतांही पाहिलें–असा अर्थ. (मोरोपंतकृत वनपर्व–अध्याय ३ पहा). ३. हरिहरांच्या रूपांतील अद्वैतज्ञानाच्या आनंदप्राप्तीनें. ४. पाशुपतास्त्र मागे–असा अन्वय. ५. लवकर, त्वरित. ६. यादवकौरवश्रेष्ठ कृष्णार्जुन ! ७. कृष्णार्जुन. ८. उत्तम सरोवराजवळ. ९. सहस्रमुख. १०. देवमुनी कंप पावती. ११. ह्या अनेकवचनी क्रियापदाचा कर्ता 'कृष्ण' अर्थात् कृष्णद्वय म्हणजे कृष्णार्जुन. 'घे तीं' असें पाठांतर. १२. नांगर. १३. शर (बाण) भाला गमे. १४. धनुष्याची दोरी. १५. शिव. १६. जिंकिलें. (अर्थात् आमचा जय झाला).

श्रीमूर्ति राजमुद्रा, नर कागद, त्यांत सम[1] ठसा हो ! तो; ।
तो ध्यानयोग, बुडतां सर्वांहि जडांसि, कमठसा[2] होतो. ॥ १०२
हृदयांत ध्यान तसें धरिलें, सरहस्य[3] पाशुपत गा ! तें, ।
जें काळातें जिंकी, जेंवि गरुडतेज आशु पतगातें[4]. ॥ १०३
प्रभु, दावुनि निज 'विजयद सदरिघ्न[5] ध्यान, चाप चढवूनी, ।
शर त्या सरींच टाकी, कार्मुकहि[6], महास्त्रमंत्र पढवूनी. ॥ १०४
'विजयी व्हा, जा', ऐशी आज्ञा होतां महेशपद नमुनी, ।
होउनि कृतार्थ आले शिबिरासि पुन्हां प्रसन्नवदन मुनी[7]. ॥ १०५
प्रभुनें स्वप्नीं केला कृतकृत्य सखा, न लेश भागविला.[8] ।
इकडे दारुक गोष्टी सांगोनि प्रातरवधि जागविला. ॥ १०६
प्रथम करी जपहोमब्राह्मणपूजादि विहित जें कर्म; ।
मग विश्वकर्मनिर्मित भासुर[9] भद्रासनीं[10] बसे धर्म. ॥ १०७
शुभ्रांबर, मुक्ताधर, सितचामरवीज्यमान[11] शोभे तें, ।
बहु राजरत्न, ओढुनि घे शारदपूर्णचंद्रशोभेतें[12]. ॥ १०८
चंद्र किति ? जसा धर्मा, न तसा कवि मानवे शतक्रतुला[13]. ।
मग तद्यशोमृताची[14] धरिल कसें मानवेशतक्र[15] तुला[16] ? ॥ १०९
ज्याचा प्रतापरवि मधुकैटभतिमिरीं[17] लव[18] प्रभा वमला[19], ।

---

१. राजमूर्तिसम. अर्जुन शंकराशीं तादात्म्य पावला--असा भाव. राजमुद्रा=राजाचा शिक्का. २. कूर्मासारखा (कूर्मानें पृथ्वीला उचलून धरिलें त्याप्रमाणें उचलून धरणारा). ३. मंत्ररहस्यसहवर्तमान. ४. पक्ष्यातें. ५. सत्+अरि+घ्न=बलाढ्य शत्रूंचा नाश करणारें. ६. धनुष्य. ७. नरनारायण. स्वायंभुव मन्वंतरांत धर्मनामक ऋषीला मूर्तिनामक स्त्रीपासून दोन पुत्र झाले. त्यांचीं नांवें नर व नारायण अशीं होतीं. हे दोघेही विष्णूच्या अंशानें जन्मले होते. पुढें ते अनुक्रमें अर्जुन व कृष्ण ह्या रूपानें पृथ्वीवर अवतरले, अशी कथा आहे. ८. प्रातःकालपर्यंत. ९. प्रकाशमान. १०. श्रेष्ठासनीं. ११. शुभ्र चामरांनीं वारा घातला जात आहे ज्याला असें. १२. शरदृतूंतील. १३. इंद्राला. १४. तत्+यश+अमृताची=धर्मयशोमृताची. १५. दुर्योधनरूप तक्र. १६. तुलना. १७. मधुकैटभरूप अंधकाराच्या ठायीं. मधु आणि कैटभ हे दोन्ही दैत्य विष्णूनें मारिले होते. १८. लेशमात्र प्रभा. १९. त्यजिता झाला.

तो प्रभु ज्याच्या द्वारीं, वाच्य न [1]त्याचा लव प्रभाव मला.॥ ११०
तों भूपप्रभ कवची खड्गी मणिकुंडली युवा वंदी ।
[2]द्वास्थ, म्हणे, 'प्रभु येतो तो, वेद स्तविति ज्या, जसे [3]बंदी.'॥ १११
धर्म म्हणे, 'त्यजिति, जयां नमुनि, [4]कुलधनादिभवमदा, ज्ञाते, ।
प्रभुचरण दर्शन मला द्याया इच्छिति कसे [5]मदाज्ञा ते ? ॥ ११२
[6]तिमिरहत [7]गतीच्छु कवण रविच्या घालील [8]आण वाजीतें ? ।
आणा हो द्वास्थ ! तया, पूजासाहित्य आणवा जी ! तें.' ॥ ११३
येतां प्रभुचें, धर्म स्वकरें लागे, [9]संभाजन कराया. ।
'धन्य' म्हणे [10]यां, जसि [11]रघुपतिबहुमानीं सभा जनकराया. ॥११४
भक्तापुढें न मिरवी तेज श्रीमूर्ति, रविस [12]भाजी जी. ।
दावी बहु विनय, म्हणे जरिहि ब्रह्मादिकविसभा 'जी जी'.॥११५
द्रुपद विराट [13]वृकोदर सात्यकि इत्यादि सर्वही आले; ।
झाले कृतार्थ हरिला पाहुनि, चंद्रा चकोरसे, धाले. ॥ ११६
धर्म म्हणे, 'माधवजी ! भ्यालें मन, करुनि बोध वळवा जी ! ।
व्यसनीं तरेल [14]मंदरसा, जरि ताराल तो [15]धवळवाजी.'॥ ११७
कृष्ण म्हणे, 'राजाजी ! कां भ्यालां ? विजय हा असामान्य, ।
एका [16]पुरारिवांचुनि नाहींच जगत्रयीं असा मान्य.' ॥ ११८
ज्या पाहुनि सुरहि म्हणति, 'कृष्णचि [17]कृष्णानुजाधव, [18]लवा जी,' ।
तो धर्माला सर्वांमागुनि येउनि नमी धवलवाजी. ॥ ११९
आलिंगुनि धर्म म्हणे, "वत्सा ! [19]विजयोत्सुका ! महाबाहो ! ।
'मारिन जयद्रथ,' म्हणसि, तरि सत्य तुझा सुकाम हा बा! हो.१२०

---

१. धर्माचा. पर्यायोक्ति. २. द्वारपाल. ३. भाट. ४. कुल+धन=सत्कुल आणि द्रव्य इत्यादिकांपासून भव म्हणजे निर्माण होणारा जो मद त्यातें. ५. माझी आज्ञा; किंवा मदेंकरून अज्ञ जो मी त्या मला. ६. अंधकारामुळें अडलेला. ७. गमन करण्याविषयीं इच्छा करणारा. ८. शपथ. ९. पूजन. १०. धर्माला. ११. रामचंद्राच्या बहुमानीं. १२. दहन करी. १३. भीम. १४. समुद्रमन्थनकालीं मंदराचल समुद्रांत तरल्याप्रमाणें. १५. श्वेताश्व, अर्जुन. १६. पुर+अरि=शिव. १७. कृष्ण+अनुजा+धव (पति)=अर्जुन; कृष्ण हाच अर्जुन. १८. नमा. १९. विजय+उत्सुका.

आश्रय मोठ्या विजया वि[1]जया ! होतोसि तूं करुनि आजीं[2], ।
कीं हा प्रसन्न बहु तव मुखवर्ण, असाहि अच्युतहि, आजी." ॥ १२१
धर्मासि विजय सांगे स्वप्नींच्या अद्भुता अनुभवातें. ।
नमिति, क्षितिवरि ठेवुनि शिर, सर्व स[3]देवकीजनु भ[4]वातें. ॥ १२२
किति म्हणति, 'काय सु[5]रभी ? पुरवी आस्था पि[6]नाकिलीला हो!' ।
किति म्हणति, 'एक हरिहर; इतरीं हा स्थापिना कि[7]लीला हो!' ॥ १२३
धर्म म्हणे, 'हूं ! अद्भुत करुनि, मला आजि स[8]मरसव दावा. ।
काय इतर रस ? योगचि[9] एक भला आ[10]जिसम रस वदावा.' ॥ १२४
धर्मप्रेरित गेले ते भीमादिक सु[11]रोपम रणाला; ।
रा[12]मप्रहित जसे द[13]शमुखकटकाच्या सु-रोपं[14] मरणालीं. ॥ १२५

अध्याय नववा.

श्रि[15]तवत्सलें मुकुंदें त्यजिला स्व[16]स्वामिभावसार थि[17]तां; ।
प्रेमें श्रीहि न वरिली तैसी, जैसी स्व-दा[18]स-सारथिता. ॥ १
सिद्ध करिति य[19]न्नामें ब्रह्मादिसकलमनोरथास जु[20]नीं, ।
तो प्रभु म्हणे, 'पटु न मी.' दे पं[21]चाक्षरमनो ! रथा सजुनी. ॥ २
द्वेष म्हणे, 'अर्जुनजी ! व्हा सिद्धरथस्थ त[22]पनकोपार्थ.' ।

---

१. 'मेधाविजया'(=मदाबुद्धिवंता अर्जुना !) असाही पाठ आहे. २. युद्ध. ३. देवकीनंदनासह. ४. शंकराला. ५. कामधेनु. ६. शंकराची लीला. ७. किल्लीला, युक्तीला. 'किल्ली' शब्दाचा अपभ्रंश. इतरांकडून याला हें शिक्षण मिळणार नाहीं. 'स्थापिना' हें कर्मणि क्रियापद आहे. ८. युद्धयज्ञ. ९. ध्यानयोग, योगसाधन. युद्धरसाची बरोबरी फक्त ध्यानयोगच करूं शकतो, असा भाव. १०. युद्धतुल्य रस. ११. देवतुल्य. १२. रामानें सोडिलेले. १३. रावणसैन्याच्या मरणाला. १४. उत्तम शर. १५. आश्रिताविषयीं कृपाळु अशा. १६. आपल्या स्वामिपणाचें सार. १७. अल्पसा, थोडासा. 'सार' याचें विशेषण. १८. स्वदासाचें सारथ्य. १९. यत्+नामें. २०. पुराणीं. प्राचीन काळापासून साधुसंतांनीं वर्णिलेलीं म्हणून भगवंताचीं नामें जुनीं झालीं, हें स्पष्ट आहे. २१. पंचाक्षरमंत्रा ! 'नमःशिवाय' हा मंत्र. याचें माहात्म्य मोठें आहे. २२. सूर्यकोपार्थ.

तैं[1] कां न म्हणेल मनीं, 'ब्रह्मपदार्थर्थ तप नको,' पार्थ ? ॥ ३
करुनि प्रदक्षिण द्विजवृंदासि,[2] रथासि तो कवि नैयानें[3] ।
मग वेधोनि[4] अधिष्ठी,[5] जनकांकीं[6] जेंवि तोकें[7] विनयानें.[8] ॥ ४
काय उणें त्या,[9] करि सश्रीकृष्णा[10] ज्यां[11] निवास[12] विप्रांशी[13] ? ।
कर्णांहीं[14] स्वस्तुतिस श्रीकृष्णाजानि[15] वासवि[16] प्रांशी.[17] ॥ ५
झाला निजदासाचा, ज्या स्तविति सुधीर विप्र, [18]तो दास; ।
[19]श्रीनलिनीचा, चक्र त्यजुनि, धरि सुधी[20] रवि प्रतोदास.[21] ६
[22]पांसुनिकरहि, प्रभुच्या[23] हेतु बहु प्रीतिचा, बुकासाच. ।
वाटे न कौस्तुभाला, जपला जगदीश चाबुका साच. ॥ ७
अनुभवती, रूपाची एक स्थिति, एक हानि, पटें[24] सूत, ।
तैसे हे कृष्ण[25] सखे—एक रथी, एक हा निपट[26] सूतें.[27] ॥ ८
कृष्ण रथीं चढले; मग तोहि चढे पुत्र सात्यकाचा[28] हो ! ।
जेंवि हररथीं विधि हरि[29]; दुसरा दृष्टांत सत्य कैंचा[30] हो. ॥ ९
अवलोकुनि सात्यकिला पार्थ म्हणे, 'धर्मराज रक्षावा. ॥
सैन्धववधाहुनि[31] उणा न तुवां हा कार्यभाग लक्षावा. ॥ १०

---

१. तेव्हां. २. द्विजवृंदाला प्रदक्षिणा करून, उजव्या हाताकडे द्विजवृंद राहतील अशा रीतीनें त्यांसभोंवतीं फिरून. ३. नीतीनें. ४. चढोनि. 'वंदूनि' असाही पाठ आहे. ५. रथासि अधिष्ठी=रथांत बसे. ६. पित्याच्या मांडीवर. ७. बाल. ८. नम्रतेनें. ९. अर्जुनास. १०. कृष्णासह. ११. ज्या सश्रीकृष्णा विप्रांशी निवास करी—असा अन्वय. १२. स्थान. १३. ब्राह्मणांचा आशीर्वाद. ब्राह्मणांच्या आशीर्वादांनीं ज्याला आपलें राहण्याचें स्थळ केलें, मोठ्या आनंदानें ते आशीर्वाद ज्यांच्या ठायीं नियुक्त झाले—असा अर्थ. वरील गीतींतील प्रदक्षिणीकृत जे विप्र, त्यांच्या आशीर्वादांनीं—असा संबंध. 'सश्रीकृष्णा' हें 'ज्या' याचें विशेषण. १४. कानांनीं. १५. द्रौपदीपति. १६. इन्द्रपुत्र (अर्जुन). १७. त्यांनीं केलेली स्तुति अर्जुन ऐकता झाला-असा अर्थ. १८. कृष्ण. १९. लक्ष्मीरूप कमलिनीचा रवि (आनंद देणारा) श्रीकृष्ण चक्र त्यजून प्रतोदास धरी, सारथ्यकर्म स्वीकारी—असा अर्थ. २०. चांगला बुद्धिमान्. २१. चाबुकास. २२. धूळीसमूह. २३. प्रभुच्या बहु प्रीतिचा हेतु (विषय) झाला. २४. वस्त्र आणि सूत. २५. कृष्णार्जुन. २६. अत्यंत, सर्व प्रकारें. २७. सारथी. २८. सात्यकी. २९ पंतलिखित पोथींत 'विधि-व हि' असा पाठ आहे. व=वरुण. ३० कथा. ३१. जयद्रथवधापेक्षां.

चिंता करूं नको, तो कुरुगुरु तेजें असो अनल[1], सरें[2] हो. ।
एक मजपुढें माधव, तूं जा धर्मापुढें, अनलस[4] रहा.' ॥ ११
गेला तो धर्माला रक्षाया, जेंवि सत्यक–पित्याला[5]. ।
सुगलोक्त[6] रामसेवा स्मरला पाहोनि सत्य कपि त्याला[7]. ॥ १२
द्रोणें रचिला सैन्धवरक्षार्थ व्यूहनायक व्यूह[8], ।
परमार्थरक्षणक्षम अपराजित जेंवि काय कव्यूह[9]. ॥ १३
चोवीस कोस लांब व्यूह, दहा कोस रुंद तो मागें. ।
जेणें श्रिता न बाधों द्यावा पंरकाल[10], जेंवि सोमागें[11]; ॥ १४
जिंकीसा कोणीहि नें[12] शास्त्रें, शस्त्रें, तपोनि धीरा ज्या, ।
तो[13] जपला, अमृतरसा बहु शक्र तसा, तपोनिधी[13] राजा[14]. ॥ १५
सैन्धव मागें दूर स्थापूनि व्यूहगूढगर्भांत, ।
होय पुढें परकटकीं जाया, दवें[15] जेंवि शुष्कदर्भांत. ॥ १६
व्यूहापुढें स्वयें गुरु, दुर्मर्षण[16] त्यापुढें, उभा राहे. ।
मृग जैसा वाराया हरिची[17], तो वाट जिष्णुची[18] पाहे. ॥ १७
सेनाग्रीं वाजविती नरनारायण[19] सखे दरवरा[20] जे, ।
ते[21] मोरसे; भुजगसे ऐकति होउनि सखेद रव राजे[22]. ॥ १८

---

१. अग्नि. २. सरोवर. ३. अर्जुन. ४. आलस्यरहित (सावध). ५. सत्यक नांवाच्या आपल्या पित्याला. ६. सुग्रीवानें सांगितलेली. वाली नांवाचा एक वानर किष्किंधा नगरीचा राजा होता; त्याचा सुग्रीव हा भाऊ. वालीनें सुग्रीवाची बायको तारा हीस पळवून, त्यास घालवून दिलें होतें. तेव्हां तो ऋष्यमूक पर्वतावर राहात असे; कारण वालीला त्या पर्वतावर मतंगऋषीच्या शापामुळें जातां येत नसे. त्या सुग्रीवाचा मंत्री हनुमान या नांवाचा वानर होता. सुग्रीवानें सीतेचा शोध करण्यासाठीं निरनिराळ्या दिशांस वानर पाठविले होते. त्या गोष्टीचें मारुतीस स्मरण झालें. ७. सात्यकीला. त्याला (सात्यकीला) पाहून कपि (मारुति) सुगलोक्त रामसेवा स्मरला–असा अन्वय. स्मरणालंकार आहे. ८. व्यूहश्रेष्ठ व्यूह. ९. कवि+ऊह=कवितर्क. १०. शत्रुरूप काळ. ११. सोम+अग=कैलासपर्वतानें. १२. नाहीं. १३. तो तपोनिधि = द्रोण. १४. जयद्रथास. १५. दावानळ, वणवा. १६. धृतराष्ट्राच्या शत पुत्रांतील एक. १७. सिंहाची. १८. अर्जुनाची. १९. अर्जुन आणि कृष्ण. २०. शंखश्रेष्ठा. (पृष्ठ १२२ टीप २३ पहा). २१. नरनारायण. २२. कौरवपक्षीय राजे.

रोमांच[1]कंचुकाला, कडकडतां [2]कृष्णकंबु, [3]कपि त्याला; ।
[4]पर सोडी भानाला, सिंहरवें जेंवि जंबुक पिल्याला. ॥ १९
बहु गज हय हगति मुतति, दे शंखस्फुरण तें विपत्तीतें. ।
श्री[5]नृहरिनामगर्जन भूतातें होय, तेंवि[6] [7]पत्तीतें. ॥ २०.
[8]ज्याचे, [9]निवातकवचाद्यसुरबला निपट म्हणति, शर, '[10]दभ्र' ।
त्या दुर्मर्षणबल [11]किति ? गर्जुनि भिववील वायु [12]शरदभ्र ? ॥ २१
अर्जुनबाणसमूहें दुर्मर्षणकटक सर्व भंगे तें. ।
जरि विजयशक्तितें पर रोधिल [13]सैकतहि [14]सेतु गंगेतें. ॥ २२
दुःशासन होय पुढें, दुर्मर्षणसाचि भग्नहि, रणांत. ।
खद्योततेज[15] उरतें कांहींतरि काय अर्ककिरणांत ? ॥ २३
दुःशासन शीघ्र पळे, [16]जोंणो गिरिवरुनि दगड तो घसरे. ।
गुरुवरि जाय [17]कपिध्वज, जेंवि पुढें मथुनि सेतु ओघ[18] सरे. ॥ २४

---

१. रोमांचरूप आच्छादनाला. २. कृष्णाचा शंख. ३. मारुति. ४. शत्रु. ५. नारसिंहाचें स्मरण केलें असतां भूतें (पिशाचें) भिऊन पळून जातात अशी समजूत आहे. नृसिंहदैवत सर्व पिशाचांचा परिहार करणारें आहे. गाणगापुर, नरसोबाची वाडी व विन्हाडसिद्धाचें कवठें या तीन क्षेत्रीं पिशाचें गत घेतात. हीं तिन्ही स्थानें नृसिंहदैवताचीं प्रख्यात क्षेत्रें आहेत. नृसिंहमंत्राचा जप करणाऱ्यास भूतांपासून पीडा होत नाहीं, अशी पंतांची समजूत होती. (वनपर्व–अध्याय १२।६३, भीष्मपर्व–अध्याय ५।१५ पहा). ६. तसें भयंकर. ७. पायदळास. ८. ज्या अर्जुनाचे शर निवातकवचाद्यसुरबला 'निपट दभ्र' म्हणति. (वनपर्व–अ० ५ गी० ११६ पहा). ९. निवातकवचादि राक्षसांचे बळास. निवात व कवच हे प्रऱ्हादाचा भ्राता संऱ्हाद याचे पुत्र. इंद्रानें अर्जुनास अस्त्रविद्या शिकविली, म्हणून गुरुदक्षिणा देण्यासाठीं अर्जुनानें ह्या असुरांचा संहार केला. 'ह्या दानवांचा पराभव कर, म्हणजे मला गुरुदक्षिणा पावली' असें इन्द्रानें अर्जुनास सांगितलें होतें. ह्या दानवांपासून देवांस त्रास होऊं लागला. तेव्हां ते इन्द्रासह ब्रह्मदेवास शरण गेले. त्यानें इन्द्र अन्य देहानें (पुत्ररूपें अर्जुनहस्तें) याचा वध करील, असा त्यांस आशीर्वाद दिला. हे ब्रह्मदेवाच्या वरानें उन्मत्त झाले होते व ह्यांची संख्या तीन कोटी होती. (मूळ वनपर्व–अ० १६८–१७२ पहा). १०. तुच्छ. ११. **काव्यार्थापत्ति** अलंकार. १२. शरत्+अभ्र=शरदृतूंतील (क्षुद्र) अभ्र वायूला भिववील काय ? अर्थात् नाहीं. **प्रश्नालंकार**. १३. वाळूवा. १४. बांध. **संभावनालंकार**. १५ काजव्याचा प्रकाश. १६. **उत्प्रेक्षालंकार**. १७. ज्याचे ध्वजीं मारुति आहे, असा अर्जुन. १८. (पाण्याचा) प्रवाह.

कृष्णानुमतें अंजलि जोडुनि अर्जुन म्हणे, "अहो गुरुजी ! ।
'स्वस्त्यस्तु'[1] म्हणा, द्या मज शिष्या आशी, जयप्रदा गुरें[2] जी. ॥ २५
पांडुसम, युधिष्ठिरसम, कृष्णसम, तुम्ही त्रिनेत्रसम[3] महित[4]. ।
करिल प्रसाद तुमचा जेंवि, तसें नाकनाथ[5] न, मम हित. ॥ २६
प्रेम असामान्य करी गुरुराज, दयालु जनक[6] सामान्य, ।
तें न स्मरेल जो, तो होईल कृतघ्न जन कसा मान्य ? ॥ २७
या दुर्भेद्यव्यूहीं इच्छितसें आजि मी शिरायास. ।
तुमचा प्रसाद नसतां होइल माझा वृथा चिरायास[7]. ॥ २८
अश्वत्थामा[8] तैसा सैन्धववधपणहि हाहि राखावा; ।
कीं भंगतां प्रतिज्ञा मानधनें अग्नि वा[9] हिरा खावा." ॥ २९
हांसोनि द्रोण म्हणे, 'पार्था ! मजला न जिंकितां आजी ।
जिंकावया जयद्रथ शक्य नव्हे. मजसवें करीं आजी[10].' ॥ ३०
ऐसें वदोनि मार्गणवृष्टि[11] तयावरि महातपा[12] सोडी, ।
जैशी आटोपाया मत्तगजशिरीं महात पासोडी[13]. ॥ ३१
तों अर्जुन, गुरुकार्मुक खंडाया, बाण निज गुणीं[14] जोडी. ।
तें जाणोनि[15] गुरुप्रभु[16] गांडीवाच्याचि त्या गुणा तोडी. ॥ ३२
जोडुनि गुण पार्थ करी कुरुसेनापालविप्रकटकांता[17]; ।
कीं गुरुपराभवेंही कु[19] रुसेना, पालवि[20] प्रकट कांता[21]. ॥ ३३

---

१. स्वस्ति अस्तु. (कल्याण असो). २. मोटी. ३. शंकरासमान. ४. पूज्य. ५. इन्द्र. ६. पिता, बाप. ७. चिर+आयास=चिरकालीन परिश्रम. ८. द्रोणपुत्र. ९. किंवा. १०. युद्ध. ११. बाणवृष्टि. १२. मोठें आहे तप ज्याचें, असा द्रोण. १३. पासोडी सोडी=झांपडी घाली. १४. धनुष्याच्या दोरीवर. १५. 'तों जाणुनि' असें पाठांतर. १६. द्रोण. १७. कौरवसैन्याचा ब्राह्मण अधिपति (द्रोणाचार्य), त्याच्या सैन्याचा अंत. १८. 'विप्र' शब्दाची योजना साभिप्राय आहे. अर्जुन क्षत्रिय व द्रोण ब्राह्मण; तेव्हां ब्राह्मणाच्या सेनेचा क्षत्रियानें अंत करणें साहाजिकच आहे. १९. पृथ्वी. राजा हा पथ्वीचा पति अशी समजूत आहे. द्रोणाचार्यांचा पराभव होऊन धर्म राजा व्हावा, असें पृथ्वीस वाटणें साहजिक आहे. आदर्शप्रतींत 'कुरु-सेना' असा पदच्छेद केलेला होता. २०. हांका मारी, पदरानें खूण करून बोलावी. २१. प्रिय पुरुषाला (धर्मराजाला).

त्या दोंही [1]कृष्णांवरि गुरु खवळे, जेंवि देवें [2]कीनाश; ।
बहुधा म्हणे, 'पृथेसह शोकें पावोचि देवकी [3]नाश.' ॥ ३४
द्रोण करी [4]नाराचें क्षत वक्षीं, जेंवि तक्षक [5]रदानें. ।
कांपे क्षण, [6]जो [7]भीता रक्षाया परम दक्ष [8]कर-दानें. ॥ ३५
धैर्य धरुनि गुरुवरि शर सोडी श्वेताश्व,' जेंवि [9]कुंपिताही. ।
हर्षे द्रोण, न कोपे; पुत्रोत्कर्षें [10]कुंढे नं कु–पिता ही. ॥ ३६
जो योजिला गुरूनें, सर्वहि तो कृष्णरक्त सायक पी, ।
ज्याच्या [11]व्रजीं प्रसादें खाती [12]ब्रह्माद्यलभ्य साय कपी. ॥ ३७
गुरुशर पडति नररथीं, [13]नवजलजीं जेंवि भृंग सु[14]रसार्थ, ।
कीं त्या [15]सुयज्ञवाटीं शिरला, घ्याया स्वभाग, [16]सुर-सार्थ ॥ ३८
केशव म्हणे, 'सख्या ! हा गुरु सोडुनि मुख्य कार्य साधावें. ।
सैंधववधार्थ सत्वर, नियत [17]शिवार्चार्थ आर्यसा, धावें.' ॥ ३९
पार्थ म्हणे, 'सूचविलें समयीं हित. [18]उचित काय तुज वाहूं ? ।
चाल सख्या ! लवकरि, हा कुरुसेनापाल घाल उजवा. हूं!' ॥ ४०
गुरुतें प्रदक्षिण करुनि रथ काढी वासुदेव वेगानें, ।
नच [19]म्हणितलें जयाच्या 'किमपि' यशाच्या 'न देववे' गानें. ॥ ४१
जातां गुरुवरि सोडी शर नर, होऊनियां [20]परावृत्त. ।
असुरा अमृत तसें बहु दुर्लभ, [21]ज्यों साधुचें [22]परा वृत्त. ॥ ४२
द्रोण म्हणे, 'रे अर्जुन ! कोठें जातोसि ? कां [23]निसरलोस ? ।
शत्रुस न जिंकितां तूं [24]निघसी कीं; कां पणा विसरलास ?' ॥ ४३

१. कृष्णार्जुनांवर. २. यम. ३. हें पंतांचें आवडतें यमक आहे. (उद्योगपर्व अध्याय १०।२८ पहा). ४. बाणानें. ५. दंतानें. ६. कृष्ण. ७. भ्यालेल्याला. ८. हात देऊन. ९. कुपित+अहि=क्रुद्ध सर्प. १०. दुःख न मानी. ११. गोकुळीं. १२. ब्रह्मादिकांना अलभ्य अशी साय. १३. नूतन कमलांवर. १४. उत्तम रसाकरतां, (मकरंदासाठीं). १५. उत्तम यज्ञमंडपीं. १६. देवतासमूह. १७. शिवपूजार्थ. १८. योग्य देणगी. १९. जयाच्या (ज्या कृष्णाच्या) यशाच्या गानें 'किमपि न देववे' [असें] नच म्हणितलें. अर्थात् त्याच्या यशाच्या गायनापासून मोठा लाभ आहे. २०. मागें वळून. २१. द्रोणाचें. २२. शत्रूला. २३. निसटलास, पळालास. २४. 'निघसी, कीं या पणा विसरलास' असा पाठभेद.

पार्थ म्हणे, 'शत्रु न तूं, माझा गुरुराज, बा दयाळो ! कीं. ।
जोडील कोण समरीं तुज जिंकुनि [1]साधुवाद या लोकीं ?' ॥ ४४
ऐसें बोलोनि निघे अति सत्वर [2]सिंधुराजवधकर्मा. ।
त्या अयुतबळें रोधिति [3]जय, कांबोज, श्रुतायु, कृतवर्मा. ॥ ४५
या कटकातें मथितां, गांठी कुरुगुरु पुन्हाहि; परि [4]त्यांतें ।
सोडी पार्थ महामति, [5]कालविलंबार्थ युद्ध करित्यातें. ॥ ४६
कृतवर्म्यासीं झटतां देव म्हणे, 'चाल करुनि मथना, तें ।
आणूं नकोचि चित्तीं [6]व्याही हें, त्यजुनि धर्मपथ, नातें.' ॥ ४७
मोहुनि भोज निघे कीं, प्रभु [7]वैरिन्याबरि म्हणे, 'सख्या! निघ रे!'।
शिरतां नर द्रवे परबल, [8]अर्कें वनेंहि [9]घृतें जसें विघरे. ॥ ४८
पांचाल, उत्तमौजा, चक्रत्राता दुजा युधामन्यु; ।
त्यां गांठी भोज, जसा [10]गतसत्संगा नपीं बुधा [11]मन्यु. ॥ ४९
[12]व्याली ज्याला वरुणापासूनि नदी प्रसिद्ध [13]पर्णाशा; ॥
जेणें पूर्ण न केली स्वपरिभवें शत्रुचीच [14]कर्णाशा; ॥ ५०
पर्णाशा प्रार्थी बहु, 'ज्या अमर करा वरें,' असें वरुणा, ।
ज्याला [15]मंत्रपुरस्कृत सुगदा देउनि पिता करी करुणा; ॥ ५१
ज्यासि म्हणे, वरुण, '[16]तरणि होउनि अरिसागरांत [17]तारील; ।
युद्ध न करि, त्यावरि जरि सोडिसिल गदा, तुलाचि मारील;' ॥ ५२
तो[18] धांवला श्रुतायुधराजा [19]भीमानुजासि वाराया; ।
होउनि विरथ, स्वगदा सोडी नारायणासि माराया. ॥ ५३

---

१. शाबासकी. २. जयद्रथाचा वध करणें हेंच आहे कर्म ज्याचें, असा अर्जुन. ३. धृतराष्ट्राच्या पुत्रांतील एक. ४. द्रोणातें. ५. कालक्षेप करण्याकरितां. ६. व्याही (?) हा व्याही आहे, हा जांवई आहे अशा प्रकारचे विचार मनांत येऊं देऊं नको, असा कृष्णाच्या भाषणाचा मथितार्थ दिसतो. ७. वारंवार. ८. सूर्यतेजें. ९. घट्ट, थिजलेलें तूप. १०. गत+सत्+संग=गेला आहे साधुसंग ज्यापासून अशा. ११. कोप. १२. प्रसवली. १३. नदीविशेष. १४. श्रवणेच्छा. १५. मंत्रपूर्वक. १६. नौका. १७. याचा कर्ता 'गदा.' १८. तो श्रुतायुध राजा. वरील तीन गीतींतील 'जो' याचा हा प्रतिशब्द आहे. १९. अर्जुनास.

जें भक्ष्य[1]भ्रांत्यागतमूषीतें भय महा भुजग दे, तें ।
त्या वरुणसुतनृपाच्या, देता झाला महाभुज[2], गदेतें. ॥ ५४
जसि योजितां अविषयीं[3] कृत्या, तसि ती महागदा परते; ।
मारी श्रुतायुधाला. सर्व भयें भंगले तदा पर[4] ते. ॥ ५५
मग कांबोज सुदक्षिण नृप वधिला जेंवि सिंह शरभानें[5]. ।
हरिति शिरें बहुतांचीं जैसीं, तैसींच पार्थशर भानें. ॥ ५६
हाणी श्रुतायुराजा समरीं रक्तप्रपार्थ[6] तोमरें[7] तों ।
मोहे प्रभुही; जाणों वदला, न वदोनि, पार्थ तो, 'मरतों.' ॥ ५७
तद्बंधु अच्युतायुहि हाणी शूलेंकरुनि सितवाहा[8]. ।
देव म्हणे, 'बा! सावध हो; देइल हर्ष मोह कितवा[9] हा.' ॥ ५८
उठतां[10], वाटे, आला[10] जाऊनि प्रेतराजसदनातें[11]; ।
वारा घालूनि पुशी प्रभु वारंवार मित्रवदनातें. ॥ ५९
गमले[12] स्वकाळिजा अहि[13], डसले. शर शौरिच्या[14] शरीरा जे, ।
विजया[15]; निज नयनयुगीं कण[16], दोघे बंधु ते शरी[17] राजे. ॥ ६०
दावी विकलत्व प्रभु, जों कांहीं कौतुकेंचि कोपार्थ ।
इंद्रास्त्रें कटकासह करि दोघांचेंहि भस्म तो पार्थ. ॥ ६१
नियतायु एक, दुसरा दीर्घायु, कुमार वीर जे त्यांचे, ।
तेही वधिले विजयें, राहों न दिलेचि धीर[18] जेत्यांचे[19]. ॥ ६२
वेष्टिति अंग कलिंग प्राच्य[20] असे बहुत भूप कोपानें; ।
ते दंडिले नरानें, जेंवि स्वपशु[21] प्रमत्त गोपानें. ॥ ६३

---

१. भक्ष्य+भ्रांति+आगत+मूषीतें=भक्षणाच्या आशेनें आलेल्या उंदरीस. २. आजानुबाहु अर्जुन. ३. अयोग्य वस्तूवर. ४. शत्रु. ५. भानें हरिति–असा अर्थ. ६. रक्ताची पोई होण्याकरितां. ७. आयुधविशेष. ८. अर्जुना. ९. कपटी दुर्योधनास हा मोह (तुला आलेली मूर्छा) हर्ष देईल. १०. 'अर्जुन' हा कर्ता. ११. यमगृहातें. १२. उत्प्रेक्षालंकार. १३. सर्प. १४. कृष्णाच्या. १५. 'विजया गमले' याचा संबंध पुढेंही घ्यावयाचा. १६. धूळीच्या कणासारखे. १७. बाण धरणारे. (श्रुतायु आणि अच्युतायु). १८. 'गर्व' असाही पाठ आहे. १९. जयनशीलांचे. २०. पूर्व देशाचे राजे. २१. प्रमत्त स्वपशु (आपलीं मस्त ढोरें) गोपानें (गुराख्यानें) जेंवि [दंडावीं], तेंवि नरानें (अर्जुनानें) ते दंडिले–असा अन्वय.

पार्थ [1]प्रवर्तवी, परबल मर्दुनि, [2]शोणितापगेला हो ! ।
जैसा [3]वर्षाकालीं, तैसाचि [4]क्षोणितैाप गेला हो ! ॥ ६४
प्रभुसि गदेनें हाणी तों [5]**अंबष्ठ श्रुतायु** [6]जगदीशा. ।
हृदयीं 'धन्य' म्हणे [7]त्या **[8]विजयध्वजनिलय [9]वायुज** [10]गदीशा. ॥ ६५
[11]नर त्या गदेसि खंडी जों, तों धांवे धरूनि दुसरीतें; ।
आला गमे नदीचा लोंढाचि, पुढें करूनि [12]सुसरीतें. ॥ ६६
ताडी आधीं **प्रभुला**, मग **पार्थाला** पुनः पुन्हा रागें; ।
अद्भुत तें; चावावे **गरुड**–[13]**गुहशिखी** बळें जसे नागें. ॥ ६७
जसि गति [14]**घटकर्णाची** करि, पुरवाया स्वकाम, **राम** रणीं; ।
झाली प्राप्त तसिच त्या **पार्था**पासूनि [15]पामरा मरणीं. ॥ ६८
शिरतां **विजय** बहु करी दुर्योधनकटक तें [16]विकळ [17]पातें. ।
भिववील न प्रवेशें, हरिणाच्या, हरिहि तेंवि, कळपातें. ॥ ६९
व्यूहीं शिरतां **अर्जुन**, **दुर्योधन** निज मनीं म्हणे 'हाय !' ।
जाय **द्रोणा**पासीं; नमुनि म्हणे त्यासि, 'हें बरें काय ? ॥ ७०
तो तुजसमक्ष कैसा शिरला व्यूहीं ? शिरों नये वातें ! ।
तेजें अलंघ्य कीं तूं **आचार्या** ! [18]**वासवादिदेवांतें**. ॥ ७१
भ्याले सर्वहि योद्धे **पार्था**, हरि जेंवि वधपरा शरभा. ।

---

१. उत्पन्न करी. उत्प्रेक्षालंकार. २. शोणित+आपगा=रक्तनदी. ३. पावसाळ्यांत. ४. पृथ्वीचा ताप. एकार्थी उष्णतामूलक ताप; द्वितीयार्थी पीडारूप ताप. ५. अंबष्ठ देशाचा राजा श्रुतायु. ६. जगदीशा प्रभूला हाणी–असा अन्वय. ७. त्या गदीशा. ८. विजयध्वज हें निलय आहे ज्याचें, असा मारुति. विजयध्वज=अर्जुनाचें निशाण. कथा-संदर्भ–मारुति आणि अर्जुन यांचें एका प्रसंगीं परस्परांच्या सामर्थ्याविषयीं बोलणें चाललें असतां, निकरावर गोष्ट येऊन युद्ध झालें. त्यांत अर्जुनास श्रीकृष्णाचें साहाय्य अस-ल्यामुळें यश आलें आणि मारुति हरला. तेव्हां अर्जुनाच्या ध्वजावर बसून युद्धप्रसंगीं आपल्या भयंकर गर्जनेनें शत्रूंस भयाकुल करण्याचें काम मारुतीनें पतकरिलें. म्हणूनच अर्जुनास 'कपिध्वज' 'कपिवरध्वज' असें म्हणण्याचा प्रघात पडला. ९. वायुपुत्र मारुति. १०. गदाधारणकर्त्यांच्या ईशाला, (श्रुतायूला). ११. अर्जुन. १२. मगरीतें. १३. कार्तिकेयाचें वाहन मयूर. १४. कुंभकर्णाची. १५. नीचाला, (श्रुतायूला). येथें पर्यायोक्तालंकार आहे. १६. मूर्छित. १७. हल्ल्यानें. १८. इन्द्रादि देवांतें.

आम्हां न सोसवे नररथभा, जसि राक्षसां पराशरभा[1]. ॥ ७२
दिधलें जयद्रथाला अभय; व्यूहीं सिताश्व शिरकविला. ।
रक्षोचित[2] प्रतिज्ञावच, न तसें धन, कलत्र, शिर, कंपिला[3]. ॥. ७३
विश्वासघात[4] कीं हा, लावियला त्वांचि पाप[5] ! डाग मला. ।
अभयद जयद्रथा तव कर माथां, जेंवि पापडा, गमला[6]. ॥ ७४
मद्विप्रिय[7]रत, धर्मप्रियरत, तूं स्पष्ट आजि कळलास. ।
मज पोषित्या विषफळें, अमृतफळें[8] मदहितार्थ[9] फळलास[10]. ॥ ७५
तूं मधुनें सारविला, केवळ वरि मात्र गोड, वाखरची[11]. ।
जो गुण करी[12], तयाचें, अरिवश होउनि, अनिष्ट वाख[13] रची. ॥ ७६
खेदें प्रलाप[14] केला. गुरुजी ! चित्तीं धरूं नका; पावा. ।
रक्षा सैंधव. आपण लावुनि पोषुनि तरू[15] न कापावा.' ॥ ७७
द्रोण म्हणे, 'तूं अश्वत्थामासा, हें न अन्यथा नातें. ।
सेवीं गुरुमातेच्या विद्यारूपा, न अन्य, थानातें. ॥ ७८
कोप नसेचि तुझा मज; सांगतसें सत्य मी, न वंचकसा[16]. ।
माझा धनंजयाचा होइल तुल्य प्रतापसंच[17] कसा ! ॥ ७९
मी वृद्ध, रथी सारथि नर नारायण, सखे तरुण बा ! ते ।

१. पराशराचें तेज. पराशराच्या पित्याला राक्षसांनीं वधिलें होतें. ही गोष्ट पराशरास समजून त्याला मोठा क्रोध आला, आणि त्यानें राक्षससत्र करून पुष्कळ राक्षस मारिले—अशी कथा आहे. २. रक्षा+उचित=रक्षण करण्यास योग्य. (मागें अध्याय १ गीति १२४ व पुढें अध्याय २१ गीति २० पहा.) ३. झाल्याला. ४. 'विश्वासघातकी हा' असा पाठ आदर्शप्रतींत होता. ५. पापी द्रोणाचार्या ! 'पापडाग' असा पाठ आदर्शप्रतींत होता. ६. नाशकारक—असा अर्थ. ह्या गीत्यर्धाच्या स्पष्टीकरणार्थ पुढें दिलेलें गीत्यर्ध उपयोगीं पडेलः—'नाहीं तरि म्यां ऐसे चुरिले असते धरूनि पापडसे'। (मोरोपंत—वनपर्व—अध्याय ७।१०२). येथील पापडाचा दृष्टांत ग्राम्यत्वास्तव अप्रशस्त होय, असें कित्येक म्हणतात. ह्यासंबंधीं पृष्ठ ८ टीप १४ पहावी. ७. माझें अप्रिय करणारा. ८. 'अमृतफळें मदहितास फळलास' असाही पाठ आहे. ९. माझ्या शत्रूसाठीं. १०. फलदायक झालास. ११. वखा. १२. दोरी वळतो. १३. दोरी करण्याचें द्रव्य, ताग. १४. बडबड. १५. वृक्ष, झाड. 'विषवृक्षोऽपि संवर्ध्य स्वयं छेत्तुमसांप्रतम्।' ही कव्युक्ति प्रसिद्धच आहे. १६. ठकाप्रमाणें. १७. प्रताप+संच= पराक्रम आणि सर्व साहित्याचा मेळ.

अक्षय [1]लक्षयशोधनजनसन्नुत रथ, तुरंग,धनु, भाते. ॥ ८०
बा ! सोडिले शर पुढें जे जे त्या अर्जुनें महाभागें, ।
[2]वेगातिशयें पडती ते. एक क्रोश [3]तद्रथामागें ॥ ८१
हयबल बहु, कृष्णाचें निपुणपणहि बहु, न सांगवे गा ! तें. ।
न तसा [4]संचेंहि. सोसिलहि [5]प्रवयाचें न आंग वेगातें. ॥ ८२
व्यूहाचें मुख सोडुनि त्यामागें म्यां वृथा न लागावें. ।
वदलों 'धर्म धरिन' तें करिन; मग तुम्हीं न कां मला गावें?॥ ८३
करितां युद्ध, [6]धनंजय उजवें घालूनि हात जोडूनी, ।
गेला, न जिंकितां मज, बहु [7]होकरितांहि, शीघ्र सोडूनी. ॥ ८४
अर्जुन शिरला व्यूहीं, त्या मागें धर्म सांपडेल मला ।
[8]सुखसाध्य; [9]यक्षराजत्यक्त निधि जसा, तसाचि तो गमला. ॥ ८५
मी जातों धर्मावरि, तूं जा त्या [10]पांडवास वाराया. ।
होय [11]सुदुःसह '[12]जीवितनिस्पृहजनकांड [13]वासवा, [14]राया !'॥ ८६
भूप म्हणे, 'इच्छावा बाळें घ्याया [15]सुधांशु उडुनि करें, ।
तैसें हें. गुरुजि ! कसा जिंकावा [16]चंडभानु [17]उडुनिकरें ? ॥ ८७
हें न घडेल, न [18]म्हणवे. धरिता झाला धरेसि दर्भ कसा ? ।

---

१. यशच आहे धन ज्यांचें, अशा लक्ष जनांनीं उत्तम प्रकारेंकरून स्तुत असा. ('रथा' चें विशेषण). तुरंग=घोडा. तुरंग, तुरग, तुरंगम अशीं ह्या शब्दाचीं तीन रूपें आहेत. तुरेण (त्वरया) गच्छतीति तुरंगः. २. त्याच्या रथाच्या वेगातिशयानें. ३. तत्+रथ=अर्जुनाच्या रथामागें. (त्याच्या रथाचा वेग बाणांपेक्षांही अधिक होता म्हणून तो बाणाच्या पुढें जाई–असा भाव.) ४. सर्व साहित्यांचा मेळ. ५. वृद्धाचें. ६. 'सर्वान् जनपदान् जित्वा वित्तमादाय केवलम् । मध्ये धनस्य तिष्ठामि तेनाहुर्मां धनंजयम् ॥' अशी धनंजय शब्दाची व्युत्पत्ति महाभारतांत दिली आहे. ७. हटकितांही. ८. सुखानें साध्य, सहजीं मिळण्यासारखा. ९. कुबेरानें टाकलेला. १०. अर्जुनास. ११. सहन करण्यास अत्यंत कठीण. १२. जीविताविषयीं निस्पृह जो जन त्याचा शर. (जीवावर उदार झालेल्याचा बाण–असा भाव). १३. इन्द्रासही. १४. हे दुर्योधना ! तूं जीवावर उदार होऊन युद्ध कर–असा भावार्थ. १५. अमृतमय किरण ज्याचे, त्या चंद्राला. १६. प्रचंड सूर्य. १७. नक्षत्रसमूहें. १८. हें घडणार नाहीं, असेंही म्हणतां येत नाहीं. कारण दर्भ (तृण-विशेष) जमिनीला आधारभूत कसा होतो ? नदीच्या कांठची माती दर्भांच्या मूळांच्या आधारामुळें वाहून जात नाहीं, ही अनुभवसिद्ध गोष्ट आहे.

रक्षावें यश आपण. हा शिष्य करिल गुरूक्त[1] अर्भकसा.' ॥ ८८
द्रोण म्हणे, 'कुरुराजा ! पार्थ दुराधर्ष[2] सत्य, परि त्यातें ।
तूं रोधिशील माझ्या सामर्थ्यें, सैंधवांतकरि[3]त्यातें. ॥ ८९
होशील त्या प्रवाहा पर्वत तूं; मी नव्हे अलीकवचा[4]. ।
तुज लेववितों तें[5], ज्या दृढता वज्राहुनी भली कवचा. ॥ ९०
घे कवच, अभेद्य सुरासुरनरसर्वास्त्रशस्त्रवृष्टीनें, ।
श्रीशुकवैराग्य जसें रंभादि[6]स्त्रीप्रकांडदृष्टीनें.' ॥ ९१
श्रीगुरुनें लेवविलें नव कनककवच, जपोनि मंत्रास, ।
जें अरिचा हरि[7], सत्पदरज मृतिचा[8] जेंवि, सर्व संत्रास[9]. ॥ ९२
द्रोण म्हणे, 'वृत्रासुर या सामर्थ्येंचि जिष्णुनें[10] मथिला; ।
साक्षाद्रुद्रेंचि[11] कवचधारणमंत्रप्रयोग हा कथिला. ॥ ९३
हरिपासुनि[12] जोडुनि दे हें विद्यासुधन अंगिरा[13] जीवा[14]. ।
तो[15] अग्निवेश्यगुरुला[16], ह्रद[17] जीवन[18] जेंवि संगि-राजीवा[19]. ॥ ९४
लेवविलें तुज म्यां हें, कौतुक दाविल, अभेद्य कवच रणीं.' ।
ऐसें ऐकुनि गुरुच्या, घाली निघतां नृपाल कैंव[20], चरणीं. ॥ ९५
जाय सुयोधन, वारुनि पार्थातें, सिंधुराज राखाया. ।
स्पर्शे युधिष्ठिरचमू व्यूहा, जसि सिंधुरा[21] जरा[22] खाया. ॥ ९६

---

१. गुरु+उक्त=वडिलांची आज्ञा. २. दाबून टाकण्याला कठीण. ३. जयद्रथाचा अंत करणारा जो अर्जुन, त्यातें. ४. मिथ्यावादी. ('अलीकवचाः' असा मूळ संस्कृत शब्द). ५. तें कवच. अशा प्रकारचें कवच कीं. ६. रंभादि उत्तम स्त्रियांच्या दृष्टीनें. 'प्रकांड' शब्दानें उत्तमत्व दर्शविलें जातें. 'मतल्लिका मचर्चिका प्रकांडमुद्धतल्लजौ। प्रशस्तवाचकान्यमूनि' इत्यमरः। मतल्लिका, मचर्चिका व प्रकांड (स्त्रीलिंग), आणि उद्ध व तल्लज (पुल्लिंग) हे पांच शब्द उत्कर्षार्थक किंवा प्रशस्तवाचक असून समासाच्या अंतीं यांचा उपयोग करितात. ७. हरण करी. ८. मृत्यूचा. ९. पीडा, भीति. १०. इन्द्रानें. ११. साक्षात्+रुद्रेंचि. १२. इंद्रापासून. १३. बृहसतीचा बाप. १४. बृहसतीला. १५. बृहसति. १६. द्रोणाच्या गुरुला. १७. डोह. १८. जळ. १९. चिकटून असणाऱ्या कमळास. २०. मिठी. २१. गजास. २२. वृद्धदशा.

अध्याय दहावा.

मारुति, सात्यकि, धृष्टद्युम्न तसे कुरुबळासि तुडवीती, ।
[1]कुनृपतिराष्ट्रासि जसे दुष्काळ, व्याधि, चोर बुडवीती. ॥ १
द्रोण न [2]थेरे क्षण परकटकांत, जसा न रुद्र थारावा; ।
[3]तच्चापरवा पांडव भीति, जसे अहि [4]गरुडरथारावा. ॥ २
द्रोण क्षत्रियहृदया बहु, जैसी, भीति, [5]राम, दे वधुनी. ।
करि पूर्ण सेवित्यांचे रक्तनदी, जेंवि काम [6]देवधुनी. ॥ ३
शतसंख्य नाचले, त्या अद्भुतसमरोत्सवीं, भट-[7]कबंध. ।
वातें घनसा, द्रोणें धर्माचा भेदिला [8]कटक–बंध. ॥ ४
रक्तनदींत बुडाले गज; मग गेले न कोण वाहोन ? ।
गमला [9]गोवर्धननगवर्षिघनसमूह [10]शोणवाहोन. ॥ ५
द्रोणरण विलोकुनि, सुर, सिद्ध, स्मरती तदा [11]पिनाकिरणा; ।
म्हणती, 'दापिल काळा हा, रविच्या काय [12]दापिना किरणा.?' ॥ ६
गांठी [13]धृष्टद्युम्न द्रोणाला, राहु जेंवि रविला हो ! ।
[14]सिकताद्रि नदेंसा, तो वांटे त्या [15]बाहुजें विरविला हो ! ॥ ७
भिडवूनि हयांसी हय, घेउनि तेजस्वि [16]चर्म [17]करवाली, ।
तो स्वरथावरुनि उडे, जैसा [18]समरोग्रकर्मकर [19]वाली. ॥ ८

---

१. दुष्ट राजाच्या राज्यास. २. टिके (स्थिर न होय). ३. तत्+चाप+रवा=त्याच्या धनुष्याच्या शब्दास. ४. गरुडरथ+आराव=गरुडाच्या शब्दास. ५. परशुराम. ६. देवनदी=भागीरथी. ७. वीरांचीं शिरोरहित शरीरें. [असेंच वर्णन पंतकृत विराटपर्व, अध्याय ६।२९ मध्यें आढळतें]. ८. व्यूहरचना. ९. इन्द्रानें अतिवृष्टि केल्यामुळें गोपांच्या रक्षणास्तव कृष्णानें गोवर्धन पर्वत उचलून धरिला होता त्यावर वृष्टि करणारा मेघसमूह. १०. शोण+वाह+ऊन=रक्ताश्व जो द्रोण त्याहून उणा. ११. शिवाच्या युद्धास. १२. दबावीना. १३. द्रुपदपुत्र, अर्जुनाचा शालक, आणि द्रोणाचा शत्रु. १४. वाळूचा पर्वत. १५. क्षत्रियें (धृष्टद्युम्नानें). १६. ढाल. १७. तरवारी. १८. समर+उग्र+कर्म+कर=रणांगणीं उग्रकर्म करणारा असा. १९. वानरराजविशेष. हा किष्किन्धेचा राजा. हा मोठा पराक्रमी होता. ह्यानें आपल्या भावाची (सुग्रीवाची) भार्या हरण केल्यामुळें रामानें त्यास मारिलें. त्याची स्त्री तारा ही मोठी पतिव्रता होती.

द्रोणावरि झड घाली तो, जेंवि श्येनें[1] आमिषा[2] नेया[3]. ।
कौरव म्हणती बहुधा, 'काळचि हरणार यां[4] मिषानें यो[5].' ॥ ९
चढतां युगीं[6], ह्याच्या पृष्ठींहि, क्षिप्र सर्व विप्रभ[7] या ।
पाहुनि पर पृथ्वीपति[8] झाले; परि पावला न विप्र[9] भया ॥ १०
खंडुनि असि, चर्म, रथहि, मर्मीं सर्वत्र विंधुनि, करानें ।
घेउनि खर[10] शर, जोडी चापीं तो शक्तिसिंधु[11] निकरानें[12]. ॥ ११
प्राण हरावेचि म्हणुनि जो प्रखरतराशुगासि[13] गुरु सोडी, ।
तों तत्काळ चतुर्दशबाणांहीं त्यांसि[14] सात्यकी तोडी. ॥ १२
सात्यकिला षड्विंशति[15] शर हाणी द्रोण तो महाकोपी; ।
तो माधव[16] तितुकेचि प्रखर शर गुरुस्तनांतरीं[17] वोपी. ॥ १३
तों वीरांला राजा धर्म म्हणे, 'सैन्यपाल[18] पळवा हो ! ।
सात्यकिरणप्रवाहीं पडला गुरु, हा असाचि पळ[19] वाहो[20].' ॥ १४
बळप[21] पळविला; तैं गुरु दावी भृगुवीरसा[22] समर-सरणी[23]. ।
किति म्हणति 'देखिलाचि न यामागें या रसासम[24] रस रणीं.' ॥ १५
शैनेय[25] म्हणे, 'सूता ! द्रोणावरि नीट वाह[26] हाक रणीं; ।
करित नसे विप्राची धृतपरधर्मप्रवाह[27] हा करणी. ॥ १६
षट्कर्मींच[28] असावें नित्य रत, ब्राह्मणें अ-घात-रतें[29]. ।
क्षत्र[30] स्वधर्मयुद्धानुष्ठानें[31] सर्वथा अघा तरतें. ॥ १७

---

१. ससाणा. २. भक्षाला, मांसाला. ३. नेण्याकरितां. ४. या धृष्टद्युम्नाच्या रूपानें. ५. द्रोणास. ६. युग=जूं. ७. निस्तेज. ८. राजे. या पाहुनि सर्व पर पृथ्वीपति (शत्रुपक्षीय राजे) क्षिप्र विप्रभ झाले–असा अन्वय. ९. द्रोण. १०. प्रखर. ११. बलसमुद्र असा जो द्रोण. १२. आवेशानें. १३. त्यापेक्षां प्रखर बाणास. आशुग=बाण. १४. बाणास. १५. सव्वीस. १६. मधु यादवाचा वंशज, सात्यकी. १७. छातीच्या मधोमध. १८. सेनापति धृष्टद्युम्नास. १९. पळभर. २०. वाहत राहो. २१. सेनापति, धृष्टद्युम्न. २२. भार्गवरामसा. २३. युद्धरीति. २४. या युद्धरूप रसासारखा. २५. शिनिराजाचा नातू, सात्यकि. २६. घोडे. २७. परकीयांच्या (क्षत्रियांच्या) धर्माचा ओघ स्वीकारिला आहे ज्यानें असा हा द्रोणाचार्य. २८. अध्ययन, अध्यापन; यजन, याजन; दान, प्रतिग्रह; हीं षट्कर्में. २९. अहिंसारतें. ३०. क्षत्रियजाति. 'क्षत्रस्वधर्मयुद्धानुष्ठानें' असा पाठ आदर्शप्रतींत होता. ३१. क्षत्रियधर्मास अनुसरून युद्ध करण्यानें.

सात्यकिसीं द्रोणासीं होय महायुद्ध; तेधवां कविला[१] ।
वाटे, तद्बाण[२]निहतकटकशवभरें अहींद्र[३] वांकविला ! ॥ १८
इषुनीं झांकुनि घेती ते, करुनि छत्र, केतु, विध्वस्त[४]. ।
तो अप्रकाश[५] त्यांचा आप्त[६]कुमुदखेदहेतु विधुअस्त[७]. ॥ १९
सात्यकिनें कुरुगुरु[८]चीं कोदंडें[९] खंडिलीं रणीं सोळा. ।
त्या समरचमत्कारें केले ब्रह्मादिसुर नभीं गोळा[१०]. ॥ २०
शिष्याच्या शिष्याला[११] तो गुरुवर बहु मनांत मानवला. ।
कां नवलाव[१२] नव्हे, घटकर्ण[१३]गळीं जरि बसेलें[१४] कौनवला[१४] ? ॥ २१
गुरुयोजित सर्वास्त्र[१५]प्रत्यस्त्रें सात्यकि स्वयें शमवी; ।
रमवी सत्सुरदृष्टिसि, वमवी[१६] मद[१६], अहित[१७]दृष्टिसी भ्रमवी[१८]. ॥ २२
करितां गुरु[१९]शरपटलें दिनकरतेजोविनाश, तम खवळे[२०]. ।
सात्यकिकडे मनें, विजयार्थ, विनविल्याविना, शतमख[२१] वळे. २३
गुरु सात्यकि रक्षाया, धरुनि सुधैर्यायुधा बहुतरा[२२] जे[२३] ।
भिडले, झाले शस्त्रज्वलनीं, न करुनि विलंब, हुत[२४], राजे. ॥ २४
हरिनें जेंवि नराचा, अरुणें[२५] रथ पळविला न तपनाचा[२६]. ।
मुनि म्हणति परस्पर, 'हें पाहुनि झालेंचि सफळ[२७] तप; नाचा.॥ २५

---

१. पंडितास. २. त्यांच्या बाणांनीं मारलेल्या सैन्यांतील प्रेतांच्या ओझ्यानें. ३. **अतिशयोक्त्य**लंकार. अहि+इन्द्र=शेष. ४. भग्न. ५. अंधकार. ६. तो त्यांचा अप्रकाश, त्यांचे आप्त जे दुर्योधनअर्जुनादि हींच कुमुदें (चंद्रप्रकाशित कमळें), त्यांच्या खेदाला कारण असा विध्वस्त (चंद्रास्त) ठरला. ७. विधु+अस्त=चंद्रास्त. **उत्प्रेक्षा**लंकार. ८. द्रोणाचीं. ९. धनुष्यें. १०. एकत्र. ११. गुरुद्रोणाचा शिष्य अर्जुन, आणि त्याचा शिष्य सात्यकि, त्याला गुरु मनांत फार मानवला; गुरूनें फार वाखाणणी केली. १२. कौतुक, आश्चर्य. 'नवलास' असें पाठांतर. १३. कुंभकर्णाच्या गळ्यांत. १४. लहानसें पक्वान्न अडकेल. १५. अस्त्रें, आणि प्रत्यस्त्रें म्हणजे अस्त्रांच्या विरुद्ध आलेलीं अस्त्रें. १६. गर्वहरण करी. १७. अहित=शत्रु. १८. **कारकदीपका**लंकार. १९. बाणांच्या मोठ्या पटलानें (आच्छादनानें). २०. वाढे. २१. इन्द्र. २२. 'बहुतरा' हें 'सुधैर्यायुधा' याचें विशेषण सामान्यरूप. २३. जे भिडले, ते राजे हुत झाले—असा अन्वय. २४. दग्ध. २५. अरुणानें सूर्याचा रथ चालविला, त्यापेक्षां कृष्णानें पार्थाचा रथ अधिक वेगानें चालविला—असा अर्थ. २६. सूर्याचा. २७. सूर्यास्तापूर्वी जयद्रथाला मारण्याल अर्जुनाला अवकाश मिळणार म्हणून.

[1]'अरि एक क्रोश पुढें लक्षुनि ज्या ज्या शरा **विजय** सोडी, ।
क्रोश पुढें गेल्यावरि मागें तो तो तदीय शिर [2]तोडी. ॥ २६
तो कीं [3]सूत, मिरविला तिळभरहि [4]जयापुढें न वेग [5]मनें. ।
रविचे [6]उणे गुणें हय. जिंकितिल कवण तयां [7]नवे गमनें? ॥ २७
विंदानुविंद ताडिति **पार्था**सि जसे, तसेचि **गो**विंदा. ।
विरथ करुनि **अनु**विंदा मारी [8]लोकैकवीर तो **विं**दा. ॥ २८
ताडी [9]भालीं [10]त्यांतें कोपें **अनु**विंद तो गदाघातें, ।
ज्याचें चरणस्मरणचि नाशी बहु [11]नरकभोगदाघातें. ॥ २९
अनुविंदबाहुमस्तकखंडन केलें पळें [12]**सि**ताश्वानें. ।
[13]**न**रकीर्ति [14]नरबळें जरि हरितिल [15]हरिची बळें [16]<u>सिता</u> [17]श्वानें. ॥ ३०
[18]श्वश्रूकर जेंवि शिरे गेहीं, [19]जरि न म्हणती सुना, 'सीर', ।
व्यूहीं तेंवि **कुरु**[20]चमू धिक्कारुनि तो [21]धरासुनासीर. ॥ ३१
श्रमला; **जय**द्रथाच्या, जायासि न शक्त [22]हो, निकट कांहीं. ।
हें योजुनि वेढियला **पार्थ**, करायासि हानि, [23]कटकांहीं. ॥ ३२
त्या समयीं **पार्थ** म्हणे, '**दे**वा ! [24]संश्रितशुभाकरा ! वाजी ।
श्रमले कीं; श्रमशमना घडिभरि तरि रथ उभा करावा जी !'॥ ३३

---

१. त्याचें (शत्रूचें). २. अर्जुन हा पुढें एक कोश जाऊन पोंचल्यानंतर, त्याचे बाण मागें शत्रूंचीं शिरें तोडीत, इतकी अर्जुनाच्या गमनाची त्वरा होती. (अध्याय ९ गीति ८१ पहा). **अतिशयोक्ति** आहे. ३. सारथी कृष्ण. ४. ज्यापुढें. ५. अर्जुनाच्या गमनाची इतकी त्वरा असण्याचें कारण त्याचा सारथी तो होता कीं, ज्यापुढें मनोवेग यत्किंचितही गर्व मिरवूं शकत नसे. अर्थात् मनोवेगापेक्षां अर्जुनसारथी जो कृष्ण त्याचा वेग ज्यास्त असे-असा इत्यर्थ. सर्व वेगांत मनाचा वेग श्रेष्ठ होय, हें प्रसिद्धच आहे. ६. अर्जुनाच्या घोड्यांपेक्षां उणे (कमी). ७. नवीन, आणखी दुसरे. ८. लोक+एक+वीर=वीरश्रेष्ठ अर्जुन. ९. कपाळीं. १०. कृष्णातें. **पर्यायोक्त** अलंकार. ११. नरकयातना देणऱ्या पातकातें. १२. अर्जुनानें. १३. अर्जुनाची कीर्ति. १४. सामान्य मनुष्यांचीं सैन्यें. १५. सिंहाची. <u>१६. स्त्री.</u> १७. कुतरीं हरितील-इति शेषः येथें **संभावनालंकार** आहे. १८. श्वश्रू+कर=सासूचा हात. १९. यद्यपि. २०. सेना. २१. धरा (पृथ्वी)+सुनासीर (इन्द्र)=पृथ्वींद्र. अर्जुन, शिरे-इति शेषः. २२. अर्जुन. २३. [शत्रूच्या] सैन्यांनीं. २४. संश्रिताच्या (भक्ताच्या) कल्याणाची खाण जो तूं. (संबोधनार्थी).

कृष्ण म्हणे, 'माझ्याही हेंचि मनीं, लोळवीन हे वाजी.[1] ।
लोळिव तूंहि कुरुचमू, बा ! करिते तुजसवेंहि हेवा[2] जी.' ॥ ३४
उतरे रथावरुनि नर; पळवी कुरुकटक कृत[3]पराभव तें; ।
करि निर्मनुष्य मंडॅल[4] तो एक क्रोश आपणाभवतें. ॥ ३५
स्वस्थस्वांतें[5] क्रीडे कुरुबळपंकजवनांत[6] पार्थकरी[7]; ।
मंत्रबळें सु-सरोवर निर्मुनि, शरगृह अनातपार्थ[8] करी. ॥ ३६
शर जेंवि किरण भवते, जें कौरवकटक तोचि परिवेष[9]; ।
रविच कविमतें अर्जुन तेजें रूपेंहि, भिन्न[10] परि वेष. ॥ ३७
निःशंक कुरुबलीं नर, जेंवि हरि[11]शतावृतींहि शरभ वनीं. ।
पर्वी[12] शिवालयींसा, शिरला, [13]देवर्षि, शीघ्र शर भवनीं[14]. ॥ ३८
प्रभुनें मुक्त करुनि हय, चुचकारुनियां हळूच कौशल्यें, ।
निजबोधें[15] श्रितहृद्गत[16] दुःखेंसीं, सकळ काढिलीं शल्यें. ॥ ३९
अश्व परशरांहीं[17], भवतापांहीं[18] जेंवि दास[19], पोळविले; ।
ते देवें, भक्तिरसें जाणों स्वचरणरजांत, लोळविले. ॥ ४०
देवर्षि मुखीं घालुनि बोटें[20] म्हणे, 'हीं[21] ! सुयोधना कुटिला ! ।
भक्तिबळेंचि पहा हा परमेश्वर आजि अर्जुनें लुटिला.' ॥ ४१
ज्यांचें[22] पदनख दासां जें सुख दे, तापल्यां न तें विधु, तो ।
भगवान् स्वयें अहा ! या विजयहयां, सत्पदास[23] तेंवि, धुतो. ॥ ४२

---

१. शत्रूचे घोडे. (अंगुलिनिर्देश करून कृष्ण म्हणतो). २. स्पर्धा. ३. पराभूत केलेलें (कौरवसैन्य.) ४. वर्तुळाकृति भूमिभाग. ५. स्वस्थ मनानें. ६. कौरव-सैन्यरूप कमलवनामध्यें. रूपकालंकार. ७. अर्जुनरूप हत्ती. ८. अन्+आतप+अर्थ=छायार्थ. ९. परिधि, घेर. १०. निराळा, वेगळा. ह्या गीतीशीं पंतकृत आदिपर्व, अध्याय २५।८ ही ताडून पाहण्यासारखी आहे. ११. शेंकडों सिंहांनीं वेढलेल्या वनामध्यें. १२. पर्वकाळांत. १३. नारद. १४. शरगृहीं. १५. आत्मबोधें. १६. आश्रितांच्या हृदयांतलीं. १७. शत्रूच्या बाणांनीं. १८. संसारांतील दुःखांनीं. १९. भक्त. २०. मोठ्या आश्चर्यानें. ही लोकोक्ति आहे. २१. दुःखोद्गार. २२. 'ज्याचा पदनख' असें पाठांतर. २३. सत्पद=साधूंचे पाय. 'सत्यदास' असा रा० पराडकर यांच्या प्रतींत पाठ आहे व त्यावर 'खरोखरीच्या नोकराप्रमाणें' अशी टीप आहे.

आम्ही [1]दत्ततसे गुण गुरु लघु हो [2]वर्जुनों, नरा [3]बाबा ! ।
तूं धन्य, [4]खळहि; नातरि यापरि [5]हा अर्जुना ! न [6]रागावा. ॥ ४३
ज्याच्या श्रीपददास्यें पावे [7]तोखां सदा रमा [8]जाया, ।
हरितो मना, नराचा होउनि तो [9]खासदार, [10]माजा [11]यां. ॥ ४४
पुरुषार्थद ते केले, दासहयहितोदयाकर, खरारे. ।
झालासि दासदास, प्रभुही. तूं बा ! दयाकर खरा रे ! ॥ ४५
सुखद स्पर्श श्रीच्या, बहुधा न हयांसम, स्तनाचा [12]यां. ।
हें यश गाउनि, शिवसा, लागेल सुधी समस्त नाचाया. ॥ ४६
प्रेमें माता बाळा न्हाणी, कीं भक्त शंभुच्या लिंगा, ।
तैसाचि नरहयां हरि. कवि हो ! याचेचि पाय आलिंगा. ॥ ४७
औषध, [13]सुचणक, कल्पी [14]पीतपट पसाहि तोबरा माप. ।
श्रितसाहित्य कराया न बरा [15]मंदार; तो बरा [16]माप. ॥ ४८
[17]हरि [18]हरिततृणीं चारी तो प्रभु, ज्याचा प्रताप [19]दुर्वार. ।
'हरि हरि !' तई करिति, पद देउनि गणपतिशिरींहि दुर्वा [20]रें.॥ ४९
[21]तोकें तृपाशमना, कीं क्षालाया [22]तात तोक-मल, [23]पाणी ।
प्यायाचेंही वेंची; करि, न [24]पिउनि, तेंवि तो कमलपाणी. ॥ ५०
[25]उच्चैःश्रवा म्हणावा पार्थाच्या कां न 'नीच' तुरगांनीं ? ।
[26]त्यां पूजी [27]तो, ज्याचें यश [28]नंदनकाननीं [29]चतुरगानीं. ॥ ५१
योजुनि तुरगवर रथीं, आपण कुरुबल पहात देव रिघे; ।

---

१. दत्तात्रेयासारखे. दत्तात्रयांनीं निरनिराळे चोवीस गुरु केले होते. २. सोडीत नाहीं. ३. अरे बाबा अर्जुना ! ४. दुर्योधनहि धन्य. ५. कृष्ण. ६. खपावा. ७. संतोषार्ते. ८. स्त्री. ९. मोतद्दार. भगवंतांनीं आपल्या भक्ताची सेवा कशी केली ह्यासंबंधीं पंतकृत 'केकावली', श्लोक ७ व त्यावरील टीपा पहा. १०. माझ्या. ११. माझ्या या मना हरितो. १२. श्रीकृष्णास. १३. चांगले हरभरे. १४. पीतपट हा तोबरा, आणि पसा हें माप कल्पी. 'यथासंख्य' अलंकार. १५. कल्पतरु. १६. लक्ष्मीपति. १७. अश्व. १८. हिरव्या गवतांत. १९. दुर्धर्ष. २०. 'र'करणें=रडणे. २१. अपत्याची तहान भागविण्याला. २२. बाप. २३. उदक. २४. स्वतः न पितां. २५. इन्द्राचा घोडा. २६. त्या घोड्यांस. 'ज्यां' असें पाठांतर. २७. कृष्ण. २८. इन्द्राच्या नंदनवनांत. २९. चतुरांच्या गाण्यांत.

मग विजयातें, मर्दुनि रडवाया खलप, हात दे; वरि घे. ॥ ५२
चालवितां प्रभुनें तो गरुडें स्तविला तसाचि, रेथ, वातें. ।
फाटे परबल; वाटे तमचि, कनककशिपुवक्ष अथवा तें. ॥ ५३
वेदासि नास्तिक,.तसे गेले पार्थासि भीरु सोडूनी, ।
मोडूनि धर्मसन्नयमर्यादा, प्राज्य पाप जोडूनी. ॥ ५४
नद सिन्धुपासुनि, नरापासुनि पर, परतले न माघारे. ।
सुर म्हणति, 'भला ! क्रीडा करिसी शात्रवशशांत, वाघा!रे!' ॥ ५५
कुरुकंटकराहुवदनाआंतुनि ते कृष्ण रविशशी सुटले, ।
कीं ते मकर; व्यूहचि जाल; सुभट तंतु; तटतटां तुटले. ॥ ५६
कृष्ण जयद्रथ पाहुनि होति सुखी, जेंवि यज्ञवाट सुर, ।
मरुधन्वदेशमार्गी जैसे प्राशूनि तोय वाटसुर. ॥ ५७
गज गांठिला हरींनीं, तुडवुनि गेला मदांध पुच्छातें. ।
तुच्छातें बहु मानिति, तृषित मधुप जेंवि कुंटजगुच्छातें. ॥ ५८
श्वेतांश्व म्हणे, "न शकुन झाले यां आजि सा रथां बरवे. ।
प्रभुजी ! म्हणा, 'सुद्रष्टा तरिहि पहा आजिसार, थांब, रवे !'॥ ५९
म्यां वाहिलें प्रभुपदीं, तो, जिंकिल आजि सा रथां बेलें. ।

१. खलपतिला. २. तो रथ प्रभुनें चालवितां गरुडें स्तविला, तसाचि वातें [स्तविला]–असा अन्वय. ३. अंधकार. 'तमो ध्वांते गुणे शोके क्लीबं, वा ना विधुंतुदे' इति मेदिनी. उत्प्रेक्षालंकार. ४. हिरण्यकशिपूचें हृदय. हिरण्यकशिपु हा प्रऱ्हादाचा पिता. विष्णूनें नृसिंहावतार घेऊन याचें पोट चिरून यास मारिलें, अशी कथा आहे. ५. पाखंडी, वेदशास्त्रनिन्दक. ६. भित्रे. ७. धर्म+सत्+नय+मर्यादा=धर्म आणि सुनीती यांची मर्यादा. ८. पुष्कळ. ९. शत्रुरूप ससांत. १०. कौरवांचें सैन्य हाच राहू त्याच्या तोंडांतून. ११. कृष्णार्जुन. १२. जाळें. १३. उत्तम योद्धे. ह्या गीतींत 'परंपरितरूपक' आहे. १४. यज्ञमंडप. १५. निर्जल ओसाड देशाचे मार्गांत. १६. पांथ, प्रवासी. १७. गांठिलेला. १८. सिंहांनीं. १९. भ्रमर. २०. कुड्याच्या फुलांच्या झुबक्यास. २१. अर्जुन. २२. सहा रथ्यांस. ह्यांचीं नांवें अध्याय ८ गीति ६ मध्यें आहेत. २३. चांगला पाहणारा. २४. युद्धसामर्थ्य. २५. हे सूर्या ! २६. अध्याय ८।९३ पहा. २७. येथें 'बेल' म्हणजे पूजासाहित्य असें समजावयाचें.

जरि भानु बहुद्रष्टा[1], देखाया आजिसार थांबेल. ॥ ६०
देशिल जयद्रथा ! तूं मरुनि अयश आजि सा रथां नीचा ! ।
देवींच्या पदराला ढाळिल[2] हा आजिसार थानीच्या[3]." ॥ ६१
विजय असा हर्षे, तों दुर्योधन होय आडवा राया; ।
विघ्नहरा[4] विघ्न जसा, किंवा उदधीस आड[5] वाराया. ॥ ६२
कृष्ण म्हणे, 'कौंतेया ! श्रीमद्रुद्रापुढें[6] जसा मार[7], ।
आला पुरुषव्याघ्रा[8] ! दुर्योधन मूढ हा ससा; मार. ॥ ६३
तुज हा वराक[9] बाहे[10], तरि हरिस रणार्थ कां न बाहु[11] रुरू[12] ? ।
घालुनि गांठि, अधर्महि धर्माची करिल कां न बा ! हुरुरू[13] ?॥ ६४
मरणार्थ बाहतो हा तुज, नरसिंहास मस्त बकरा गा ! ।
करितील मराळाचें[14] काय, धरुनिही समस्त बकें[15] रागा ?' ॥ ६५
झाला धनंजयाला मान्य अभिप्राय हाटकपटाचा[16]. ।
त्या वाटे मोडावा खल, सुनृपा जेंवि हाट[17] कपटाचा. ॥ ६६
कुरुपतिरथाभिमुख रथ चालवितां नीट लोकनाथानें, ।
कटकें न रोधिति, जसीं रंभेचीं शुकविलोकना[18] थानें. ॥ ६७
पार्थावरि नृप[19] उठतां कुरुसेना विप्रभा[20] वदे, 'हा ! हा ! ।
होमी पतंग दीपीं, नुमजुनि तेजप्रभाव, देहा हा.' ॥ ६८
भूप[19] म्हणे, 'कां भ्यालां भट हो ! माझा प्रतापहात पहा. ।
परजीवन निःशेष प्राशील प्रलयभास्वदातप[21] हा. ॥ ६९

१. सर्व पहाणारा. २. हा आजिसार देवींच्या (महिषींच्या, राण्यांच्या) थानींच्या (स्तनांवरील) पदरा ढाळील (हालवील)–असा अन्वय. आपल्या पतींच्या सुरक्षितपणा-संबंधीं काळजीमुळें त्यांची छाती धडधडेल व पदर हालेल–असा भाव. ३. स्तनावरच्या. ४. विनायकास. ५. विहीर, कूप. ह्या गीत्यर्धांतील दोन्ही उपमा समर्पक आहेत. कारण दुर्योधनाला अपयश मिळणार, असें त्या ध्वनित करीत आहेत. ६. श्रीमत्+रुद्र=श्रीमत् शंकरापुढें. ७. मदन. ८. पुरुषश्रेष्ठा. ९. नीच. १०. बोलावी. ११. बोलावो. १२. रोही, हरिण. 'हरि मरणार्थ कां न बाहु रुरू' असा पाठभेद. १३. हुररेवडी, हुर्‍योहुर्‍यो. १४. हंसाचें. १५. बगळे. १६. सुवर्णासारिखा पीत पट ज्याचा अशा कृष्णाचा. १७. बाजार. १८. शुकाच्या दृष्टीला. १९. राजा (दुर्योधन). २०. कांतिहीन. २१. प्रलयकालच्या सूर्याचें ऊन.

जाणा म्यां कृष्ण सख्यापार्थासह आजि, हरुनि मद, वधिला. ।
पावेल भुजबळें नर न, जलधिच्या तेंवि, तरुनि मं[1]दवधिला.'॥ ७०
पार्थाहि म्हणे, 'जरि तूं वीर्यें झालासि पांडुच्या, पाहूं ।
शस्त्रास्त्रबळ तुझें; दे यश शा[2]रदचंद्रपांडु चापा. हूं.' ॥ ७१
हाणी तीन शर नरा, चार हयां, न[3]वघनप्रभास दहा; ।
तोडी प्रतोदहि. म्हणे तें पाहुनि जि[4]ष्णुचा सभासद 'हा !' ॥ ७२
पार्थें शर पाठविले भेदाया मर्म, वातसे, चवदा. ।
कृपणगृहीं अतिथि जसे, नृपदेहीं तेहि[5] बा ! तसेच, वदा. ॥ ७३
तितुकेचि पुन्हा झाले विफल, जसे दुर्जनीं सदुपदेश; ।'
तेव्हां 'सख्या ! तुझें बळ कोठें गेलें ?' म्हणे य[6]दुपदेश. ॥ ७४
पार्थ म्हणे, 'कवच दिलें गु[7]रुनें वा[8]त्सल्य देवविल याला. ।
नेतील न शस्त्रास्त्रें शक्रादि समस्त देव विल[9]याला. ॥ ७५
परि मी तुझ्या प्रसादें ऐसेंहि अभेद्य कवच खंडीन; ।
दंडीन अरिसि. माझी शक्ति, तसी कांपवील, थंडी न.' ॥ ७६
ऐसें वदोनि-मंत्रुनि शर कवचविदारणार्थ जों सोडी, !
'सर्वास्त्र'[10]घांतकास्त्रें अश्वत्थामा तयासि तों तोडी. ॥ ७७
विस्मित होउनि पार्थ प्रभुसि म्हणे, 'गु[11]रुसुतप्रभाव मला ।
हित अहितहि, जेंवि तमीं वाटेंत फणी मणिप्र[12]भा वमला. ॥ ७८

---

१. मत्+अवधि=माझ्या पाराला. २. शरत्कालीन चंद्रासारिखे शुभ्र यश. ३. नवीन मेघासारिखी कांति ज्याची अशा कृष्णाला. ४. इन्द्राचा. ५. 'तेंवि' असें पाठांतर. तसेच= निष्फळ, व्यर्थ. ६. यदु+पद+ईश=कृष्ण. ७. गुरूनें दिलेलें कवच. (दिलें=दिलेलें.) गुरूनें दिलेलें कवच याला (दुर्योधनाला) वात्सल्य देववील–असा अन्वय. द्रोणाचार्यांनीं दिलेल्या कवचामुळें (मागें अध्याय ९।९२ पहा) माझ्याविषयीं दुर्योधनाचे मनांत प्रेमभाव उत्पन्न होईल–असा भाव. ८. कृपाळूपणा. ९. नाशाला. १०. सर्वास्त्र नामक नाशकारक अस्त्रानें. ११. अश्वत्थाम्याचें सामर्थ्य. १२. [सर्पांच्या मस्तकांतील] मण्याचें तेज. कित्येक प्राण्यांच्या मस्तकामध्यें मणि अथवा मुक्ताफळें सांपडतात, अशी प्राचीन लौकिक समजूत आहे. यास आधारः–'करींद्रजीमूतवराहशंखमत्स्याहिशुक्त्युद्भववेणुजानि । मुक्ताफलानि प्रथितानि लोके तेषां तु शुक्त्युद्भवमेव भूरि ॥' (कुमारसंभव–सर्ग १ श्लोक ६ टीका पहा).

योजीन जरि पुन्हा, तरि मजवरिच फिरेल अस्त्र बापा ! हें. ।
साहें क्षण. जिंकितसे लीलेनें अरिस दास हा, पाहें. ॥ ७९
वश करिल, रसिकसा शिर बहु तुकुनिहि, काय गा ! शरेंठ कन्निला ? ।
काय इतर नरसा हर, ह्मणुनि हृदयीं स्मरें शर, ठकविला ?' ८०.
हय सूतपार्ष्णि सारथि मारुनि, खंडुनि समस्त हातेरें. ।
फोडुनि कवच, पळें करि पार्थ खळाचें पळांत भीतेरें. ॥ ८१
श्येनासीं धृष्टपणें गांठि बळें घालितां जसा चटक, ।
व्यसनीं पडे सुयोधन; तें पाहुनि सर्व धांवलें कटक. ॥ ८२
पार्थाचा रथ झांकुनि नाना शस्त्रांचिया समूहांनीं, ।
चुकविति सुयोधनाच्या प्राणाची, सर्व कुरुचमू, हानी. ॥ ८३
त्या काळीं जगदीशें पैरधृतिहर पांचजन्य वाजविला. ।
तन्नादें गजवैरमदनाशक केसरिनिनाद लाजविला. ॥ ८४
प्रभुशंखरवें कौरव, जेंवि गरुडगर्जनें महासर्प, ।
केले भग्न; नुरविला गांडीवें तिलहि परबळीं दर्प. ॥ ८५
कुरुबळविमुक्त नररथ, जंगमजनमुक्त माध्वसा, साजे. ।

१. डोलवून. २. सरडा. ३. इतर सामान्य मनुष्याप्रमाणें. ४. मदनानें. ५. दुर्दशा. ६. ससाण्याला. ७. दांडगेपणानें. ८. चिमणा. ९. शत्रूचें धैर्य हरण करणारा असा. १०. नामविशेष (शंख). पांचजन्य-पंचजन नामक दैत्यापासून कृष्णास हा शंख मिळाला, यावरून या शंखाचें हें नांव पडलें. या दैत्याची कथा अशी आहे कीं, हा समुद्राच्या तळाशीं राहात असे. एकदां भगवान् श्रीकृष्ण हे आपल्या संदीपनि नामक गुरूजवळ शास्त्रादिकांचा अभ्यास करीत असतां त्या गुरूचा मुलगा प्रभासतीर्थांत स्नान करीत असतां बुडाला. तो ह्या दैत्यानें पाण्याच्या तळाशीं नेला. हें कृष्णास कळल्याबरोबर तो पाण्यांत उडी टाकून पाण्याच्या तळाशीं गेला आणि तेथें त्या दैत्याचा वध करून त्याच्या उदरांतून त्यानें हा शंख काढिला व गुरूचा पुत्र गुरूस जीवंत आणून दिला. हा शंख सदहू दैत्याच्या अस्थींपासून निर्माण केला होता, असाही पुराणांतरीं उल्लेख आढळतो. ११. गजश्रेष्ठाचा गर्व हरण करणारा. ११. सिंहाचा शब्द (गर्जना). १३. लिंगायत लोकांच्या तावडींतून सुटलेल्या. जंगम, लिंगायत हे कडवे शिवभक्त आणि माध्व हे कडवे विष्णुभक्त. यामुळें या उभयतांचें परस्परांशीं मोठें वैर होतें. पंतांच्या वेळीं आणि तत्पूर्वीं चार पांचशें वर्षें ही स्थिति होती. तिचा दृष्टांत येथें पंतांनीं दिला आहे. १४. मध्वमतानुसारी ब्राह्मणसा.

गर्जति, जयद्रथाच्या हरणारे [1]मृत्युसाध्वसा [2]सा जे. ॥ ८६
[3]कृष्णांहीं, निज-दर-[4]वर वाजवुनि बहु, स्वशत्रु कोपविले, ।
कर्णकृपाश्वत्थामप्रभृतींचे सिंहनाद लोपविले. ॥ ८७
बहुतां कर्णादि महावीरांसीं एक विजय युद्ध करी. ।
[5]बहुतद्धि, करितिल काय क्रुद्धा [6]कण्ठीरवासि [7]रुद्ध, [8]करी ? ॥ ८८
भूरिश्रवा प्रभूच्या खंडी [9]करगत नवप्रतो[10]दांस; ।
तेणें काळहि कांपवि, केवळ न [11]सुमेरुवप्र, तो [12]दोस. ॥ ८९

अध्याय अकरावा.

येरी[13]कडे वृकोदर सात्यकि पांचाळ मत्स्य हे, भारी ।
भांडति कुरुवीरांसीं, जेंवि [14]महेभांसवें [15]महेभारी. ॥ १
धांवे द्रोण धराया धर्मातें, गरुड जेंवि नागातें. ।
गुरुशिष्ययुद्धचरित प्रेक्षकजनभान ठेविना गा ! तें. ॥ २
[16]खण्डी युधिष्ठिराच्या, आधीं [17]खरतरशरव्रजें, धनुला. ।
[18]हनुला धरुनि [19]निवविला वात्सल्यें, म्हणुनि हलुचि मग तनुला. ॥ ३
करुनि प्रसाद गुरुनें दिधली, ती गुरुसि दाखवी [20]शक्ती. ।
भक्ति[21]मदुत्तम धर्म प्रेषी द्रोणाकडे [22]महाशक्ती. ॥ ४
'द्रोणासि स्वस्ति असो,' ऐसीं तें सर्व बोलिलीं भूतें. ।
शक्ति महाकृत्यासी चळचळ तत्काळ कांपवी [23]भूतें. ॥ ५

---

१. मृत्युभयास. २. सहा. ३. उभय कृष्णांनीं, कृष्णार्जुनांनीं. ४. आपापले श्रेष्ठ शंख. ५. हें 'करी' याचें विशेषण. ६. सिंहास. ७. अवरुद्ध, अडविलेला, कोंडलेला. ८. गज. ९. हातांतील. १०. नवीन चाबुकास. ११. मेरूचा पाया. येथें अतिशयोक्ति अलंकार आहे. १२. भूरिश्रवा. १३. दुसरीकडे, अन्यत्र. १४. महा+इभ=मोठ्या गजांशीं. १५. महा+इभ+अरी=मोठे सिंह. १६. याचा कर्ता 'द्रोण' अध्याहृत. १७. तीक्ष्ण बाणांच्या समुदायानें. १८. हनुवटीला. १९. 'विनविला' असाही पाठ आहे. २०. सामर्थ्य. २१. भक्तिमतांमध्यें श्रेष्ठ. २२. शस्त्रविशेष. २३. भूमीतें.

शक्ति [1]ब्रह्मज्ञानें [2]ब्रह्मज्ञानें जसीच काळाची, ।
तेंवि द्रोणें हरिली ब्रह्मास्त्रें ती[3] [4]मनुष्यपाळाची. ॥ ६
भस्म करुनि शक्तीतें ब्रह्मास्त्र क्षु[5]ब्ध होय; [6]तच्छमना ।
ब्रह्मास्त्रानेंचि करी गुरुवत्सल धर्मराज [7]अच्छमना. ॥ ७
शरपंचकें विदारुनि [8]काय, क्रूर [9]क्षुरप्र सोडूनी, ।
गुरुचें धनु [10]मनुजेंद्र क्षितिवरि पाडी, पळांत तोडूनी. ॥ ८
सोडी द्रोण गदेतें; तीवरि धर्महि महागदेतें, हो ! ।
[11]सच्चरित [12]सवंग कुतुक दे, [13]नंदन बहु महाग देतें हो ! ॥ ९
प[14]डल्या भंगुनि, पावुनि सद्वीरमुखें सुवर्णन, [15]गदा त्यौं. ।
गुरुशिष्यरणा वर्णिति कवि, जेंवि अधन [15]सुवर्णनगदात्या. ॥ १०
चारी वाजी वधुनि, च्छेदुनि धनु, केतु भूमिवरि पाडी, ।
[16]भारद्वाज महात्मा धर्मासि शरत्रयें उरीं ताडी. ॥ ११
विर[17]थ [18]व्यायुध होउनि सहदेवरथीं चढे पळे धर्म. ।
कर्म असें घडतां त्या कविचा न स्वल्पही मळे [19]धर्म. ॥ १२
भूप पळाल्यावरि बहु नाश रणीं प्राप्त होय राजांस, ।
वध्यचि [20]अहिसा, अभिमुख येतां, गुरु, बंधु, सोयरा, [21]ज्यांस.॥ १३
धृष्टद्युम्न, घटोत्कच, सात्यकि, भीमादि वीर धर्माचे ।
मथिती कुरुकटकातें, जैसे दुःसह वि[22]पाक कर्माचे. ॥ १४
दूरुनि पांचजन्यध्वनि परिसुनि, बहुत भय धरी धर्म; ।
सात्यकिसि म्हणे, 'बापा ! धांव कसा. हो धनंजया [23]वर्म. ॥ १५

१. ब्रम्ह जाणणाऱ्यानें. २. ब्रह्मज्ञानाचे योगानें. ३. महाशक्ति. ४. धर्मराजाची. ५. संतप्त. ६. तत्+शमन=त्या ब्रह्मास्त्राचे शांतीस. ७. शुद्ध अंतःकरण ज्याचें असा. ८. देह. ९. खुरप्याच्या आकाराचें फळ लावलेला बाणविशेष. १०. मनुज+इन्द्र=धर्म. ११. 'दे' याचा कर्ता. १२. साधूंचें चरित्र कौतुक सवंग (स्वल्प किंमतीनें) देतें, आणि नंदनवन म्हणजे इंद्रवन महाग देतें. १३. इन्द्राचें वन. १४. त्या गदा मोडून पडल्या. १५. सुवर्णाचा पर्वत देणाऱ्यास. १६. द्रोण. १७. रथहीन. १८. वि+आयुध=आयुधहीन. १९. क्षात्रधर्म. मागें अध्याय २ गीति ३१ व तीवरील टीपा पहा. २०. सर्पासारखा. २१. ज्या राजांना. २२. परिपाक, परिणाम, फळ. २३. कवच (रक्षक).

व्यसनीं[1] सहाय होउनि आमाला, होय जो परासु[2] कृती[3], ।
शक्रादिलोकपालामध्यें बहुमान्य तो बरा सुकृती[4]. ॥ १६
समयीं सहाय होता[5] पुरुष श्रीविष्णुसींच तोलावा. ।
प्रियसख माधव[6] दोघे असतां न बुडो; तटासि तो लावा. ॥ १७
धांवा शीघ्र. असों या स्नेहरसाचा मनांत ओलावा. ।
माधवजी ! आजि तुम्हीं मित्रें[7] थडीला, म्हणोनि 'ओ', लावा.॥ १८
आहेत भीमधृष्टद्युम्नादिक मजसमीप; भय नाहीं. ।
बा ! त्वद्भुजाश्रितें म्यां विड्वर[8] पाहों नयेचि नयनांहीं.' ॥ १९
सात्यकि बोले, 'प्रभुजी ! चित्तीं चिंता करूं नका कांहीं. ।
हंसध्वंस[9][10] कधींतरि केला, संगरें[11] करून कोकांहीं[12] ? ॥ २०
गुरुकरचि शिरोरक्षक, भारावह काय ओखटा[13] टोप ? ।
गुरुवर सहाय असतां, व्हावा कोशास[14] हा खटाटोप ? ॥ २१
असतां सहाय साक्षात् प्रभु कोय[15] धनंजयास मी ? राजा ! ।
कृष्णा नरा क्रिया त्या सुकरा[16]; न धनंजया[17], समीरा[18] ज्या. ॥ २२
मी जातांचि करिल कीं तुझिया तो द्रोणविप्र हरणातें[19]. ।
बा ! सांपडतां सोडिल संप्रहरण[20] कोण विप्रहरणातें[21] ? ॥ २३
सांगावें धनपतिनें[22] निधिचें रक्षण जसेंचि यक्षातें[23], ।
कथिलें तैसेंचि तुझें[24] विजयें मज आजिदक्षातें[25]. ॥ २४

---

१. संकटांत. २. मृत. ३. कुशल. ४. धन्य. ५. होणारा. ६. मधुकुलोत्पन्न कृष्ण व सात्यकी. ७. अर्जुन. ८. अतिशय दुःखद अशी स्थिति, नायनाट. विड्=शाप देणें, अकल्याण चिंतिणें. ९. हंसाचा भंग (पराजय). १०. मोरोपंतकृत कर्णपर्व, अध्याय २८, त्यांत हंसकाककथानक आहे, तें रसिकांनीं अवश्य वाचावें अशी सूचना आहे. ११. युद्ध. १२. कावळ्यांनीं. १३. गुरुकर (गुरूचे हात) शिरोरक्षक (आपल्या मस्तकाचें रक्षण करण्यास समर्थ) [आहेत], भारावह (जड) [आणि] ओखटा (वाईट, व्यर्थ) [असा जो] टोप (शिरस्त्राण) [तो शिरोरक्षक होईल] काय ?—असा अन्वय. अर्थात् 'नाहीं' हें अपेक्षित उत्तर. १४. कशाला. १५. काव्यार्थापत्ति आहे. १६. करण्यास सुलभ. १७. अग्नीस. १८. वाऱ्यास. १९. तुझ्या हरणातें. २०. सशस्त्र. प्रहरण=शस्त्र, आयुध. २१. वि-शस्त्रातें. २२. कुबेरानें. २३. कुबेराच्या सेवकाला. २४. तुझें रक्षण. २५. रणदक्षातें (मज).